# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती इतिवृत्तांत

**दिनांक ०८-०४-२००४ पासून**

**दिनांक २४-०६-२००४**

**रजिष्टर क्र. ८**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
# स्थायी समिती सभा

| अ. क्र | स्थायी समिती सभेचा दिनांक | विषय क्र. व ठराव क्र. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | ०८-०४-२००४ | विषय क्र. १ ते विषय क्र. XXXX | |
| ०२. | १९-०४-२००४ | ---- | |
| ०३. | २९-०४-२००४ | विषय क्र. ०२ ते विषय क्र. XXXX | |
| ०४. | १०-०५-२००४ | विषय क्र. ०३ ते विषय क्र.१३ | |
| ०५. | १७-०५-२००४ | विषय क्र. १४ ते विषय क्र. १७ | |
| ०६. | २७-०५-२००४ | विषय क्र. १८ ते विषय क्र. २६ | |
| ०७. | ०७-०६-२००४ | विषय क्र. २७ ते विषय क्र. ३० | |
| ०८. | २३-०६-२००४ | ---- | |
| ०९. | २४-०६-२००४ | विषय क्र. ३१ ते विषय क्र. ३९ | |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०८-०४-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का. व. क्र. ०१) इतिवृत्त. गुरुवार दिनांक ०८-०४-२००४ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री. भाऊसाहेब ताठे यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ११.५० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३. | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण | -//- |
| ४. | स. स. श्री. शेख इलियास किरमानी शे. उमर | -//- |
| ५. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ६. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ७. | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फयार खान | -//- |
| ८. | स. स. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव | -//- |
| ९. | स. स. श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल | -//- |
| १०. | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| ११. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| १२. | स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| १३. | स. स. श्री. रगडे भगवान दगडुजी | -//- |
| १४. | स. स. श्री. मुनाफ शेख यासीन | -//- |
| १५. | स. स. श्री. सलिम स. युसूफ | -//- |

**विषय क्र. १ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती पदावर निवड करणे.

**संवाद :**

**नगरसचिव** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक ०१-०४-२००४ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ८८.४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषीत करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ०४-०४-२००४ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारण्याची कार्यवाही पुर्ण झाली असून, दिनांक ०४-०४-२००४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाली आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १. | श्री. सय्यद सलीम सय्यद युसूफ |
| २. | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |

**पिठासन अधिकारी** : सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येत आहे.

(पिठासन अधिकारी छाननी करतात.)

**पिठासन अधिकारी :** छाननीचे काम पुर्ण झाले असून, खालील नामनिर्देशन पत्रे वैद्य ठरलेली आहेत.

१. श्री. सय्यद अली य. युसूफ ०२. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन

वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यायचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर, इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच संमतीने ३० मिनिटाच्या अवधीत म्हणजेच १२.३० वाजेपर्यंत आपले नाव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समिती सभापती पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.३० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समिती पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्थायी समिती पदासाठी ०२ उमेदवारांपैकी विहीत मुदतीत एकही उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले नाही.

आता स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १. | श्री. सय्यद सलीम सय्यद युसूफ |
| २. | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |

मतदानाबाबत गोपनियता पाळता यावी. म्हणून मतपत्रिकेच्या स्थळप्रतिवर अनुक्रमांक राहील मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सरमिसळ करण्यात येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांक मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका थोडयाच वेळात तयार होतील व मतदानाला सुमारे ०१.०५ वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी/अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी व त्यानंतरच नगरसचिव यांनी सर्व स. सदस्यांच्या माहितीसाठी नमूना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** नवीन आठ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून सर्वसाधारण सभेत निवड झालेली आहे. त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करावे.

याचवेळी नवीन आठ सदस्यांच मा. सभापती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**पिठासन अधिकारी :** मतपेटीजवळ नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे. व मतपेटीला कुलूप लावुन तिची चावी माझ्याकडे आणुन द्यावी व मतपेटी मोहोरबंद करुन घ्यावी. (पिठासीन अधिकारी यांच्या सहीने मतपेटी मोहोरबंद करण्यात आली.)

सभाकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वत: उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर, त्यांनी मतमोजणी पाहण्याकरीता एखादया सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणुन पाठविता येईल त्यासाठी मतदान सुरु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये. नगरसचिव यांनी कृपया मतदान संबंधीच्या सुचना सभागृहाच्या निर्दशनास आणून द्याव्यात.

**पिठासन अधिकारी :** नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यात झालेली आहे. क्रमांक १ वर श्री. घोडले नंदकुमार राधाकिसन व क्रमांक २ वर श्री. सय्यद सलिम सय्यद युसूफ यांचे नांव आहे. आता मतदानाला सुरुवात होत आहे. स. सभासदांची नांवे पुकारण्यत येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (F) च्या अनुषंगाने मतदानासाठी ३० मिनिटांचा कालावधी देण्यात येत असून, सभागृहातील घडयाळाप्रमाणे आता ०१.०५ वाजले असून, मतदान ०१.३५ वाजता संपले सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (G) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सभापती पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदी प्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक ०५-०४-२००४ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असून, या संबंधी निर्गमीत आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमून देण्यात आलेली आहेत. त्यांनी ती कामे जबाबदारी पार पाडावीत जनसंपर्क अधिकारी मतदानास पात्र असलेल्या सदस्यांची नांवे पुकारतील.

**नगरसचीव** : १. मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेनचेच आपले मत नोंदवावे.

३. सभा कामकाम नियमावलीचे नियम क्र. ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर, त्यांना मा. पिठासन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका येईल.

४. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५० कोणत्याही सभासदाला एकापेक्षा जास्त इच्छुकांनी आपले मत देता येणार नाही. मतदान करते वेळी प्रत्येक सभासद मतदान पत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्यांच्या नावांसमोर फुली करील (x) ५. सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदीनुसार खालील परिस्थिती मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१) जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहीला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर खुण केलेली असेल अथवा

२) जी छिंद्राकीत (परफोरेटेड) नसेल अथवा

३) जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरुपयोगी आहे.

**जनसंपर्क अधिकारी :** नांवे पुकारल्यानुसार स. सदस्य श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन, स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक यांनी मतदान केले. सभापती श्री. ताठे मतदान केले. करण्यासाठी गेल्यानंतर पिठासीन अधिकारी म्हणुन स. स. काशिनाथ कोकाटे यांनी काम पाहिले. यानंतर श्री. संजय पांडूरंग शिरसाठ श्री. माणिक लक्ष्मण साळवे, श्री. शेख इलियास किरमाणी, श्रीमती जयश्री किवळेकर, सौ. शाहीन जफर व महमुद जफर, सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान, श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव, यांनी मतदान केले. श्री. मेघावाले मोहन धन्नूलाल यांनी मदतनीसाची लेखी मागणी केल्यानुसार मा. पिठासीन अधिकारी यांनी सुचना केल्यानुसार मुख्यलेखाधिकारी श्री. एम. पी. खैरनार यांनी त्यांना मदत केली. तसेच श्री. पारे सोपान भाऊराव यांनी सुध्दा मदतनीसाची लेखी मागणी केल्यानुसार पिठासीन अधिकाऱ्यांनी सुचविल्याप्रमाणे लेखाधिकारी श्री. संजय पवार यांनी त्यांना मतदानासाठी मदत केली. यानंतर श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ यांचे नांव पुकारले असता पिठासीन अधिकारी म्हणून पुन्हा श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक यांनी काम पाहीले. श्री. काशिनाथ कोकाटे यांनी मतदान केले. यानंतर श्री. सावंत मधुकर दामोधर, श्री. रगडे भगवान दगडुजी, श्री. शेख मुनाफ शे. यासिन, श्री. स. सलिम स. युसूफ यांनी मतदान केलेले मतदानासाठी एकूण सोळा होत. सोळा सदस्यांनी मतदान केलेले आहे.

**पिठासन अधिकारी :** आता ०१.३५ वाजले असून, मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिके टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी. उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये व सभागृहात शांतता ठेवुन निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्यास सहाकार्य करावे. ही विनंती.

( मतमोजणी करण्यात येते.)

**पिठासन अधिकारी :** मतमोजणीचे काम पुर्ण झाले आहे.

एकुण मतदान - १६
अवैध मते - ००
वैध मते - १६

उमेदवारांनी पडलेली मते खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | पडलेली मते |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सलीम सय्यद युसूफ | ०६ |
| २. | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन | १० |

मत मोजणीच्या निकालावरील मी असे घोषीत करतो की, स्थायी समिती सभापती पदासाठी श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले याची बहुमताने

निवड झाली असून, मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी सभापती पदाचे आसन ग्रहन करावे.

यावेळी नवनिर्वाचित सभापती यांचे मावळते सभापती श्री. भाऊसाहेब ताठे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात. प्रशासनातर्फे मा. आयुक्त, नगरसचीव पुष्पगुच्छ देवुन स्वागत करतात. (नवनिर्वाचित सभापती आसन ग्रहन करतात.) यानंतर नवनिर्वाचित सभापती श्री. नंदकुमार घोडेले यांचे समयोजित भाषन होते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार सभापती स्थायी समिती पदासाठी स. स. श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांच्या बहुमताने झालेल्या निवडीस मंजूरी देण्यात आली.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १९-०४-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का. व. क्र. ०२) इतिवृत्त. सोमवार दिनांक १९-०४-२००४ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री. नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.०५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ४. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ५. | स. स. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव | -//- |
| ६. | स. स. श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल | -//- |
| ७. | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| ८. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ९. | स. स. श्री. मुनाफ शेख यासीन | -//- |
| १०. | स. स. श्री. सलिम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती :** आपणा सर्वांना माहितच आहे. लोकसभा निवडणूक आचार संहिता असतांना आजची सभा आयोजीत केलेली आहे. सर्वांना विनंती की, निवडणूकीची ज्यांचेवर जबाबदारी आहे. मा. जिल्हधिकारी यांनी जे निर्देश दिले त्याचे पालन करणे आवश्यक आहे. कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. आचार संहीतेचे काटेकोर पालन करुन या सभेचे कामकाज करायचे आहे. कोणत्याही प्रकारच्या आचारसंहितेचा भंग होणार नाही. याची काळजी घ्यायची आहे. चर्चेला सुरुवात करावी. पत्रकार बांधवाना पत्रकार कक्षात प्रवेश देण्यात यावा. कोणताही विषय कार्यक्रम पत्रिकेवर नाही. धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. आडवडयातून एक वेळेस तरी स्थायी समितीची बैठक व्हावी म्हणून ही बैठक आयोजीत केलेली आहे. पत्रकारांना विनंती की, आचार संहीतेचा भंग होणार नाही अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात येऊ नये याची काळजी घ्यावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** सध्या शहरात व मराठवाडयात सुध्दा पाण्याची परिस्थिती मोठया प्रमाणात भेडसावत आहेत या शहरात पाणी पुरवठयासंबंधीची परिस्थिती कशी व पुढील एक महिन्यात कशी व्यवस्था राहील याबाबत खुलासा करण्यात यावा. प्रशासनाचे नियोजन तसेच जायकवाडी जलाशयाची आजची परिस्थिती काय आहे.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता श्री. पानझडे यांनी खुलासा करावा. स. सदस्यांना विनंती की, सूचनात्मक प्रश्नांची विचारणा व्हावी. पुन्हः पुन्हः विनंती की, आचारसंहितेचा भंग होणार नाही. मतदान आकर्षित होणार नाही. फक्त

सूचना करणार आहोत. पाणीपुरवठा कसा सुरळीत राहिल याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.) :** जायकवाडी जलाशयात जो जिवंतपाण्याचा साठा आहे तो संपल्यात जमा आहे. आपतकालीन योजना राबवावी लागणार आहे. जायकवाडी येथील जे अप्रोज चॅनलचे मुख आहे. त्या ठिकाणाचा गाळ काढण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. तसेच जे अतिरिक्त पंपींग स्टेशन आहेत. त्याचे सुध्दा काम सुरु केलेले आहे. त्याठिकाणी ६०-६० एच. पी. चे ८ पंप आहेत त्याची दुरुस्ती करुन काम करण्याचे सुरु आहे. याद्वारे आपतकालीन काळात इंटेक मधुन पाणी होणार आहेत. बऱ्याचशा भागात एक दिवसा आड पाणी दिले जाते. सिडकोला काही भागात दोन-तीन दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो. आता सध्या पाण्याच्या संदर्भात तुलनेत तक्रारी कमी आहेत. सिडको व इतर भागात सरसकट एक दिवसाआड पाणी पुरवठा करणार आहोत. उन्हाळाभर पाणी पुरवठा सुरु राहील.

**श्री. संजय शिरसाठ :** आचार संहितेच्या काळात सुध्दा आपण बैठक घेत आहोत व या सभेत सदस्यांनी कोणत्या मुदयावर व कशा पध्दतीने चर्चा करावी याबाबत अगोदरच उल्लेख केला. स्थायी समितीच्या बैठकीला बहुतांशी आर्थिक विषय चर्चेला असतात. महापालिकेचा फायदा होण्याच्यादृष्टीने चर्चा करणे हा आचारसंहितेचा भंग होत नाही. असे माझे मत आहे. होर्डींगच्या संदर्भात टेंडर काढण्यात आले होते. सर्वेक्षणासाठी महापालिकेने ४.५० लक्ष रु. जवळपास खर्च केले. ज्या एजन्सीने सर्वेक्षण केले त्यांनी असे दाखवून दिले की, या शहरात अनेक महत्वाची ठिकाणे आहेत व त्या ठिकाणी होर्डींग्ज लागल्यास महापालिकेचे उत्पनन मोठया प्रमाणात वाढेलच. ८० लक्ष पर्यंत उत्पन्न वाढेल. जे उत्पन्न ४-५ लक्ष दरवर्षी येत होते ते आता जवळपास ७५-८० लक्ष दरवर्षाला येणार असे दाखविण्यात आले. त्यासाठी २००३ ला टेंडर काढण्यात आले. टेंडर होवून ९ महिने आले. ४०-४४ लक्षचे टेंडर होते. त्यांच्या अगेन्समध्ये २० लक्ष रु. घेण्यात आले. उर्वरीत जे उत्पन्न महापालिकेस येणार होते ते येण्याची शक्यता कमी आहे. ९ महिन्याच्या कालावधी गेला. ३ महिने बाकी आहे. वेळ वाया जातो आहे. आजही म्हणावी तशी कार्यवाही याबाबत होत नाही. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जो कोणी टेंडर घेतो त्या एजन्सीला महापालिकेचे सहकार्य सुध्दा मिळत नाही. अशी परिस्थिती आहे. या महापालिकेतील काही अधिकारी पुर्वीचे जे कुणी अनाधिकृत होर्डींग लावत होते. त्यांना सहकार्य करतात. यात महापालिकेचे ५० लक्षचे नुकसान होते यास जबाबदार कोण? संबंधित एजन्सी धारक यांनी पत्र देवून काही साईड मध्ये बदल करण्या संदर्भात मागणी केली व सहकार्य करावे म्हणून नमूद केले होते व महिन्याचा कालावधी गेला. कार्यवाही नाही. मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा. सभापती** : उत्पन्नाच्या बाबतीत स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्या बाबतीत होर्डींग्जच्या माध्यमातून मोठया प्रमाणात तूट निर्माण होत आहे. ती भरुन निघणार असेल किंवा महापालिकेने निविदा धारकाकडे ज्या निविदा शर्ती व अटीनुसार होर्डींग्जचे टेंडर दिलेले आहे व त्यानुसार होर्डींग निविदाधारक पालन करीत नसेल तर, प्रशासनाने काय पावले उचलली

याबाबत खुलासा करावा. तसेच अनाधिकृत जाहिरात फलकाबाबत देखील मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : आचारसंहिता असल्यामुळे काही मुद्यांवर मला स्पष्टपणे बोलता येणार नाही. महापालिकेच्या उत्पन्नाच्या बाबत जे काही प्रामाणिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. यात दुमत नाही. मनपाचे उत्पन्न वाढावे याबाबतचा आढावा मी स्वत: व श्रीयुत खैरनार मुख्यलेखाधिकारी यांनी घेतलेला आहे. होर्डींग्जच्या बाबती कॅटेगिरीज आहेत. ओ. बी. सी. असे गट आढळल्या त्याबाबतीत चर्चा झालेली आहेत. झालेले काम व उर्वरीत काम अशा पध्दतीने लवकर करता येईल. याबाबत सुचना दिलेल्या आहेत. अनाधिकृत होर्डींग्ज असतील परंतु खाजगी मालकीच्या जागेवर असेल तरी परवानगी लागते. त्याबाबतचा खुलासा जागा निहाय मालमत्ता अधिकारी यांनी कारणे आवश्यक आहे.

**मालमत्ता अधिकारी :** सेल ॲड एजन्सीला निविदा देण्यात आलेली आहे. त्या एजन्सी बरोबर संयुक्तीक पाहणी दिनांक १७-०४-०४ रोजी केलेली असून, अ गटार येणाऱ्या २२ साईटच्या जागा निश्चितच केलेल्या आहेत. त्यांना तसे पत्रही देणार आहोत. २२ साईटस मी स्वत: त्यांचे प्रतिनिधीला दाखविले.

**श्री. संजय शिरसाठ :** माझा प्रश्न वेगळा होता. ९ महिन्यापूर्वी टेंडर झाले. ४४ लख उत्पन्न येणार होते. टेंडर नोटीसच्या अटी व शर्तीप्रमाणे २० लक्ष रुपये संबंधित एजन्सीज महापालिकेकडे जमा केलेले आहे. सन २००३ सालचे टेंडर घेतलेले आहे. यात किती महिने झाले. १७-०४-२००४ रोजी साईट बदलून व कोणत्या दयायच्या कोणत्या नाही यावर चर्चा होते. यासारखे दुर्देव महापालिकेचे दूसरे असू शकत नाही. मालमत्ता अधिकारी यांचेकडे अति. चार्ज दिलेला आहे. यापूर्वीचे जे अधिकारी होते. त्यांनी कार्यवाही का केलेली नाही त्याचा खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : सेल अँड एजन्सीकडून फक्त २० लक्ष रुपये जमा केलेले आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** मनपाच्या अटी शर्तीनुसार २० लक्ष रुपये जमा केलेले आहेत. एकुण २५५ साईटस त्या एजन्सीला देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ५०-६० साईट क्लिअर घेवून देण्यात येत असेल तर, यामुळे मनपाचे उत्पन्न फारसे वाढणार नाही. साईट क्लिअर करण्याची या घटकेला कार्यवाही होते. सर्वेक्षण कशाच्या अधारे करण्यात आले होते.

**मा. आयुक्त** : ए. बी. सी. चा तपशील मालमत्ता अधिकारी यांना देता येत नसेल तर उपआयुक्त श्री. शिंदे यांनी यावर अभ्यास केलेला आहे. त्यांनी आढावा घेतलेला आहे. परवानगी घेवून ते परिनिरीक्षका बरोबर गेलेले आहेत. त्यासाठी पुढील सभेत याबाबतची माहिती दिली जाईल.

**मा. सभापती** : उपआयुक्त श्री. शिंदे यांचा दुरध्वनी मला सुध्दा आलेला होता. आताच मा. आयुक्तांनी खुलासा केल्याप्रमाणे पुढील बैठक लगेच आडवडयात होणार आहोत.

**श्री. संजय शिरसाठ :** बैठक होईल तेव्हा होईल. ज्यांनी टेंडर घेतले त्यांनी २० लक्ष मनपास दिले व २ महिन्याचा कालावधी गेला. २-३ महिने राहीले. उर्वरीत २०-२४ लक्ष रुपये मनपास येणार आहेत का हा माझा प्रश्न आहे दोन महिन्यात काम पूर्ण होणार आहे का?

**मा. आयुक्त** : काही साईटस क्लिअर झालेल्या असतील जेथे अडचण आलेली असेल त्याचा तपशील देता येईल त्यासाठी प्रशासनाला मुदत देण्यात यावी. काम झालेच नाही. असे म्हणता येणार नाही.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा जेणे करुन स. सदस्यांचे समाधान होईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने स. सदस्य श्री. शिरसाठ यांनी प्रश्न उपस्थित केला. आचार संहीता एक दीड महिन्यापासून लागू आहे. होर्डींग संदर्भात निविदा घेवून ९-१० महिन्याचा कालावधी गेला. निविदा दिलेल्या आहेत. असे असतांना ४०-४५ लक्ष रु. ऐवजी २० लक्षच रुपये उत्पन्न मिळत असेल. ज्या जागा त्या एजन्सीला निश्चित करुन दिल्या अशा किती तरी जागांवर होर्डींग अस्तित्वात आहेत त्या बदल्यात उत्पन्न मिळणार आहे. त्याची माहिती सभागृहात ठेवण्यात यावी. नफा/तोटा किती होईल हे आजच समजून येईल.

**मा. सभापती** : खुलासा करण्यात यावा की, निविदेमध्ये किती साईट दिलेल्या होत्या. किती ठिकाणच्या साईट क्लिअर झालेल्या आहेत. किती प्रलंबीत आहेत. त्याबद्दल मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** एकूण २६२ साईटस आहेत. ६२ साइटस ' अ ' येतात. त्यापैकी साईटस क्लिअर करुन दिलेल्या आहेत. दि. १७-०४-०४ रोजी सर्वे करण्यात आलेला आहे. १० साईटस या खाजगी मालमत्तेवर येत असल्याने वादग्रस्त आहे. २२ जागांसंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे. व उर्वरीत जाहीरात फलके लावलेले आहेत.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** १० महिन्यापुर्वी टेंडर झाले दि. १७-०४-२००४ रोजी सर्वे करण्यात आला. गेल्या मागील ९-१० महिन्याच्या कालावधीत मालमत्ता विभागाने काय कार्यवाही केलेली आहे. त्याचा खुलासा करण्यात यावा.

**मा. आयुक्त** : तोच प्रश्न वेगळया पध्दतीने विचारला तरी उत्तर एकच राहील. कोणत्याही गुत्तेदराच्यादृष्टीने ' अ ' गटार येणाऱ्या साईटसला जास्त महत्व दिले जाते. कारण त्यात त्यास जास्त उत्पन्न येणारे असते. ' अ ' गटार येणाऱ्या साईटस क्लिअर प्राधान्याने रिकाम्या करुन देण्यात याव्यात अशी मागणी असते. ' ब ' आणि ' क ' गटार पुष्कळ साईटस उपलब्ध असल्यातरी त्या ठिकाणी गुत्तेदाराची काम करण्याची उत्सुकता नसते. याचा तपशील पूढील सभेत देण्याची विनंती प्रशासनाने केली आहे. याबाबतीत जे प्रयत्न झालेले आहेत. त्याबाबत संबंधित अधिकारी निश्चित खुलासा करतील. ज्या ही अडचणी झालेल्या असतील त्यानुसार साधक बाधक चर्चा करता येईल. याबाबतीत दुर्लक्ष झाले असेल हा प्रश्न प्रशासनाला माहित नाही असे नाही.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** एकूण २६२ साईटस आहेत. काही साईटसमध्ये संबंधितास फायदा होत नाही. म्हणून करण्यास तयार नाही. असे म्हणता येणार नाही. अटी व शर्तीनुसार व टेंडर नुसार ज्या साईटस नेमून दिलेल्या आहेत. त्या साईटस एजन्सीजला घ्याव्याच लागतील. त्या एजन्सीचे काम केले नही तर, महापालिकेला जी रक्कम एजन्सीज कडून मिळणार होती ती वसूल करण्यात यावी. असे माझे स्पष्ट मत आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** मालमत्ता अधिकारी यांनी गोलमोल उत्तर दिलेले आहे. ' अ ' गटार येणाऱ्या एकूण ६२ साईटस असून, काही जागा वादग्रस्त आहेत. त्या

सर्वेक्षण करतांना का निर्दशनास आलेले नाही. जो खर्च सर्वेक्षणासाठी झाला त्यास जबाबदार कोण टेंडर चुकीचे जाहीर केलेले आहे की, ही चूक प्रशासनाने मान्य करावी. अगोदरच महापालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. आपल्या विनंतीस मान देवून हा विषय पुढील बैठकीत आपण घेणार आहोतच.

**मा. सभापती** : पोटतिडकीने स. सदस्य या ठिकाणी बोलतात. परंतू प्रशासनाची अडचण लक्षात घेऊन पुढील सभेत सविस्तर माहीती प्रशासनाने सादर करावी.

**सौ. शाहीन जफर :** जो प्रश्न मी उपस्थित करणार आहे. या प्रकरणाबाबत एक वर्षापासून चालू आहे. सिल्लेखान्यातील जागेसंबंधीचे आहे. संबंधित व्यक्तीने अनाधिकृत घराचे बांधकाम केले. याबाबत प्रशासकीय अधिकारी, विधी सल्लागार यांना माहिती दिली. संबंधित व्यक्तीने खालच्या कोर्टात प्रकरण सादर केलेले होते. कोर्टाने त्या व्यक्तीच्या विरोधात निकाल दिला. यानंतर सदर व्यक्तीने सिव्हील कोर्टात प्रकरण सादर केले. तेथे सुध्दा त्या व्यक्तीच्या विरोधात निकाल दिलेला आहे. त्यानंतर सदर व्यक्तीने मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले. तेथे सुध्दा त्या व्यक्तीच्या बाजुने निर्णय दिलेला नाही. असे असतांना सुध्दा कार्यवाही का होत नाही म्हणून विचारणा केली असता बरोबर उत्तर मिळाले नाही. प्रशासकीय विभागाला कळविलेले आहे असे उत्तर मिळते प्रशासकीय विभागात विचारणा केली असता श्री. कंकाळ प्रशासकीय अधिकारी यांचेकडुनही कार्यवाही करण्यासाठी पोलीस कुमक उपलब्ध होत नाही. असे उत्तर मिळते. अमूक अमूक समस्या आहेत. न्यायालयाने आदेशाचे कोणतेही पालन होत नाही. खेद वाटतो. सदर जागेवरील अतिक्रमण काढावे न्यायालयाचे आदेशाचे कोणतेही पालन होत नही. खेद वाटतो. सदर जागेवरील अतिक्रमण काढावे न्यायालयाचे आदेश आहेत. पूर्ण अतिक्रमण काढून मटेरियल जप्त का केले जात नाही. निर्देश देवून १ महिना झालेला आहे. अदयाप का कार्यवाही झालेली नाही. मला न्यायालयाचे आदेशाची प्रत द्यावी. मला अवमान याचिका दाखल करावयाची आहे.

**मा. सभापती** : न्यायालयाचे आदेश असतील तर, विधी सल्लागार यांनी खुलासा करावा त्याची प्रत प्रशासकीय विभागाला दिलेली असेल तर, श्री. कंकाळ प्रशासकीय अधिकारी यांनी का कार्यवाही केलेली नाही. न्यायालयाचे स्पष्ट आदेश काय होते. खुलासा करण्यात यावा.

**विधी सल्लागार :** सिल्लेखाना येथील अनाधिकृत बांधकामासंबंधी श्री. शेख नवाब या व्यक्तीने जागेच्या संदर्भात खालच्या न्यायालयात दावा दाखल केलेला होता. अतिक्रमण काढण्याबाबतची जी कार्यवाही होती त्यास मनाई हुकूम मिळावा म्हणून वेळोवळी न्यायालयात मागणी केलेली आहे. ती विनंती खालच्या कोर्टाने अमान्य केली. त्यानंतर मा. जिल्हा न्यायालयाने तेथे अमान्य केले. त्यानंतर मा. उच्च न्यायालयात रिट दखल केली तेथे स्वतः त्या व्यक्तीने प्रकरण परत (मागे) घेतले. त्यानंतर प्रशासकीय पातळीवर कार्यवाही झालेली नाही. असे स. सदस्य यांचे म्हणणे होते. न्यायालयाची प्रत दयावी. अशी मागणी होती. कोर्ट आदेशाची प्रत आणलेली आहे. प्रमाणित प्रत देण्यात येईल. निर्णय घेवून १ महिना झालेला आहे. प्रशासकीय विभागास पत्र देवून कळविण्यत आलेले आहे.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांचेकडुन पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय विभागाने का कार्यवाही केलेली नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** विधी सल्लागार यांचेकडून आलेल्या पत्रानुसार या विभागातील मुळ संचिकेनुसार ५०-७० वर अनाधिकृत बांधकाम झालेले होते ते काढण्यात आलेले आहे. तार फिन्सींग काढले होते. पुन्हा लावण्यात आले असेल, अतिक्रमण बाबतचे फोटो सुध्दा या विभागाकडे आहेत.

**मा. आयुक्त** : कलम ५२.५३ चा आधार घ्यावयाचा असेल तर, ह्या गुन्हा दाखल करा.

**मा. सभापती** : सर्वसामान जप्त करावे. संबंधित व्यक्तीवर पोलिसात गुन्हा दाखल करावा.

**श्री. शे. मुनाफ शे. यासीन :** शहरातील रोषन गेट ही जुनी वस्ती असून, त्याची दुरुस्ती करण्याच्या खर्चाबाबत ४ वर्षापासून संचिका कार्यवाहीस्तव आहे. अनेक वेळा चर्चा करावी किंवा बजेट उपलब्धनाही असे शेरे दिले जातात. प्रत्येक वेळी संचिका का प्रलंबीत राहते. गेटला मुतारीचे स्वरुप आले. (वर्तमानपत्र दाखवतात.)

**मा. सभापती** : आचार संहिता चालू आहे. आर्थिक बाबीच्या संदर्भात चर्चा करता येणार नाही. असे माझे मत आहे.

**शे. मुनाफ शे. यासीन :** ४ वर्षापासूनचा हा प्रश्न आहे. या गेटच्या बाजूलाच मुतारी आलेली आहे. घाण दिसून येते. वॉर्डातील नागरीक याबद्दल दूरध्वनी करुन विचारणा करतात. त्यांना काय उत्तर दयावे. असा प्रश्न येतो. आजच्या वृत्तपत्रात त्याबद्दल छापून आलेले आहेत.

**मा. आयुक्त** : आचारसंहितेचा अडसर आहे ही बाब खरी आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या ईमारतीचे जतन करण्यासंदर्भात महापालिकेच्या वतीने पावले उचलण्यात आलेली आहेत. आचार संहिता पुर्वीच्या संदर्भात सूचना व हरकती मागविण्यत आलेल्या आहेत. आपण इस्टिमेंट केलेले आहे. परंतू त्या विषयातल्या तज्ज्ञाचे म्हणणे असे की, ज्या दुरुस्त्या करावयाच्या त्या तज्ञाकडून करुन घ्याव्यात. महापालिका पातळीवर हे दुरुस्तीचे काम करणे ऐतिहासिक दृष्टया तितकेसे बरोबर नाही. त्यामुळे संबंधित तज्ञ व्यक्तींना मी स्वतः विनंती केलेली आहे. श्री. सोनवणे अति. शहर अभियंता यांचेकडे ती संचिका आहे. लवकरच या कामास गती देता येईल. स्वच्छतेच्या बाबतीत विभागीय अधिकारी यांनी काळजी घ्यावी. कलम ३७ खाली महापालिकेने ठराव घेतला आहे व प्रकरण कार्यवाही अंतर्गत आहे. १५६ वास्तूचे सर्वेक्षण केले आहे.

**मा. सभापती** : रोषनगेटच्या बाजूला मुत्री झालेली आहे. तेथे स्वच्छता कशा प्रकारे राहील याची झोन अधिकारी यांनी काळजी दयावी.

**श्री. मोहन मेघावाले :** सुरेवाडी जाधववाडी भागात तसेच जळगाव रस्त्यालगतच्या काही जागेच्या संबंधी प्रकरण न्यायालयात चालू असतांना अनधिकृत बांधकाम मोठया प्रमाणात चालू आहे या संदर्भात प्रशासकीय अधिकारी यांना दोन-तीन महिन्यापासून अनेक वेळा कल्पना दिलेली आहे. परंतु अदयाप कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही मी जातो मी बघतो अमूक व्यक्तीला नोटीस दिली अशी दिशाभूल करणारी उत्तरे देतात. जळगाव रस्ता हा व्हि. आय. पी. रस्ता असून, या रस्त्यालगत आजही मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे होत आहे. अतिक्रमण करुन मोठे रोड

बांधलेले आहे. प्रशासकीय विभागाचे त्याकडे लक्ष नाही. आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. योग्य तो खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकीय अधिकारी :** ८-१० दुकानांचे काम चलू आहेत ते खाजगी जागेवर बांधकाम केलेले होते. संबंधितास नियमाप्रमाणे नोटीस दिलेली आहे. पुढील कार्यवाही चालू आहे.

**श्री. मेघावाले मोहन :** रस्त्यालगत बऱ्याच नागरिकांनी अनाधिकृतपणे शेड टाकलेले आहे. अशा बांधकामच्या ठिकाणच्या सामान का जप्त करण्यात आलेले नाही. आजपर्यंत किती जागेवरील सामान जप्त केलेले आहे. माहिती देण्यात यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** महाराष्ट्र प्रादेशिक व अधिनियमाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. बेसमेंट तोडले आहे. आतापर्यंत तीन वेळेस मटेरियल जप्त करण्यात आलेले आहे. महापालिकेच्या आवारात पडलेले आहेत.

**मोहन मेघावाले :** जळगांव रस्त्यालगत मागील बाजूस मोठया प्रमाणात ८-१० दुकानाचे अनाधिकृत बांधकाम चालू आहे. तेथील साहित्य का जप्त झालेले नाही. सद्य स्थितीत बांधकाम चलू आहे. मा. सभापती, संबंधित अधिकारी माझ्या बरोबर प्रत्यक्ष निर्दशनास येईल.

**मा. आयुक्त** : मा. सभापती यांचे वतीने खुलासा करतो की, सहा. संचालक नगररचना आणि प्रशासकीय अधिकारी यांनी यापूर्वी कार्यवाही केली असेल. तरी पुन्हा जागा पाहणी करुन फोटो काढावे. गुन्हा दाखल करावा.

**मा. सभापती** : केलेल्या कार्यवाहीची माहिती पदाधिकाऱ्यांना देण्यात यावी. तसेच मेजर कार्यवाही जरी होत असेल त्याबद्दल सुध्दा माहीती पदाधिकारी यांना देण्यात यावी. कार्यवाही होते आम्हाला माहीती दिली जात नाही आम्ही सुध्दा या महापालिकेचे घटक आहेत. गोपनियता ठेवण्याचे काम सुध्दा आमचे कर्तव्य आहे. आताच मा. आयुक्त यांनी सुचना केल्याप्रमाणे जळगाव हा व्हि. आय. पी. रस्ता आहे. जाधववाडी, सुरेवाडी भागात अनाधिकृत बांधकाम चालू असेल तर, संयुक्तरित्या पाहणी करुन कार्यवाही करण्यात यावी. पंचनामा करुन संबंधितावर पोलीस गुन्हा दाखल करण्यात यावे. जप्तीचे रेकॉर्ड ठेवावे.

**श्री. शे. मुनाफ शे. यासीन :** एक ते दीड महिन्यापुर्वी रोषणगेट ते राममंदीर आझाद चौक या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात झाले आहे. या रस्त्यावर आज स्थितीत खड्डे पडलेले दिसून येतात. लाखो रुपये खर्च होतात. दीड ते दोन महिन्यात डांबरीकरणाचे काम खराब होवू शकते का? खुलासा करावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा दयावा. हे काम आपणाकडून होत आहे की, रस्ते व विकास महामंडळाकडुन होत आहे.

**अति. शहर अभियंता :** सदरचे काम एम. एस. आर. डी. सी. विभागामार्फत चालू आहे. त्या कामावर महापालिकेचे नियंत्रण आहे. रोषणगेट ते आझाद चौकापर्यंत काम अर्धवट सोडलेले आहे. कारण काम करण्यास काही लोकांनी मज्जाव केलेला होता अशी परिस्थिती दोन ठिकाणी झालेली आहे. तेथील लोकांची घरातील सर्व सांडपाणी रस्त्यावर सतत येते. त्यास पर्याय नाही.

**मा. सभापती** : टेक्नीकल अडचण निर्माण होते. असे उत्तर अधिकारी देतात. परंतू ज्यांचे सांडपाणी रस्त्यावर येते त्यांना नोटीस वैगेरे देवून ते बंद करुन काम घ्यावे. संबंधित अधिकारी हा सदस्य आपण स्वतः या जागेवर प्रत्यक्ष पाहणी करतील ते काय निर्णय घ्यायचा तो घेण्यात यावा.

**मा. आयुक्त** : मे महिन्याच्या पहिल्या आठवडयात मा. सभापती एम. एस. आर. डी. सी. चे अधिकारी व ज्या खाजगी मालक नागरीकांचा विरोध आहेत. त्यांना एकत्र बोलवावे त्यांचा मालकी हक्काबाबत खरोखरच विरोध होत असेल तर त्यांचेसह चर्चा करु.

**श्री. कोकाटे काशिनाथ** : चेलीपूरा आझाद चौक ते सिडको पर्यंत त्या रस्त्याचे काम एम. एस. आर. डी. सी. विभागामार्फत चालू आहे. त्यामध्ये १७-१८ मालमत्ता धारकांचा अडसर निर्माण होतो आहे. त्यांचेशी प्रशासनाने चर्चा करुन मोबदला देण्याचे बाकी असेल तर, ते देण्यात यावे. शहरातील तो मोठा रस्ता आहे. इतर रस्त्याची रहदारी या रस्त्यामुळे कमी होईल अपघात होणार नाही. डिसपुटेड मालमत्तेची नोंद घेवून त्याचे जागा मालकांशी चर्चा करण्यासाठी मा. आयुक्त यांनी त्यांना वाटाघाटीस बोलावून त्वरीत काम हाती घ्यावे. २००-३०० मीटरचे रस्त्याचे काम झालेले आहे. दुसऱ्या टप्यात बाजूने गटार करण्याची जी योजना आहे. त्यासाठी जागा उपलब्ध होत नाही म्हणून ते काम थांबून आहे. नालीचे काम याच वेळेस होणे गरजेचे आहे. पावसाळयाच्या काळात आणखीनच परिस्थिती वेगळी होईल काम करता येणार नाही. सध्या हे पाणी हे नालीमधून वाहत नाही. रस्त्यावरून वाहते.

**मा. सभापती** : रस्ता रुंदीकरणामध्ये जर त्या जागा बाधीत होत असेल तर, मोबदला देण्यास प्रशासनास काय अडचण आहे.

**मा. आयुक्त** : जमीन मालकांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी विशेष भुसंपादन अधिकारी आहेत. त्यांचेकडे ते काम चालू आहे. त्यांचेकडे मालकी हक्क सिध्द होवून मोबदला देण्यासंबंधीची या लोकांची कार्यवाही चालू असेल तर, महापालिकेची काहीच अडचण असणार नाही. टी. डी. आर लागू करण्याची सुध्दा महापालिकेची तयारी आहे. काही ठिकाणी महपालिकेस तातडीने काम करण्याची गरज असते. आताच सूचना केली की, या रस्त्याचे काम पावसाळयात करणे योग्य होणार नाही ही, सत्य परिस्थिती आहे. त्यासाठी आपण कलम ७७ चा वापर करुन खाजगी वाटाघाटीने मा. स्थायी समितीच्या मान्यतेने काम सुरु करता येईल. मालकी हक्काबाबतचा तपशील असेल तर, अडचण येणार नाही. तपशील नसेल तर तो मागणी करुन नंतर सभागृहात सादर करावा लागेल.

**श्री. कोकाटे काशिनाथ** : ठराविक मालमत्तेचा हा प्रश्न उद्‌भवलेला आहे. मा. आयुक्तांनी वाटाघाटी करुन हा प्रश्न सोडवावा.

**मा. सभापती** : मिळकत धारकांना मा. आयुक्तांनी चर्चेला बोलावून हा प्रश्न निकाली काढावा.

**सौ. शाहीन जफर** : क्रांतीचौक भागात टपरीधारक व्यवसाय करतात. प्रशासकीय अधिकारी त्या विभागातील कर्मचारी सायं ७ ते १० वाजेच्या दरम्यान व त्या दुकानाची तोडफोड करतात. टपऱ्या उचलून आणल्या जातात. अनाधिकृतपणे व्यवसाय होतो म्हणून ही कार्यवाही होते. अशी कार्यवाही या भागासाठीच का होते.संपूर्ण शहरात का होत नाही.

**मा. सभापती** : क्रांतीचौक भागच नव्हे तर अशा प्रकारची कार्यवाही इतर शहरातील सर्वच भागात होणे आवश्यक आहेत. क्रांती चौक भागात बिर्यानी हे खुल्या जागेवर विक्री होते. त्या ठिकाणी सर्व नागरीक येत जात असतात. मांस बिर्याणी विक्री होऊ नये असा आमचा सर्वांचा उद्देश आहे. त्या ठिकाणी कार्यवाही

होते. अभिनंदन केल्यास योग्यच होईल. इतर ठिकाणी १०० रुपये लागतात मात्र या ठिकाणी १०-१५ रुपयात मिळते त्यामुळे गाडयाची गर्दी असते

**सो. शाहीन जफर :** औरंगपुरा, गुलमंडी सिडको भागात सुध्दा अशी कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**श्री. मोहन मेघावाले :** सिडको भागात सुध्दा रस्त्यावर विक्री होते.

**मा. आयुक्त** : शहराचे आरोग्य चांगले राहण्यासाठी सिडको भागात सुध्दा अशा प्रकारची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तशा सूचना संबंधित विभागाला दिलेल्या आहेत. सिडको भाग मनपाच्या अखत्यारीत नसला तरी आरोग्याच्या दृष्टीने सिडको भागात सुध्दा अशी कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

**मा. सभापती** : ज्यांच्याकडे मांस, बिर्याणी विक्रीचे लायसन्स नसेल त्या विक्रेत्यावर पोलीस गुन्हा दाखल करण्यात यावा.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** वार्डातील निवडणूक झाली. सदस्य म्हणून निवडुन आलो परंतु संपूर्ण कार्यकाळ आचार संहितेतच जात आहे. एक वर्ष राहीलेले असून, पून्हा विधानसभा निवडणकीची आचार संहिता लागेल वार्डात पाण्याचा मोठा गंभीर प्रश्न आहे. वार्डात विहीर नाही. हातपंप नाही. पाणीपुरवठा जास्तीत जास्त होणेसाठी प्रशासनाने तात्काळ उपययोजना करावी. वार्डातील सर्व नागरीक मालमत्ता कर भरतात.

**मा.आयुक्त** : पिण्याचे पाणी नैसर्गिक व अत्यावश्यक बाब आहे. पाण्याची अडचण निर्माण होणार नाही. याबाबत २९ मार्चच्या महाराष्ट्र निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार काही सूचना आहेत. प्रशासनाकडून या बाबतीत काळीजी घेण्यात येईल.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २९-०४-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का. व. क्र. ०३) इतिवृत्त. गुरुवार दिनांक २९-०४-२००४ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | स. सदस्य |
| २. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ३. | स. स. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव | -//- |
| ४. | स. स. श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल | -//- |
| ५. | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| ६. | स. स. श्री. मुनाफ शेख यासीन | -//- |
| ७. | स. स. श्री. सलिम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : आपणा सर्वांना माहितच आहे की, आचारसंहिता चालू असून त्यात आपण बैठक घेत आहोत. आचारसंहितेचा कुठल्याही प्रकारचा भंग होणार नाही. या दृष्टीकोनातून चर्चा करण्यात यावी. मागील बैठकीत दोन सन्माननीय सदस्यांनी मालमत्ता विभागाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला होता. सेल ॲड ज्या संस्थेने होर्डींग्जचा ठेका घेतलेला होता. या बैठकीत माहीती देणार होते. माहीती सादर करण्यात यावी.

**सौ. शाहीन जफर :** सिल्लेखाना येथील एका जागेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला होता. अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. त्यामुळे कलम ५२,५३ खालील कार्यवाही करण्यात यावी असे मा. आयुक्तांनी आदेशित केलेले होते. त्यबाबत आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे. माहीती देण्यात यावी.

**मा. सभापती** : दि. १९-०४-२००४ च्या स्थायी समितीच्या बैठकीत सिल्लेखाना येथील अनाधिकृतपणे झालेले बांधकामाबात चर्चा झालेली होती. जे अतिक्रमण झालेले बांधकामाबाबत चर्चा झालेली होती. जे अतिक्रमण झालेले असतील ते काढण्यात यावे असे आदेशित केलेले होते व तसा रिपोर्ट स्थायी समिती समोर आणावा असे म्हटले होते. एका पत्राद्वारे असे कळविले की, १८ तारखेला तेथील अनाधिकृत शेड तोडण्यात आलेले आहे. त्यांनी फोटोग्राफही दिलेले आहे.

**सौ. शाहीन जफर :** अतिक्रमण काढण्यात आलेले नाही चुकीची माहीती अधिकारी देतात. दोन दिवसापूर्वी मी प्रत्यक्ष त्या ठिकाणी भेट दिलेली आहे. अतिक्रमण काढण्यासाठी कोणते कर्मचारी गेलेले होते. माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : प्रशासकीय अधिकारी आज नाहीत. त्यांनी माझी परवानगी घेतलेली आहे. त्यांनी अतिक्रमण काढल्याबाबतचे छायाचित्र दिलेले आहे. कोणते अभिप्राय आहे. आपण बघून घ्यावे.

**सौ. शाहीन जफर :** या ठिकाणचे मटेरियल काढले परंतु त्याच ठिकाणी पडलेले आहे. उचलून आणले जात नाही. सदर जागा संपूर्ण क्लिन करण्यात यावी असे न्यायालयाचे आदेश आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास का दिरंगाई होत आहे. संबंधित व्यक्तीने न्यायालयात प्रकरण दाखल केलेले होते. खालच्या कोर्टात प्रकरण मनपाच्या बाजूने निकाल दिला. सिव्हील कोर्टात सुध्दा मनपाच्या बाजूनेच निकाल लागलेला आहे.

**मा. सभापती** : मटेरियल उचलून महापालिकेच्या प्रांगणात आणायचे व जो खर्च येईल तो संबंधिताकडून वसूल करण्याबाबत नोटीस दयावी.

**सौ. शाहीन जफर :** अतिक्रमण काढल्यानंतर मटेरीयल त्या ठिकाणी टाकले जाते उचलून आणले जात नाही. पुन्हा लोक अतिक्रमण करुन बांधकाम करतात.

**मा. सभापती** : या विभागाचे प्रशासकीय प्रमुख उपआयुक्त (म) आहेत. त्यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** यापुढे जेव्हा जेव्हा प्रशासकीय विभाग अतिक्रमण काढतील. कोर्टाचे आदेश असेल किंवा महापालिकेमार्फत कार्यवाही होईल. आम्ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२.५३ खाली गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी अतिक्रमण काढल्यानंतर एम. आर. टी.पी. नुसार कार्यवाही करता येईल. परंतु प्रत्येक ठिकाणचे, विटा, माती दगड इ. मटेरियल महापालिकेच्या प्रांगणात आणणे संयुक्तीक वाटत नाही. यासाठी अतिरिक्त कर्मचारीही लागतील असे माझे मत आहे. पोलीस गुन्हा दाखल केल्यास या बाबींना आळा बसेल असे वाटते. इतर वेळेस अतिक्रमण काढतो त्यावेळी सेंट्रीग वैगेरे मटेरियल आणतो.

**सौ. शाहीन जफर :** विटा, माती, दगड अशा मटेरियलचा मुद्दा उपस्थित केलेला नाही. लाकडी खोके, पत्रे, इतर उपयोगी साहित्य याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. एखादयाचे शेड काढल्यानंतर ते संपूर्ण मटेरियल का आणले जात नाही.

**मा. सभापती** : दिनांक १९-०४-२००४ रोजी झालेल्या बैठकीत स्थायी समितीने जे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करुन अहवाल देण्यात यावा. दि. १८-०३-२००४ रोजी केलेल्या कार्यवाही बाबतचे पत्र देण्यात आले हे योग्य नाही. याचा अर्थ सभागृहाची सुध्दा दिशाभूल केलेली आहे. स्थायी समितीच्या आदेशानंतर काय कार्यवाही केलेली आहे. ते अपेक्षीत आहे. अगोदरची कार्यवाही नाही. अशा प्रकारे प्रशासकीय अधिकरी करीत असेल त्यांचे विरुध्द कडक कार्यवाही करावी लागेल याची दखल घ्यावी. सन्माननयी सदस्या सौ. शाहीन जफर यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यानंतर दि. १९-०४-२००४ नंतर काय कार्यवाही केलेली आहे. त्याबाबतचे उत्तर अपेक्षीत आहे. कार्यवाही वेळीच झालेली असती तर मुद्दाच उपस्थित झाला नसता. ठिक आहे. त्या भागातील इमारत निरिक्षक नसेल. स. सदस्या सौ. शाहीन जफर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले असेल तर, तसेच आदेश कर्मचाऱ्यांना देण्यात यावे आणि तशी माहिती स. सदस्यांना देवून त्याची एक प्रत मला देण्यत यावी. वारंवार अतिक्रमण होत असेल तर, अर्थ नाही. पुढील बैठकीत या संबंधीची माहिती देण्यात यावी.

**श्री. मधूकर सावंत :** आजच्या दै. सामना वृत्तपत्रात बातमी आलेली आहे की, स. सदस्या डॉ. आशा बिनवडे यांच्या वार्डात भाजी मंडईसाठी दुकाने बांधकाम केलेली आहे. या दुकानाचा तीन चार वेळेस लिलाव करुनही भाडयाने कोणी घेतलेले नाही. या ठिकाणी अवैध वापर होत असल्याचे नमूद केले आहे. मनपाचे उत्पन्न वाढवायचे असेल तर, या दुकानांचे भाडेदर कमी केल्यास गरजू गरीब नागरीक भाजी विक्रीसाठी दुकाने होऊ शकतील व रस्त्यावर जे भाजी विक्रेते आहेते ते विक्रेते कमी होतील आणि रस्त्यावरील रहदारीस अडथळा होणार नाही.

**मा. सभापती** : जवाहर कॉलनी भागातील भाजी मंडईचे बांधकाम केलेले आहे ते किती दिवसापुर्वी केले आहे. किती वेळेस लिलाव करण्यात आला, त्यास प्रतिसाद का मिळाला नाही. याबाबत मालमत्ता अधिकारी यांना खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** जवाहर कॉलनी भागात भाजी विक्रेत्यासाठी पहिल्यांदा १८ ओटे बांधण्यात आलेले होते. त्यासाठी ३०-१२-१९९९ रोजी ही दुकाने भाडेतत्वावर देण्यासंबंधी जाहीर लिलाव करण्यात आलेला होता. त्यापैकी १३ ओटयांचे एक वर्षाचे भाडे भरणा करुन घेतलेले आहे. पुन्हा सात ओटे बांधण्यात आले. सद्य:स्थितीत तेथे २५ ओटे असून, दि. १३-०३-२००३ रोजी २० ओटयासाठी निविदा मागविण्यत आली. निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही. त्यानंतर जे स्थानिक भाजी विक्रेते आहेत. त्यांचे बरोबर चर्चा करण्यात आली व रस्त्यावर जे भाजी विक्री करतात. त्यांचा तेथे व्यवसाय होतो. म्हणून हे लोक दुकाने घेण्यास तयार नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे.

**मा. आयुक्त** : बातमी वाचून आपणांस वेगळे वाटले तरी विषय फार मोठा आहे. वरवर असे वाटते की, प्रशासन काहीच करीत नाही. हे चुक आहे. यासंबंधी सर्वे केलेला आहे. परंतु महानगरपालिकेचे जे दर आहे. त्यास प्रतिसाद मिळत नाही. महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांना ही बाब माहित आहे. पहिला प्रश्न असा की, रेटेबल व्हॅल्यू कमी करता येतो का? दर कमी करण्यासाठी महापालिकेच्या नियमात कुठेही उल्लेख नाही. म्हणून अधिकाऱ्यांना अशा सूचना केलेल्या आहेत की, ज्याप्रमाणे आजुबाजुच्या जागेच्या किंमती काढण्यात येतात. त्याप्रमाणे आजुबाजुच्या दुकानाच्या किमतींची सरासरी काढण्यात यावी. खरेदी विक्री व्यवहार मागील तीन ते पाच वर्षापासूनचा विचारात घेवून अशा पध्दतीने एखादया नवीन पध्दतीने या दुकानांचे मूल्यांकन काढले आणि ते मुल्यांकन धोरणात्मक म्हणून महापालिकेस सक्षम प्राधिकरणास मान्य झाल्यास हा प्रश्न सुटू शकेल. तसेच ज्या ठिकाणी व्यापारी संकुल, भाजी मार्केट बांधण्यासाठी तेथील लोकेशन निवडणे ही तितकीच महत्वाची बाब आहे. अमूक ठिकाणी महापालिकेची जागा आहे तेथे व्यापारी संकुल करायचे असे म्हणून चालणार नाही. तेथे व्यवसाय चालेल की नाही हे सुध्दा चालेल की नही हे सुध्दा बघणे आवश्यक आहे.

**श्री. मधुकर सावंत :** आजही रस्त्यालगत भाजी विक्रेंत्याच्या अनेक हातगाडया उभ्या करुन भाजी विक्री करतात. त्या लोकांना रस्त्यालगत उभे राहू दिले नाही तर दुकाने भाडेतत्वावर जाण्यास मदत होईल.

**मा. आयुक्त** : हा प्रयोग यापुर्वीही झालेला आहे. मी महापालिकेस नसतांना यापुर्वी हातगाडीवाल्यांना हटविण्यात आलेले होते. आपल्या विचारांशी मी शंभर टक्के सहमत आहे. अगोदर रस्त्यावरील विक्री पूर्णपणे बंद करावी लागेल.

कोणीच दुकाने घेतलेली नाही असा प्रश्न नाही. काही लोकांनी डिपॉझिट भरुन डिपॉझिट भरुन दुकाने घेतलेली आहे. सक्तीने चालू करुन दयावी लागेल व मनपाचे जाचक असे भाडे असेल तर त्यात सवलत देता येईल का? यावर फेरविचार करण्याची गरज आहे अशा सूचना दिलेल्या आहेत.

**मा. सभापती** : आताच मा. आयुक्तांनी खुलासा केला की, रेटेबल व्हॅल्यू कमी करुन किंवा भाडेतत्वावर दुकाने घेण्यास लावून भाजी मंडईमध्ये विक्रेत्यांना कसे आणता येईल. यासाठी प्रयत्न होणार प्रशासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे. म्हणून जे रस्त्यावर भाजी विक्री करतात त्या विक्रेत्यांना भाजी मंडईचे दुकाने कशा पध्दतीने दिली जातील यासाठी अधिकाधिक लक्ष देऊन रस्त्यावरील भाजी विक्रेत्यांची संख्या कमी करावी व त्यांना पटवून देवून भाजी मंडईत कसे आणता येईल याकडे लक्ष दयावे.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यगृह अधिकृतपणे चालू आहे का, अधिकृत नसेल तर आतापर्यंत सील का लावण्यात आलेले नाही खुलासा करावा. शैक्षणिक झोनची जागा असतांना कमर्शियल बांधकाम केले आहे. अहवाल येवून दोन महिने झालेले आहे. आपले अधिकारी संबंधीत व्यक्तीस मिळालेले आहेत काय? ते जर अनाधिकृत आहे तर कार्यवाही का होत नाही.

**मा. सभापती** : यासंबंधी बऱ्याच बैठकामध्ये चर्चा झालेली आहे. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी खुलासा केलेला होता की, संबंधिताचे जे प्रपोजल आहे ते प्रलंबीत पडलेले आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** आज रोजी सदर नाट्यगृह अनाधिकृतपणे चालू आहे सील का लावण्यात येत नाही. मोठे बिल्डर आहेत. म्हणून सील लावण्यात येत नाही का?

**मा. सभापती** : लेखा परिक्षणाचा जो अहवाल झालेला आहे. त्यासंबंधी याच आडवडयात बैठक घेणार आहोत.

**सहा. संचालक न.र. :** तापडीया नाट्यगृहाच्यासंबंधी प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडुन याबाबत अभिप्राय सुध्दा मागविलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामूळे दुसरी कार्यवाही करणे योग्य होणार नाही. संबंधितास नोटीस दिल्यानंतर हे प्रकरण न्यायप्रविष्ट झालेले आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** प्रकरण न्यायप्रविष्ट झाले तरी न्यायालयाचे कोणतेही आदेश नाहीत म्हणून या नाट्यगृहास सील करता येते.

**मा. आयुक्त** : अधिकाऱ्यांनी वरवर उत्तरे देवू नये. ज्या तीन अटी आहेत त्या अटींचे आपणांस प्रथमदर्शनी वाटले की, त्यांचा भंग केलेला आहे. तो कलेला नाही असे त्यांचे स्पष्ट म्हणणे आहे. त्यासाठी त्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. आणि ते तांत्रिक स्वरुपाचे व नियमावर आधारीत उत्तर आहे. त्याची छाननी सहा. संचालक नगररचना यांनी केलेली आहे. संचालक यांनीही या संदर्भात पत्रव्यवहार केलेला आहे. संबंधिताने कोर्टात जावे किंवा नाही व त्यांचा प्रश्न आहे. म्हणून लिगल व टेक्नीकली डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांचेकडुन अभिप्राय मिळत नाही तो पर्यंत कार्यवाही करता येणार नाही. इलिगल नाही. हा खुलासा करावा. नसता संबंधित नगरसेवक यांना सविस्तर उत्तर देण्यात यावे.

**सहा. संचालक न. र. :** सदरील प्रकरणाच्या बाबतीत लेखी उत्तर देण्यात येईल.

**मा. आयुक्त** : कलम ५२, ५३ ची नोटीस दिलेली होती. ज्या तीन अटीचा खुलासा पाहीजे आहे तो सहा. संचालक नगररचना विभागाकडून होणे आवश्यक आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** एक बिल्डरची बाजू घेवू नये. आपण सर्व शहराचे सभापती आहात.

**मा. सभापती** : मी कुणीही वैयक्तीक व्यक्तीची बाजू घेणार नाही. मा. आयुक्तांनी दिलेल्या उत्तराने आपले समाधान झालेले असेल. सर्व सदस्यांना संबंधित अधिकारी उत्तर देणार आहेत.

**श्री.प्रल्हाद निमगावकर :** मागील बैठकीत मी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित केलेला होता. रामकृष्णनगर व नाथ प्रांगण भागात नागरिकांना शंभर टक्के बेटरमेंट चार्ज भरलेला असून, पाण्याची सुविधा नाही ड्रेनेज लाईन नाही म्हणून म. आयुक्त तसेच मा. सभापतींना विनंती की, त्यांनी प्रत्यक्ष त्या भागात जाऊन पाहीणी करुन तेथील समस्या सोडवावी.

**मा. सभापती** : आताच स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे या भागात पाणीपूरवठा व ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेल्या नाही याचा खुलासा करावा.

**कार्य. अभियंता (पा.पू.) :** या भागात अशा कामांसाठी बजेटमध्ये तरतुद केलेली नाही.

**मा. सभापती** : गेल्या दोन वर्षापासून नावानिशी बजेट तयार होत आहे. ज्या कामाची तरतुद केली जाते. ती कामे झालेली आहेत.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** या भागासाठी कोणीही नगरसेवक नव्हते. नागरीकांनी बऱ्याचदा यासाठी पाठपुरावा केलेला होता. परंतू कार्यवाही झाली नाही.

**मा. सभापती** : गेल्या दोन वर्षापासून नावानिशी बजेट ठेवण्यात येत आहे. असे असतांनाही त्यापूढे जावून प्रशासनास अशा सूचना करण्यात येतात की, ज्या भागातील नागरिकांनी विकास खर्च भरलेला आहे. त्या प्रभागत प्रशासनाने लक्ष घालुन मूलभूत सुविधा देण्याकरीता तरतुद करावी. त्या प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा. अशा किती गृहनिर्माण संस्था आहेत. कॉलन्या आहेत की, त्यांनी शंभरटक्के विकास खर्च भरणा केलेला आहे. परंतू तेथे सोयी सुविधा दिल्या जात नाही. ही माहीती प्रशासनाने सर्वसाधारण सभेत ठेवावी. सर्वसाधारण सभेसमोर यावर्षीची अर्थसंकल्प येईल तेव्हा चर्चा करुन तरतुद करता येईल. तसा प्रस्ताव आणावा.

**श्री. मधुकर सावंत :** स. सदस्य श्री. साहेबराव कावडे यांचे वॉर्डात गेल्या आठ-दहा महिन्यांपासून व्यापारी संकुल बांधून तयार झालेले आहे. आजपर्यंत महापालिकेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. खुलासा करावा.

**मा. सभापती** : चिकलठाणा भागात आठ-दहा महिन्यांपासून व्यापारी संकुल बांधून तयार आहे. परंतु वापरात नाही. या प्रमाणेच शहरातील इतर भागात बऱ्याच ठिकाणी व्यापारी संकुले बांधून पडलेली आहेत. त्याचा लिलाव करुन जे कोणी घेण्यास इच्छुक असतील त्यांना देण्यात यावे. याबाबत कार्यवाही करुन पुढील बैठकीत सविस्तर अशी माहिती या सभेत देण्यात यावी. किती ठिकाणी व्यापारी संकुले बांधलेली आहेत. परंतू त्याचा वापर होत नाही. खुलासा देण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी :** पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल. जी दुकाने रिकामी आहेत. ती भाडयाने देणेसंबंधी जाहीर लिलावाची कार्यवाही चालू आहे.

**मा. आयुक्त** : मालमत्ता अधिकारी यांना सूचना करतो की, हा नविन विषय नाही. मी झाल्यानंतर मागील वर्षात एक वेळसे लिलाव करण्यात आलेला होता. परंतु हे दर फार जास्त असल्यामुळे परवडणारे नव्हते. म्हणून तोच प्रयोग पुन्हा करुन दोन महिन्यांचा वेळ घेवू नये. त्या दुकानाचे दर बाजारभावापेक्षा कमी किंवा त्याबरोबर कसे ठेवता येईल. याकडे उप-आयुक्तांनी लक्ष घालुन इतर दुकानामध्ये व्यवसाय होतो. परंतू ५० ते १०० फुटाच्या अंतरावरच महापालिकेच्या दुकानामध्ये तो व्यापारी व्यवसाय का करीत नाही तोपर्यंत दिलेल्या नोटीसला कागदावरच अर्थ राहील.

**मा. सभापती** : इमारतीचे कम्प्लीशन झालेले असेल तर, ताबा घेऊन पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

**मा. आयुक्त** : स्थायी समितीने आदेश देण्याची वाट बघू नये. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : आताच मा. आयुक्तांनी योग्य अशा सूचना केलेल्या आहेत. तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. आरक्षण ठेवण्याबाबतचे सुध्दा शासनाचे जी. आर. आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. मधूकर सावंत :** महानगरपालिका पोटनिवडणूकीची आचारसंहिता लागलेली आहे. या सभागृहाच्या वतीने मा. आयुक्तांना निवडणूक आयोगास विनंती पत्र देवून फक्त संबंधित निवडणूक होत असलेल्यास प्रभागासाठी आचारसंहीता असावी अशी विनंती पत्राद्वारे करावी. नसता संपूर्ण शहरातील विकास कामे थांबून राहतील असे होवू नये.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे व यापूर्वीच मी गेल्या १८ तारखेला निवडणूक आयोगास पत्र दिले की, यापुर्वीही महापालिका पोटनिवडणूका झालेल्या होत्या व त्या प्रभागासाठीच आचारसंहिता मर्यादीत होती. त्याप्रमाणेच आता पोटनिवडणूक होत असलेल्या प्रभागाचे मर्यादेपुरतीच आचारसंहिता ठेवावी असे पत्र दिलेले आहे. नांदेडचे महापौरांनी लोकसभा निवडणूक पार पडलेली आहे. म्हणून लोकसभेची आचारसंहीता सुध्दा शिथील करण्यात यावी म्हणून मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. त्याचा निर्णय ५ तारखेला आहे. तसेच एका वार्डात निवडणूक होत आहे. फक्त त्याच वॉर्डासाठी आचारसंहिता लागू असावी. यासाठी मा. आयुक्तांनी माझ्या समक्ष आयोगाकडे चर्चा केलेली आहे. मा. आयुक्त हे निवडणूक आयोगाकडे पत्र देणार असून, आपल्या सर्वाच्या प्रयत्नाना यश येईल असे मला वाटते.

**श्री. मोहन मेघावाले :** माझ्या घराच्या बाजुला मोठा स्लम भाग आहे. बऱ्याच लोकांनी पाण्याचे कनेक्शन मुख्य जलवाहिनी जोडुन घेतलेले आहेत. त्याच पाईपलाईनद्वारे इतर भागात टप्पाटप्याने पाणी सोडले जाते. म्हणून ज्यांनी मुख्यजलवाहिनीवरुन कनेक्शन घेतलेले आहे. त्यांचेसाठी स्वतंत्र पाईपलाईन टाकुन नळ कनेक्शन देण्यात यावे नसता मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे. रस्त्यावर पाणी वाहते.

**कार्य. अभियंता (पा.पु) :** घराच्या दर्शनी भागालाच मुख्य जलवाहिनी आहे. त्यावरुन जोडणी केली आहे. स्वतंत्र जलवाहिनी टाकावी लागेल.

**मा. सभापती** : स्वतंत्र पाईप लाईन टाकण्याची ताबडतोब व्यवस्था करण्यात यावा. त्या नागरीकांना स्वतंत्र नळ कनेक्शन देण्यात यावे.

**श्री. मधुकर सावंत :** डेक्कन ओडीसी रेल्वे या शहरात येणार आहे. सदर पर्यटक वेरुळ-अजिंठा बरोबरच श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तुसंग्राहालयाचे नांव होते. परंतु हे नांव कमी करण्यात आलेले आहे. या वास्तुमध्ये पर्यटक आकर्षित होऊन संपूर्ण जगात या ऐतिहासिक शहराचे नांव होईल यादृष्टीने कमी केलेले नाव टाकण्याचे प्रयत्न व्हावेत यासाठी मा. आयुक्तांनी काळजी घ्यावी.

**मा. सभापती :** चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. डेक्कन ओडीसी रेल्वे या शहरात येणार होती. देश विदेशातील पर्यटक येणार आहेत. आधीच्या यादीत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्राहालयाचे नांव होते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अगोदर नांव टाकले होते. त्या संदर्भात महापालिकेशी संपर्क साधलाच असेल यात शंका नाही. परंतू वगळण्यात आले व पुन्हा प्रशासनाने काय प्रयत्न केले याचा खुलासा करण्यात यावा. छत्रपती शिवाजी म्युझीयम डॉ. बाबसाहेब आंबेडकर रिसर्च सेंटरच्या बाबतीत पर्यटन विकास महामंडळ दखल घेत नाही. खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :** छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयाचे नांव डेक्कन ओडीसी पर्यटकांसाठी भेटीसाठी प्रशासनाने प्रयत्न करुन सामाविष्ट केलेले होते. पहिल्यांदा जे पर्यटक आले. त्यावेळेस त्यांनी भेट ही दिली. परंतु मागील आठवडयात वृत्तपत्रात आले की, यातून छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्राहालयाचे नांव वगळण्यात आले. ही कार्यवाही मुंबई येथील कार्यालयातून आलेली आहे. औरंगाबाद पर्यटन महामंडळाशी संपर्क साधून हे नांव कसे घेता येईल यासाठी प्रयत्न करणार आहोत.

**मा. आयुक्त :** एम. टी. डी. सी. हे स्टेट गव्हर्नमेंटचे अंडरटेकींग आहे. त्याचे एम. डी. निवडणूकीच्या कामात आहेत. म्हणून मुंबईच्या बाहेत आहेत. खात्री बाळगा की, छत्रपती शिवाजी पुराणवस्तु संग्राहालयाचा तर समावेश होईलच इतरही काही असेल त्याचा समावेश करता येईल.

**श्री. मधूकर सावंत :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचा यात समावेश करण्यात यावा.

**मा. सभापती :** या शहरात महापालिकेने चांगले प्रकल्प हाती घेवून पर्यटकांसाठी वास्तू बनविलेल्या आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र व छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्राहलय दोन्ही संग्रहालयाचे व्हिडीयो कॅसेट करुन पर्यटन विकास महामंडळाकडे देण्यात यावे आणि यापुढे अगोदर, नांव टाकण्यात येते व नंतर वगळण्यात येते असे होता कामा नये आमच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत अशी त्या विभागाकडे विनंती करावी.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** नाथ प्रांगण भागात ओपनस्पेस आहेत. त्या जागेवर सध्या दोन-तीन घरे अनाधिकृतरित्या झालेली आहेत. या जागांचे संरक्षण व्हावे. तारकुंपन करण्यात यावे. जेणे करुन अतिक्रमण होणार नाही. संबंधित अधिकारी यांनी सूचना केलेली होती.

**मा. सभापती :** महापालिकेच्या मालकीच्या भुखंड आहे. त्याचे संरक्षण करणे महापालिकेचे कर्तव्य आहे. उपआयुक्त श्री. शिंदे यांना सूचना देण्यात येतात की, येणाऱ्या अर्थसंकल्पात या भुखंडाचे संरक्षण होण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन अर्थसंकलप तरतूद करण्यात यावी.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** सध्या या जागेवर दोन घरे झोली आहेत. अर्थसंकलप मंजूर होण्यास वेळ लागेल. जागेचे संरक्षण होणे गरजेचे आहे. उशीर झाल्यास पुन्हा अतिक्रमण वाढेल.

**सहा. संचालक न. र. :** ते ले आऊट अंतीम मंजूर नाही. मालकी पाहुन घेतो.

**मा. आयुक्त** : माझ्या दोन तीन सूचना सहाय्यक संचालक नगररचना यांना मा. सभापतींच्या परवानगी देतो. अंतिम मंजूरी व तात्पूरती मंजूरी ही प्रोसीजरच बंद करावी. सहा महिन्यापुर्वी या आल्यानंतर सुचविले होते. अंतिम मंजूरी नसेल तर रिलीक्वीशमेट डीड नसेल. अंतिम मंजूरी असेल तर, लिगल डिड विलंब लावतो. गेली बऱ्याच वर्षापासून ती खुली जागा महापालिकेच्या ताब्यात आली नसेल. ती रितसर ताब्यात घ्यावी. उपआयुक्त (म) प्रशासकीय अधिकारी व सहा. संचालक नगर रचना यांनी संयुक्तपणे एकत्र येवून ओपन स्पेसवरील सर्व अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही करावी. ज्यांची घरे झालेली आहेत. त्यांचेकडे कोणतेही टायटल नाही. नंतर काही तरी कागदपत्रे जमा करतात. प्रकरण लांबणीवर पडते अतिक्रमण काढण्यात अडचण येते असे सदस्यांचे मत आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** रेल्वेस्टेशन ते महावीन चौक पर्यंत किती फुट रुंद रस्ता आहे. खुलासा करावा. आता नुकतेच पद्मपुरा भागात एक लहान मुलाचा अपघात झालेला आहे. ९ मी. ते ४५ मी. पर्यंत रस्ता असावा असे न्यायालयाचेही आदेश आहेत.

**मा. सभापती** : अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा. रस्ते विकास महामंडळाकडुन कार्यवाही होणार होती.

**अति. शहर अभियंता :** या रस्त्याचे ८०% काम झालेले असून, २०% काम बाकी आहे. २०% रस्त्याचा जो विकास बाकी आहे तो पद्मपुरा भागातील एकूण १२५ खाजगी मालमत्ता येतात. त्या हस्तांतर करण्याच्या बाकी आहेत. ह्या मालमत्ता जो पर्यंत ताब्यात येणार नाही. तोपर्यंत १०० फूटाचा रस्ता करता येणार नाही. सहा. संचालक नगररचना यांचेकडून भूसंपादनाची कार्यवाही होईल.

**सौ. शाहीन जफर :** रेल्वेस्टेशन ते लेबर कॉलनी पर्यंतचा रस्ता १०० फूटाचा असावा असे न्यायालयाचे आदेश आहेत. रेल्वेस्टशेन ते महावीर चौक हा रस्ता सुध्दा १०० फुटाचा असावा असे आदेश दिलेले आहेत. पद्मपूरापर्यंत १०० फुट रुंद झालेला आहे. पद्मपूरा ते महावीर चौक पर्यंत का रस्ता रुंद झाला झालेला नाही. पंचवटी हॉटेलच्या बाजूला आहे. ज्या मिळकती आहेत. त्यांना मोबदला दिलेला आहे. त्या साईडचा रस्ता सुध्दा रुंद झालेला नाही. रस्त्याचे काम कोणत्या ठेकेदाराने घेतलेले आहे. काल पद्मपूरा भागात अपघात होवून एक मूलाचा मृत्यू झाला. तो रस्ता रुंद नव्हता म्हणून हा अपघात झालेला आहे. रस्ता रुंद करता यावा. म्हणून न्यायालयाचे निर्देश आहेत.

**मा. सभापती** : जेथे अपघात झाला त्या स्थळी मी उपस्थित होतो. रस्ता रुंद होण्यासाठी ज्या खाजगी मालमत्ता आहेत. त्यांचे संपादन होणे आवश्यक होते. ती कार्यवाही झालेली नाही. काही नागरीक माजी महापौर श्री. जैन यांना भेटले होते. छावणी परिषदेकडून जागा होऊन जागा होऊन ती संपादन करुन रस्ता रुंद करावा. अशी त्यांची मागणी होती. छावणी परिषदेबरोबर चर्चा करुन प्रश्न निकाली निघाल्यास लवकरच कार्यवाही होईल.

**मा. आयुक्त** : एम. एस. आर. डी. सी. च्या सर्व प्रकल्पाबाबत मी दोन वेळेस आढावा घेतलेला आहे. मला सर्व माहिती असतांना खाजगी मालमत्ता हस्तगत करावयाच्या राहिलेल्या आहेत. असे मला अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडून कधीही सांगण्यात आलेला नाही. आताच सांगितल्याप्रमाणे रस्त्याची आखणी बदलण्याची मागणी केलेली होती. ती बदलण्याची अति. शहर अभियंता, शहर अभियंता यांचेकडून कधीही सांगण्यात आलेले नाही. आताच सांगितल्याप्रमाणे रस्त्याची आखणी बदलण्याची मागणी केलेली होती. ती बदलण्याची अति. शहर अभियंता यांची शिफारस आहे की नाही. शहर अभियंता यांची संमती आहे की नाही हे निर्दशनास येणे आवश्यक आहे. नागरिकांच्या विनंती नुसार उजव्या बाजूला आखणी बदलून जागा घ्यावयाची असेल तर, एम. एस. आर. डी. सी. च्या विभागास कळवावे लागेल. कोणती जागा घ्यायचा, कोणती घ्यायची नाही याची शिफारस करणे अधिकाऱ्यांचे कामे आहे. रक्कम देण्याबाबतचा प्रश्न पुढे आहे.

**अति. शहर अभियंता :** त्यांना कळवावे लागेल. सहा. संचालक नगररचना यांना नकाशावर मार्क करावा लागेल आजच्या डी. पी. प्लॅनमध्ये अंतर्भुत नाही.

**मा. सभापती** : सर्व नकाशे वैगेरे होवून तेथील स्थळ पाहणी करावी तशा सूचना ठेकेदारास देण्यात याव्यात. जे रस्त्याचे अर्धवट काम बाकी आहे ते पूर्ण करण्यात यावे.

**श्री. स. सलीम स. युसूफ :** औरंगपुरा भाजी मंडईचे स्थलांतर होणार होते. अदयाप कार्यवाही केलेली नाही.

**मा. सभापती** : सहा. संचालक नगर रचना, विधी सल्लागार, शहर अभियंतायांनी एका बैठकीत असे उत्तर दिले हेते की, महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर येथील दुकान धारकांना जागा देवून लवकर कार्यवाही केली जाईल. ती कार्यवाही कुठपर्यंत झालेली आहे. खुलासा करावा. संचिका मा. आयुक्तांकडे होती असे सांगण्यात आले होते.

**कर्य. अभि (वि. ड्रे.) :** जेव्हा माझ्याकडे शहर अभियंता पदाचा चार्ज होता त्यावेळेस ३१ डिसेंबर रोजी स. सदस्य श्री.चंद्रशेखर जैस्वाल तसेच भाजी मंडईतील भाजी विक्रेते व मालमत्ता अधिकारी यांचे सोबत जवळपास तीन वेळेस बैठका झालेल्या होत्या. वास्तुशास्त्रज्ञांनी जसा नकाशा दिलेला होता. त्याप्रमाणे पुर्वीचे गाळे, नवीन गाळे किती होणार याची माहिती द्यावयाची होती. त्यानंतर श्री. सोनी साहेब रुजू झाले. त्यानंतरची माहिती मला नाही.

**मा. आयुक्त** : श्री. सोनी शहर अभियंता हे अधिकृत माहिती देतीलच. परंतू भाजी मंडई कोठे स्थलांतरीत करावयाची यासाठी मनपास अडचण नाही. त्या नागरीकांची अडचण आहे. त्यावर पुन्हा चर्चा करावी लागेल. विचार करुन निर्णय घेतला जाईल. त्या भाजी विक्रेते संघटनेचे निवेदन माझ्याकडे आलेले आहे.

**मा. सभापती** : जे भाजी विक्रेते आहेत त्यांचे सोबत स. सदस्य राहतील. त्यांचे उपस्थितीत बैठक होऊन योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** संत एकनाथ रंगमंदीर पासून सन २००३-२००४ मध्ये महापालिकेस किती उत्पन्न मिळाले याची माहिती देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** सध्या माझ्याकडे माहिती नाही. पुढील बैठकीत माहिती दिली जाईल. एका नाट्य प्रयोगासाठी २५००/- रु. आकारणी होते. दिवसातून एक किंवा दोन नाट्यप्रयोग होतात.

**मा. आयुक्त** : आकडेवारी देता येईल विषय काढल्याबद्दल आभारी आहोत. मागील वर्षी बजेट मंजूर झाल्यानंतर मी या महापालिकेत आयुक्त म्हणून रुजू आलेलो होतो. ७ ते ७.५० लक्षचे काम केले. सद्य:स्थितीत नागरिक तेथे बसू शकतात. परंतू अनेक नागरिकांची मागणी आहे की, विशेषत: कलाकार व तांत्रिक तज्ज्ञांची की, या रंगमंदिराची विशिष्ट प्रकारच्या दुरुस्त्या कराव्यात. या सभागृहाला विनंती करेन की, महापालिकेतील जे तांत्रिक अधिकारी आहेत. त्यांनी इस्टिमेंट केले तर बरेच लाखापर्यंत खर्च येऊ शकेल. तेवढी तरतुद या वर्षाच्या बजेटमध्ये मंजूर केली तर, या रंगमंदिराचे संपूर्ण काम होईल. त्याशिवाय तेथील दर वाढविता येणार नाही. संत एकनाथ रंगमंदिर रिकामे आहे. भाड्याने कोणी होत नाही अशी अवस्था नाही. दुसऱ्यांच्या स्पर्धेत यावयाचे असेल तर, तेथील सुधारणा करणे आवश्यक आहे.

**श्री. स. सलीम स. युसूफ :** नेहरु भवनचाही समावेश करुन तेथील आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी. तेथे सुध्दा खुर्च्या व्यवस्थित नाहीत.

**मा. सभापती** : संत एकनाथ रंगमंदीर हे रसिक नागरिकांसाठी एक सुविधा म्हणून उपलब्ध करुन दिलेली आहे. नफा किंवा तोटा याचा विचार केला जात नाही. नफा मिळावा हा उद्देश त्यामागे नाही. संत एकनाथ रंगमंदीराचे आधुनिकीकरण व्हावे व सर्व रसिकांची सुध्दा मागणी आहे. त्या खर्चासाठी सर्वसाधारण सभेत अर्थसंकल्प मंजूर हेणार आहे. त्यावेळी भरीव अशी तरतुद करण्याची मागणी सदस्य करतील. त्यानुसार निर्णय घेतला जाईल. नेहरु भवनची प्रशासनाने पाहणी करुन कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** : स. सदस्य श्री. निमंगावकर यांनी सांगितलेल्या दुरुस्त्या प्रशासनास आवश्यक वाटेल अशी सर्व कामे सन २००४-०५ च्या अर्थसंकलपात झालेली नसतील त्याबाबत बऱ्याच स.सदस्यांशी मी चर्चा केलेली आहे. प्रशासनाचे नियोजन आहे. आज जाहीर करु शकत नाही. परंतु सर्वसाधारण सभेत नक्कीच आपले सर्वांचे समाधान होईल अशी कामे घेता येईल.

**श्री.शे. मुनाफ शे. यासीन :** रोशन गेटच्या बाजुला असलेली मुतारी बाबत मागील बैठकीत चर्चा झालेली होती. स्वच्छता असावी. परंतु कोणत्याही कार्यवाही करण्यात आलेली नाही. चार वर्षापासून या गेटसाठी बजेट आहे. आतापर्यंत काम केलेले नाही.

**मा. सभापती** : प्रशासनास आदेशित केलेले होते. झोन अधिकारी यांनी तेथील मुतारी बंद करावयास पहीजे. या गेटचा विकास कसा होईल. याकडे महापालिकेने लक्ष दयावे.

**मा. आयुक्त** : सर्व दुरुस्तीबाबत बरेचशे नियोजन झालेले आहे. अन्य महापालिका वगळून बाहेरील संस्थेचा सहभाग करुन घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. आचारसंहिता असल्यामूळे जास्त निर्णयात्मक बोलणे बरोबर होणार नाही. याबाबत दोन वेळेस माझी तज्ज्ञांशी चर्चा झालेली आहे. अंदाजपत्रक तयार करुन व तांत्रिक बाबी तपासून अभिप्राय देणार आहेत.

**श्री. इलियास किरमाणी :** डॉ. देशपांडे निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची खाते चौकशी चालू होती. त्या चौकशीचा अहवाल सभागृहासमोर अदयाप आलेला नाही.

**मा. सभापती** : अहवाल प्राप्त असेल तर, सादर करावा. नसता आजची परिस्थिती काय आहे. खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मा. स्थायी समितीच्या निर्णयानुसार निवृत्त न्यायधिश मा. श्री. निरखी यांचे अध्यक्षतेखाली डॉ. देशपांडे यांची चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली होती. मा.निवृत्त न्यायाधिश श्री. निरखी यांचा अहवाल प्रशासनाकडे प्राप्त झालेला असून, त्या अहवालाची छाननी चालू आहे.

**मा. सभापती** : अहवालाची छाननी म्हणजे काय प्रशासन त्यात फेरफार करु शकते का?

**उपआयुक्त (प्र.) :** ज्या मुदयावर प्रशासनाने कार्यवाही प्रस्तावित केलेली होती. चौकशी अधिकाऱ्यांनी त्या मुदयांवर जे काही प्रशासनामार्फत साक्षी नोंदविल्या गेल्या व त्यानुसार जे निष्कर्श दिले आहेत ते मा. आयुक्तांकडे सादर केलेले आहेत. त्या निष्कर्षाची छाननी चालू आहे.

**मा. सभापती** : माझ्या माहीतीप्रमाणे दिलेला अहवाल जसाच्या तसा या सभागृहात ठेवण्यास हरकत नाही. छाननी करण्याचे अधिकार स्थायी समितीत असतील असे माझे मत आहे. जसाच्या तसा अहवाल सादर करावा.

**उपआयुक्त (प्र) :** सविस्तर अहवाल पुढील बैठकीत देण्यात येईल.

**मा. आयुक्त** : ही न्यायालयीन चौकशी नसून विभागीय चौकशी आहे. चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधिश यांची नियुक्ती केलेली आहे. प्रोसीजरप्रमाणे कार्यवाही होईल. त्यावर आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहासमोर येणारच आहे. अहवाल प्राप्त आलेला आहे. जास्त वेळा न लागता अहवालाची छाननी झालेली आहे. कारणे दाखवा नोटीस पाठवणे, खुलासा होणे व आणखी काय कार्यवाही करणे शक्य आहे व कायदेशीर मत होणे या बाबी चालू आहेत. हे प्रकरण न्यायालयात आहे. न्यायालयास सुध्दा अहवाल द्यावयाचा आहे.

**मा. सभापती** : मागील बैठकीत प्रशासकीय विभागामार्फत होणार असलेली कार्यवाही व करण्यात आलेली कार्यवाही याचा अहवाल वेळोवळी स्थायी समितीस द्यावा म्हणून आदेशित केलेले होते. परंतु त्या आदेशाचे पालन आलेले दिसून येत नाही. प्रशासनाने याची दखल घ्यावी व आदेशाचे पालन करावे.

**विषय क्र. ०२ :**

दिनांक ०८-०४-०४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का. व. क्र. ०१) इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक ०८-०४-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक १०-०५-२००४ रोजी मा.सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.४५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर | स. सदस्य |
| ३. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ४. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ५. | स. स. श्री. सौ. रशिदा बेगम गफ्फरयारवारखान | -//- |
| ६. | स. स. श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल | -//- |
| ७. | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| ८. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ९. | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| १०. | स. स. श्री. रगडे भगवान दगडुजी | -//- |
| ११. | स. स. श्री. मुनाफ शेख यासीन | -//- |
| १२. | स. स. श्री. सलिम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती :** अगोदर चर्चा करण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** काल खडकेश्वर भागात एक रिक्षा चालक श्री. महादू धोंडीबा बनकर यांचा दुर्देवी अंत झाला. तो दुसऱ्याचा प्राण वाचविण्यासाठी गेलेला असतांना त्यांचाच मृत्यू झालेला आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री. मधुकर सावंत :** यास माझे अनुमोदन आहे.

यावेळी स्व. महादू धोंडीबा बनकर यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** चर्चेसाठी वेळ दिलेला आहे काल दि. ०९-०५-२००४ रोजी खडकेश्वर भागात हुबळीकर मंगल कार्यालयासमोरील लोखंडी दुभाजक वर श्रीमती पुष्पा मापारी यांना विजेचा शॉक लागला त्यांचा आवाज ऐकुन रस्त्याच्या बाजुला उभा असलेला रिक्षा चालक महादू धोंडीबा बनकर हे त्या महिलेस वाचविण्यासाठी गेले असता त्या ग्रीलमध्ये वीजेचा प्रवाह असल्याने स्व. बनकर यांना दुसऱ्याचा प्राण वाचवितांना स्वत:चा प्राण गमवावा लागेल. ही दुर्देवी घटना आहे. हा प्रकार कशामुळे घडला याची चौकशी होणे आवश्यक आहे. सदर भागात मी. स्वत: जाऊन पाहणी केली लोकांच्या तोंडून वेगवेगळया प्रकारची चर्चा येत होती. त्या भागात आपण स्वत: व मा. महापौर यांनी सुध्दा पाहणी केलेली आहे. तसेच तातडीची बैठक आपण

स्वत: मा. महापौर यांनी सुध्दा पाहणी केलेली आहे. तसेच तातडीची बैठक आपण स्वत: व मा. महापौर मा. आयुक्त यांनी घेतलेली आहे. हा प्रकाश कशामुळे घडलेला आहे. अशा घटना वारंवार होणार नाही याची दखल घेणे आवश्यक आहे. सभागृहाला प्रशासनाने स्पष्ट खुलासा करण्यात यावा त्यानुसार चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**मा. सभापती** : काल सकाळी ०९.३० वाजेच्या दरम्यान खडकेश्वर भागात रस्ता दुभाजकावर महादू धोंडीबा बनकर नावाच्या रिक्षा चालकाच्या विजेचा धक्का लागू मृत्यू झाला. ही बातमी कळताच मी ११.०० वाजेच्या सुमारास मा. महापौर मा. उपआयुक्त यांचे समवेत पाहणी केली. सर्व परिस्थिती जाणून घेतली. संबंधित व्यक्तींच्या कुटूंबियांना तात्काळ २०,०००/- रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी म्हणून मा. महापौरांनी पत्र देवून आदेशीत केलेले आहे. ती लवकरच देण्यात येईल. सदर व्यक्ती दुसऱ्याचे प्राण वाचविण्यासाठी गेलेला होता. एका अर्थाने तो शहीद झालेला आहे. त्यात चौकशी अधिकारी म्हणून श्री. सी. एस. सोनी यांची मा. आयुक्त यांनी नियुक्ती केलेली होती. त्यांचा अहवाल त्यांनी तयार केलेला आहे. अहवाल तयार असेल तर, सभागृहात वाचून दाखवावा.

**शहर अभियंता** : काल सकाळी ९ ते ९.३० वाजेच्या सुमारास खडकेश्वर भागात एक रिक्षा चालक महादू धोंडीबा बनकर यांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. त्या संदर्भात मा. आयुक्त यांनी मला पाहणी करुन कार्यवही करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या व अहवाल सादर करावा म्हणून आदेशीत केलेले होते. त्यानुसार मी प्रत्यक्ष पाहणी केली. त्या भागातील काही नागरीक तेथे होते. त्यांचेसह मी चर्चा व चौकशी केली व चौकशी अहवाल मा. आयुक्तांना सादर केलेला आहे. निश्चित ही दुर्दैवी घटना आहे असे अहवालात मी नमूद केलेले आहे. वीजेचा शॉक लागुनच तो व्यक्ती मरण पावलेला आहे. श्रीमती पुष्पा मापारी नावाच्या ज्या महिला आहेत. त्यांना शॉक बसला त्यानंतर त्या मोठया आवाजात ओरडल्यामूळे बाजूलाच रिक्षा चालक श्री. महादू बनकर हे धावून येऊन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला व त्या प्रयत्नात त्यांचा होत ग्रीलवर पडला गेला त्या ग्रीलमध्ये वीजेचा प्रवाह होता. मापारी मॅडम ह्यांचा प्राण वाचला.परंतू त्या रिक्षा चालकाचा हात ग्रीलवर गेल्यामुळे एकदम वीजेची पकड निघु शकत नाही. घटना घडली. कशामुळे घडली. त्या ठिकाणी महापालिकेचे पोल आहे. अंडरग्राऊंड केबल आहे. केवळ खराब झाल्यामूळे त्या ठिकाणावरुन ते डिस्कनेट करण्यात आले. हॅन्गींग मधुन विदयुत प्रवाह घेऊन चालू करण्यात आलेले होते. अंडरग्राऊंड केबल मधुन फक्त न्युटरलाचा उपयोग होत होता. ही केबल फेल व डेड होती असे माझे निर्दशनास झालेले होते. जेव्हा वरील केबल चार्ज केले जाते तेव्हा खालची केबल निश्चित डिस्कनेट करावे लागते. डिस्कनेट नाही केले तर, वेगळे प्रकार होऊ शकतात. चौकशी केली असता लाईट बंद होते. सकाळी ६.३० वाजता विदयुत प्रवाह बंद करण्यात आलेला होता. ही घटना सकाळी ९.३० वाजता घडलेली होती. ६.३० वाजता फ्यूज काढुन घेण्यात आले होते. याचा अर्थ त्यामुळे विदयूत प्रवार राहण्याचा प्रश्नच येत नाही. बाबर नावाचे कर्मचारी होते. त्यांना विचारणा केली असता त्यांनी ६.३० वाजता लाईट बंद केलेले होते. तेथील रहिवाशांना विचारले तेव्हा त्यांनीही असेच उत्तर दिले

की, लाईट बंद होते. एक्सपोज वायर मध्ये विदयुत प्रवाह नव्हता. पथदिवे आपण बंद करतो. वीजेचा प्रवाह निश्चित कोठुनतरी गेलेले असेल, त्यामूळे शाूक लागून त्या व्यक्तीचा मृत्यू झालेला आहे. या बरीचशी कारणे असु शकतात. न्युटरल फेल झालेले असेल. एम.एस. ई. बी. ची जी ओव्हर हेड वायर असते ती फेल झालेली असेल इन्सूलेशन कट झालेले असेल. हॅन्गींग वायर हे बॉक्सच्या वरील बाजुने असते. बॉक्स पुर्णतः लागत नाही. सदरचे वायर होल मधून देणे आवश्यक आहे. तो बॉक्स बंद नाही. यापुर्वी वादळ, पाऊस झालेला होता. अशा मुळे या घटना घडू शकतात. न्यूटरल फेल होणे फ्यूज मधून विदयुत प्रवाह जाणे. बॉक्सचे दरवाजे वाऱ्यामुळे उघडल्यास ग्रीलला जाऊन लागतात. त्यामुळेही विदयुत प्रवाह येऊ शकतो. परंतु जी अंडरग्राऊंड केबल होती. ती डेड होती. त्यास डिस्कनेक्ट केलेले होते. त्याचे फ्युज वायर काढल्यामूळे प्रश्न येत नाही. तांत्रिक अहवाल जे इलेक्ट्रीकल इन्सपेक्टर जे शासनाचे असतात. याची चौकशी करुन तंतोतंत अहवाल ते देवू शकतात. त्यांचेकडे ती जबाबदारी सोपविलेली असून, चौकशी चालू आहे. उदया संध्याकाळ पर्यंत त्यांचाही अहवाल सादर होईल.

**श्री. भगवान रगडे :** संबंधित अधिकारी यांनी त्यांचे पध्दतीने अहवाल दिला. एक व्यक्ती आज मृत्यूमुखी पडला. म्हणून त्या घटनेकडे लक्ष देण्यात येते. परंतु या शहरात अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या घटना होऊ शकतात. अशी परिस्थिती आहे. एम. एस. ई. बी. च्या पोलची महापालिकेच्या पोलची आहे. ही नवीन घटना नाही. यापुर्वीही घटना घडलेल्या आहेत. माझ्या वॉर्डात ब्रीजवाडी भागात पाण्याची टाकी होती. पंप बसविलेला होता. त्या पंपावर थ्रीफेजचे कनेक्शन होते. नेहमी तो बॉक्स उघडा राहात असेल तेथे एका मुलाचा हात लागून मृत्यू झालेला होता. म्हणून शहरात ज्या ठिकाणी डी. पी. असेल, डी. पी. बॉक्स असतील. त्यामुळे नागरीकांच्या जीवीतास धोका निर्माण होणार नाही. याची दखल कोण घेतात. या महापालिकेमध्ये कार्यकारी अभियंत्यांचे पद निर्माण केलेले आहे. उपअभियंता ची पदे आहेत. लाईनमन आहेत. कोणीही अधिकारी, कर्मचारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करीत नाही. अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे हा प्रकार घडलेला आहे. जी अंडरग्रांऊडसाठी परवानगी दिलेली होती. किती दिवसात ते काम पुर्ण करायचे होते. परवानगी दिलेली होती की नाही. दिली असेल तर, कोणत्या बेसवर दिलेली होती. खोली व रुंदी किती त्याबद्दल सखोल चौकशी करण्यात यावी. शहरात अनेक वॉर्डात अशा घटना होऊ शकतात. अनेक वेळ मी पत्र दिलेले आहे. विदयुत तारा लटकलेल्या दिसून येतात. त्यात झोळ पडतो. त्या ओढून घेण्यात यावे. नागरीकांच्या जीवाला धोका होऊ नये. डी. पी. उघडयावर आहेत. तार फेन्सींग नाहीत म्हणून श्री. महादू धोंडीबा बनकर यांना मृत्यूच्या छायेत जाण्याची वेळ आली व आपण चर्चा करतो की, हे काम एम. एस. ई. बी. का? महापालिका परंतु दोन्ही विभागाचे काम आहे. येथील नागरीकांना धोका होऊ नये हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम आहे. जी घटना घडली ती दुर्देवी आहे. २० हजार रुपये देण्याची निर्णय घेताल. तो घरातील कर्ता व्यक्ती गेलेला आहे. २०,०००/- रुपये देऊन त्या कुटूंबीयाचे भागणार नाही. म्हणून त्या

कुटूंबातील त्यांची पत्नी किंवा मुलगा असेल त्यांना महापालिकेच्या सेवेत नोकरीवर घेण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** शहर अभियंता यांनी अहवाल सादर केलला आहे. परंतू त्यांनी जी पाहणी केली त्याचे मत सभागृहासमोर ठेवले आहे. त्या जागेवर मी स्वत: प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. त्या ठिकाणी खोदकाम करण्यात आलेले होते. वृत्तपत्र सुध्दा व्यवस्थित अशी माहिती आलेली आहे. जे काही केबल वायर होती ते तुटलेले दिसुन येत होते. केबल वायरचे कनेक्शन बंद होते असे त्यांचे म्हणणे होते जेव्हा ओव्हर हेड पासुन विदयुत प्रवाह दिला जातो तेव्हा खालचे व इतर कनेक्शन बंद केले जाते. तेथे ग्रीलमध्ये विदयुत प्रवाह होता म्हणूनच त्या महिलेस शॉक लागलेला होता व ज्या इसमाचा मृत्यू झाला तोही विदयुत प्रवाहामुळेच झालेला आहे. हे मान्यच करावे लागेल. या घटनेमागे महापालिकेची व एम. एस. ई. बी. ची किती जबाबदारी होती हे पहाणे आवश्यक आहे. बाबर नावाचे कर्मचारी यानी सकाळी ६.३० वाजता विदयुत पुरवठा बंद केला. घटना ९.३० वाजेच्या सुमारास घडलेली आहे. मग त्या ठिकाणी विदयूत पुरवठा कसा व कोणी सोडला हे महत्वाचे आहे. अर्थींग झाली तर कुठे कालच पाहण्याची गरज होती. किंवा इतर कारणामुळे ही घटना घडलेली आहे. याची कसुन चौकशी घेणे आवश्यक आहे. एम. एस. इ. बी. च्या विभागासंबंधी सांगावयाचे झाल्यास गेल्या ३ वर्षापूर्वी घाटी दवाखान्याच्या रस्त्याला लागुन विजेच्या धक्क्याने तीन लाईनमनचा मृत्यू झालेला होता. इलेक्ट्रीक्स सुपरवायझरचा रिपोर्ट मागविण्यात आला. परंतु काहीही कार्यवाही करण्यात आलेली नव्हती या घटनेच्या बाबतीत तसे काही होऊ नये म्हणून जातीने दखल घेण्यात यावी. रिपोर्ट मागवितांना विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता यांचा सहभाग असणे आवश्यक आहे. ड्रेनेजसाठी खोदकाम झालेले होते. अशी माहिती मिळाली. जे खोदकाम करण्यात आले ते काम कोणत्या प्रकारचे होते. रेटलिस्टचे होते. मोठी निविदेचे होते. याची चौकशी व्हावी. कामाचे आदेश व मुदत किती दिवसासाठीची होती. याची चौकशी होणे गरजेचे आहे. कोणतेही विकास काम करतांना इतर काही विकास कामात दुरुस्तीचे काम निर्माण झाले असेल ते काम त्या ठेकेदाराने पुर्ण करणे आवश्यक असते. त्या ग्रीलमध्ये विदयूत पुरवठा असेल किंवा नसेल परंतू खोदकाम चालू आहे. अमुक कामाची दुरुस्ती करावी लागेल असा अहवाल त्या ठेकेदाराकडून प्रशासनाकडे आलेला होता का? हे सुध्दा पाहण्याची गरज आहे. त्या ठेकेदाराकडून प्रशासनाकडे आलेला होता का? हे सुध्दा पाहण्याची गरज आहे. शहरात इतर किती भागात डी. पी. उघडया पडलेल्या दिसून येतात.

**मा. सभापती** : सर्व सदस्यांनी यावर चर्चा करावी त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडुन सविस्तर खुलासा घेता येईल.

**श्री. मधुकर सावंत :** शहर अभियंता यांनी अहवाल दिला की, बाबर नावाच्या व्यक्तीने सकाळी ६.३० वाजता लाईट बंद केल्यानंतर ९ ते ९.३० दरम्यान त्या ठिकाणी विदयूत प्रवाह येतो क्या? हा प्रश्न उपस्थित होतो. रु. २०,०००/- ची तरतुद केलेली आहे. ती अल्प प्रमाणात आहे. वृत्तपत्रात आपण नेहमी बघतो अमुक व्यक्तीने लहान मुलांचा जीव वाचविला. त्यांना राष्ट्रपती पुरस्कार दिला जातो. या ठिकाणी महादू धोंडीबा बनकर नावाच्या रिक्षा

चालकाने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता एक महिलेचा जीव वाचविलेला आहे व तो स्वतः त्यात मृत्यूमूखी पडलेला आहे. एका अर्थाने तो शहीद झाला आहे. म्हणून २०,०००/- रु.ऐवजी भरघोस अशी रु. १ लक्षची आर्थिक मदत देण्यात यावी.

**मा. सभापती** : सहानुभूतीपूर्वक म्हणून आपतकालीन आर्थिक मदत म्हणून २०,०००/- रु. घोषित केलेला आहे. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आणखी काही आर्थिक मदत देता येत असेल तर सर्व पदाधिकरी/अधिकारी यांना एकत्रित बसुन निर्णय घेतला जाईल. यापुर्वीही दिलेली आहे. या दुर्देवी घटने बद्दल सभागृहात चर्चा झाली. स. स. श्री. कोकाटे यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांना खोदकाम केल्याचे दिसुन आले. अंडरग्राऊंड केबल सुध्दा आहे. अंडर ग्राऊंड केबलमध्ये विदयुत पुरवठा होता किंवा कसे निविदा केव्हा काढण्यात आलेली होती. ए-१ की बी-१ ची निविदा होती रेटलिस्टची होती याबाबत त्याप्रमाणे स. स. श्री. सावंत यांनी एक लक्ष रु. आर्थिक मदत देण्याची मागणी केली. आपण आर्थिक मदत देतो ती देता येईल का?

**श्री. भगवान रगडे :** १ ते १.५० लक्ष आर्थिक मदत देवून काही होणार नाही. तो घरातील कर्ता व्यक्ती होता. त्यांचे कुटूंबातील एका व्यक्तीस या महापालिकेच्या सेवेत सामावून घ्यावे.

**मा. सभापती** : त्या रिक्षा चालकाच्या कुटूंबातील एका व्यक्तीस नोकरीवर घेण्यासंबंधी या सभेत ठराव मंजूर करुन सर्वसाधारण सभेकडे पाठवुन सर्वसाधारण सभा काय जे धोरण ठरवील किंवा आर्थिक मदत देता येत असेल, ती देता येईल.

**कार्य. अभि. (ड्रे/वि) :** सदर ड्रेनेजच्या कामाची निविदा १.२१ लक्ष आहे. कार्यादेश २७-०२-२००४ रोजी दिलेला आहे. २ महिन्याची मुदत होती. १०.१२ दिवसांपुर्वी काम पुर्ण झालेले आहे.

**मा. सभापती** : स. सदस्यांचे म्हणणे असे की, खोदकाम केल्यामुळे केबल लाईन बस्ट झालेली होती. ती प्रत्यक्ष ठिकाणी उघडयावर दिसुन येत होती. त्यात विद्युत पुरवठा होता का?

**कार्य. अभि. (पा. पु.) :** केबल साधारणतः चार महिन्यापूर्वी बस्ट झालेली होती. डेड झालेली आहे. म्हणून ओव्हर हेड सर्व्हिस वायर टाकुन लाईन चालू करण्यात आलेली होती. सतीश कामेकर यांनी ते काम घेतलेले होते.

**मा. सभापती** : चार महिन्यापुर्वी केबल लाईन बस्ट झालेली असतांना कार्यवाही केलेली नाही. किमान १ महिन्याच्या आत ती केबल लाईन दुरुस्त व्हावयास पाहिजे. असे आदेश देण्यात यावे. ४-४, ६-६ महिने लाईन बस्ट झाल्यानंतरही दुरुस्त होत नाही. यापुढे १ महिन्यांच्या आत दुरुस्ती केल्या पाहिजे असे आदेश देण्यात यावे. जी दिरंगाई झालेली आहे ती यापुढे होता कामा नये.

**मा. सभापती** : या विषयावर भरपूर चर्चा झालेली असून, आपण सर्वांनीच स्व. महादु बनकर यांचे बाबतीत सहानुभूती दाखविलेली आहे. मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली जी बैठक झालेली होती. त्यात स्पष्ट अशा सुचना अधिकाऱ्यांना देण्यात अलेल्या होत्या की, जे ओव्हर हेड मधुन विदयुत पुरवठा घेतलेला असेल तो अंडर ग्रांऊड केबल करुन करण्यात यावा. ज्या शहरात उघड्या डी. पी. आहेत. त्यात तार फेंसीग तसेच विद्युत तारामध्ये झाडे येत असतील ते तोडावे. अशा सुचना दिलेल्या आहेत. जे पोल विदयुत विभागाचे असतील त्यांना तसे पत्र देवून कार्यवाही करण्याच्या सूचना

देण्यात आलेल्या आहेत. त्याच बैठकीत संबंधित व्यक्तीच्या कुटूंबीयांना २०,०००/- देण्याचे पत्र सुध्दा मा. आयुक्तांना देण्यात आलेले आहे. रु. २०,०००/- मदत देण्यास हरकत नाही. त्याबाबत मा. आयुक्त खुलासा करतील. तात्काळ उद्याच ती मदत द्यावयाची आहे.

**श्री. मधुकर सावंत :** भरघोस मदत करावी अशी विनंती आहे.

**मा. आयुक्त** : या विषयावर तांत्रिक चर्चा झालेली आहे. त्या तांत्रिक चर्चेमध्ये अधिक भर घालणे योग्य नाही. सभागृहात स्पष्ट व्हायला पाहिजे की, महापालिका एम. एस. ई. बी. इलेक्ट्रीकल इन्सपेक्टर हे शासनाचे अधिकारी असतात. त्यांचे कार्यक्षेत्र मोठे असते. कोर्ट प्रकरणांत किंवा चौकशीच्या बाबतीत त्यांची साक्ष काढली जाते. मी स्वतः आणि मंत्री महोदयांनी महापालिकेला त्यांचा अहवाल लवकर देण्याचे सांगितले. दोन दिवसात अहवाल सादर होईल. तांत्रिकदृष्ट्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर योग्य तो निर्णय घेता येईल. अहवाल नसतांना अंतीम निर्णय घेणे योग्य ठरणार नाही.

**मा. सभापती** : चुक कुणाची ही असु दया. परंतु सदर व्यक्ती हे दुसऱ्याचे प्राण वाचविण्यासाठी गेलेले होते. म्हणून त्यांना मदत द्यावयाची आहे. चुक असेल तरच मदत द्यायची अशी मदत द्यायची अशी आमची भावना नाही. सहानुभूतीपुर्वक आपतकालीन जी मदत करण्यात येते. शहराचा नागरीक म्हणून त्यास मदत करायची आहे. रिपोर्ट आल्यानंतर भरघोस अशी मदत करण्याचा निर्णय घेता येईल. परंतु २०,०००/- रु. ही तोडकी रक्कम आहे ती देण्यास हरकत नसावी. सभापती नात्याने प्रशासनास आदेश देतो की, तात्काळ मा. महापौरांनी पदाधिकाऱ्यांनी जे पत्र दिले व या स्थायी समितीच्या सभेत सुध्दा चर्चा होवून असा निर्णय घेण्यात येतो की, २०,०००/- रु. मदत देण्यात यावी.

**मा. आयुक्त** : मा.सभापतींनी आदेश दिलेले आहे. सकाळच्या बैठकीतही चर्चा झालेली आहे. सकाळच्या सभेच्या अनुषंगाने जे पत्र दिलेले आहे. ते कार्यकारी अभियंता तसेच मुख्यलेखाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या व मा. सभापतींच्या आताच्या आदेशास अधिन राहुन संबंधित अधिकाऱ्यांना ही मदत देण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

**मा. सभापती** : ठिक आहे. रु. २०,०००/- सर्वसाधारण सभेच्या अधिन राहून देण्यात यावी. आणखी काही रक्कम वाढवून देता येत असेल तर, सर्वसाधारण सभेत निर्णय घेता येईल. सर्व सदस्यांना कल्पना देऊ इच्छितो की, स्थायी समितीची समोरील विषय सुचिका निवडणूक आयोगाकडे परवानगी मागविलेली विषयासह त्यांना कळविण्यात आलेले होते. निवडणूक आयोगाने असे स्पष्ट नमूद केलेले आहे की, या महापालिकेच्या उस्मानपुरा वार्डाची निवडणूक आहे. त्या वार्डाशी निगडीत कोणताही असा विषय या बैठकीत चर्चेला येऊ नये. शिवाय त्या प्रभागासंबंधी कोणतीही चर्चा होऊ नये. पाणी किंवा नैर्सेगिक आपत्तीतून ज्या घटतात असे सर्व विषय घेता येतील.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** शहरात पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणात भेडसावत आहे. सिडको भागात कधी दोन कधी पाच दिवसाआड सुध्दा पाणी आलेले नाही. यासाठी प्रशासनाने काय उपाययोजना केलेली आहे. शहरात सिडको भागासाठी एकूण किती एम. एल. डी. पाणी येते. शहरासाठी किती व सिडको

भागासाठी किती पाणी दिले जाते. एक्सप्रेस लाईनची कार्यवाही पुर्ण झाली का?

**श्रीमती जयश्री किवळेकर :** आताच एका गंभीर विषयावर चर्चा झाली. दुसरा पाणी व गंभीर व जीवनाशी निगडीत विषय आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मध्यंतरी एक्सप्रेस लाईन टाकुन सिडको भागात पाणी-पूरवठा झाला. सहा महिने व्यवस्थित पाणी पुरवठा झाला. त्याच वेळसे ज्यांचेकडे हातपंप होते त्यासही पाणी होते. जेव्हा खऱ्या अर्थाने पाण्याची गरज असते. हात पंपानाही पाणीनसते व महापालिकेमार्फत होणारा पाणीपुरवठा ही एक दिवसाआड करण्यात आलेला आहे. व वेळेवर नाही व कमी दाबाने होतो. नियोजन करणे प्रशासनाचे काम आहे. एक्सप्रेस लाईनवर मोठया प्रमाणात खर्च झालेला आहे. सिडको भागात पाण्याची आजची स्थिती अत्यंत दयनीय आहे. याबाबत अधिकाऱ्यांना सर्व कल्पना आहे. सिडको भागात येणारे पाणी वेळेवर नाही. कमी दाबाने पाणी येते. नियोजनाचे बंधन नाही. वृत्तपत्रात विभागातर्फे बातम्या दिल्या जातात, पाणी वळवुन घेतले. जलवाहिनी फुटली यामुळे जनतेचे समाधान होणार नाही. नागरीकांकडील बोअरवेल/हातपंपची पाण्याची पातळीखोल गेलेली आहे. पाण्याचा गंभीर प्रश्न झालेला असून, वृत्तपत्रात दिलेली सूचना सर्वच लोक वाचतात. असे नाही. कशामुळे पाणी पुरवठा विस्कळीत झाला. आम्हाला सुध्दा कल्पना नसते. लोक आमच्याकडे येतात. त्यांना काय उत्तर दयावे प्रश्न पडतो. आठवडयातुन एक दिवस पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यास परिस्थिती समजू शकेल परंतू गेल्या १५ दिवसांत तीन-तीन दिवस पाणी येते ते साडे आठ पर्यंत न झाल्यास नागरीक लगेच प्रश्न विचारतात. सुशिक्षित लोक घराबाहेर येत नाही असा प्रश्न नाही. सर्वांनाच पाणी लागते. एक्सप्रेस लाईन टाकुन काय फायदा सिडको वासींयासाठी आलेला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासुन अर्धा तासापेक्षा जास्त वेळ पाणी येत नाही. ते ही वेळेवर नाही एक दिवसाआड येते, कमी दाबाने येते. एन-३, एन-४ भागात उपआयुक्त राहतात. तेथील पाण्याची परिस्थिती त्यांना माहीत आहे. पाण्यासाठी लोकांनी न्यायालयात धाव घेतली न्यायालयाच्या आदेशानुसारच एन-३, एन-४ येथे पाणी देत होतो. महापालिकेच्या वतीने असा खुलासा न्यायालयात केला की, या भागात सिडकोने मोठया व्यासाच्या पाईप लाईन टाकून दयाव्यात. त्यावर सिडकोने ५ लक्ष खर्च केले. त्यास महापालिकेने मोठी जलवाहिनी जोडलेली असून, चार महिने झाले. नवीन जल वाहिनीतून अदयाप पाणीपुरवठा झालेला नाही. पाणीपुरवठा सोडायचा नव्हता तर का खर्च करण्यात आलेला आहे. दररोज माझे घरी पाण्यासाठी नागरीक येवून बसतात. प्रश्न विचारतात उत्तर नसते. एक महिना झाला वर्ग-१.२ चे इतर विभागाचे अधिकारी माझ्या वार्डात राहतात. त्यांचा दुरध्वनी आल्यावर उत्तर नसते. यासाठी काय नियोजन होणार आहे व एक दिवसा आड पाणी देणार त्यावेळी असा निर्णय झाला होता की, एक ते दिड तास पाणी पुरवठा केला जाईल. असे आश्वासन दिलेले होते. तीन दिवसाआड पाणी देण्यात येते. पाणी असून आहे. परंतु नियोजन नाही. उदयापासुन माझ्या वार्डात पाणी पुरवठा व्यवस्था सुरळीत करण्याचे आदेश द्यावेत. संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा घ्यावा.

**श्री. मधुकर सावंत :** मा. महापौर, उपमहापौर, मा. सभापती मा. आयुक्त यांनी एकत्रित येऊन १० लक्ष जनतेसाठी पाणी पुरवठा योजना सुरळीत करण्यासाठी जी धावपळ केली त्याबद्दल आभारमानावे तेवढे कमीच आहे. व जेवढी प्रशंसा करावी तेवढी कमीच आहे. मागील काही दिवसांपासुन जनतेचे जे हाल झाले त्यास पाटबंधारे विभागाचे अधिकारी जबाबदार नसुन महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता (पापु) श्री. पानझडे हेच जबाबदार आहेत. अनेक महिन्यांपासुन बघतो की, श्री.पानझडे हे अत्यंत अकार्यक्षम बेजबाबदारपणे उत्तरे दिली आहे की, पाच-सहा दिवसापासुन पाणीपुरवठा होत नाही हे मला आज माहिती मिळाली. आजतरी पाणी देवु शकत नाही. उदयाचे मला माहिती नाही. पाणीपुरवठा करण्याचे काम माझे नाही. आपण आयुक्तांकडे जाऊ शकता. त्यांना काय समजते. वैगेरे शब्द वापरलेले आहे. श्री. पानझडे यांचे पाणी पुरवठा करण्याचे काम नसेल तर, त्यांना त्या पदावर का ठेवावे? जायकवाडी संदर्भात जे काही येत आहे ते श्री. पानझडे मुळेच होत आहे. सन २००४ च्या उन्हाळयात सर्वसामान्य जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी भयंकर त्रास होणार हे अगोदरच जनतेला माहित होते. परंतू पदवी प्राप्त केलेले श्री. पानझडे यांना भविष्यात पाणी टंचाईला तोंड दयावे लागेल याचा वेध घेता आला नाही. ऑक्टोंबर/नोव्हेंबर २००३ मध्येच गाळ काढण्याचे काम गरजेचे होते. तसेच पाणीपुरवठा करणारे जे यंत्र आहेत. त्यांची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्याबाबत शासनाचे पत्र येवून सुध्दा कार्यवाही झालेली नाही. जनतेचा रोष अधिकाऱ्यांवर नाही तर नगरसेवकांवर असतो. नेमके काल तो प्रकार घडलेला आहे. जायकवाडी जलाशयातून पाणीपुरवठा सुरळीत व्हावा म्हणुन मा. सभापती यांचे घरावर जनतेने हल्ला केला. त्यावेळी ते जायकवाडी येथे पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी व्यस्त होते. या स. श्री. पानझडेच जबाबदार आहेत. पाणीपट्टी पाटी जनतेकडुन रु. १८००/- पाणीपट्टी घेतली जाते. परंतु पाणीपुरवठा विभागाच्या अशा कारभारामुळे जनतेस सहा महिने पाणी दिले जात नाही. उन्हाळयात नवीन नळ कनेक्शन दिले जात नाही. तरी माझ्या प्रभागातून वेंदातगृहकूल व चौबे हॉस्पीटल याच्या समोरील मुख्य जलवाहीनीतुन दोन नळ कनेक्शन दिलेले आहेत. जायकवाडी ते या शहरा पर्यंत अनेक व्हॉल ना दुरुस्त असून, हजारो लिटर्स पाणी वाया जाते. सदरील बाब वारंवार निर्दशनास आणुन देऊनही श्री. पानझडे सांगतात अशाप्रकारे पाणी वाया जातच नाही. माझ्या माहीतीनुसार संबंधित अधिकारी हे रस्त्याने प्रवास न करता हेलीकॉप्टर ने जात असावे. ते पाणीपुरवठा विभागात आल्यापासून भ्रष्टाचार वाढलेला आहे. ते स्वतः दुसऱ्याच्या नावाखाली ठेका घेतात. त्यांच्या कामाचा दर्जा कोणीच तपासत नाही. ही वस्तुस्थिती आहे. माझी विनंती की, श्री. पानझडे यांनी पदभार स्विकारल्यापासुन त्यांचे कामाची तज्ञामार्फत पुर्नः तपासणी करावी. त्यांना भ्रष्टाचारा विषयी बोललो तर मला उध्दटपणे बोलले का तुम्ही सी. बी. आय. चे अधिकारी आहात काय? मी माझ्या कामाची सर्व शुटींग वैगेर करुन ठेवलेली माझे व कोणी करु शकत नाही. माझी बदली होवू शकत नाही. माझ्या वार्डातील अनाधिकृत नळ कनेक्शन काढण्यासंबंधी त्यांना अनेक वेळा पत्र देवूनही कार्यवाही झालेली नाही. म्हणून १० लक्ष जनतेच्या भावनेशी खेळणारे श्री. पानझडे यांना त्वरीत निलंबीत करावे. जायकवाडी

येथील गाळा न काढणे मशीनरी दुरुस्त न करणे यांची चौकशी करावी. अशी माझी मागणी आहे.

**मा. सभापती** : स. स. सदस्य व माजी सभापती श्री. ताठे यांनी पाणी प्रश्नावर मुद्दा उपस्थित केलेला आहे. स. स. श्रीमती किवळकर यंनीएन-३, एन-४ भागात पाण्याचे नियोजन नाही. मुद्दा उपस्थित केला. पाईपलाईन टाकण्यात आलेली असून, चालू करण्यात आलेली नाही. १५ दिवसांपासुन तीन-तीन दिवसाआड पाणी येत असे त्यांनी मत व्यक्त केले. स. स. श्री. सावंत यांनी त्यांचे भागात अनाधिकृत नळ कनेक्शन बाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. नवीन नळ कनेक्शन दिलेले आहेत का? तसेच जायकवाडीतील गाळ वैगेरे काढण्याबाबत तत्परतेने कार्यवाही न केल्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर खुलासा करावा.

**श्री. भगवान रगडे :** गेल्या चार वर्षात सुरळीतपणे मिळाले परंतु जो भाग झोपडपट्टीचा आहे. त्या भागात दररोज पाणीपुरवठा व्हावा असा सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झालेला होता. त्या लोकांकडे पाणी साठविण्यासाठी काहीच नसते. गरीब लोक अशा वस्तीत राहात. दररोज मेहनत करुन पोटाची खळगी भरावी लागते. पाणी साठविण्याची व्यवस्थाच नाही. नियमीतपेक्षा थोडा वेळ पाणी दयावे. परंतू दररोज देण्यात यावे.

**मा. सभापती** : परळी औष्णीक केंद्रास पाणी देण्यात आल्यामूळे पाणी टंचाई निर्माण झाली. १०-१२ दिवसच पाण्याचा अभाव निर्माण झालेला असावा. स. सदस्यांनी सुचना केल्यानुसार श्री. पानझडे खुलासा करतील. दररोज पाणी देण्यासंदर्भात जायकवाडीचे धरणात पाणी पुर्णतः साठविल्यानंतर विचार करण्यात येईल.

**कार्य. अभि. (पा. पु.) :** पाणीपुरवठा कार्यपध्दतीवर सद्यस्थितीस अनुसरुन स. सदस्यांनी मत मांडलेले आहे. स. स. श्री. किवळेकर स. स. श्रीमती किवळेकर, स. स. श्री. ताठे, स. स. श्री. रगडे यांनी अनियमीत पाणीपुरवठा बदल प्रश्न उपस्थित केले आहे. परंतू स. सदस्य श्री. सावंत यांनी माझ्यावर आरोप केलेले आहे. ते आरोप सर्व प्रथम मी फेटाळतो. वैयक्तीक आरोप केलेले आहे. म्हणून सभाकाज नियमावलीनुसार ते आरोप वगळण्यात यावे अशी विनंती आहे. जे आरोप माझ्यावर केले त्या बाबतच्या कोणत्याही चौकशीस सामोरे जाण्यास मी तयार आहे. चौकशीचे आदेश द्यावेत.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** जो प्रश्न स. सदस्यांनी विचारला त्याबाबतच उत्तर अपेक्षीत आहे. जास्त सखोल खुलासा करण्याची गरज नाही. पाणी पुरवठयात विस्कळीतपणा का आला याबाबतच खुलासा करावा आरोप प्रत्यारोप यातून काहीच साध्य होत नाही.

**मा. सभापती** : स. स. श्रीमती किवळेकर, स. स. श्री. ताठे, स. स. श्री. रगडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचा खुलासा करावा. स. स. सावंत यांचे आक्षेपार्ह शब्द इतिवृत्तातुन वगळण्यात येतील.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** पाण्याचा प्रश्न का निर्माण झाला. ज्या ज्या वेळी प्रश्न उद्भवेल त्या त्या वेळी सर्व सदस्य प्रशासनाच्या बरोबर आहे. सभागृहात ज्या विषयावर सुचना केली. त्यावर प्राधान्याने चर्चा करावी. आरोप/प्रत्यारोप करु नये. वस्तुस्थितीला धरुन चर्चा करावी. मार्ग काढावा.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** स. सदस्यांनी जे आरोप केले ते बरोबर नाही. माझ्यावर अन्याय होऊ नये. माझी बाजु मांडण्याची संधी दयावी. वैयक्तीक काम झालेले नसेल त्याचा रोष म्हणून कुठलेही पुरावे न देता आरोप करणे बरोबर नाही.

**मा. सभापती** : पाणी पुरवठा विस्कळीत का झाला त्याचा खुलासा करावा.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** दररोज पाणी पुरवठा करणे तांत्रिकदृष्टया शक्य होणार नाही. पाणी साठविण्याची व्यवस्था नही म्हणून मागणी केली परंतु ज्या तक्रारी येतात. एक दिवसाआड पाणी येणे. अवेळी येणे अशा तक्रारी सोडवू शकतो. परंतु नियोजनाच्या दृष्टीकोनातून दररोज झोपडपट्टयामध्ये पाणीपुरवठा करु शकत नाही. एका ठिकाणी दररोज दुसरा ठिकाणी एक दिवसाआड असे योग्य होणार नाही. पाण्याचा मुबलक साठा झाल्यावर दररोज पाणी पुरवठा करता येईल. पाणी साठविण्यासाठी टाकी खरेदी केल्यास साठवण करता येईल.

**श्री. भगवान रगडे :** दररोज रोजीरोटी मिळण्याची त्यांचेत कुवत नाही त्यामुळे टाक्या खरेदी करणे शक्य नाही.

**मा. सभापती** : एक्सप्रेस लाईन सुरु केली. पाच सहा कोटी रुपये खर्च केले परंतु या सात-आठ दिवसांत जी परिस्थिती उद्‌भवलेली आहे. दररोज पाणी पुरवठा करण्याची मागणी केली. मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : ज्या दिवशी वेळापत्रकानुसार पाणी पुरवठा करतो. त्याप्रमाणे देत रहावे. ज्या दिवशी पाणी पुरवठा त्या त्या भागात देत नाही. दुसऱ्या तिसऱ्या दिवशी पाणी देणार आहात त्या भागात टँकरद्वारे पाणी देण्यात यावे. अशा सूचना अधिकाऱ्यांना आहेत.

**श्री. भगवान रगडे :** टँकर गेल्यानंतर आपसात भांडण होते पाणी भरपूर आहे पण नियोजन नाही. चार वर्षात पाणी टंचाई भासली नाही. अनेक आयुक्त येवून गेले. परंतू आपल्या कार्यकाळात व श्री. पानझडे यांच्या कार्यकाळात दलीत वस्त्यांमध्ये अन्याय होत आहे. नारेंगाव ते ब्रीजवाडी येथील पाण्याच्या पाईपलाईनचे टाकीचे काम केले असते तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती. त्यात पाणी साठवून ५०-५० टक्के असे दररोज पाणी घेता आले असते. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दलीत वस्त्यातील नागरीकांना त्रास सहन करावा लागतो.

**मा. आयुक्त** : ज्या ज्या ठिकाणी पाणी किती वेळात येईल याचा अभ्यास करण्याचा मी सुध्दा प्रयत्न केलेला आहे. प्राप्त पुरवठा व वितरण वेळ त्यांना निश्चित वेळ जसे ७-८, ८-९ अशी वेळ सांगता येणार नाही. अशी अधिकाऱ्यांची अडचण आहे. मी त्यांना अशा सूचना केलेल्या आहेत की, ठीक निश्चित वेळ सांगता येत नसेल तर, ब्लॉक वेळ निश्चित करुन ७ ते १० किंवा ८ ते ११ वाजेपर्यंत किंवा ११ ते ११ वाजेपर्यंत पाणी येऊ शकेल. अशा तरी सूचना दिल्या गेल्या पाहीजेत. जेणे करुन दोन तास, तीन तास त्या त्या भागातील नागरीकांना घरी बसून पाणी घेवू शकतील. या सूचना कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी मान्यही केलेल्या आहेत. त्याचे वेळापत्रक जाहीर करण्यासाठी सूचना दिल्या आहेत. परंतू मध्यंतरीच कॅनॉलचा प्रश्न उपस्थित झाल्यामुळे तीन चार दिवस बाहेर असल्यामूळे कार्यवाही होवू शकली नाही. स. सदस्यांच्या भावना वेगळया नाहीत. नियोजन करण्यास वेळ दयावा लागेल. नागरीकांनी पाण्यासाठी प्रतिनिधींना फोन करायचे. नंतर पाणी

सोडायचे हे अशा मोठया शहरात चालणार नाही. निश्चित वेळे वाढ देऊन इतक्या वेळात पाणी येईल ही कल्पना दिली तर घरातील कुणीतरी व्यक्ती घरी राहील. तशा प्रकारचे वेळापत्रक देणार आहेत. ज्या वस्त्यात पाणी देण्याच्या सूचना मी दिलेल्या आहेत. प्रत्यक्ष त्या वस्त्यांना पाणी मिळेपर्यंत अडचण राहणार आहे. हे मला मान्य आहे. परंतू संबंधित अधिकारी यांनी त्या भागात पाहणी करुन जसे साठवण टाकी भरत नाही किंवा पाणी पुरवठा लाईनमध्ये दुरुस्ती असेल किंवा आणखी पुरवठा योजनेत दोष असतील ते प्राधान्याने काढले पाहिजेत कॅनॉलचा प्रश्न झाला. ज्या भागात पाणी पुरवठा होत नाही. तेथे टँकरद्वारे पाणी पुरविणे गरजेचे आहे. ज्या दिवशी पाणी पुरवठा करण्याबाबत योजना विस्कळीत झाली त्या दिवशी जवळपास नेहमीपेक्षा जास्त १२ टँकरद्वारे पाणी देण्याच्या मी सूचना दिलेल्या होत्या. ते पाणी कोणत्या भागात दिले त्याचा तपशील असेल, टँकरचे पाणी ही तात्पुरती व्यवस्था असते आपल्या भावना समजून घेऊ शकतो. यावर आताच एका स. सदस्यांनी दररोज पाणी सोडण्याची मागणी केली त्याबाबत इतर ठिकाणचे पाणी नियोजीत करुन ते देता येते का? पाहून कार्यवाही करण्याची संबंधित अधिकारी यांनी प्रयत्न करावेत.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. रगडे यांचे या उत्तराने समाधान झाले असावे स. सदस्या श्रीमती किवळेकर यांनी त्यांचे वार्डासाठी ज्या जलवाहिन्या टाकल्यात्या चालू करण्यात आलेल्या नाही त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

**कार्य. अभियंता (पा. पु.)** : एन-३, एन-४, भागासाठी ज्या जलवाहिनी टाकलेली आहे. त्या संदर्भात या विभागातील उपअभियंता यांनी मला कल्पना दिली उदया कोणत्याही परिस्थितीत पाहणी करुन या भागात नियमित सकाळीच पाणी पुरवठा केला जातो. परंतू काही तांत्रिक अडचण आल्यास पाणी देण्यास वेळा होतो. गेल्या ८-१० दिवसात पाणी पूरवठा योजना सर्वत्रच विस्कळीत झालेली होती. मा. आयुक्तांनी सूचना केल्यानुसार वेळापत्रक तयार करण्याचे काम सुरु केलेले आहे. ते तयार केल्यानंतर या सभागृहाच्या माहितीस्तव सादर करण्यात येईल.

**मा. सभापती** : स. सदस्या श्रीमती किवळेकर यांचा प्रश्न असा की, कमी दाबाने पाणी येते.

**श्रीमती जयश्री किवळेकर** : एक दिवसाआड पाणी दिले तर पूर्ण दाबाने पाणी देवू असे निश्चित झालेले होते. जानेवारी/फेब्रुवारी महिन्यापासुन पाईप लाईन टाकण्यात आली. अदयाप चालू केलेली नाही. एक दोन तास उशीर झाला, समजू शकतो. सकाळी ८ वाजता येणारे पाणी ३ वाजता येते हे योग्य नाही.

**कार्य. अभियंता (पा. पु.)** : गेल्या आठ दहा दिवसांपासूनच असे झालेले असेल त्यापुर्वी नाही.

**श्रीमती जयश्री किवळेकर** : मनपाचे सांगण्यानुसार सिडकोने पाईप लाईन टाकली. मनपाचाही खर्च झाला. ती पाईप लाईन चालू करण्यास वेळ मिळाला नाही. अशी उत्तरे देणे बरोबर नाही. यापुर्वी आपण असे स्पष्टीकरण केलेले होते की, सिडको जेव्हा एन-३, एन-४ भागासाठी २०० मी मी ची पाईप लाईन टाकेल व पर्यायी त्यास लागून मनपा २५० मीमीची पाईप लाईन टाकली जाईल व मध्येच क्रॉस कनेक्शन असते ते सिडकोने केल्यानंतर लगेच पाणी पुरवठा केला जाईल, असे सांगण्यात आलेले होते. पत्र दिले होते.

**कार्य. अभियंता (पा. पु. ) :** आहे त्याच पाण्यात देता येणे शक्य नाही. ६७ कोटीच्या योजनेमधील काही कामे पूर्ण झाली. येणारे पाण्याचे प्रमाण जो पर्यंत वाढत नाही. तो पर्यंत त्याच पाण्यात भागवावे लागेल.

**मा. सभापती** : उदयाच स. सदस्य यांच्या समवेत कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन जास्तीत जास्त पाणी कसे देता येईल यासाठी प्रयत्न करावेत.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** शहरात येणारे एकूण पाणी किती, सिडको व जुन्या शहरासाठी किती दिले जाते तसेच एक्सप्रेस लाईनवर किती कनेक्शन दिले व जायकवाडीपासून गावांसाठी किती कनेक्शन दिलेले आहे. यापुर्वी क्रांतीचौकातून ज्या टाकीवर पुरवठा होतो त्या टाकीमध्ये सिडकोला दिल्या जाणाऱ्या पाणी पूरवठयातून करण्यात येत आहे.

**मा. सभापती** : संपूर्ण शहरासाठी किती एम. एल. डी.पाणी येते. शहरासाठी किती व सिडकोसाठी किती दिली जाते याचा सविस्तर खुलासा देण्यात यावा. पाण्याचे नियोजन कशा पध्दतीने चालू आहे. मुख्य जलवाहिनीवरुन किती कनेक्शन देण्यात आलेले आहे. याचाही खुलासा करण्यात यावा.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** जायकवाडीतून सुमारे १३० एम. एल. डी. पाणी उपसा होतो. फारोळयाला ट्रीटमेंट होते त्यानंतर नक्षत्रवाडी येथे घेतले जाते. एक्सप्रेस लाईन ही ६७ कोटीची योजना आहे. त्याचे एक उपभंग आहे. एक्सप्रेस लाईन टाकली आहे. त्याच पाण्यात दोन भाग झालेले आहेत. ज्या दाबाने पाणी यावयास पाहीजे त्या दाबाने येत नाही. एक्सप्रेस लाईन चालू झाली असली तरी फक्त सिडको भागात पाणी नेण्याचे काम याद्वारे होत आहे. पाणी पुरवठयात वाढ झालेली नाही. सिडको भागात २८-३० एम. एल. डी. पाणी पुरवठा देतो. उन्हाळयात पाण्याची पातळी खाली गेलेली असते. त्यामुळे १०-१५% पाणीपुरवठा पंपींगद्वारे कमी येतो. एक्सप्रेस लाईनचे मागील लाईनचे जास्तीत जास्त पाणी कशा पध्दतीने वाढविता येईल. यावर गांभीर्याने विचार चालू आहे. त्या नियोजनानुसार पाणी पुरवठा चालू राहणार आहे.

**मा. सभापती** : रिसायलिंगमुळे पाणी पुरवठयात वाढ होणार होती.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** फिल्टर साफ करण्यात ४ एम. एल. डी. पाणी अक्षरशः वाया जाते. फेकुन दयावे लागते ६७ कोटीच्या योजनेचेच ते उपअंग आहे. ४ एम. एल. डी. पाणी रिसायकलींग करण्याचे काम महराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू आहे. संथ गतीने काम चालू आहे.

**मा. सभापती** : ४ एम. एल. डी.पाणी रिसायकलींग करण्यातबाबत मा. आयुक्तांनी त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीची बैठक बोलावून कमी वेळेत काम होईल यासाठी सूचना कराव्यात.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** स्थायी समितीत अर्थसंकल्प मंजूर झालेला होता. त्या बैठकीत सुध्दा मागील लाईनचे पाणी पुरवठयात वाढ होण्याबाबत सुचविले होते. पाण्यात वाढ झाल्यास मुबलक पाणी देता येईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** एक्सप्रेस लाईनमुळे २७-२८ एम. एल. डी. पर्यंत वाढ झालेली होती. सद्यस्थितीत सिडको हडको भागासाठी २०-२१ एम. एल. डी. पाणी पुरवठा होतो आहे. त्यातील ही ४-५ एम. एल. डी. पाणी मरीमाता पाण्याच्या टाकीत दिले जाते. त्या टाकीत यापुवी क्रांती चौक येथून पाणी पुरवठा केला जात होता. तसेच मुकूंदवाडी, संजयनगर भागात सुध्दा क्रांतीचौक येथून

पाणी पुरवठा होत असते. परंतु या भागात एक दिवसाआड ३०-३५ मिनिटे पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाण्याची पातळी कमी असल्यामुळे जास्त दाबाने एक्सप्रेस लाईनला पाणीच येत नाही. नक्षत्रवाडी भागातील अठराच थ्रेड खोलले आहेत.

**मा. सभापती** : २०-२१ एम एल डी पाणी सिडको भागात दिले जाते. त्यातूनही ४ एम एल डी पाणी मरिमाता टाकीत सोडले जाते. याचा अर्थ १७-१८ एम. एल. डी. पाणीच सिडको हडको भागासाठी शिल्लक असते.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** आहे त्या पाण्यातच दोन भाग झालेले आहे. १४०० मीमी व्यासाची जलवाहिनी आहे. तिला येग्य दाब रहात नाही. त्यामुळे पहाडसिंगपूरा व मरीमाता येथील पाण्याच्या टाक्या उंच असल्यामुळे पाणी साठविणे अवघड होते. त्यासाठी दररोज कसरत करावी लागते वॉल्व बंद करणे व पाणी पुरवठा करणे. मरीमाता येथील टाकी मध्ये यापुर्वीही सिडको भागातुन पाणी होतच होतो. त्यात थोडया फार प्रमाणात वाढ झालेली आहे. याबाबत उपाय योजना होईल. स. सदस्या श्रीमती किवळेकर यांचे वॉर्डात येवून पाहणी करुन पाणी पुरवठा सुरळीत केला जाईल. गेल्या ८-१० दिवसापासुनच पाण्याची परिस्थिती विस्कळीत झालेली आहे. त्यापूर्वी सिडको हडको वासीयांच्या तक्रारी नव्हत्या.

**मा. सभापती** : मुळ मुद्दा असा आहे की, मागणी जास्त असतांना पाणी कमी देण्यात येते. १४-१५ एम एल डीच पाणी पुरवठा करण्यात येतो.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** सिडको हडको भागात येणारे पाणी व मुकूंदवाडी, सुरेवाडी, जाधववाडी चिकलठाणा जो सिडको व महानगरपालिकेचा भाग येतो. २०,००० हजार नळ कनेक्शन असून, ३५-४० हजार नळ कनेक्शनला एक्सप्रेस लाईनमधुन पाणीपुरवठा होतो. २०-२१ एम. एल. डी. पाणी येते. नळ कनेक्शनच्या तुलनेत इतर जुन्या शहरात किती एम. एल. डी. पाणी यावयास पाहिजे. नळ कनेक्शनच्या प्रमाणात तेवढे पाणी येत नाही.

**मा. सभापती** : पाण्याचे वेळीच नियोजन करावे. मागणीच्या ५०% पाणी पुरवठा होतो. स. सदस्यांच्या भावना योग्य आहे. शहरात व सिडको भागात पाणी पुरवठा कसा सुरळीत होईल याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

**सौ. शाहीन जफर :** मागील बैठकीत सिल्लेखाना येथील अनाधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही झाली नाही. ही मुद्दा मी उपस्थित केला होता. तात्काळ कार्यवाही करु असे सांगण्यत आले. अदयाप कार्यवाही करण्यात आलेली नाही. कार्यवाही केली नाही तर, कार्यवाही होत नसेल तर, मा. न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात येईल. कोणती ही कार्यवाही पुर्ण झालेली नाही. छायाचित्रे घेतली. परंतु आज ही तेथे संपुर्ण मटेरियल पडलेले आहे.

**मा. सभापती** : माझ्याकडे खुलासा प्राप्त झाला की, सिल्लेखाना येथील अनाधिकृत तार फेन्सींग बाबत श्री. नवाब यांचे विरुध्द पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ०१-०५-२००४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. एफ. आय. आर. दाखल झाले आहे.

**सौ. शाहीन जफर :** नगरसेवकांना इतकी मागणी करावयाची वेळ येते तरी सुध्दा कार्यवाही वेळेवर होत नाही. अधिकारी का कार्यवाही करीत नाही.

**मा. सभापती** : संबंधितावर अधिकाऱ्यांनी पोलिस गुन्हा दाखल केलेला आहे. त्यांनी पुन्हा तार फेन्सींग बांधकाम केले असेल तर, काढण्यात यावे.

**सौ. शाहीन जफर :** अधिकारी चुकीचे उत्तर देतात. मटेरियल उचलुन आणत नाही. बांधकाम तोडलेलेच नाही. तार फेन्सींग तसेच आहे.

**मा. सभापती :** उपआयुक्त (म) यांनी चौकशी करुन अहवाल सादर करावा.

**उपआयुक्त (म) :** झालेले अतिक्रमण व पुर्ण साहीत्य जप्त करुन आणायचा विचार होता. संबंधित पोलीस निरीक्षक अतिक्रमण पथकाचे यांना सांगितले तेव्हा पुर्ण पोलीस बंदोबस्त नव्हता सिटीचौक पोलिस स्टेशनलाही मागणी केली आहे. अतिरिक्त पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी केली. त्यानंतर १४ तारखेपर्यंत अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मिळणार नाही असे उत्तर मिळाले. १५ किंवा १६ तारखेला पोलीस बंदोबस्त घेऊन पडलेले मटेरियल उचलून आणण्याच्या सुचना प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

**मा. आयुक्त :** या कार्यवाहीबाबत प्रशासनाने नियमीत लक्ष राहीलेले आहे. नम्रपणे सांगण्यात येते. अतिक्रमण काढण्याबाबत आयुक्त व आयुक्ताखालची यंत्रणा अत्यंत दक्ष आहे. याची नोंद निश्चितपणे इतिवृत्तांत घ्यावी. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील की, तेथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्रकरणांत पोलींसाच्या सहकार्यानेच काम करावे लागते. उपआयुक्त व त्यांचे खालील जे कर्मचारी आहेत ते कार्यवाही करतील.

**सौ. शाहीन जफर :** शहरातील काही इमारती महानगरपालिकेने शाळेसाठी भाडे तत्वावर घेतलेल्या आहेत. १०-१० वर्षापासुन भाडे थकीत आहेत. संबंधित मालक शाळा सुरु होण्या अगोदर आम्ही इमारतीला कुलूप लावू असे सांगतात. इतक्या दिवसाचा भाडे थांबविण्याचे कारण स्पष्ट करावे. किती शाळांचे भाडे प्रलंबित आहे.

**मा. सभापती :** शिक्षणाधिकारी सभेल नाही त्यांचा पदभार ज्यांच्याकडे आहे त्यांनी खुलासा करावा. नसता उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा. ज्या इमारती भाडे तत्वावर घेतलेल्या आहेत. त्यांचे भाडे तात्काळ देण्याची कार्यवाही करावी.

**उपआयुक्त (म.) :**१७-१८ शाळांची इमारत भाडे तत्वावर घेतलेल्या आहेत. ६-७ महिन्यांचे भाडे महानगरपालिकेकडे थकीत आहेत. सदर भाडे समितीने भाडे निश्चित केलेले आहे. परंतू स्थायी समितीची त्यास मान्यता लागेल व जेवढे काही प्रकरणे आहेत जे की, स्थायी समितीच्या सभेची मान्यतेची गरज आहे अशी सर्व प्रकरणे कार्योत्तर मान्यतेसाठी स्थायी समितीच्या बैठकीत ठेवून मान्यता घेवून थकीत सर्व भाडे अदा करावेत अशा सुचना दिलेल्या आहेत. तसे प्रकरण सादर करण्याच्या सुचना ही दिलेल्या आहेत.

**मा. सभापती :** कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव आल्यास मान्यता देता येईल.

**मा. आयुक्त :** बरेच भाडे देण्यात आले. १८ शाळांची यादी आहे. मार्च २००४ पर्यंतचे जे काही भाडे थकीत आहे ते देण्यात येईल.

**सौ. शाहीन जफर :** महानगरपालिकाने ११ नाल्याची साफसफाईसाठी ६० लक्ष रुपये तरतुद केलेली आहे. पावसाच्या अगोदर साफसफाई होईल का?

**मा. सभापती :** या संदर्भात ३-४ दिवसापूर्वी मा. महापौर यांचे दालनात बैठक झालेली होती. त्यात असे सांगण्यात आले की, यापुर्वी ज्याप्रमाणे कामे करण्यात आली त्याच प्रमाणे आताही कामे करावीत.

**सौ. शाहीन जफर :** गेल्या वर्षी १२ लक्ष रुपये नाला सफाईसाठी ठेवलेले होते. त्यात कोणत्या नाल्याचा समावेश होता खुलासा द्यावा व कोणत्या नाल्याची

साफसफाई झालेली नाही. २३ लक्ष रुपये खर्च केले. उर्वरीत रक्कम कोठे खर्च करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी मागील वर्षात ज्या ज्या नाला सफाईचे काम केले होते. त्याची यादी दिलेली होती. पुन्हा एकदा स. सदस्यांना माहीती देण्यात यावी. यावर्षीच्या तरतुदीतुन परवाच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे नाले साफसफाई करावयाचे काम हाती घ्यावे.

**श्री. मधुकर सावंत :** जो पन्नालालनगर मधून नाला जातो. तो ही पावसाळयात मोठया प्रमाणात पाणी येते. साफसफाई मध्ये त्याचा समावेश करावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी नाल्याची पाहणी करावी. दाट लोकवस्तीतील नागरीकांना पावसाळयाचा दिवसात धोका निर्माण होणार नाही. अशा नाल्याचा ही समावेश करावा व तातडीने कार्यवाही करावी.

**सौ. शाहीन जफर :** केव्हा साफसफाई होणार आहे. पावसाळयाच्या अगोदर साफसफाई केली नाही तर, शहरातील जनतेचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. केव्हा साफसफाई होईल याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**कार्य. अभियंता (ड्रे/वि) :** चालू आर्थिक वर्षात नाला साफसफाईसाठी १० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. जेवढी तरतुद केली त्यानुसार सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या अधीन राहुन आवश्यक त्या नाल्याची साफसफाई करता येईल. निविदा सुचना जाहीर करण्यासाठी आजच पाठविण्यात आलेली असून, ७ जुन २००४ पर्यंत नाल्याची साफसफाई करण्यात येईल.

**सौ. शाहीन जफर :** गेल्या वर्षभरात कोणते नाले साफसफाई केले त्याची माहिती देण्यात यावी.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** काही नाल्यांची साफसफाई झालेली होती. त्यांची संपूर्ण माहिती माझ्याकडे आज उपलब्ध नाही. लेखी कळविण्यात येईल.

**मा. आयुक्त** : एकुण १२ लक्ष पेक्षा कमी रक्कमेची कामे झालेली आहे. टेंडर ३०.३२% कमी दराने झालेले होते. झालेल्या कामांची यादी ते आपणास देतीलच. जेथे काम झालेले नाही. त्या ही नाल्यांची नांवे यादीत असतील. पुढील बैठकीत माहिती देऊ शकतील.

**श्री. मोहन मेघावाले :** आचारसंहितेच्या नावाखाली मिटमिटा कत्तलखाना, हर्सूल तलाव,पिसादेवी भागात जवळपास ५००-६०० एकर एरियामध्ये व शहरातील आतील वस्त्यात मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे चालू आहेत. याबाबत मागील बैठकीत दि. १९-०४-२००४ रोजी यावर चर्चा केलेली होती. पुढील बैठकीत अहवाल देऊ असे सांगण्यात आले. परंतु मागील बैठकीत प्रशासकीय अधिकारी श्री. कंकाळ अनुपस्थित होते. एक शेड व त्या पाठीमागे ७-८ दुकाने काढतात. दुसरे शेड त्यामागे दुकाने अदयापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. ते पाडण्याचे आदेशीत करावे.

**मा. सभापती** : घर बांधकाम करणारांना आचारसंहिता नव्हती. ५००-६०० एकरमध्ये अनाधिकृत बांधकम होत असेल तर, संबंधित अधिकारी सर्वेक्षण करुन अहवाल देतील. त्यानंतर निर्णय घेता येईल.

**श्री. मोहन मेघावाले :** जळंगाव रस्त्यावर एका मुलीचा नुकताच अपघाती मृत्यू झालेला आहे. रहदारी वाढत असून, अनाधिकृत बांधकाम रस्त्यालगत येत आहे.

**प्रशासकीय अधिकारी :**मागील बैठकीत आदेशीत केल्याप्रमाणे जाधववाडी येथील अनाधिकृतपणे होत असलेले बांधकाम थांबविण्यात आलेले आहे. त्यांचेवर

एम. आर. टी. पी. ॲक्टप्रमाणे नोटीसा तामील करण्यात आलेल्या आहेत. नोटीसची मुदत संपल्यानंतर संबंधितावर पोलीस गुन्हा दाखल करण्यात येईल. सद्य:स्थितीत कोठेही अनाधिकृत बांधकाम चालू नाही.

**श्री. मोहन मेघावाले :** १९-०८-२००८ च्या बैठकीत मी सूचना मांडलेली होती. त्यानंतरही बांधकाम झाले.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी सूचना करुन ही त्या ठिकाणी बांधकाम झाले असेल तर, अशा अनाधिकृत व शहरातील इतर सर्व अनाधिकृत बांधकामाचा सर्व्हे करावा व पुढील बैठकीत अहवाल सादर करावा. दुसरी बाब अशी की, प्रशासकीय विभागाने दिलेल्या १०-५-०४ च्या पत्रानुसार असे कळविले की, सभापती यांना वेळोवळी कामाचा अहवाल दिला. माहीतीस्तव सभापती यांना असे दिले. प्रशासकीय विभागाने दिलेल्या अहवालाची प्रत पुन्हा माझे स्वीय सहाय्यक यांना दाखवून द्यावी.

**श्री. भगवान रगडे :** आताच स. सदस्यांनी सुचना मांडली. अनाधिकृत बांधकाम चालू आहे. अधिकारी सांगतात बांधकाम चालू नाही. प्रशासनास विचारु इच्छितो की, आचारसंहितेच्या काळात किती ठिकाणी परवानगी दिल्या. किती ठिकाणचे अतिक्रमणे काढली व किती लोकांना नोटीसा दिल्या, किती मटेरियल जमा केले. मनपाच्या उत्पन्नात किती भर पडली. उत्पन्न आले नाही तर, का आले नाही. किती लोकांवर कार्यवाही केलेली आहे. अनाधिकृत वस्त्या वाढतात. मनपाची परवानगी घेतली जात नाही. मनपाच येणारे उत्पन्न मिळत नाही. यास जबाबदार कोण? मनपाची आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल. याकडे लक्ष देणे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. माझ्या माहीतीनुसार सद्य:स्थिती शहरात अनाधिकृत बांधकाम सर्रासपणे चालू आहे. त्यामुळे मनपास उत्पन्न येत नाही. आचार संहितेच्या काळात किती बांधकाम परवानगी देण्यात आल्या, अनाधिकृत वस्त्यात किती विना परवानगी बांधकामे चालू आहेत. याचा खुलासा देण्यात यावा. पिसादेवी, सुरेवाडी भाग माझ्या वार्डात येतो. अधिकाऱ्यांना माहीत नसेल तर, मी उत्तर देतो.

**मा. सभापती** : शहरात अनाधिकृत बांधकाम किती आलेली आहेत. आचार संहितेच्या काळातच नव्हे तर, त्यापूर्वी म्हणजेच वर्षभरापासून किती अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत किती परवानगी दिली याबाबत लवकरच आढावा बैठक बोलविण्यात येईल. आठ दिवसांच्या आत बैठक घेतली जाईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सेव्हनहिल उड्डाणपुलाजवळ कमान उभारण्यात आलेली आहे. त्या कमानीसाठी श्री. गजानन महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी परवानगी घेतलेली होती. या कमानीबाबत मी सभापती असतांना चर्चा झालेली होती. त्या बैठकीत असे आदेश दिले होते की, संबंधित ट्रस्ट या कमानीचा वापर करीत नसेल तर, ती काढुन टाकण्यात यावी व परवानगी दयावी. असे असतांना ती कमान पूर्वी अर्धवट होती आता पूर्ण झालेली आहे. त्याबाबत वेळीच का कार्यवाही करण्यात आलेली नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**अति. शहर अभियंता :** यापुर्वी गजानन महाराज ट्रस्टला कमान उभारण्यास मनपाने परवानगी दिलेली नाही. जेव्हा बी. ओ. टी पध्दतीने कमान उभारण्याचे काम सुरु झाले तेव्हा मनपातर्फे सेव्हन हिल जवळ कमान उभारण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : या ठिकाणी गजानन महाराज ट्रस्टला परवानगी दिली नसली तरी सहानुभूतीपुर्वक विचार करुन ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेला बोलावून जागा उपलब्ध करुन दयावी. त्याचा विचार करावा. म्हणून म्हटले होते. संबंधित जो कुणी ठेकेदार असेल त्यांचेशी चर्चा करुन मार्ग काढण्याचा निर्णय घेतलेला होता. आताही वेळ गेलेली नाही.

**अति. शहर अभियंता :** गजानन महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांशी तशी मागणी मनपाकडे व्हावी. त्यानंतर कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : परवानगीसाठी गजानन महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी मागणी केलेली आहे. आपल्या विभागाकडे पत्र न येता मालमत्ता किंवा इतर विभागाकडे ते गेले असावे. त्याची तपासणी करावी. त्यांचेकडे अर्जाची पोंच आहे. धार्मीक स्थळ आहे. विचार करावा. त्यास वेगळे महत्व आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** गजानन महाराज ट्रस्टच्या नावाने ताबडतोब परवानगी देण्यात यावी. शहरात अशा किती ठिकाणी कमानी आहेत. त्याचा वापर होतो का व कशासाठी होता याचा खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : नॉर्मस निश्चित केल्याप्रमाणे त्या कमानीचा वापर होतो का? शहरात अशा किती कमानी आहेत?

**अति. शहर अभियंता :** एकुण २६ कमानी उभारणार असून, २३ कमानी उभारण्यात आलेल्या आहेत. त्यातील ५०% भाग संबंधित एजन्सीज जाहीरात प्रसिध्दीसाठी वापर करणार असून, ५०% क भाग हा दिशादर्शक फलकासाठी राहणार आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** बऱ्याच कमानीवर २/३ हिस्सा संबंधित मालक (एजन्सी) जाहीरात प्रसिध्दीसाठी वापर करीत आहे असे नुतन कॉलनी, क्रांतीचौक येथील कमानीवर दिसून येते. १/३ भाग दिशादर्शक फलकासाठी शिल्लक दिसून येतो. काळजी घेतलेली दिसत नाही.

**अति. शहर अभियंता :** तसा प्रकार कुठेही झालेला नाही.

**मा. सभापती** : मनपाच्या अटी शर्तीनुसार संबंधित एजन्सीने कार्यवाही केलेली आहे की, नाही चौकशी करुन याचा सविस्तर अहवाल पुढील बैठकीत दयावा.

**मा.आयुक्त** : ज्या सुचना दिल्या त्याची माहीती अधिकारी देतीलच. परंतू इतिवृत्तांत नोंद यावी. म्हणून येथून पुढील कालावधीत दिशादर्शक लिखाण प्रथम होईल व जाहीरातीनंतर अशा सूचना अतिरिक्त शहर अभियंता यांना दिल्या आहेत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** दोन ते अडीच तास चर्चा झालेली आहे. मनपाचे उत्पन्न वाढावे म्हणून जाहीरात फलकाबाबत चर्चा झालेली आहे. त्याचा अहवाल सादर करणार होते. परंतू महसूली उत्पन्न व खर्च अतिक्रमणाच्या बाबीवर चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजीत करावी व विषय पत्रिकेला सुरुवात करावी.

**मा. सभापती** : होर्डींग्ज व अतिक्रमण बाबत पुढील बैठक होऊन त्यात चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र. ०३ :**

दि. १०-०२-२००४ (का.प. क्र. १५) दि. १०-०२-२००४ (का.प. क्र. १६) व दि. १९-०४-२००४ (का.प. क्र. ०२) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** विषय क्र. ३ मध्ये येणाऱ्या आर्थिक वर्षाचे जे बजेट आहे ते मंजूर केलेले आहे. आचार संहितेचा कालावधी होता म्हणून सर्वसाधारण सभेसमोर सादर झालेले नाही. आचारसंहिता शिथील झालेली आहे. यानंतर सर्वसाधारण सभा आयोजीत होईल. जे अंदाजपत्रक विकास कामाचे बुक मध्ये दिले त्याच इतिवृत्त कायम करण्यास हरकत नाही.

**मा. सभापती** : अर्थसंकल्पाच्या संदर्भात येत्या. १८ तारखेला सभा आयोजीत करण्यात आलेली आहे. महसूली खर्च व उत्पन्न या विषयार येत्या १५, १६ तारखेला विशेष बैठकीचे आयोजन करण्यात येईल. विषय क्र. ३ मंजूर.

**ठराव :**

दि. १०-०२-२००४ (का.प. क्र. १५) दि. १०-०२-२००४ (का.प. क्र. १६) व दि. १९-०४-२००४ (का.प. क्र. ०२) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ०४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी रुग्णवाहीका खरेदीचा प्रस्ताव खालील प्रमाणे सादर केला आहे. आरोग्य वैदयकीय अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी पत्र क्र. ७२/२००४ दि. १६-०१-२००४ द्वारे कळविले आहे की, सध्या मनपा आरोग्य विभागात एक रुग्णवाहीका कार्यरत असून, सदरील वाहनावर सध्या कार्यरत ३ रुग्णालयाचे कार्य केले. जाते, जे की, अपुरे वाटते. अतिदक्ष रुग्णांना आरोग्य सेवा तात्काळ पुरविण्याच्या हेतुने महानगरपालिका अर्थसंकल्प २००३-२००४ मधील अ. क्र. ५८९ पान क्र. ७४ च्या तरतुदीनुसार रुग्णवाहीका खरेदीसाठी ५ लाख रुपयांची तरतुद केली असून, संदर्भीय आर्थिक तरतुदीतुन एक रुग्णवाहीका तात्काळ खरेदी करावी.

वेगवेगळया तीन कंपन्याच्या अधिकृत डिलर्स कडुन दरपत्रके गोळा केली त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

**१. मारुती कंपनीची ॲम्ब्युलंस :**

मे. ॲटोमोटीव्हा मॅन्युफॅक्चरर्स प्रा. लि. औरंगाबाद ह्यांनी ओमनी पेट्रोल कार ॲम्ब्युलंसचे दर जकात दर १.५% धरुन रु. २,६७,०४३.०० दिले आहे.

**२. स्वराज माझदा ॲम्ब्युलंस :**

मे. यश मोटर्स औरंगाबाद ह्यांनी डब्ल्यू व्ही २६ डी ॲम्ब्युलंस, स्ट्रेचर वेळ इक्वीवेड जकात धरुन किंमत रु. ६,८६,१२५.०० दिली आहे.

**३. टाटा सुमो ॲम्ब्युलंस :**

मे. सान्या मोटर्स, औरंगाबाद ह्यांनी टाटा सुमो ह्या वाहनावरत्या ॲम्ब्युलंसची किंमत रुपये ४,४७,४५२.०० जकात धरुन दिली आहे.

०१. मारुती ॲम्ब्युलंस ही व्हॅन असून, साईझमध्ये लहान आहे व पेट्रोलवर चालणारी आहे. त्यामुळे त्यावर भविष्यात पेट्रोलवर अधिक खर्च राहील.

०२. स्वराज्य माझदा ॲम्ब्युलंस ही २ स्ट्रेचरची व मोठी असून, किंमत देखील जास्त आहे.

०३. टाटा सुमो कंपनीची ॲम्ब्युलंस मिडियम साईझची असून, ह्या वाहनाचे ॲव्हरेज पण चांगले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता टाटा सुमो कंपनीची ॲम्ब्युलंस खरेदी करण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. ११-०२-२००४ रोजी स्थायी समिती शिफारस केली असून, सन्माननीय स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. भगवान रगडे :** पुर्वीचे किती वाहने आहेत. शिवाय नोकर भरती बंद आहे. वाहन खरेदी केल्यानंतर वाहनचालक पद भरावे लागणार, क्लिनर लागणार डिझेल खर्च या सर्व बाबी त्यात नमूद होतात. यापुर्वीची रुग्णवाहीका असतांना तिचा उपयोग कोणत्याही नागरीकाला आलेला नाही. सदर वाहन कोठे आहे. सद्यःस्थितीत चालू आहे का. याचा प्रथम खुलासा करण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** शववाहिका, रुग्णवाहीका मनपाकडे किती आहेत. व त्या सध्या कोठे आहेत. खुलासा व्हावा. या रुग्णवाहिकेचा किती लोकांना लाभ होतो.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी विचारलेला प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा. नवीन रुग्णवाहिका घेतल्यानंतर त्याचा विनियोग कसा होईल.

**आरोग्य वैदय अधिकारी :** एन-८ येथील मनपाच्या दवाखान्यात एक रुग्णवाहिका उपलब्ध आहे. त्या रुग्णवाहिकावर २४ तास वाहनचालक असतात. मागणीनुसार उपलब्ध करुन दिली जाते. सध्या माझ्याकडे आकडेवारी नाही.

**श्री. भगवान रगडे :** आज स्थितीत या रुग्णवाहिकेचा वापर होत नाही. ते वाहन दवाखान्यात आहे.

**मा. सभापती** : महापालिकेची शववाहिनी व रुग्णवाहिका अशी दोन्ही वाहने आहेत. किती लोकांनी लाभ घेतला. माझ्या माहीती प्रमाणे ही वाहने मनपाकडे आहेत हे जनतेला माहीतच नाही. त्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे.

**श्री. भगवान रगडे :** सभागृहातील कोणत्याही सदस्यांनी सांगावे की, कोणत्या सदस्यांच्या वार्डात रुग्णवाहिका आलेली होती.

**श्री.मधुकर सावंत :** स्वर्गरथ घेण्यात यावा. मनपाकडुन ही एक चांगली सेवा होईल. हा चांगला उपक्रम आहे.

**मा. सभापती** : रुग्णवाहीका होण्याचा प्रस्ताव आहे. त्यावर विचार करुन निर्णय घेतला जाईलच परंतु स. सदस्य श्री. मधुकर सावंत यांनी स्वर्गरथ (वाहन) घेण्याबाबत सुचना केली. त्याबाबत पुढील बैठकीत प्रशासनाने प्रस्तावसादर करावा. रुग्णवाहिका खरेदीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अतिदक्ष रुग्णांना आरोग्य सेवा तात्काळ पुरविण्याच्या हेतुने महानगरपालिका अर्थसंकल्प २००३-२००४ मधील तरतुदीनुसार रुग्णवाहीका खरेदीसाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी प्रस्तावातील सर्व बाबींचा विचार करता मे. सान्या मोटर्स, औरंगाबाद यांचेकडुन टाटा सुमो कंपनीची ॲम्ब्युलंस खरेदी करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रु. ४,४७,४५९.०० च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०५ :**

उपआयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला की, मे. इंडीयन ऑईल कार्पोरेशन लि. रेल्वेस्टेशन यांचा आयात होणाऱ्या पेट्रोल/डिझेल या मालावर जकात कर चालु खातेची सवलत देण्यात आलेली आहे. तथापि, मागील वर्षापासून त्यांचा रेल्वेस्टेशन येथील डेपो बंद करण्यात आला असून, सद्यास्थिती जानेवारी मनमाड येथून पेट्रोल/डिझेलचा पुरवठा करण्यात येत आहे.

असे असल्याने, कंपनीचे उपव्यवस्थापक श्री. पी. जे. जॉर्ज यांनी पत्र देवून विनंती केली आहे की, त्यांचे कंपनीस मनमाड येथून पेट्रोल/डिझेलचा पुरवठा करावा लागत असल्याने व माल हा संबंधित आयात पेट्रोल पंप यांचे नावांने येत असल्याने शहरात माल प्रवेश करते वेळी प्रत्येक वाहनातील मालावरील जकात कर रोख स्वरुपात भराव लागत आहे. त्यामुळे त्यांना चालू खातेच्या सुविधेचा फायदा होता येत नसल्याने नविन जकात चालू खातेची सुविधा चलू करणे बाबत विनंती केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम २७ नुसार चालू खातेची सवलत देण्याची तरतुद आहे. संबंधित कंपनीस चालू खातेची परवानगी देणे झाल्यास खालील अटी शतीच्या अधीन राहुन चालू खातेची परवानगी देता येईल.

०१. सदर कंपनीस रु. २५,००,०००.०० (अक्षरी रुपये पंचवीस लक्ष) बिनव्याजी अनामत ठेवावे लागतील.

०२. संबंधितांनी त्यांचे कंपनीस आयात मालाचे विवरणपत्र दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत जकता विभागास सादर करुन त्यावर होणारी जकात भरणे बंधनकारक राहील.

०३. आवश्यकता भासेल त्यावेळी आयात मालासंबंधीची कागदपत्रे व माहिती, अभिलेख जकात अधिकारी यांना तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

०४. आयात मालाची हिशोब केल्यानंतर महानगरपालिकेस दयेय आढळुन आलेल्या कोणत्याही रक्कमेबाबत ती भरली न गेल्यास फरक रक्कमेचा भरणा महानगरपालिकेस करावा लागेल.

०५. भविष्यात मासीक उलढालीच्या प्रमाणात अनामत ठेव अपूरी असल्यास त्यात वाढ करावी लागेल.

०६. मनमाड येथुन होणाऱ्या वितरणाचे काम श्री. पी. जे. जॉर्ज, उपव्यवस्थापक प्लॉट नं. १०२, समर्थनगर, औरंगाबाद हे पाहणार असल्यामूळे महिनाभरात आयात होणाऱ्या मालाचा संपूर्ण अभिलेख त्यांनी अदयावत ठेवावा व विहीत मुदतीत जकात रक्कमेचा भरणा करण्याची सर्व जबाबदारी त्यांचेवर राहील.

०७. सदर चालू खाते सवलतीमध्ये औरंगाबाद शहरातुन निर्यात सुविधा देयय असणार नाही.

०८. वरील अटी शर्तीचा भंग झाल्याचे जकात अधिकाऱ्यांचे निर्दशनास आल्यास अनामत जप्त करुन चालू खाते सुविधा बंद करण्यात येईल.

वरील अटी व शर्तीचे अधिन राहुन चालू खाते उघडण्यात परवानगी देणेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्वत सादर.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** ज्या अटी व शर्ती प्रशासनाने ठेवलेल्या आहेत. त्यांचे अधिन राहून परवानगी देणे आहे. २५ लक्ष रुपये अनामत रक्कम राहील. परंतू सदर

कंपनीची दररोज सरासरी किती जकात येते. २५ लाख रक्कमेत वाढ किंवा घट करता येईल का, खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** मे. इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. यांचे करन्ट अकौंट उघडण्यात आलेले होते. त्या कंपनीचे गोडावून धानेवाडीला शिफ्ट झाल्यामुळे त्यांनी करन्ट खातेची फॅसिलीटीज बंद केलेली होती. परंतू पुन्हा त्यांना मनपाकडे दररोज १३ ते १४ हजार प्रमाणे मार्च २००३ ते ऑक्टो २००३ पर्यंत भरणा होत होता. आजच्या रेजी १७ ते १८ हजार दररोज भरणा करतात. मार्च २००३ मध्ये रु. ३.७८ लक्ष, एप्रिल २००३ रु. ४.६७ लक्ष, मे. महिन्यात रु. ५.४७ लक्ष असे एकुण १३.९२ लक्ष रुपये भरणा केलेले आहेत व तीन महिन्याचा आढावा प्रथम घेतला. त्यात काही वाढ होते का, त्यानुसार ऑक्टो, नोव्हे, डिसेंबर या तीन महिन्याचा अहवाल मागविलेला आहे. त्यामध्ये ऑक्टो २००३ मध्ये ५.०० लक्ष नोव्हे मध्ये ४.१० लक्ष डिसेंबर मध्ये ४.९५.१४.०१ लक्ष असा होता. फार असा काही फरक नाही. आपण नियम अटीनुसार सादर कंपनीकडुन सहा महिन्यांची आगाऊ रक्कम घेण्याची तरतुद आहे. सहा महिन्याचे २६-२७ लक्ष होतात. तरी सुध्दा ३० लक्ष रक्कम घेण्याची आपली भूमिका होती ती कमी करावी. अशी विनंती कंपनीने केली व त्याचा विचार करुन रु. २५ लक्ष अनामत रक्कम ठेवण्यात आलेली आहे. यात मनपाचे काही नुकसान होणार नाही. दर महिन्यालासदर कंपनीकडुन ४ ते ४.५० लक्ष मिळणार असून, २५ लक्ष सुध्दा अनामत म्हणून मिळेल.

**मा. सभापती :** २७ जुन २००३ रोजी करन्ट अकौंट ओपन करण्याबाबत विनंती केली. तब्बल एक वर्षानंतर हा विषय का समोर आला, उशीर होण्याचे कारण काय?

**जकात अधिक्षक :** विवरणपत्र तपासून ही कार्यवाही करायची होती. संबंधितांनी प्रत्येक वर्षात त्यांनी कशा पध्दतीने पैसे भरणा केले याची माहिती घ्यायची होती. त्यामूळे प्रस्ताव उशीर आलेला आहे.

**मा. सभापती :** इतर कंपन्या असे खाते उघडण्याबाबत मागणी करतील. मनपाचे त्याबाबत काय धोरण राहणार आहे.

**जकात अधिक्षक :** प्रत्येक कंपनीकडून २५ लक्ष आगाऊ रक्कम म्हणून होणार असे ४ कंपन्या एकत्र झाल्यास १ कोटी रुपये मनपाकडे जमा होऊ शकतात. यात मनपाचा फायदा आहे.

**मा. आयुक्त :** नियम २७ स्पष्ट आहे. त्यांचे जेवढे उत्पन्न आहे. ते तपासले जाते. सहा महिन्याची तपासणी करुन त्याची सरासरी पाहीली जाते. होणाऱ्या उलाढालीच्या रक्कमेवर कार्यवाही करावी लागेल.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे. इंडीयन ऑईल कार्पोरेशन लि. रेल्वेस्टेशन यांचा आयात होणाऱ्या पेट्रोल/डिझेल या मालावर औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ चे कलम २७ नुसार प्रस्तावातील अ. क्र. १ ते ८ या अटी शर्तीच्या अधीन राहुन जकात कर चालु खातेची सवलत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-५ पाण्याची टाकी ते बजरंग चौकापर्यंत नवीन ४०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याचे (टप्पा क्र. २) कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २१,८३,८८८/- चे तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास ठराव क्र. १५९/७ दि. १९-११-२००३ अन्वये मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळाल्यानुसार लेख विभागामार्फत निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण सहा निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतीम तारखेला एक निविदा प्राप्त झाली आहे. निविदेचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. स्वामी समर्थन कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचे दर अंदाजपत्रकीय दराचे असून, सदरील प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मा. आयुक्तांची शिफारस आहे. करीता सदरील कामासाठी मे.स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृतीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एकच निविदा विभागामार्फत पुरवठा किती केव्हा करणार आहोत.

**मा. सभापती** : सविस्तर माहिती दयावी. माझ्या माहीतीप्रमाणे ९० दिवसच निविदा दर बंधनकारक असतो. दिलेल्या दरास दुसऱ्या बाजुचा सुध्दा विचार करावा लागेल की, मंजूर केल्यानंतर त्या ठेकेदाराने तात्काळ काम सुरु करणे बंधनकारक आहे. यामध्ये लेबर ॲटम व विभागा मार्फत पुरवठा किती खुलासा दयावा.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** यात १८.८८ लक्ष रुपये पाईपांचा पुरवठा आहे. विभागामार्फत पुरवठा विषय क्र. ७ नुसार मंजूर झाल्यानंतर देण्यात येणार आहे. यात एकूण ३३ कामे येतात. दि. ०६-०५-२००४ पर्यंतच टाईम लाईट होते ते संपलेले आहे. मान्यता मिळाल्यानंतर सुध्दा संबंधित ठेकेदारास विचारणा करावी लागेल काम करण्यास तयार असेल तर पुढील कार्यवाही केली जाईल.

**मा. सभापती** : विषय क्र. ६ मंजूर करण्यात येतो. लगेच कामास सुरुवात हेईल यादृष्टीने प्रशासनाने प्रयत्न करावेत. २% अनामत रक्कम भरणा करण्यासाठी पत्र दयावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-५ पाण्याची टाकी ते बजरंग चौकापर्यंत नवीन ४०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता प्राप्त झालेली मे. स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहर व सिडको भागातील विविध ठिकाणी सी. आय./डी. आय जलवाहिनी टाकण्याचे कामे सन

२००३-२००४ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर झालेली आहेत. त्यासाठी निविदा मागविल्या असता कंत्राटदारांनी अंदाजपत्रकापेक्षा १५ ते २२% जास्तीचा दर भरल्याचे व दर कमी करण्यास नकार दिल्याने सदरहू कामासाठी लागणारे पाईप व इतर साहित्य कार्यालयाने खरेदी करावे व कंत्राटदारांना पुरवावे असे ठरले. त्यानुसार प्रत्येक कामासाठी लागणारे विविध व्यासाचे सी. आय./डी. आय. पाईप व इतर साहित्य खरेदीसाठी सर्वसाधारण सभा दि. १९-११-२००० चे ठराव क्र. १६०/९ अन्वये रक्कम रु. १,७२,५९,२२७/- चे एकत्रीत अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आली.

ठरावाच्या प्राप्त मंजुरीनुसार पाईपांचा पुरवठा करणे साठी वेगळी निविदा (रु. १,४४,३८,४६६/-) ची निविदा सुचना जा. क्र. ७०/२००३ जी की राज्य पातळीवरील दैनिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दीस देण्यात येऊन ' डी ' फॉर्म नमुन्यामध्ये निविदापत्रके मागविण्यात आली. त्यामध्ये सी. आय/डी. आय पाईपचा पुरवठा करण्यासाठी चार कोऱ्या निविदांची विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| अ) | **विविध व्यासाचे सी. आय. पाईप पुरवठा करणे.** | |
| | मे. केसोराम स्पन पाईप | अं. प. दरापेक्षा |
| | ॲन्ड फाऊन्ड्री | १३.५% जास्त |
| ब) | **विविध व्यासाचे डी. आय. के-७ व के-९ पाईप पुरवठा करणे.** | |
| १. | मे. लॅम्को कलहस्ती कास्टींग लि. | अं. प. दरापेक्षा १.४६% जास्त |
| २. | मे. इलेक्ट्रो स्टील कास्टींग | अं. प. दरापेक्षा ३.८६% जास्त |

उपरोक्त पुरवठा दरांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचा दर भरल्याने दर कमी करण्यासाठी त्यांना चर्चेस बोलाविण्यात आले. पुरवठाधारकांपैकी सी. आय. पाईपचे पुरवठा धारक मे. केसोराम स्पन पाईप्स अँन्ड फाऊन्ड्री यांनी दि. १३-०२-०४ चे पत्रान्वये दर कमी करता येणार नाही. असे लखी कळविलेले आहे. तसेच डी. आय. पाईपांचे सर्वात कमी दर भरणारे मे. लॅन्को कलाहस्ती कास्टींग लि. या कंपनीचे देखील दि. ०९-०२-०४ चे पत्रान्वये दर कमी करण्यास नकार दिला आहे. तसेच वाटाघाटीचे चर्चेत दि. ०७-०२-२००४ रोजी दर कमी करण्यास नकार दिला.

प्राप्त निविदामधील सी. आय. पाईपासाठीचे मे. केसोराम स्पन पाईप अँन्ड फाऊन्ड्री यांचे दर हे अ. प. दरापेक्षा १३.५% जास्तीचे असल्याने त्यांचा विचार न करता डी. आय. पाईप खरेदीचा विचार करण्यास हरकत नाही. सी. आय. पाईपांसाठी मे. लॅन्को कलाहस्ती कास्टींग लि. यांचे दर सर्वात कमी (अं. प. दरापेक्षा १.४६% जास्त) असून, त्यांचे मार्फत प्राप्त दर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची जिल्हा दरसूची सन २००४-२००५ मधील दरांची तुलना केली असता प्राप्त दर हे कमी करता आले असते. परंतु बाजारातील कच्च्या मालाच्या वाढलेल्या दरांचा आधार घेवून मे. लॅन्को कलहस्ती कास्टींगाली ही दर कमी करावयास तयार नाही.

पाणी पुरवठा विभागामार्फत मंजुरीप्रमाणे कार्यवाही करुन पाईप व इतर साहित्य या एकत्रित खरेदीद्वारे मिळेल या आशेवर प्रत्येक कामासाठी साहीत्याची किंमत वगळता उर्वरीत कामासाठी निविदा मागवून कंत्राटदारही नेमलेले आहेत. या सर्व कंत्राटदारांना लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता घोषीत होण्यापूर्वीच कार्यादेश देण्यात आलेले आहेत. या सर्व कंत्राटदारांना खात्यातर्फे पाईप व इतर साहित्य पुरवावयाचे आहे. जेणे करुन

आचारसंहितेपुर्वी कार्यादेश दिलेली सर्व कामे सुरु करता येईल व पाणी पुरवठा ही अत्यावश्यक बाब असल्यामुळे अशा परिस्थितीत पाईपची तर आवश्यकता आहेच. परंतु कंपनी दर कमी करीत नाही. त्यामुळे सुमारे रुपये २.५० ते ३.०० कोटीचे स्पील ओव्हर झालेले आहे. त्यामुळे एवढया स्पील ओव्हर झालेल्या रक्कमेची तरतुद चालू आर्थिक वर्षात ही स्पील ओव्हर कामे करण्यासाठी करावी लागेल.

करीता उपरोक्त परिस्थितीचा विचार करुन योग्य त्या निर्णयास्तव तसेच मार्गदर्शनास्तव व प्रस्ताव विचाराथ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. भगवान रगडे :** सन २००० हा या विषयाअंतर्गत वार्डातील काम करण्याचे बाकी आहे. काम करण्यासाठी मला आंदोलन उपोषण करावे लागेल. हा विषय चार वर्षानंतर सभागृहात येतो. जेव्हा मी स्थायी समितीचा सदस्य झालो तेव्हा चार वर्षानंतर प्रस्ताव समोर येतो. मा. आयुक्तांनी मी प्रत्यक्ष भेट घेतली. प्रस्ताव येण्यास उशीर का झालेला आहे. मा. आयुक्तांनी सुध्दा १५ दिवसात काम करण्याचे आश्वासन दिले होते. टेंडर आले. एजन्सी फिक्स करण्यात येऊनही काम करण्यास अडथळा निर्माण झाला दोन वर्षापूर्वी ठराव झाला. पुन्हा ठराव येण्यास उशीर का झाला, खुलासा करावा. एक सदस्य लोकशाही मार्गाने न्याय मागतात. न्याय मिळत नाही. याचे कारण काय खुलासा व्हावा.

**कार्य. अभियंता :** हा प्रस्ताव विशिष्ट एका कामाचा नाही. स. सदस्य रगडे यांचे वार्डातील कामासह असे ३३ कामे मंजूर झालेले होते. ८-१० कामाची मटेरियल सहीत निविदा काढलेल्या होत्या. त्यावेळेस असे निर्दशनास आले की, प्रत्येक निविदा २०-२४% अं. प. दरापेक्षा जास्तीची होती. वाटाघाटीसाठी प्रत्येक एजन्सीजला बोलाविण्यात आले होते. वाटाघाटी करण्यास नकार दिला. म्हणून मा. आयुक्तच्या दालनात बैठकीत असा निर्णय झाला की, अशा कामासाठी मटेरियल डायरेक्ट कंपनीकडुन मागणी करावी व पाईप खरेदी करायचे जेणे करुन मनपाचे आर्थिक नुकसान होणार नाही. त्यानुसार प्रस्ताव तयार करुन सर्वसाधारण सभेत मान्यता घेतली मान्य ते नंतर स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवलेला आहे. यात कोणतीही दिरंगाई झालेली नाही. कमी वेळात कार्यवाही करण्यात आलेली आहे. स. सदस्य श्री. रगडे यांचे वार्डातील जे काम आहे ते सन २००० पासूनचे आहे. अंदाजपत्रक मंजूर झाले. दरम्यानच्या काळात या घटना घडल्या त्यामुळे काम होऊ शकलेले नाही.

**श्री. भगवान रगडे :** दोन वर्षापासून ठराव पास झालेला आहे. नगर सेवकांचा कालावधी संपत आलेला आहे. आता काम सुरु करणार. सर्वबाबींची कामे एकत्रित करीत राहीलात तर संपूर्ण पाच वर्षाचा कालावधी जाणार यास जबाबदार कोण? पुढील काळात आचारसंहिता लागणार आहे. काम होईल की नाही शंका येते. जे दोषी असतील त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

**मा. सभापती** : निविदा काढल्या जास्त रक्कमेच्या आल्या डायरेक्ट कंपनीकडुन मटेरियल घेतले त्यामुळे मनपाचा आर्थिक फायदा झालेला आहे. वेळेतच काम करण्याचे आदेश देणार आहोत. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात

येतात की, हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर स. सदस्य श्री. रगडे यांचे वार्डातील काम तात्काळ करण्यात यावे.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** त्या कामाचे अंदाजपत्रक मंजूर आहे. एजन्सी फिक्स करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : या प्रस्तावासंबंधी अधिकाऱ्यांनी मत व्यक्त करावे. यात असे म्हटले की, प्रयत्न केले असते. तर दर कमी करता आले असते. (ब) मध्ये अं. प. दरापेक्षा १.४६% जास्त व अ) मध्ये अं. प. दरापेक्षा १३.५% जास्त असे दिले. ही निविदा मंजूर करायची की नाही.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** दिनांक २३-०५-२००४ पर्यंत या टेंडरची मुदत आहे. वेळ निघून जाणार नाही. यासाठी प्रस्ताव मंजूर करुन २३-०५-२००४ पर्यंत नियमानुसार वर्क ऑर्डर दिली तर, मटेरियल पुरवठा करावा लागेल. नामंजूर केल्यास येणारे निविदेचे दर नक्कीच जास्त येतील. मार्केटला स्टीलचे दर वाढलेले आहेत. या प्रस्तावास मान्यता द्यावी. यात ३३ कामे येतात. दि. २५-०७-२००३ रोजीच्या स्थायी समितीसमोर प्रस्ताव आलेला होता.

**मा. सभापती** : जास्त दराचे निविदा आल्या मनपाचे नुकसान होणार होते. हित साधणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. १.४६% जास्त दराने आहेत. म्हणून प्रस्ताव समोर आलेला आहे. नियोजीत वेळेत काम होईल.

**श्री. भगवान रगडे :** वेळेला बंधन नाही. कामात दिरंगाई झालेली आहे. पुन्हा आचार संहीता लागेल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** विषय क्र. ६ मंजूर केला. विषय क्र. ७ हा स. सदस्यांचे वार्डाच्या कामाच्या येतो. या कामाच्या प्रस्तावास दि. १९-११-२००३ रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. यामध्ये सहा महिन्याचा कालावधी गेलेला आहे. निविदा मागविल्या त्यास एक महिन्याचा कालावधी गेला. स्थायी समिती समोर येण्यास एक महिना उशीर झालेला आहे. मुळात हा प्रस्ताव येण्यास उशीर झालेला आहे. २३-०५-२००४ ही शेवटची मुदत आहे. त्वरीत वर्क ऑर्डर देवून दोन महिन्याचा कालावधी आहे. त्यात ३०-४० वार्डातील कामे येतात. पाण्याचा प्रश्न सुटेल. कमीत कमी किती मुदत देता येईल हे पहावे. त्यानुसार निर्णय घ्यावा. हा ठराव पास करावा.

**मा. सभापती** : हा विषय मंजूर करण्यात येतो. संबंधिताकडून दोन दिवसाच्या आत २% अनामत रक्कम भरणा करुन घ्यावी. ७ दिवसाच्या आत कार्यादेश देवून त्याचा अहवाल येत्या स्थायी समिती समोर ठेवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर व सिडको भागातील विविध ठिकाणी सी. आय./डी. आय जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता प्रत्येक कामासाठी लागणारे विविध व्यासाचे सी. आय./डी. आय. पाईप व इतर साहीत्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी डी. आय. पाईपांसाठी मे.लॅन्को कलाहस्ती कास्टींग लि यांचे दर सर्वात कमी (अं.प.दरापेक्षा १.४६% जास्त) असल्यामुळे मे. लॅन्कोकलाहस्ती कास्टींग लि. यांची डी. आय. पाईप साठीची अं. प. दरापेक्षा १.४६% जास्त दराची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०८ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार चौराहा ते जाधवमंडी व संस्थान गणपती मंदीर ते मोंढा या १२ मीटर (४० फूट) रुंद रस्त्याने बाधीत मिळकत न. भू. क्र. ७९५८, ७९५९/१, ७९५९, ७९६०, ७१६१ व ७९६२ ह्या मिळकतीचे बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटी संपादन करावयाचे आहे. त्यासाठी मिळकत धारकांना द्यावयाचा मोबदला सर्व वजावटी जाता तसेच बाधीत क्षेत्र तपशील खालील प्रमाणे आहे.

| न. भू. क्र. | बाधीत क्षेत्र | द्यावयाचा मोबदला (रु.) |
|---|---|---|
| ७९५८ | १३८.१० चौ मी. | १३,९९,८०५/- |
| ७९५९/१ | ५८.८७ चौ. मी. | ५९६७१५/- |
| ७९५९ | ४४.०० चौ. मी. | ४,४६,००५/- |
| ७९६० | ३३.७५ चौ. मी. | ३,४२,०७०/- |
| ७९६१ | २४.३५ चौ. मी. | २,४६,८१५/- |
| ७९६२ | १६.५० चौ. मी. | १,६७,२२५/- |
| | ३१५.५७ चौ. मी. | ३१,९८,६३५/- |

वरील प्रमाणे हितसंबंधिताचा मोबदला सर्व वजावटी जाता निश्चित केला असून, ५०% मोबदला रक्कम नोंदणी दस्त ऐवज (रजिस्ट्री) करतेवेळी द्यावयाचे आणि ५०% मोबदला रक्कम संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे पी. आर. कार्डवर नोंद घेतल्यानंतर व मालमत्ता टॅक्स बेबाकी प्रमाणपत्र दाखविलेल्या नंतर अदा करावयाचे आहे.

तसेच खरेदी खतासाठी लागणारी रक्कम मोबदला रक्कमेतून कमी (वळती) केली असल्याने खरेदी खत (रजिष्ट्री) करुन घेण्यासाठी रु. ३५,२०००/- (तीन लाख बावन्न हजार) खर्च येईल.

करीत वरील प्रमाणे हितसंबंधीतांना द्यावयाचा मोबदला व रजिस्ट्रीसाठी लागणारा खर्च र. रु. ३,५२,०००/- श्री. एस. बी. राठोड, कनिष्ठ अभियंता यांचे नांवे अग्रीम देण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** यात मालमत्ता विभागाचे अधिकारी यांचा सुध्दा समावेश असावा.

**मा. सभापती** : प्रस्ताव दुरुस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार चौराहा ते जाधवमंडी व संस्थान गणपती मंदीर ते मोंढा या १२ मीटर (४० फूट) रुंद रस्त्याने बाधीत मिळकत न. भू. क्र. ७९५८, ७९५९/१, ७९५९, ७९६०, ७१६१ व ७९६२ ह्या मिळकतीचे बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटी संपादन करण्यास तसेच त्यासाठी मिळकत धारकांना द्यावयाचा मोबदला रक्कम हितसंबंधितांना ५०% मोबदला रक्कम नोंदणी दस्तऐवज (रजिस्ट्री) करतेवेळी द्यावयाचे आणि ५०% मोबदला रक्कम संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे पी. आर. कार्डवर नोंद घेतल्यानंतर व मालमत्ताटॅक्स बेबाकी प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| न. भू. क्र. | बाधीत क्षेत्र | द्यावयाचा मोबदला (रु.) |
|---|---|---|
| ७९५८ | १३८.१० चौ मी. | १३,९९,८०५/- |
| ७९५९/१ | ५८.८७ चौ. मी. | ५९६७१५/- |
| ७९५९ | ४४.०० चौ. मी. | ४,४६,००५/- |
| ७९६० | ३३.७५ चौ. मी. | ३,४२,०७०/- |
| ७९६१ | २४.३५ चौ. मी. | २,४६,८१५/- |
| ७९६२ | १६.५० चौ. मी. | १,६७,२२५/- |
| | ३१५.५७ चौ. मी. | ३१,९८,६३५/- |

तसेच खरेदीसाठी खतासाठी लागणारी रक्कम मोबदला रक्कमेतून कमी (वळती) केली असल्याने खरेदी खत (रजिष्ट्री) करुन घेणेसाठी रु. ३,५२,०००/- (रुपये तीन लाख बावन्न हजार) श्री. एस. बी. राठोड, कनिष्ठ अभियंता यांचे नांव अग्रीम देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ०९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सतीश पेट्रोल पंप ते महात्मा फुले रस्त्यावर विवेकानंद चौक ते बाबुराव काळे चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १०,३६,९५२/- च्या अंदाजपत्रकास व निविदा दरास विषय क्र. ८६ दिनांक १४-०१-२००४ च्या स्थायी समितीच्या सभेत मंजुरी मिळाली आहे. परंतु काम करीत असतांना वाढीव खर्च झाला आहे. एकुण वाढीव खर्च रुपये २,६४,५४६/- झाला आहे. तरी सुधारीत अंदाजपत्रकीय र. रु. १३,०१,४९८/- ला स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** दोन लक्षचे वाढीव इस्टीमेंट येते. रस्त्याची पाहणी केलेली नव्हती का? मी स्वतः रस्ता बघितला. निराला बाजार ते खजाना ऑप्टीकल्स पर्यंतचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. त्यामूळे २ लक्ष वाढीव रक्कमेस मंजूर करण्यात येऊ नये. त्या रस्त्यावर १५ दिवसाचे आत खड्डे पडलेले आहेत. प्रत्यक्ष मा. आयुक्त आपण स्वतः पाहणी करावी काम व्यवस्थित झालेले नाही.

**मा. सभापती** : या कामावर खर्च झालेला आहे. एकत्रित पाहणी केली जाईल. यात अतिरिक्त शहर अभियंता व स. सदस्य श्री. सावंत यांनी पाहणी करावी. विषय क्र. ९ मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सतीश पेट्रोल पंप ते महात्मा फुले रस्त्यावर विवेकानंद चौक ते बाबुराव काळे चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामाकरीता काम करीत असतांना वाढीव खर्च झाला असल्याने मुळ अं. प. रु. १०,३६,९५२/- एकूण वाढीव खर्च रु. २,६४,५४६/- असे सुधारीत अंदाजपत्रकीय र. रु. १३,०१,४९८/- ला सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, हॉटेल प्रशांत ते एम. आय. डी. सी. ऑफीस रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेलया र. रु.

१२,९६,८००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (११) कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन (०३) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. चारणीय कन्स्ट्रक्शन | ०.५१% कमी दराने |
| २. | एम. ए. सिध्दकी | १.६५% जास्त दराने |
| ३. | के. बी. पाथ्रीकर | निविदा उघडली नाही. |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी चारणीया कन्स्ट्रक्शन यांचे निविदाच दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.५१% कमी आहेत. करीता मे. चारणीया कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सदरील काम अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हॉटेल प्रशांत ते एम. आय. डी. सी. ऑफीस रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त असलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.५१% कमी दराचे निविदाधारक मे. चारणीया कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम यांचेकडुन अं. प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११ :**

कार्यकारी अभियंता (ज.नि/विदयुत) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरतील पथदिवे चालु बंद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे मनुष्यबळ नाही. हे काम करण्यासाठी मनपाकडे तेवढे मनुष्यबळ नाही. त्यामुळे पुर्ण शहरातील पथदिवे चालू बंद करणेसाठी टायमर लावणेसाठी रु. २६.०० लक्षच्या अंदाजपत्रकास सर्वाधारण सभा दि. १९-०९-०३ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण दहा निविदापत्रके विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण दहा निविदापत्रके विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत पाच निविदापत्रके प्राप्त झाली. ती खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | मे. असन्सो लाईटस | अं. प. दरापेक्षा ३.५०% जास्त |
| २. | मे. रुबीकॉन इंजिनियर्स | ५.५% जास्त दराने |
| ३. | अल्ट्रा इलेक्ट्रीकल्स | ६.७५% जास्त दराने |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ४.५% जास्त दराने |
| ५. | मेट्रो इलेक्ट्रीकल्स | सादर न केल्यामुळे |

वरील प्राप्त निविदापैकी असन्सोलाईटस यांची निविदा दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३.५% जास्त आहेत. या निविदेमधल्या अंदाजपत्रकात काम पुर्ण झाल्यावर एका वर्षापर्यंत सुपरव्हिजन व ऑपरेशन संबंधित ठेकेदाराने करावयाचे अटीवर स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुर्ण शहरातील पथदिवे चालू बंद करणेसाठी टायमर लावणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३.५% जास्त दराची मे. असन्सो लाईटस यांची निविदा काम पुर्ण झाल्यावर एका वर्षापर्यंत सुपरव्हिजन व ऑपरेशन संबंधित ठेकेदाराने करावयाचे अटीवर स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२ :**

सहाय्यक संचालक, नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्ता रोशनगेट ते सिडको (आझाद चौक) या रस्त्याने बाधीत मिळकती सर्व्हे क्र. ३४ व ३६ मौजे जसवंतपुरा बाधीत असून बाधीत क्षेत्र अनुक्रमे २८९५ चौ. मी. व २३५६ चौ. मी. आहे. उक्त बाधीत क्षेत्राचा मोबदला सर्व वजावटी जाता रुपये ८९,००,४४५/- निश्चित करण्यात आला असून, उक्त बाधीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेणेसाठी रु. १७,३२,८३०/- खर्च येईल.

तसेच मिळकत धारकास उक्त बाधीत क्षेत्राचा आगाऊ मोबदला रु. १०,००,०००/- यापूर्वी देण्यात आलेला आहे. करीता आगाऊ मोबदला दहा लाख वळती करुन एकूण दयेय मोबदला रु. ७९,००,४४५/- (रुपये एकोणऐंशी लाख चारशे पंचेचाळीस फक्त) त्यांचे हिस्से प्रमाणे दोन हफ्त्यात म्हणजे ५०% मोबदला रजिस्ट्री करते वेळी व ५०% मोबदला संपादीत क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिकेचे नांवे ७/१२ वर नोंद घेतल्या नंतर देता येईल.

सबब वरील प्रमाणे संबंधित मिळकत धारकास त्यांचे हिस्सेनुसार मोबदला देणेस्तव व रजिष्ट्री खर्च रु. १७,३२,८३०/- अग्रीम म्हणून श्री. मोहम्मद वसील शाखा अभियंता यांचे नांवे देणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ८० फुट रुंद रस्ता रोशनगेट ते सिडको (आझाद चौक) या रस्त्याने बाधीत मिळकती सर्व्हे क्र. ३४ व ३६ मौजे जसवंतपुरा बाधीत असून बाधीत क्षेत्र २८९५ चौ. मी. व २३५६ चौ. मी. मिळकती संपादन करण्यास तसेच सदर मिळकतीचा निश्चित करण्यात आलेला मोबदला सर्व वजावटी जाता रु. ८९,००,४४५/- संबंधित मिळकत धारकास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. उक्त बाधीत क्षेत्राचा आगाऊ मोबदला रु. १०,००,०००/- यापुर्वी देण्यात आलेला असल्यामुळे आगाऊ मोबदला रक्कम रुपये दहा लाख वळतीकरुन एकूण ध्येय मोबदला रु. ७९,००,४४५/- (रुपये एकोणऐंशी लाख चारशे पंचेचाळीस फक्त) त्यांचे हिस्से प्रमाणे दोन हप्प्त्यात म्हणजे ५०% मोबदला रजिस्ट्री करते वेळी व ५०% मोबदला संपादीत क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिकचे नांवे ७/१२ वर नोंद घेतल्यानंतर देण्यास आणि रजिष्ट्री करुन घेण्यात येणाऱ्या रक्कम रु. १७,३२,८३०/- च्या खर्चास तसेच सदरील रक्कम श्री. मोहम्मद वसील शा. अ. यांचे नांवे अदा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिळकत सर्व्हे नं. २३/६ जयसिंगपूरा भागशः क्षेत्र सहा एकर दोन गुंठे मोजणी नकाशानुसार क्षेत्र दोन हेक्टर तीस आर (२३००० चौ. मी.) या मिळकतीवर अर्जदार

दि. फ्रान्सीस कार्पोरेशन रोमन कॅथलिक चर्च करीता विद्यमान फादर जॉर्ज (ट्रस्टी) यांनी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक १६९/१७/२००२ नुसार बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला असून, या प्रस्तावामध्ये मतिमंद मुलांसाठीची शाळा, व्यावसायिक शिक्षण केंद्र व कर्मचारी निवासस्थान या इमरतीसाठी बांधकाम प्रस्तावित केले आहे. सदर प्रस्तावास न्यु नंदनवन कॉलनी अनाधिकृत वसाहतीमधील विद्यमान पोच रस्ता गृहीत धरुन तसेच अंतर्गत विकास कामासंबंधी अर्जदाराकडून हमीपत्र घेवून अर्जदारास विकास परवानगी ही विषय क्र. २५ दिनांक ०२ सप्टेंबर २००३ रोजी संपन्न झालेल्या मा. स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बां. व. प्रस्ताव मान्य करण्यत आलेला आहे. तो मान्य करतांना जमीन विकास शुल्क रु. ४,८३,०००.०० तसेच शहर विकास निधी ७२,३२०/- आकारुन बा. प. प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे.

अर्जदाराने दाखल केलेली प्रस्तावित मिळकत सार्वजनिक विश्वस्त संस्था यांची असून, तेथे मतीमंद मुलांसाठी शाळेचा प्रस्ताव असल्यामुळे शासन निर्णय क्र. टी पी एस-१२९३/३२/प्र.क्र./९३ नवि-१२ दि. २४ मे १९९३ नुसार जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% सुट देणेची तरतुद आहे.

जमीन विकास निधी ४,८३,०००.०० तसेच शहर विकास निधी ७२.३२०.०० असे एकूण रु. ५,५५,३२०/- शुल्क आकारण्यात आलेले असून, यामध्ये एकूण ७५% सुट म्हणजे रु. ४,१६,४९०/- देण्यात येवून उर्वरीत रक्क्म रु. १,१३,८३०/- मान्यता झाल्यास भरुन घेण्यात येईल.

करीता वरील प्रमाणे जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% सूट रु. ४,१६,४९०/- देणेबाबत व उर्वरीत रक्कम रु. १,१३,८३०/- भरुन घेणे करीता प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

करीता वरीलप्रमाणे ७५% सुट देणेचे निर्णयास्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**मा. सभापती** : ७५% सूट देण्यासंबंधीची इतरही प्रपोजल आहेत का? शासन निर्णय काय आहे. संस्थेची घटना ई. सविस्तर माहिती देण्यात यावी.

**श्री. मधुकर सावंत :** सर्व सदस्यांना शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**मा. आयुक्त** : संस्था रजिस्टर्ड आहे. आयुक्त पातळीवर खात्री झाली. ७५% सवलत रु. ४.९६ लक्ष एवढी होते. ही सवलत द्यायची की नाही यावर निर्णय व्हावा.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सविस्तर असा प्रस्ताव ठेवावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव सविस्तर माहीतीसह पुढील स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १७-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक १७-०५-२००४ रोजी मा.सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे सकाळी ११.२५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३. | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मणराव | -//- |
| ४. | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ५. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ६. | स. स. श्री. सौ. रशिदा बेगम गफ्फरयारवारखान | -//- |
| ७. | स. स. श्री. प्रल्हाद निमगांवकर | -//- |
| ८. | स. स. श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल | -//- |
| ९. | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| १०. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ११. | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| १२. | स. स. श्री. शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| १३. | स. स. श्री. सलिम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : मागील सभेत सुचना केल्याप्रमाणे यादी सभेत आचारसंहीतेचा भंग होणार नाही या दृष्टीने चर्चा करावी. वॉर्ड क्र. २५ उस्मानपुरा येथे पोट निवडणूक असल्याने या वॉर्डासंबंधी कोणत्याही प्रकारची चर्चा करण्यात येऊ नये. विषय पत्रिकेवर देखील विषय घेतला जात नाही.

**श्री. माणिक साळवे :** महाराष्ट्राचे प्रसिध्द कवी व सामाजिक कार्येकर्ते स्व. वामनदादा कर्डक यांचे दु:खद निधन झाले त्यांना त्या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री. मधुकर सावंत :** यास माझे अनुमोदन आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेसाठी आयुष्य वाहीले. या महापालिकेने त्यांना मानपत्र देवून सत्कारही केलेला होता.

**मा. सभापती** : ठिक आहे. सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.
(याच वेळी स्व. वामनदादा कर्डक यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. मोहन मेघावाले :** मागील महिन्यात नुकतीच लोकसभेची निवडणूक झाली. त्यात या जिल्ह्याचे खासदार म्हणून मा. श्री. चंद्रकातजी खैरे निवडून आले. त्याबद्दल सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

**मा. सभापती** : लोकसभा निवडणूकीत या जिल्ह्याचे खासदार म्हणून मा. श्री. चंद्रकांतजी खैरे निवडून आल्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** मागिल बैठकीत मी वॉर्ड क्र. १७ मध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमण चालु आहे. म्हणून मुद्दा मांडला होता. श्री. बालांडे नावाच्या बिल्डरने अतिक्रमण केले. त्याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी केलेली सुचना तसेच स. सदस्या सौ. शाहीन जफर यांनीही सिल्लेखाना भागात होणारे अनाधिकृत बांधकामाबाबत मुद्दा मांडलेला होता. या दोन्ही प्रकरणाबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. याचा सविस्तर खुलासा व्हावा.

**प्रशासकीय अधिकारी :** संबंधित बिल्डर्सला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३ प्रमाणे नोटीस देण्यात आलेली होती. नोटीसची मुदत संपल्यानंतर तोडायला गेला असता मा. न्यायालयाचे जैसे थे आदेश त्यांनी दाखविले त्यामुळे झालेले बांधकाम काढता आलेले नाही.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** अतिक्रमण काढण्या अगोदर पासून ती सभागृहात सुचना करीत आलेली आहे. अगोदरच बजावून सांगितले होते. स्थगिती आदेश येईल. ते थांबवायला पाहीजे होते.

**श्री.संजय शिरसाठ :** नोटीस किती दिवसाची देणे बंधनकारक आहे. नियम काय आहेत.

**प्रशासकीय अधिकारी :** संबंधितास ३५ दिवसाची नोटीस देण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४७८ नुसार अनाधिकृत बांधकाम काढण्याची तरतूद आहे. यात स्पेसीफिक मुदत दाखविली नाही. ॲथॉरिटीप्रमाणे साधारणतः १५ दिवसाची नोटीस देणे अपेक्षीत आहे. तसेच एम. आर. टी. पी. ॲक्टनुसार अनाधिकृत बांधकाम किंवा बेकायदेशीर बांधकाम आहेत. याबाबत नोटीस देवून कार्यवाही करण्याची जी तरतुद आहेत. ती ३५ दिवसाची आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** १५ दिवसाची नोटीस का दिली नाही. ३५ दिवसाची नोटीस देण्यात आली.

**मा. सभापती** : किमान १५ दिवसाच्या मुदतीची नोटीस देवू शकतो. असे असतांना ३५ दिवसाची नोटीस देण्याचे कारण काय व केव्हा दिलेली आहे. न्यायालयाचे " जैसे थे " आदेश केव्हा मिळाले खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी :** नगर रचना विभागामार्फत बांधकामास परवानगी दिलेली होती. जास्तीचे अनाधिकृत बांधकाम केले तर एम. आर. टी. पी. ॲक्टनुसार नोटीस द्यावी लागते.सदर प्रकरणाची संचिका सध्या माझ्या नाही. गेल्या १२ तारखेला साईटवर आम्ही गेलेलो होतो. त्यावेळी संबंधिताने न्यायालयाचे जैसे थे आदेश दाखविलेले होते. ३५ दिवसाची नोटीसची मुदत होती. त्यानंतर साईटवर गेलेलो होतो.

**श्री. निमगांवकर प्रल्हाद :** नोटीस यासाठी दिली की, संबंधित व्यक्ती न्यायालयात जाणार प्रशासनाकडून वेळ दिलेला आहे. त्यामुळे अतिक्रमण झालेले आहे.

**मा. सभापती** : अर्ध्या तासानंतर ती संचिका मागवून घ्यावी. त्यावर चर्चा करता येईल. सविस्तर माहिति यासभागृहाला द्यावी. स. सदस्या शाहीन जफर यांचे

वार्डातील सिल्लेखाना भागात तार फिन्सींग काढण्यासाठी गेलो असतांना कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली.

**मा. सभापती** : त्या बाबतचीही संचिका अर्ध्या तासानंतर घेऊन त्याचा रिपोर्ट सभागृहात सांगण्यात यावा.

**श्री. संजय शिरसाठ :** विवेकानंद महाविद्यालयाचे हॉस्टेलचे बांधकाम हे अनाधिकृत झालेले आहे. याबाबत ६ महिन्यापासून मी सुध्दा उपस्थित करीत आहे. त्याचे सविस्तर उत्तर मला मिळालेले नाही. प्रशासनाने खुलासा करावा या ठिकाणी अतिक्रमण होते आहे. म्हणून शहा नावाच्या व्यक्तीने वारंवार महानगरपालिकेकडे पत्र दिलेले आहे. व मलाही अर्ज दिलेले आहे. सहा. संचालक नगररचना विभागाने सुध्दा सदरचे बांधकाम अनाधिकृत आहे. म्हणून अहवाल दिलेला आहे. ६ महिन्याच्या कालावधीत कार्यवाही केलेली आहे. सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकीय अधिकारी :** शहा नावाच्या व्यक्तीच्या घराच्या बाजुलाच गेट बसविलेला होता. तो काढण्यात आलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** शहा नावाच्या व्यक्तीचा प्रश्न सोडून द्यावा. नियमानुसार प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. अनाधिकृत बांधकाम झाल्यानंतर बघ्याची भूमिका घेण्याचे कारण काय?

**प्रशासकीय अधिकारी :** वसतीगृहाचे बांधकामबाबत पंचनामा करुन नोटीस देण्यात आलेली आहे.

**श्री. सिरसाठ संजय :** गेट तोडण्यात आलेले आहे. मा. आयुक्तांनी पहाणी करावी. सहा महिन्यापासून मुद्दा उपस्थित होतो आहे. कार्यवाही होत नाही. ३५ दिवसाची नोटीसचा कालावधी सहा महिन्यापूर्वी अर्ज दिला त्याचे काय झाले.

**मा. सभापती** : याबाबत जी कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबतची माहिती त्यांचे विभागप्रमुख उप आयुक्त (म) आहे. त्यांना माहीत नसते. त्यांना माहीती दयावी. नगररचना विभागाकडुन काय माहीती प्राप्त होते आहे. याची सविस्तर माहीती नियमीत देण्यात येत नाही. अशा पध्दतीने काम होत असेल तर, योग्य नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** विवेकानंद महाविद्यालयाच्या हॉस्टेलच्या संदर्भातीलच माहीत देण्यात आलेली नाही. इतर सर्व माहीती दिलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** अशा प्रकारे या विभागाचे काम चालत असेल तर योग्य नाही. मा. उच्च न्यायालयाने सुध्दा काही निर्देश दिलेले आहे. चूकीची माहिती मा. न्यायालयात सादर करण्यात येते याची उप-आयुक्तांनाही तर मा. आयुक्तांना सुध्दा नसेल. असे वाटते.

**मा. आयुक्त** : स्थायी समितीमध्ये जे प्रश्न विचारले जातात त्यासंदर्भात संचिका सभागृहात उपलब्ध नसेल तर, त्या संचिका मागवून त्याचे उत्तर द्यावे व पर्याय होऊ शकतो. आयत्या वेळेला उपस्थित झालेले प्रश्न याची माहीती घेवूनच उत्तरे दयावी लागतील.

**श्री. संजय शिरसाठ :** हा प्रश्न ऐनवेळचा नाही गेल्या ६ महिन्यापूर्वी स्थायी समितीमध्ये विचारण्यात आलेला होता. पुढील बैठकीत उत्तर दिले जाईल. असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले होते. याचा अर्थ जेव्हा जेव्हा स्थायी समितीची सभा होईल. तो मुदयांचा खुलासा दिला जात नाही तो पर्यंत ती संचिका

बरोबर असणे आवश्यक आहे. आचारसंहितेच्या काळात तो प्रश्न उपस्थित करु शकलो नाही. याचा अर्थ संचिका बरोबर ठेऊ नये. असा होत नाही.

**मा. आयुक्त** : सहा. संचालक नगररचना विभागाकडुन जर या बांधकामाच्या बाबतीत अनाधिकृत बांधकाम असा उल्लेख असेल तर, उपआयुक्तांनी खुलासा करणे आवश्यक होते. अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण यात कायदयाने फरक आहे. हा फरक विचारात न घेता चर्चा करणे योग्य नाही. अनाधिकृत बांधकामबाबत एम. आर. टी.पी. कायदयानुसारच कार्यवाही होते अतिक्रमण असेल ते कोणत्याही जागेवर असू शकते. शासनाचे किंवा महानगरपालिकेच्या जागेवर देखील असू शकते. नोटीस देवून प्रशासकीय अधिकारी यांनी विनाविलंब काढणे आवश्यक असते. उपआयुक्त (प्र) हे या विषयाच्या संदर्भात प्रमुख आहेत. त्यांनी केलेली कार्यवाही व कार्यवाही न होण्याची कारणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. आयुक्ताकडून व सभागृहाकडुन वेळच्या वेळी सूचना देण्यात येतात.

**मा. सभापती** : आताच मा. आयुक्तांनी खुलासा केला व स. सदस्यांचा प्रश्न ऐनवेळचा नाही यापूर्वीच त्यांनी उपस्थित केलेला आहे. माहिती सोबत ठेवणे आवश्यक होते. जेव्हा जेव्हा आयत्या वेळी विषय चर्चेला येत असतील तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांनी वेळ मागवून घेतल्यास दिला जाईल. नंतर खुलासा करण्यात यावा.

**श्री. मोहन मेघावाले :** आताच स. सदस्य श्री. संजय शिरसाठ यांनी प्रश्न उपस्थित केला. जाधववाडी, भागातील काही नागरीक मा. आयुक्तांना भेटण्यासाठी आलेले होते. निवेदनही दिलेले आहे. ३५ दिवसाची नोटीस दिली म्हणतात. ६ महिन्यानंतरही कार्यवाही होत नाही. आचारसंहिता व इतर मधल्या कालावधीत इमारत निरिक्षकांनी काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करण्यात यावा. मुळ मालकावर का कार्यवाही केली जात नाही.स. सदस्य श्री. सिरसाठ यांचा प्रश्न ६ महिन्यापासून चालू आहे. का कार्यवाही होत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** ऐनवेळचे विषय असतांना अर्ध्या तासात माहीती मागविण्यात आली. ठिक आहे. आणखी दुसऱ्या प्रकरणाबाबत सुचना आहे की, सुचना आहे की, जय टॉवर्सचे जे बांधकाम झालेले आहे. त्यातील काही भाग महापालिकेला ताब्यात घ्यावयाचा आहे. विकास करण्यासाठी जागा दिलेली होती. २५% हिस्सा मनपास मिळणार आहे. त्या ठिकाणी दोन वेळेस भेटी दिलेल्या असून, या इमारतीचे बांधकाम घेऊन ५ वर्ष झाली आहे. संबंधित मालक दुकाने विक्री करुन गेलेला आहे. जो २५% महापालिकेस घ्यावयाचे होते ते काम घेण्यात आलेले नाही. याचाही खुलासा अर्ध्या तासात दिला तर योग्य होईल. विवेकानंद कॉलेजच्या हॉस्टेल बाबत १० वेळेस मी प्रश्न उपस्थित केलेला आहे. मार्च पर्यंत त्यांनी रक्कम भरणा केलेली होती. त्या जागेचे पी. आर. कार्डवर महापालिकेचे नांव लागलेले आहे का? ती जागा ताब्यात घेतलेली आहे का याचही खुलासा करण्यात यावा.

**श्री. सोपान पारे :** अतिक्रमणाच्याच बाबतीत विषय आहे. म्हाडा कॉलनीत चुकीच्या पध्दतीने मार्कींग करण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : स. सदस्या सो. शाहीन जफर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत श्री. कांबळे इमारत निरिक्षक यांना जो अतिक्रमण हटवितांना अनुभव आला तो त्यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणून दयावा.

**श्री. कांबळे (इ. नि.) :** सिल्लेखांना येथे अतिक्रमण काढण्यासाठी गेलो असता तेथे मला मारहाण करण्यात आलेली आहे. ३ वेळेस तोडले पोलीस बंदोबस्त होता. पोलीस पथकाची मागणी केलेली होती. १८ तारखेला पोलीस पथक दिले जाईल असे सांगण्यात आलेले होते. परंतू आम्हाला त्वरीत अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिल्यामूळे पथक तेथे गेलेले होते.

**सौ. शाहीन जफर :** एकूण ८३ वॉर्ड आहेत. प्रत्येक वॉर्डात अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होणार नसेल तर योग्य नाही. कर्मचाऱ्यांना मारहाण होते म्हणून भिती पोटी निघून आल्यास शहरात संपूर्ण अतिक्रमण होईल यास जबाबदार कोण?

**मा. सभापती** : पोलीस फोर्स बरोबर असतांना कर्मचाऱ्यांना मारहाण होत असेल तर योग्य नाही. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही केली पाहीजे.

**सौ. शाहीन जफर :** यापूर्वी दोन वेळेस अतिक्रमण काढण्यात आलेले होते. त्यावेळीही काही गुंड प्रवृत्तीचे लोक सुरी चाकु घेवून मारहाण करण्यास आलेले होते. तिसऱ्यांदा जास्त पोलीस फोर्स घेवून जाणे गरजेचे होते. पोलीस कर्मचारी संख्या कमी असेल तर, जास्तीचे मागणी करण्यात यावी.

**मा. सभापती** : मुद्दा असा की, पोलीस फोर्सची मागणी केलेली होती. १८ तारखेला देणार होते. सभागृहाच्या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही केली म्हणून हा अनुभव आलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** एक कर्मचारी १५ पोलिस कर्मचारी बरोबर असतांना मारहाण होत असेल तर, योग्य नाही. याचा अर्थ आपण सक्षम नाही. संबंधित कर्मचाऱ्यांना सभागृहात आणण्याची गरज नव्हती परंतु आमचे कर्मचारी कसे मार खातात हे दाखविण्यासाठी सभागृहात कर्मचारी बोलत आहे. प्रशासकीय विभाग कार्यवाहीच करीत नसेल तर, अतिक्रमण होवू दया? अशा प्रकरणात कोणी दादागिरी करीत असेल तर, त्या नागरीक विरुध्द प्रशासनाने त्या अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशन मध्येच पोलिस गुन्हा नोंद करणे आवश्यक होते. असा प्रकार होत असेल व मारहाण होते या भीतीने अशीच अतिक्रमणे होतील व हटविता येणार नाही.

**श्री. कांबळे (इ.नि.) :** खाजगी जागेवर ते अतिक्रमण आहे मनपाच्या जागेवर नाही. तार फेन्सींगचे काम केलेले आहे. ४ वेळेस काढले सन १९७१ सालची त्यास परवानगी होती.

**श्री. संजय शिरसाठ :** तीन वेळेस अतिक्रमण काढण्यात आले अतिक्रमण नाही म्हणतात. महापालिकेच्या जागेवर तार फिन्सिंग केलेले आहे असे सांगतात ते तोडण्याची आवश्यकता वाटते की नाही.

**मा. सभापती** : सदरचे कंपाऊंड हे अनाधिकृत असेल तर नियमाप्रमाणे काढणे आवश्यक आहे.

**श्रीमती शाहीन जफर :** १९७१ ची परवानगी असेल तर ३० वर्षानंतर सदर परवानगी लॅप्स होते.

**मा. सभापती** : सदर व्यक्तीवर रितसर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात यावा. मनपाकडे असलेले पोलीस शिपाई यांचे समोर जर कर्मचाऱ्यांना मारहाण होत असेल. पोलीस बघ्याची भूमिका घेतात. मा. आयुक्तांनी लक्ष दयावे.

**श्री सावंत मधुकर :** पोलीस पथक कर्मचाऱ्यांवर महापालिकेचे ३० ते ३५ लक्ष दर वर्षाला खर्च होतात. निष्क्रीय पोलीस पथक दिलेले आहे. जे काम न करणारे पोलीस शिपाई महापालिकेकडे दिलेले आहे. चांगले काम करणारे पोलिस शिपाई मागविण्यात यावे. १५ पोलिसाच्या समोर एक महापालिकेचा कर्मचारी यांना मारहाण होते व सभागृहात येवून सांगण्याची वेळ असे दुर्देव आहे.

**मा. सभापती** : सध्या जे पोलिस शिपाई कार्यरत आहे. त्यांचा अशा कामासाठी उपयोग होत नसेल तर, मा. आयुक्तांनी पुढील बैठकीत याबाबत अहवाल द्यावा. संबंधित व्यक्तीवर पोलीस स्टेशनला रितसर गुन्हा दाखल करुन जास्तीचा पोलीस फोर्स घेवून सदरचे सिल्लेखाना येथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. संबंधित व्यक्ती व त्यांचे साथीदार यांना घाबरुन अतिक्रमण काढले जात नसेल तर हे योग्य नाही.

**श्री सावंत मधूकर :** एखादा सदस्य अतिक्रमण काढण्याबाबत सुचना मांडतो. आपल्या प्रशासकीय विभागाने किती वेळेस जावून अतिक्रमण काढावे. तीन वेळेस जावून अतिक्रमण काढले म्हणतात. नेहमीच हा प्रकार होत असेल तर, महापालिकेने हेच काम करायचे का असा प्रश्न निर्माण होतो.

**मा. सभापती** : एक वेळस अतिक्रमण काढण्यात आले. पुन्हा पुन्हा त्या जागेवर अतिक्रमण जो कुणी संबंधित व्यक्ती करीत असेल व त्याबाबत वारंवार महापालिकेला कार्यवाही करण्याची वेळ येत असेल तर, त्यासाठी येणारा खर्च संबंधिताकडुन वसुल करण्याची कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे.

**श्री. शे. मुनाफ शे. यासीन :** एकाच विषयावर वारंवार प्रत्येक बैठकीत चर्चा होते. त्यात जास्त वेळ निघून जातो व महत्वाच्या इतर विषयावर चर्चा होत नाही. जे बोलायचे ते तसेच राहुन जाते. चार बैठकीपासून सिल्लेखाना येथील अतिक्रमणाबाबत चर्चा होत आहे. पोलिस पथक बरोबर असतांना अधिकारी कर्मचारी मारहाण होत असेल तर, बरोबर नाही. पोलिस काय करीत होती. सदर तार कंपाऊंडला १९७१ ची परवानगी होती तर ती आज पर्यंत नियमाने योग्य आहे का?

**मा. सभापती** : यापूर्वी ३ वेळा काढले. ७१ ची परवानगी दाखवा ते तपासणी करीत होते.

**श्रीमती शाहीन जफर :** यापूर्वी सदरचे अतिक्रमण काढण्यासाठी कर्मचारी अधिकारी गेले असता जे फोटो मध्ये आलेले आहे त्यात असू दिसून येते की, पोलिस पथक झाडाखाली उभे होते. अतिक्रमणाच्या ठिकाणी नव्हते. कार्यरत असलेले पोलिस शिपाई काम करीत नसेल तर दुसरे पथक मागविण्यात याचे पालिकस फोर्स चांगला असल्यास महापालिकेचे नुकसान होणार नाही. ५० लक्ष रुपये पोलिसावर खर्च होतात.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मा. आयुक्त खुलासा करतील.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. ताठे आपण उशीरा सभागृहात आलेले आहात. आताच मा. आयुक्तांनी म्हटले की, आयत्या वेळेस प्रश्न उपस्थित केल्यास लगेच खुलासा देण्यात अडचण येते. पुढील बैठकीत खुलासा करण्याचे आदेशीत केलेले आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मोंढा नाका भागात दीड महिन्यापूर्वी फळांच्या दुकानांना आग लागून बऱ्याचशा दुकाना आगीने भस्म झाल्या. बऱ्याच लोकांचे नुकसान झालेले आहे. मा. आयुक्तांनी याबाबत चौकशी केलेली आहे का? सदरीची जागा

महापालिकेची की खाजगी मालकाची आहे. सदर दुकन धारकांना फळे विक्रीसाठी परवानगी दिलेली आहे का?

**मा. सभापती** : आताच स.सदस्य यांनी सुचना केल्याप्रमाणे मा. आयुक्तांनी कार्यवाही केलेली आहे. तसेच महापालिकेतर्फे आर्थिक मदत देण्याविषयी काही पावले प्रशासनाने उचलली आहेत. का खुलासा देण्यात यावा.

**उपआयुक्त (म)** : सदरची दुकाने अधिकृत नसल्यामुळे आर्थिक मदत देता येणार नाही. आकस्मित मदत देण्याची तरतुद मा. जिल्हाधिकारी यांचे विभागामार्फत होते. तसे पत्र त्या विभागाकडे देण्यात आलेले आहे. अधिकृत नसल्याने मदत देत नाही.

**श्री भाऊसाहेब ताठे :** याचा अर्थ सदरच्या दुकाने ही अतिक्रमण झालेले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. प्रशासनाने याबाबत काय कार्यवाही केलेली आहे. अतिक्रमणाच्या जागेवर दुकाने असतील तर काढण्यात का आलेले नाही. परवानगी दिली नाही. कार्यवाही होणे आवश्यक होते.

**मा. सभापती** : सदरची दुकाने अतिक्रमणाच्या जागेवर आहेत का. प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**प्रशासकीय अधिकारी :** सदर फळाची दुकाने खाजगी जागेवर आहेत. आपल्या जागेवर बसले होते आपण ते काढले आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** आताच संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा केला. या बाबतीत मा. आयुक्त सहमत आहेत का? होय किंवा नाही खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : अशा प्रकारे प्रश्न उपस्थित होत असेल तर, संचिका बघूनच सांगता येईल. यात अनेक कारणे दिसुन येतील. आपणांस सुध्दा माहिती आहे. मा. उच्च न्यायालयाने १५ मी. ते ४५ मी. रस्त्याच्या संदर्भात निर्देश दिलेले आहेत. हा तर मोठा रस्ता आहे. मध्यवर्ती रस्त्यापासुन किती अंतर सोडावे यात कोणलाच काहीच करता येत नाही. ती दुकाने कोठे होती. खाजगी जागेवर आहेत का नंतरचा प्रश्न आहे. बिल्डींग लाईनमध्ये दुकाने येत असतील तर खाजगी असो किंवा कोणतीही जागा असे तेथे दुकाने टाकू शकत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** आताच आपण उत्तर दिल्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना सांगण्यात यावे की, खाजगी जागेवर जरी असेल तरी, अतिक्रमण काढता येते. तर कार्यवाहीस सुरुवात करतील. ३५ दिवसांची नोटीस वैगेरे देणार आहेत का?

**प्रशासकीय अधिकारी :** नोटीस वैगेरे देण्याची गरज नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** दोन बाजुने दोन प्रकारचे संबंधित अधिकारी सभागृहात उत्तर देतात. एकीकडे सांगतात खाजगी जागेवर आहे म्हणून कार्यवाही करता येत नाही. म्हणून मा. आयुक्तांना विचारणा करावी लागते. आता सांगतात की, नोटीस देण्याची आवश्यकता नाही. आताच मा. आयुक्तांनी सांगितले की, खाजगी जागेवर अतिक्रमण झालेले असले तरी काढता येते. त्याबाबतचे ज्ञान आम्हाला सुध्दा आहे. संबंधित अधिकारी कार्यवाही करणार आहेत की नाही. नगरसेवकांना झालेले अतिक्रमण थांबविण्याच्या सूचना कराव्या लागतात. एकाही कामाबाबत अधिकारी रिस्क होत नाही. उडवाउडवीची उत्तरे देतात. अधिकारी कार्यवाही करीत नसेल तर, त्यांचेवर पोलीसात गुन्हा नोंद करण्यात यावा. यामुळे मनपाचे नुकसान होत आहे. सामान्य व्यक्तीने पानटपरी टाकली तर ती उचलून होवूनच लगेच मोडतोड करुन घेऊन

जातात. अशी स्थिती आहे. अतिक्रमणे ही चालूच गरीबांसाठी एक न्याय दुसऱ्यासाठी एक न्याय अशी अवस्था दिसून येते.

**मा. सभापती** : स्टॉलच्या दुकानास आग लागलेली होती. आताच मा. आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे पुढील बैठकीत सविस्तर असा खुलासा करण्यात यावा.

**मा.आयुक्त** : प्रशासनाचाच खुलासा अपेक्षीत असेल तर, या प्रकरणात कदापीही आर्थिक मदत देता येणार नाही. अशाही प्रकरणात मदत करायची असेल तर, सर्वसाधारण सभेत धोरण ठरवावे.

**श्री. संजय शिरसाठ :** अतिक्रमण असेल तर, आर्थिक मदत देण्याची आवश्यकता नाहीच परंतू, त्या फळाच्या दुकानामध्ये एखादया सामान्य नागरीक आगीत मृत्यू झाला असता तर जबाबदारी कुणाची असती? झालेले अतिक्रमण तात्काळ काढण्याची कार्यवाही करावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** महापालिकेच्या मालकीचे असेल तर, काढण्याचा अधिकार आहे. परंतू खाजगी जागेवर जरी असेल व परवानगी नसेल तर, अनाधिकृतपणे आहे म्हणून काढता येते.

**मा. आयुक्त** : आग विझविण्यात आल्यानंतर फायर विभागाकडून तसा अहवाल येत असतो. हा अहवाल उपआयुक्त (म) यांचेकडे येतो. तो अहवाल आयुक्तांकडे येतच असतो. परंतू प्रत्येक बाबतीत आयुक्तांनीच बघणे योग्य नाही. अशा प्रकारात वाव दिला तर कोणी आग लावील व आर्थिक मदतीसाठी महापालिकेकडे येईल. सदरची दुकाने अतिक्रमीत आहेत का, याबाबत श्री. कंकाळ (प्र.अ.) व उपआयुक्त श्री. शिंदे यांना संचिकेवर सुध्दा सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भात स्पष्ट आदेश आहेत की, रस्त्याच्या मध्यवर्ती रेषेपासून किती अंतरावर बिडींग लाईन पाहिजे ती असणे आवश्यक आहे. याबद्दल कुठेही दुमत नाही. हे डिमार्केशन करुन घेतल्यास खाजगी जागेवर असो किंवा महापालिकेच्या जागेवर असो अतिक्रमण म्हणून काढण्याची तरतूद आहे. संबंधित अधिकाऱ्यांना काहीही अडचण येण्याचे कारण नाही.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत सविस्तर अहवाल देण्यात यावा. फळांचे दुकान अधिकृत की अनाधिकृत होत्या. आरोग्य विभागाचा परवाना होणे गरजेचे आहे. तो घेतला की नाही.

**सौ. रशिदा बेगम :** मागील वर्षात न झालेली कामे या अर्थसंकलपात आलेली नाही. माझ्या वार्डात १ लक्षचे काम होते. तीन वर्षापासून होत नाही. या वर्षाच्या अर्थसंकल्पात का घेतलेले नाही. खुलासा करण्यात यावा. पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव होता.

**श्री. सोपान पारे :** म्हाडा कॉलनीत ड्रेनेज लाईन पाणी पुरवठा लाईनवरील अतिक्रमण काढावे म्हणून न्यायालयाचे आदेश आहेत. जी मार्कींग होते. ती चुकीची होत आहे. मुळ रहात्या घरावर सुध्दा मार्कींग केलेली आहे. यापुर्वीही रस्त्याच्या रुंदीकरणा संदर्भात न्यायालयाचे आदेश आहेत. त्याबाबतची कार्यवाही केलेली आहे का खुलासा देण्यात यावा. गरीब नागरीकांची घरे कशासाठी पाडतात. न्याय देण्यात यावा. ड्रेनेज लाईन किंवा जलवाहिनी वरील अतिक्रमण काढावे याबद्दल दुमत नाही.

**मा. आयुक्त** : स. सदस्या सौ. रशिदा बेगम यांनी सुचविलेल्या कामाबद्दल बोलतो आहे. यावर चर्चा करण्याची आवश्यक नाही. तीन वर्षापासून काम अर्थसंकल्पात येते परंतू केले जात नाही. याबाबत प्रत्येक कार्यकारी अभियंता यांना सूचना

दिल्या की, लेखी सूचना दिलेल्या आहेत की, १००% बेंटरमेंट चार्जेस भरणाऱ्या वस्तीतील कामास प्राधान्य द्यावे तसेच शहरातील जे गावठाणमधील काम आहे. त्यासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेपूढे जाईल. त्या सभेत आपण थोडयाफार प्रमाणात मदत करावी अशी विनंती आहे.

**सौ. शाहीन जफर :** जून महिना येत आहे. शाळा उघडतील महापालिकेकडे भाडेतत्वावर असलेल्या इमारतीचे भाडे देण्यात आलेले नाही. मागील बैठकीत याबाबत चर्चा झालेली होती. लवरकच रक्कम दिली जाईल असे सांगण्यात आलेले होते. खुलासा करण्यात यावा. माझ्या वॉर्डात अशा एकूण तीन शाळा आहेत की, त्या शाळा इमारत मालकाचे भाडे थकलेले आहे. भाडे दिले नाही तर मिळकतधारक शाळा उघडू देणार नाही. आठ दिवसात भाडे दिले जावे नसता प्रशासन जबाबदार राहील.

**मा. आयुक्त** : यासंबंधी मी आढावा घेतलेला आहे. १९-०५-२००४ पर्यंत संबंधित इमारत धारकास भाडे दिले जाईल.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. पारे यांनी सूचना केल्याप्रमाणे त्या संबंधीचा खुलासा करण्यात यावा.

**शहर अभियंता** : मा. उच्च न्यायालयात सिडको हस्तांतरणाबाबत प्रकरण चालू आहे. त्यात सिडको भागात म्हाडाचा समावेश आहे असे नमूद होते. म्हाडा बाबत एक सी. ए. केलेला होता. त्यावर अंतीम सुनावणी होऊन म्हाडा भागातील ड्रेनेज व पाण्याच्या पाईप लाईन वरील अतिक्रमण त्वरीत काढावे अशा सूचना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या होत्या. म्हाडा विभागास सुध्दा सर्वे करण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार म्हाडा विभागाने ज्या भागात अतिक्रमण झालेले आहे त्या बद्दलचे सविस्तर बुकलेट तयार केलेले आहे. त्यावर पुर्ण मार्कींग दिलेली आहे. त्या बुकलेटची एक प्रत मनपास दिलेली आहे. अंतिम निर्णय झाला तेव्हा जे ड्रेनेज व जलवाहिनीवरील अतिक्रमण झालेले आहे ते काढावे असे निर्देश दिले त्यानुसार महापालिकेने त्या भागात जाऊन मार्कींग केलेली आहे. घरांवर सुध्दा मार्कींग आहे. ही वस्तुस्थिती आहे. या कामावर माझे स्वतःचे नियंत्रण आहे मी दररोज जातो. मी स्वतः पाहणी केलेली आहे. जे कर्मचारी काम करणार आहेत. त्यांना प्रत्येक वेळेस बरोबर होऊन बैठका होवून सूचना दिलेल्या आहेत. जेथे ड्रेनेज/पाणी पाईप लाईन असेल तेथील झालेले बांधकाम काढणार आहेत. बैठकीचे मिनिटस सुध्दा देण्यात येते. चुकीचे काही मार्कींग होवून बांधलेले काम पाडण्यात आले तर, त्यास संबंधित कर्मचारी जबाबदार राहील. बऱ्याचशा अडचणी आलेल्या होत्या. तेथील रहिवाश्यांचे तसेच सदस्यांचे पत्र सुध्दा आलेले होते. त्यानुसार मी व उपआयुक्त आम्ही कालच ४ तास संयुक्त पाहणी केली व हे पत्र म्हाडास गेले. म्हडाचे मुख्यलेखाधिकारी यांचा आज फोन होता. त्यांचेसह चर्चा केली. त्यांनी असे सांगितले की, १०X१.३५ मीटरचे प्लॉट दिलेले आहेत. या दोन्हीच्या मधून ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेले आहेत. ड्रेनेज लाईनवरील अतिक्रमण केलेली जागा सुध्दा आमची आहे. म्हणून काही लोकांचा आग्रह होता. त्याबद्दलही म्हाडा ऑफिसला कळविण्यात आले. ती जागा त्या नागरीकांची का म्हाडाची याबाबत म्हाडा विभागाने ताबडतोब निर्णय घेणे

आवश्यक आहे. त्या बैठकीत या संदर्भात चर्चा होवून जे काही करता येईल त्यावर निर्णय घेतला जाईल. यापुर्वी काही ठिकाणी ड्रेनेज लाईन होती. काही काळानंतर ती शिफ्ट झालेली आहे. ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन व पाण्याची पाईपलाईन आहे. त्या जागेवर अतिक्रमण झालेले असेल तरच ते तोडण्यात येईल. जाणुन बुजून कुणावरही अन्याय होणार नाही. कोणासही त्रास होणार नाही. सर्वांना सूचना दिल्या. मी दररोज जातो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जेथे ड्रेनेज लाईन जलवाहिनी नाही अशा ठिकाणी बांधकाम केलेले असेल तर, ऑडशेप म्हणून जागा देण्यास हरकत नसावी.

**शहर अभियंता :** हा अधिकार म्हाडा विभागाचा आहे. महापालिकेला जागा देता येणार नाही.

**मा. आयुक्त** : मा. सभापतींच्या परवानगीने दोन मुदयांवर चर्चा करणे आवश्यक आहे. वास्तविक यावर कार्यवाही होणे आवश्यक होते. मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. शहर अभियंता यांनी खुलासा केलेला आहे. त्यापेक्षा खोलात जाऊन मी मुद्दे बघितले व स. सदस्य व सभागृह यांचे अडचणी अगोदर माझ्याकडे आल्यानंतर सदरची कार्यवाही तुर्त थांबवलिेली आहे. यात दोन मुद्दे आहेत. जो काही नकाशा आहे ते म्हाडा विभागाने देणे आवश्यक आहे. मार्जीनल स्पेस मध्ये जरी बांधकाम केले तरी ते अनाधिकृत बांधकाम आहे. समोरील भागात व पाथवे मध्ये केले तरी ते अनधिकृत आहे. जेव्हा संबंधित व्यक्तीला म्हाडा ताबा देते तेव्हा त्या घराच्या चारही सिमा किती आहे. त्याबाबतचा नकाशा असेल तर, लगेच स्पष्ट होईल. महापालिकेच्या वतीने काम चालू आहे. आताच खुलासा केल्याप्रमाणे बैठकीअंती योग्य तो निर्णय होईल. मा. उच्च न्यायालयात सुध्दा वस्तुस्थिती अवगत करणे आवश्यक आहे. या बाबतीत गांभीर्याने लक्ष दिले जात आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** मागील बैठकीत जाहीरात फलकाच्या निविदे संदर्भात विचारणा करण्यात आली होती. जाहीरात फलकाच्या संदर्भातील माहिती देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** शहरात विविध ठिकाणी होर्डींग्ज लावण्यासंदर्भात दि. ११-०७-२००३ रोजी सेल ॲड कंपनीला कार्यादेश दिलेला आहे. सदर होर्डींग्ज, अँड पोल्स आणि फिऑक्स ए. बी. सी. ग्रेडप्रमाणे लावण्यात येतील. संबंधितांनी जे कामे केलेले आहे. त्याची माहीती सभागृहासमोर ठेवण्यात येते. ए ग्रेडमध्ये एकुण ५३ होर्डींग्ज लावणे आवश्यक होते. त्यापैकी १९ ठिकाणी होर्डींग्ज उभे केले आहे. २४ ठिकाणाच्या जागेवर कोणतीही अडचण येणार नाही अशी जागा उपलब्ध आहे. ८ जागांच्या बाबतीत काही इमारत मालक दुकान मालक आक्षेप घेत आहेत. त्यानुसार सेल अँड कंपनीला पर्यायी जागा इतर ठिकाणी सुचविण्याबाबत सांगण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल. दोन जागेच्या संदर्भात न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. स्पेशल सुट क्र. १४६/२००२ बी वर्गामध्ये ७९ ठिकाणी होर्डींग्ज उभारण्याची परवानगी आहे.त्यापैकी संबंधित एजन्सीने फक्त १५ ठिकाणी होर्डींग्ज उभारलेल्या आहेत. ५६ ठिकाणच्या जागेवर होर्डींग्ज उभारण्यास कोणतीही अडचण येणार नाही. ५ ठिकाणी अनाधिकृत होर्डींग्ज आहेत. एका जागेच्या बाबत न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. सी वर्गामध्ये १२० ठिकाणी होर्डींग्ज उभारण्यास जागा दिलेली आहे. त्यापैकी १५ ठिकाणी होर्डींग्ज उभारण्यात

आलेल्या असून, ९८ ठिकाणी होर्डींग्ज उभारण्यास कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. तीन ठिकाणी छावणी हद्दीला जागा चुकीने दिलेली आहे. त्याबदल्यात दुसऱ्या ठिकाणी जागा दिली जाईल यामध्ये एका जागेच्या संदर्भात न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. फिऑक्स जे लावायचे आहेत. टेंडरमध्ये १५०० फिऑक्सची जागा ठरवून दिलेली आहे. त्या कंपनीने फक्त ११२ ठिकाणी फिऑक्स लावलेले आहेत. ॲड पोलसची ५०० ची परवानगी दिलेली आहे. त्यापैकी १०७ ठिकाणी ॲडपोटस लावण्यात आलेले आहेत. जे निविदेमध्ये ग्रुप ४ ते १९ ॲड पोटस आणि फिऑक्स मिळुन रु. ३८,८१,८५१/- संबंधित एजन्सीने दोन हफ्त्यात भरणा करण्यास पाहिजे होते. ५०% सुरुवातीस भरणा करावयास पाहिजे. त्याप्रमाणे भरणा केलेले आहे. त्यानुसार १९,८०,९२६/- भरणा केलेले असून, ५०% रक्कम पुढील सहा महिन्यात भरणा करावयास पाहिजे होते. पुढील सहा महिन्याच्या सुरुवातीस १५ दिवसात आत भरणा करावयास पाहीजे होती. दि. ०८-०७-२००३ पासून टेंडर करारनामा केलेला आहे. त्या दिवशीपासून कार्यवाही सुरु आहे. सहा महिन्यात ५०% व उर्वरीत सहा महिन्यात ५०% रक्कम भरणे आवश्यक होते. या संदर्भात मार्च महिन्याच्या अगोदरच संबंधितास डिमांड वैगेरे दिलेले आहे. आजपर्यंत पैसे भरणा केलेले नाहीत. काम केल्याचा अहवाल आज दिलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** चुकीच्या पध्दतीने गाजावाजा करुन निविदा काढण्यात आल्या. ५३ पैकी फक्त १९ लावले २४ जागा क्लिअर आहेत. ' ब ' मध्ये ८९ पैकी १५ लावले. ५६ क्लिअर आहेत. करारनाम्याप्रमाणे पहिल्या सहा महिन्यात ५०% भरले. उर्वरीत भरलेले नाही. आपण करारनाम्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. फिऑक्स १५०० पैकी ११२ लावले. ॲडपोल ५०० पैकी १०७ ठिकाणी लावले. १९ लाख जमा केले. महानगरपालिकेचे सहा-सात लाख रुपये सर्वेक्षणात गेले. मनपास नाममात्र उत्पन्न होत आहे. निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे जाहीरात फलक ताबडतोब लावण्यात यावेत. अन्यथा करारनामा रद्द करण्यात यावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** काही ठिकाणी जाहीरात फलकांचा आकार कमी जास्त झालेला आहे. फलकाच्या आकाराप्रमाणे त्यांनी पैसे भरलेले नाहीत.

**मालमत्ता अधिकारी :** काही ठिकाणी जाहीरात फलकाचा आकारल वाढलेला आहे. त्या ठिकाणी वाढीव क्षेत्रावर निविदेतील दराप्रमाणे रक्कम आकारण्यात येत आहे.

**मा. सभापती :** निविदेप्रमाणे दुसरा हप्ता भरलेला नाही. जाहीरात फलकाचे आकार वाढले. वर्ग ' अ ' मध्ये संख्या वाढविण्यत यावी. निविदा अटीशर्तीप्रमाणे कार्यवाही करण्यात देखील करावी.

**मा. आयुक्त :** संबंधित निविदाधारक सेल ॲडस् मालमत्ता अधिकारी व उपआयुक्त (म) यांचेसह सुमारे दीड तास बैठक घेऊन त्यांना सूचना दिलेल्या आहेत. प्रत्येक जागेची माहीती उपलब्ध आहे. निविदा धारकांनी ज्या वेगाने काम केलेले नाही. मुदत जुलै २००३ ते जुलै २००४ मध्ये संपते ५०% रक्कम शिल्लक आहे. सदरची रक्कम किती होते हे प्रशासकीय अधिकारी यांना काढण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. अनाधिकृत जाहीरात फलकांचा सर्व्हे पूर्ण झालेला आहे. महानगरपालिकेच्या जागेवर २८ अनाधिकृत जाहीरात

फलक असून, १२२ खाजगी जागेत आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४५ प्रमाणे आयुक्तांनी आदेश दिल्यानंतर उपआयुक्त यांनी काल बध्द कार्यक्रम आखुन कार्यवाही करावी. कलम २४५ चे अधिकारी त्यांना देण्यात आलेले आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** ०८-०७-२००३ ला करारनामा झालेला आहे. तिसऱ्या महिन्यात २० लाख भरले नाही.

**मा. सभापती** : पुढच्या बैठकीत अहवाल देण्यात यावा. दंडात्मक कार्यवाही करायची असेल तर, प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल.

(मा. सभापतींनी दुपारी १२.४५ वा. सभा तहकूब केली व १.२३ वाजता पुन्हा सभेला सुरुवात झाली.)

**मा. सभापती** : स.सदस्य श्री. संजय शिरसाठ श्री. मेघावाले व श्री. निमगांवकर यांनी मुद्दे उपस्थित केलेले होते. जय टॉवर्स येथील २५% गाळे महानगरपालिकेने ताब्यात का घेतले नाही.

**मालमत्ता अधिकारी :** नगररचना विभागाकडून ताबा मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री. संजय शिरसाठ :** नगररचना विभाग शहर अभियंता याना हस्तांतर करतील व शहर अभियंता हे मालमत्ता अधिकारी यांना हस्तांतर करतील.

**उपअभियंता (न.र.) :** पद्मपूरा येथील जय टॉवर्स येथील समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास (ऑकोमोडेशन रिझर्वेशन) अंतर्गत विकास कामे २५% गाळयांचा ताबा द्यावयाचा आहे. वरीष्ठ स्तरावर पाहणी झालेली आहे. सदर प्रकरण निर्णयास्तव वरीष्ठाकडे आहे मालमत्ता अधिकारी यांच्याकडे दि. २७-०२-२००८ ला पाठविण्यात आलेले आहे. नगर रचना विभागचा अहवाल दिलेला आहे.

**मा. सभापती** : २५% नियमानुसार दिला आहे का.

**उपअभियंता (न. र.) :** बेसमेंट फ्लोअरमध्ये भाजीमंडई नियमित करण्याचा व्हायचा आहे. स्पेसिफिकेशन शहर अभियंता पाहतील.

**श्री. संजय शिरसाठ :** पाच वर्षे झाले आजही आपली मालमत्ता आपल्या ताब्यात नाही. त्याबद्दल नोटीस द्यावी. नगररचना विभागाने संचिका पुढे पाठविलेली आहे. मा. आयुक्तांनी याबाबत माहिती दयावी.

**शहर अभियंता :** महानगरपालिकेला मिळणार भाग तयार आहे. ताब्यात घ्यावे म्हणून मालकाने पत्र दिलेले आहे. वरीष्ठ पातळीवर पाहणी झाली. स्पेसिफिकेशन प्रमाणे काम झालेले आहे. ताब्यात घेण्यास हरकत नाही. खिडक्या तावदान इ. किरकोळ कामे राहिलेली असतील. हस्तांतर करुन घेण्यास हरकत नाही. सहा. संचालक नगररचना यांना विचारणा केली योग्य आहे का तपासून हस्तांतर करुन घ्यावे. तळघराबद्दल सहा. संचालक नगर रचना यांनी सांगितले की, तळघर सोडून बाकीचे घेवू शकतो.

**मा. आयुक्त** : आरक्षण क्र. ३२३ भाजी मार्केट व बहुउद्देशीय हॉल ४४ गाळे भाजी मंडईसाठी व एक बहुउद्देशीय हॉल बांधलेला आहे. या कामावर तत्कालीन शहर अभियंता श्री. आय. टी. गायकवाड यांनी सुपरविजन केलेले आहे. काम पूर्ण होवून दोन-तीन वर्षे उलटली. महानगरपालिकेला हस्तांतर व्हायचे आहे. काही कामे बाकी आहेत. शहर अभियंता यांनी देखील सांगितलेले आहे. रंगकाम हॉलचा जीना लॅडीग विदयूतीकरण खिडक्यांच्या काचा,

दुकानाचे छताचे वॉटर प्रफुींग, रेन वॉटरपाईप दरवाजाचे रंगकाम इत्यादी विकास कामे तळघरात भाजीमंडई बांधली. विकास कार्य नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय होत नाही. नियमीत करता येईल का शपथपत्र नकाशा सहीत न्यायालयात दाखल केलेले आहे. बांधकामाबाबत करारनाम्याप्रमाणे अभ्यास करुन विधी सल्लागार यांनी अभिप्राय दयावेत. १ एप्रिल पुर्वी अंतीम करावे अशा सूचना १६ मार्चला दिलेल्या आहेत. सहा. संचालक नगररचना यांनी पुढील कार्यवाही बद्दल माहिती सांगावी.

**उपअभियंता (न. र. ) :** सहा. संचालक नगररचना हा मुंबईला गेलेले आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** दुरुस्त्या किरकोळ स्वरुपाच्या आहेत. चार वर्षे वाया गेली. कमीत कमी दीड लाख रुपये उत्पन्न आले असते. सहाय्यक संचालक नगररचना यांनी पुढील सभेत माहिती दयावी.

**मा. आयुक्त** : बैठक झाली पत्रही दिले भाजी मंडई वापरात नसावे असे मी म्हटले होते. न्यायालयात शपथपत्र दिलेले आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** आपल्या सुपरव्हिजनखाली काम झालेले आहे. जे कोणी दोषी असतील त्यावर कार्यवाही झालेली नाही. आपली मालमत्ता किती दिवस पडून राहणार आहे.

**उपअभियंता (न.र.) :** २२ दुकाने व हॉल याबद्दल माहिती दिलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** भोगवटा प्रमाणपत्र देता येणार नाही. झालेल्या बांधकामात भाजी मंडईचा वापर दयेय आहे का, भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर चालू झालेला आहे.

**मा. सभापती** : नियमानुसार व रितसर कार्यवाही करुन दुकाने ताब्यात घ्यावीत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास या योजनेअंतर्गत किती विकासांना परवानगी देण्यात आलेली आहे. किती प्रकरणात २५% मालमत्ता ताब्यात घेतली. त्याचा वापर सुरु केला आहे का व सद्य:स्थिती काय आहे? अशी प्रकरणे अत्यंत कमी आहेत. नगररचना विभागाच्या स्टाफला संपूर्ण माहीती आहे. जय टॉवर्समध्ये लोकांनी जाहीरातीचे दुकान घेतले. अशा प्रकरणात भ्रष्टाचार झाल्याची शंका येते. काही बिल्डर्सला पाच-दहा रुपयांच्या बाँडवर परवानगी दिलेला आहे ते लोक सुविधा देत नाही. मग जनता लोकप्रतिनिधीकडे येतात व आपण विकास कामे करायला लावतो. २५% मिळकतीचे हस्तांतरण झालेच पाहीजे. मा. आयुक्तांचे सहकार्य आहे. परंतू सर्व अहवाल घेण्यात यावा.

**मा. सभापती** : समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास अंतर्गत किती परवानगी देण्यात आल्या. मनपाचा वाटा ताब्यात घेतला का, सविस्तर अहवाल देण्यात यावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मनपाने एका वेळी विकास परवानगी मंजूर केल्यानंतर स्थगिती देण्याचा कोणाला अधिकार आहे? दिवसात अंतर्गत विकासाची परवानगी व स्थगिती दिली. हा अधिकार मा. आयुक्तांना की सहाय्यक संचालक नगररचना यांना आहे? समुचित आरक्षणाच्या माध्यमातून विकास प्रकरणांची सविस्तर माहीती मा. आयुक्त देतील.

**मा. आयुक्त** : शासनाचा १९९४ चा जी. आर. आहे. याप्रमाणे किती परवानगी देण्यात आलेल्या आहेत. याची माहिती सहा. संचालक नगररचना यांनी द्यायची आहे. मी रुजू झाल्यापासून ४ प्रकरणे प्रलंबीत आहे.

**उप अभिंयता (न. र.) :** बन्सीलाल नगर मधील एक प्रकरण आहे. अशी एकूण पाच प्रकरणे आहेत.

**मा.आयुक्त** : नगर भुमापन क्र. १५३०४/२० यास दिनांक २९-०९-९७ ला विकास परवानगी दिलेली आहे. शहर अभियंता यांनी दि. १७-०४-२००२ ला स्पेसिफिकेशन प्रमाणे काम झालेले आहे. असा अहवाल दिलेला आहे. त्याप्रमाणे ७ दुकाने व हॉल आज महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. दुकाने लिलाव करण्याची प्रक्रिया त्वरीत सुरु करण्यात येईल. विभागीय अधिकारी वि. क्र. ४ चे कार्यालयाचा वापर सुरु करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर मिळकतीवर महानगरपालिकेचे नांव लावण्याची कार्यवाही करण्याची देखील सूचना करण्यात आलेली आहे व सहा. संचालक नगररचना यांनी भोगवटा प्रमाणपत्र देण्यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत देखील सूचना देण्यात आलेल्या असून, दि. १७-०४-२००२ ला महानगरपालिकेला हस्तांतरण झालेले आहे.

**मालमत्ता अधिकारी :** लिलावाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. भाडे समितीवर ठेवून कार्यवाही सुरु केली आहे.

**मा. सभापती** : जाहीर लिलाव पध्दतीने तात्काळ ८ दिवसांमध्ये कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. ४ मिळकतींना आपले नांव लागले आहे काय, आखिव पत्रिका व ७/१२ वर आपले नाव लावण्यात यावे. नोंदणीकृत दस्तऐवज करुन घेण्यात यावे. मालमत्ता अधिकारी यांनी मालखरे यांचे भोगवटा प्रमाणपत्र स. स. न. र. यांचेकडुन तपासून घ्यावे. विधी सल्लागार यांचा सल्ला घेवून कार्यवाही करावी. आठ दिवसांत जाहीर लिलाव घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. संजय शिरसाठ :** नगर भूमापन कार्यालयात नामांतरासाठी किमान १५ दिवस लागतात.

**मा. सभापती** : १५ दिवसांत कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती** : एकदा नांव लावल्यानंतर प्रशासन काळजी घेईल.

**श्री. सोपान पारे :** आपल्या शहरात छोटे मोठे रंगमंदिर किती आहेत? तापडीया रंग मंदीरास सील लावण्यात आले आहे काय? त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे काय?

**मा. सभापती** : पुढच्या बैठकीत माहिती देण्यात यावी.

**मा. आयुक्त** : सहा. संचालक नगर रचना यांचेकडून टिप्पणी वितरीत झालेली आहे. विधी सल्लागार व उपअभियंता यांना विनंती की, आपला विषय चालू असतांना आपण बोलावे ही आपली जबाबदार आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** प्रत्येक उत्तर मा. आयुक्त यांनीच द्यायला पाहीजे असे नाही. विभाग प्रमुखांनी पण जबबादारी आहे की, त्यांनी माहिती ठेवली पाहीजे.

**श्री. प्रल्हार निमंगावकर :** मागील दोन तीन सभेमध्ये मी नाथप्रांगण व इतर वसाहतींच्या बाबतीत जेथे १००% विकास खर्च भरलेले आहे. तेथे विकासाची कामे करण्याबाबत विचारणा केली होती. त्याबद्दल काय कार्यवाही झाली.

**मा. सभापती** : उदया अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा आहे. या संदर्भात मा. महापौरांकडे वेगळा प्रस्ताव दयावा. १००% विकास खर्च भरल्यानंतर सुविधा दिल्या नसतील तर सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवण्यात यावा.

मागील बैठकीत पाईप खरेदी निविदा बाबतीत २% अनामत घेवून ७ दिवसांत कार्यादेश देण्यात यावा. अशा सूचना देण्यात आल्या होत्या. या संबंधीचा अहवाल देण्यात यावा.

**कार्य. अभियंता (पा. पू.) :** मा. स्थायी समितीच्या मंजूरीनंतर २% अनामत रक्कम भरणेबाबत संबंधितास स्पीड पोस्ट व फॅक्सद्वारे पत्र पाठविलेले आहे. त्यांना मी स्वत: दोन वेळसे दुरध्वनी वरुन संपर्क साधला. त्यांना पत्र मिळाल्याची माहीती मिळाली. याबद्दल विचार चालू आहे. असे सांगण्यात आले. ७ दिवसांची मुदत उदयापर्यंत आहे. उदया भरले नाही. तर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती** : उदया २% रक्कम भरली नाही तर स्थायी समितीला माहीती देण्यात यावी.

**विषय क्र. १४ :**

दिनांक २९-०४-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती** : मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक २९-०४-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १५ :**

नगर भूमापन क्रमांक २५९१ मौ. खडकेश्वर मिलकॉर्नर या भुखंडावर बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दाखल झालेला असून, सदरील मिळकत ही विकास योजना नकाशानुसार गावठाण बाहेरील आहे. प्रचलित कार्य पध्दतीनुसार गावठाण क्षेत्राबाहेरील ज्या मिळकतधारकाने आतापर्यंत कधीही त्यांच्या मिळकतीसाठी विकास खर्च भरल्याचा पुरावा उपलब्ध होत नाही. अशा सर्व मिळकत धारकांकडून विकास खर्च भरुन घेण्यात येतो. परंतू सदरील प्रस्तावास रितसर छाननी करुन भूखंडधारकास विकास खर्च भरुन घेण्यात येतो. परंतू सदरील प्रस्तावात रितसर छाननी करुन भूखंडधारकास विकास खर्च भरण्याबाबत सुचना देण्यात आली असता, अर्जदाराने मा. आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे अपील करुन सदरील मिळकतीवर १९७१ पासून जुने बांधकाम असल्यामुळे ते पाडुन नवीन बांधकाम करावयाचे असल्याने विकास खर्च आकारण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

सदर प्रकरणात मा. आयुक्तांचे आदेशानुसार उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांचे मार्गदर्शन मागितले असता त्यांचेकडील पत्र जा. क्र./वि.नि.नि/विकास खर्च/उ. सं./औ/७४८ दि. ०६-०४-०४ अन्वये अभिप्राय प्राप्त झाले आहे ते खालील प्रमाणे.

" सदरच्या प्रकरणात जुनी इमारत पाडुन नविन इमारत बांधवयाचे प्रस्तावित आहे. तसेच विकास खर्च हा एकदाच खुल्या भुखंडावर बांधकाम करते वेळीच वसूल करावयाचा असल्यामुळे सदरचा पुनर्विकास करतांना घेणे योग्य होणार नाही. असे या कार्यालयाचे मत आहे. तथापी सदरचे बेंटरमेंट चार्जेस हे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाने अनुषंगाने घेण्यात येत असल्यामुळे याबाबत आपले स्तरावर सर्वकर्ष धोरण ठरवून निर्णय घेणे उचित होईल." असे उपसंचालक नगररचना यांनी कळविले आहे.

सदर प्रकरणात न. भू. क्र. २५९१ चा जो नगर भूमापन नकाशा सादर केलेला आहे. त्यानुसार १९७१ साली त्यावर बांधकाम अस्तित्वात असल्याचे दिसते.

अशा प्रकारे केवळ एकाच भूखंडाबाबत निर्णय घेण्याऐवजी याबद्दलचे सर्वसाधारण धोरण ठरविणे योग्य राहील.

मा. उपसंचालक नगररचना यांचे अभिप्राय लक्षात घेता ज्या भूखंडावर मूळ नगर भूमापन नकाशानुसार (१९७१ साली) बांधकाम अस्तित्वात होते. अशा तसेच ज्या भूखंड धारकांना यापूर्वी बांधकाम परवानगी दिलेली आहे. परंतू त्यांचेकडे आता पावती उपलब्ध होत नाही अशा भूखंड धारकांना त्यंचे भूखंड परिसरातील विकास कामे पूर्ण झालेली असतील तरच विकास खर्च वसुलीची सक्ती करणे योग्य वाटत नाही. त्यामूळे अशा भूखंड धारकांकडून विकास खर्च न आकारण्याचे धोरण निश्चित करणे योग्य होईल. त्यानुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**सौ. शाहीन जफर :** अशा किती प्रकरणामध्ये वसुली झालेली आहे?

**मा. सभापती :** काही प्रलंबीत आहे का?

**श्री. मधुकर सावंत :** मिळकत धारकाने तीन-चार मजले काढले तर मनपाचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यांना बरेच फायदे होणार आहे. शहरात अशा जुन्या ब-याच मिळकती आहेत. मनपाचे नुकसान होईल. उत्पन्नाचा विषय आहे. फेटाळण्यात यावे. एक मजला असेल तर, ठीक आहे.

**मा. सभापती :** विकास कामे झालीत व पुर्वी परवानगी दिलेली आहे. विकास खर्चाचा पूरावा उपलब्ध नाही असे प्रस्तावात नमूद केलेले आहे. शहरात अनेक १५०-२०० वर्षापूर्वीच्या इमारती आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** पहिली बांधकाम परवानगी उपलब्ध नाही व क्षेत्र देखील दाखविण्यात आलेले नाही.

**उपअभियंता (न.र.) :** सदरचा प्रस्ताव एकाच भूखंडासाठी आहे. परंतू अशा प्रकरणात सर्वसाधारण धोरण ठरविण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. सदर मिळकतीचे क्षेत्र ६२६.०० चौ. मी. आहे.

**मा. आयुक्त :** गावठाणात एक विशिष्ट इमारत ७० वर्षापूर्वी बांधलेली आहे ते तोडून पुनर्बांधणी करणार. या संदर्भात धोरण ठरविणे आवश्यक आहे. संचालक नगररचना यांचेकडून माहिती घेण्यात आलेली आहे. स्थायीसमितीमध्ये चर्चा होवून जे धोरण ठरविण्यात येईल ते सर्वसाधारण सभेपुढे सादर करावे लागेल. गुणवत्तेवर चर्चा होवून निर्णय व्हावा. अंतिम निर्णय सर्वसाधारण सभेत होईल.

**श्री. संजय शिरसाठ :** पैसे वसूल करायचे किंवा नाही ही बाब या बैठकीपुरती स्थगित ठेवावी. प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**मा. सभापती :** पुढच्या बैठकीत सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवून पुढील बैठकीत सविस्तर माहीतीसह ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १६ :**

संचालक, प्राणी संग्राहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००४-२००५ या एका वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका प्राणी संग्राहालयातील प्राण्यांकरीता बीफ खन्नी खरेदी करणे करीता निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे एकच निविदा प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | भाव प्रति किलो |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल हमीद | रु. २२.०० |
| | शेख हनीफ | |

वरील निविदा धारकाने मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर वरील प्राप्त दर की करुन रु. १७/- प्रति किलो प्रमाणे पुरवठा करण्यास होकार दिलेला आहे.

एकच निविदा प्राप्त असली तरी, सदर दर हे बाजार भावाने तुलनेत अत्यंत कमी आहेत. त्यामूळे श्री. अब्दुल हमीद शे. हनीफ यांनी दिले. रु. १७.०० प्र. किलो दर सन २००४-०५ (दि. ०१-०५-०४ ते ३१-०३-०५) या कालावधीसाठी मान्यता देण्यास्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** किती खरेदी करणार आहोत? डॉ. रझवी विभाग प्रमुख हजर नाहीत. येणाऱ्या स्थायी समिती पर्यंत खरेदीची परवानगी द्यावी व हा विषय पुढील स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यात यावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एकच निविदा प्राप्त झाली. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रातून निविदेबाबत माहिती प्रसिध्द झाली. स्पर्धा झालेली नाही. म्हणून उशीर झाला. निविदा रद्द करण्यात यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** डॉ. रझवी १५ दिवस रजेवर गेलेले आहेत.

**मा. सभापती** : सदर प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे व पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवून पूढील बैठकीत ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबादच्या अस्थापनेवर कर निर्धारक व संकलक हे वर्ग-१ दर्जाचे पद भरण्यात आले आहे. त्यांना वाहन अनुज्ञेय आहे.

मुख्य लेखा परीक्षकडे पण वर्ग-१ दर्जाचे अधिकारी आहे त्यांना ही वाहन अनुज्ञये आहे. सद्य:स्थिती अंतर्गत व्यवस्था करुन कर निर्धारक यांना वाहन दिले आहे. तर मुख्य लेखा परिक्षक पद रिक्त असल्यामुळे त्यांना वाहन दिलेले नाही.

नविन पद भरले गेले असल्यास अथवा निर्माण केले असल्यास त्या पदास वाहन अनुज्ञेयता असल्यास वाहन खरेदी करण्यास अडचण नाही. त्यादृष्टीने दोन वाहने खरेदी करावयास घसारा निधीतून तरतूद वापरता येईल. मा. आयुक्त यांनी स्थायी समितीस मंजूरीबाबत शिफारस केली आहे. वाहने खरेदी केल्यानंतर कोणती वाहने कोणास वापरावयास द्यावयाची ही प्रशासकीय बाब आहे. त्या प्रमाणे निर्णय घेवून वितरीत करता येतील.

नवीन कार खरेदी करण्यासाठी खालील प्रमाणे दर पत्रके अधिकृत विक्रेत्यांकडून गोळा करण्यात आली.

| **१.** | **मे. धूत मोटर्स औरंगाबाद (हुंडई कारचे अधिकृत विक्रेते)** | |
|---|---|---|
| अ) | हुंडाई ॲक्सेन्ट कार जी. एल. एस. मॉडेल जकात करासह/इन्शुरन्स वगळून (पेट्रोल कार) | रु. ६,२७,९६४/- |
| ब) | हुंडाई ॲक्सेल जी. व्ही. एस. जकात करासह इन्शुरन्स वगळून (पेट्रोल कार) | रु. ५,८६,५५१/- |
| २. | मे. सानिया मोटर्स, औरंगाबाद | |
| १. | हुंडाई एक्सेल जी. एल. एस. (पेट्रोल) | रु. ६,२७,९६४/- |
| २. | इंडीगो जी.एल. एक्स (पेट्रोल) | रु.४,६४,७८८/- |

प्रत्येकी एक खरेदी करण्याचे प्रस्तावित केले आहे.

तरी वरील प्रमाणे एकुण दोन कारच्या खरेदीस मंजूरी मिळावी. कारच्या किमती या डिलेव्हर घेतांना कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे अदाई करावी लागेल.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : इंडीगो जी. एल. एक्स (पेट्रोल) ही दोन वाहने खरेदी करावीत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अतिरिक्त शहर अभियंता यांनी शिफारस केल्यापैकी इंडिगो जी. एल. एक्स (पेट्रोल) प्रत्येकी रु. ४,६४,७७८/- या किमतीची दोनवाहने (कार) मे. सानिया मोटर्स, औरंगाबाद यांचेकडून प्रस्तावात दर्शविलेल्या बाबीस अधिन राहून खरेदी करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २७-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक २७-०५-२००४ रोजी मा.सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी १२.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २) | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३) | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मणराव | -//- |
| ४) | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ५) | स. स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | -//- |
| ६) | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ७) | स. स. श्री. प्रल्हाद निमगांवकर | -//- |
| ८) | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| ९) | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| १०) | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| ११) | स. स. श्री. शेख मुनाफ शेख यासीन | -//- |
| १२) | स. स. श्री. सलिम स. युसूफ | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : सुरुवातीला चर्चा घेण्यात येईल. उस्मानपूरा वॉर्डाची पोटनिवडणूक असल्यामूळे त्या ठिकाणी आचारसंहिता अंमलात आहे. त्या वॉर्डातील कामाबाबत चर्चा करता येणार नाही. कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या आठ दिवसांपासून सारख्या बैठका होत आहेत व त्यात बरीच चर्चा होत आहे. नुसती चर्चा करुन काही साध्य होत नसेल तर चर्चा कशासाठी करायची? कदाचीत असे सर्वांनाच वाटत असेल. सर्व ठिकाणी शिक्षणास महत्व आहे. आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातून जे शिक्षण देण्यात येते त्या शाळांचा दर्जा व गुणवत्त खालावलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** कॉंग्रेसचे जेष्ठ नेते स्व. एस. टी. प्रधान यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाठ यांनी सूचना केल्याप्रमाणे सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(यावेळी सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

शिक्षणाचा दर्जा ६०% व ५०%, ४०% दाखविला. बीड जिल्ह्याचे पाहणी पथक मनपाच्या शाळांची पाहणी करण्याकरीता आले होते. २० ते २५% शाळांना गुणवत्ता नाही. ते काळया यादीत टाकण्यात आले. शिक्षण विभागाकडून अशा प्रकारची पाहणी झाल्याबद्दल वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झाले

होते. या संदर्भात अशी पाहणी झालेली आहे काय व त्याचा काय अहवाल झालेला आहे काय? व त्याचा काय अहवाल झालेला आहे. याची माहीती देण्यात यावी.

**मा. सभापती** : स. स. श्री. कोकाटे यांनी चिंता व्यक्त केली. बिड जिल्हाचे पाहणी पथक आले असेल तर त्यानी अहवाल दिलेलाच असेल. तर याबद्दल सविस्तर खुलासा करण्यात यावा. त्यात त्यांनी गुणवता काय नमूद केली. २० ते २५% गुणवत्ता नमूद केली आहे का? शिक्षणाधिकारी यांनी खुलसा करावा.

**शिक्षणाधिकारी** : बीड जिल्हातील पथक प्राथमिक शिक्षण गुणवत्ता तपासणीसाठी मार्च महिन्यामध्ये आले होते. २७ शाळांची तपासणी करण्यात आली. तपासणी अहवाल मा. विभागीय आयुक्त ह्यांचेकडून अदयाप आपणास प्राप्त झालेली नाही. मी देखील पेपरलाच वाचलेले आहे. २० ते २४ टक्के गुणवत्ता कमी झाली म्हणून त्यामध्ये जिल्हा परिषद व मनपाच्या शाळांचा उल्लेख होता. जेंव्हा अहवाल प्राप्त होईल त्यावेळी माहीती देण्यात येईल. त्यांच्यासाठी सोबत माहीतीसाठी एका मुख्याध्यापाकांना देण्यात आले होते. बीडचे जे पथक आले होते. त्यामध्ये त्यांचेकडील उपशिक्षणाधिकारी देखील सोबत होते.

**मा. सभापती** : अहवाल तात्काळ मागवून घ्यावा व सभागृहापुढे ठेवण्यात यावा.

**श्री. सजय शिरसाठ** : मा. आयुक्तांनी यापुर्वी बोलले होते व या संदर्भात स्टेटमेंटही केले होते. त्यांनी स्वतः आढावा घेतला आहे व दर्जा खालावल्याचे कबूल केले. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे का, असल्यास खुलासा करावा.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी खुलासा केला होता व आदेशही दिले होते. ज्या शाळांवर शिक्षक नाहीत. पाहणी करुन अहवाल देण्यात यावा. शाळांची गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

**शिक्षणाधिकारी** : गुणवत्ता विकास उद्दीष्ट पूर्ण करणे गरजेचे आहे. परंतू मतदार यादयांचे काम चालू असल्यामुळे १०० ते १५० शिक्षण मतदार यादयांच्या कामासाठी गेले. शिक्षकांची कमतरता होती. त्यांना परस्पर आदेश दिले जातात.

**मा. सभापती** : तरी १००% निकाल असतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे** : आताच शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला शिक्षक कर्मचाऱ्यांना परस्पर आदेश दिले जातात. शिक्षणाधिकाऱ्यांना माहिती दिली जात नाही. याचा अर्थ प्रशासनाचा काहीही वचक राहीलेला नाही. कोणत्याही शिक्षकांची नियुक्ती होतांना शिक्षणाधिकाऱ्यांचे मान्यतेने होणे आवश्यक आहे. विद्यार्थी गुणवत्तेत येत नाही. शिक्षक डी. एड, बी. एड पदवीधर नाही का? का गुणवत्ता येत नाही. अशीच परिस्थिती कायम राहीली तर शाळा बंद कराव्या. उदयाच कुलूप लावण्यात यावे असे माझे मत आहे.

**मा. सभापती** : महापालिकेच्या शाळेत गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात. या सभागृहात अहवाल प्राप्त झालेला आहे. तो कसा आला. कोठून आला तो प्रश्न नाही. शिक्षक कमी असतात. शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. पाहणी अहवालात गुणवत्ता व शाळेचा दर्जा खालावलेला आहे असे का होते?

**शिक्षणाधिकारी** : शिक्षकांना मतदार यादया तयार करण्याचे काम दिले जाते. त्यामुळे अध्यापनात खंड पडतो.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जो खुलासा केला तो अत्यंत चुकीचा झालेला आहे. समाधानकारक नाही. मी जो मुद्दा मांडला त्याबद्दलचा खुलासा केलेला नाही. शिक्षण हा जीवनाचा पाया असतांना व शिक्षण विभागातर्फे महानगरपालिकेच्यावतीने ज्या ८३ शाळा चालविल्या जातात. त्यापैकी ७०% शाळांच्या इमारती ह्या मनपाच्या मालकीच्या आहेत. त्या शाळांमध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत. शिक्षक वर्ग आवश्यक तेवढे दिलेले आहे. असे असतांना शिक्षणाधिकारी जर शाळेचा दर्जा उंचावू शकत नसतील तर माझे असे मत आहे की, जे डेप्युटेशनवर अधिकारी येतात. त्यांचा कोणत्याही प्रकारचा अंकुश या विभागाच्या कर्मचाऱ्यांवर राहात नाही हे स्पष्ट होते. डेप्युटेशनवर येणार अधिकारी यांना दिलेला कालावधी कसा लवकरात लवकर जाईल व कोठेतरी चांगल्या पदावर नियुक्ती झाल्यास माझी जबाबदारी संपेल या अपेक्षेने ते काम करतात. जबाबदारीने काम करीत नाही. शिक्षण विभागावर प्रशासनाचा अंकुश असणे अत्यंत गरजेचे आहे. आताच खुलासा केला दोन वर्षापासून मतदार यादया तयार करण्याचे काम चालू आहे. याचा अर्थ शिक्षणा दुर्लक्ष करणे नाही मतदार यादया तयार करण्याचे काम सर्व जिल्हा परिषद शिक्षक व महाराष्ट्रतल्या सर्व महापालिकेतील शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग करीत आहे. चुकीचे उत्तर देवून बेजबाबदारपणाची उत्तरे देतात. माझ्या माहीतीप्रमाणे १ ते २ शिक्षक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेल्या अनेक वर्षापासून आहेत. त्या शिक्षकांची नांवे सुध्दा शिक्षणाधिकारी यांना माहित आहे. त्यांनी खुलासा करावा. मा. आयुक्तांनी शाळेच्या बाबतीत पाहणी केली. गुणवत्तेचा अहवाल तयार केला त्यामध्ये सुध्दा व ५५ ते ६५% च शाळांची गुणवत्ता आहे. शासनाच्या वतीने बीड जिल्हाचे पथक आलेले होते. त्यांनी २० ते २४% शाळेची दर्जा व गुणवत्ता असल्याचा अहवाल दिला. काळया यादीत या मनपाचे नांव जात असेल तर, यासारखे दुर्देव नाही. शाळेचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने ठोस असा निर्णय घेण्यात यावा.

**सौ. शाहीन जफर :** प्रत्येक बैठकीला शिक्षण विभागासंदर्भात चर्चा होते. निर्णय होतात. त्या निर्णयाची अंमलबजावणी येत नाही. यापुर्वी मी शाळेला भेट दिलेली होती. एकाच कुटुंबातील चार-चार लोक एकाच शाळेवर सेवा करीत असल्याचे दिसून आले. आरेफ कॉलनीच्या शाळेत उर्दू बालवाडीसाठी मराठी माध्यमाचे शिक्षक दिलेले आहेत. ते मुलांना शिकवू शकतात का? बऱ्याच शाळांची पाहणी केली परंतू शाळेत मुलांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था नाही. एक प्लास्टीक बकेट व एक ग्लास असतो. सर्वच वर्गातील मुले-मुली त्या एकाच ग्लासने पाणी पितात. अशी परिस्थिती का निर्माण होते. तिसरा मुद्दा असा की, खिचडी तयार करण्यात येते. त्यामध्ये तीन तासा वाया जातात. मुलांना त्यांचे घरुन ताट-ग्लास आणावयास सांगितले जाते. असे नियमीत होत राहील्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण होणार कसे असा प्रश्न निर्माण होतो. शिक्षणाधिकारी शाळेला प्रत्यक्ष भेट देत नाही. विद्यार्थ्यांना खिचडी वाटप केल्या नंतर विद्यार्थी कोठे जातात. शिक्षक कोठे असतात. काही घरी जातात. शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही. सब्जी मंडई येथील शाळेच्या बाबतीत बोलू इच्छितो. या शाळेवर मुख्याध्यापक आहेत. शिक्षक आहेत. प्रार्थनेच्या वेळी गैरहजर असतात. माहीती घेतल्यास

रस्त्याने ट्राफिक होती. अमुक अमूक कारणे दाखविली जातात. ही जबाबदारी शिक्षणाधिकारी यांनी घ्यावयाची आहे. प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना सक्त सूचना दिल्या पाहीजेत की, सर्व शिक्षक वेळेवर यावे. मुलांना वेळ वाया जाणार नाही. एक तास वाया जातो. दोन तास खिचडीसाठी एक मधली सुटी चार वाजतात त्यानंतर पाच वाजेला शाळा सुटते. अशा पध्दतीने शिक्षणाचे कामकाज चालत असेल तर, कोणत्याही प्रकारची गुणवत्ता व शाळेचा दर्जा वाढेल असे मला वाटत एकाच कुटूंबातील चार लोक नोकरी करतात. लहान मूले रडतात. मी आता घरुन येते. शिक्षण घेणारी मुले बसून राहतात. कोणतेही अध्यापन करुन घेतले जात नाही. महापालिका शिक्षकांना वेतन देते वाटेल तेव्हा घरी जाणे कामानिमित्त बाहेर जाणे. यावर शिक्षणअधिकाऱ्यांचा अंकुश असणे आवश्यक आहे. यात गरीब मुलांचे नुकसान होते. त्याप्रमाणे शाळेतील मुलांना पुस्तके दिली जातात. काही मुलांना दोन तर काहींना तीन पुस्तके मिळतात. नियमानुसार जे दिले जातील ते सर्वांना सारखे देण्यात यावे. या संदर्भात शिक्षणाधिकारी यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. शाळेवर भेटी देणे गरजेचे आहे. शिक्षण सभापतींची निवडणूक होते. यापूर्वी स. सदस्य श्री. लकडे व त्यापूर्वी श्री. तांबे सभापती होते. शिक्षण विभागाच्या संदर्भात बैठक घेवून पाहणी करण्याची मागणी केली असतांना माझ्याकडे वाहन नाही असे म्हटले गेले. यानंतर जे ही सभापती निवडले जातील त्यांना गाडी दिली तर शाळेवर भेटी होणार आहेत का? असे असेल तर विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. शाळेवर भेटी देण्यासंदर्भात शिक्षणाधिकारी यांना सुध्दा सूचना केल्या होत्या. पती पत्नी दोघेही सेवेत असल्यास घरभाडे दोघांनाही मिळेल का? खुलासा करण्यात यावा. काही शिक्षक शाळेत येवून हजेरी लावतात. घरी निघून जातात पती पत्नी दोघही सेवेत कार्यरत असल्यास व दोघेही एकाच घरात राहतात. अशा दोन्ही कर्मचाऱ्यांना या महानगरपालिकेत घरभाडे दिले जाते. याचा पुरावा प्रशासनाकडे नसेल तर, माझ्याकडे आहे. काही शिक्षक शाळेतच येत नाही. हे पाहण्याची सर्व जबाबदारी शिक्षणाधिकाऱ्यांची आहे. नगरसेवकांची जबाबदारी नाही. शिक्षणाधिकाऱ्यांनी नियमीत शाळेला भेटी दिल्या तर शिक्षकांवर वचक राहील व शाळेत वेळेवर येतील. अध्यापनाचे तास होतील. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. काही शिक्षक दोन दोन तास शाळेत उशीरा येतात. त्यांची नांवे सुध्दा शिक्षणाधिकाऱ्यांकडे आहेत. असे माझे मत आहे. नियमाने कार्यवाही झालीच पाहीजे. यात शंका नाही. लहान मुले सकाळीच थंडीच्या दिवसात शाळेत वेळेवर येवू शकत नाही. म्हणून इयत्ता १ ली ४ थी त्या विदयार्थ्यांसाठी सकाळ ऐवजी दुपारची शाळा करण्यात यावी. व ५ वी ते ७ वी वर्गातील विदयार्थ्यांसाठी सकाळी शाळा करावी म्हणून मी मुद्दा उपस्थित केलेला होता. त्यानुसार शाळेच्या वेळा बदलल्या. काही शिक्षक व त्यांचे कुटूंबातील लोकांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे येऊन माझ्याविषयी तक्रार केली की, एका सदस्यांनी शाळेची वेळ बदलण्यास भाग पाडले. व माझी पत्नी माझी बहीण, माझा भाऊ सकाळी उठू शकत नाही. शाळेत येऊ शकणार नाही. अशा शिक्षकांबद्दल शिक्षणाधिकाऱ्यांनी काय ॲक्शन घेतलेली आहे. तसेच शिक्षणाधिकारी यांना दोन वर्षापूर्वी पत्र दिले. एकाच घरातील चार बहीणी एकाच शाळेत काम

करतात. एकाच कुटूंबातील चार लोक एकाच शाळेत असणे कितपत योग्य आहे. खुलासा करावा.

**मा. सभापती** : स. सदस्या सौ. शाहीन जफर यांनी पोटतिडकीने शिक्षणविभागाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले आहे. त्याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**श्री. शे. मुनाफ शे. यासीन :** शिक्षण विभागावर लाखो रुपये खर्च घेतात. विदयार्थ्यांना अनेक सवलती दिल्या जातात. ड्रेस पुस्तके दिली जातात. परंतू महानगरपालिकेच्या शाळेत २०० ते २५० विदयार्थ्यांपेक्षा जास्त संख्या नसते. इतर खाजगी शाळांचा विचार केला तर देणगी देवून प्रवेशासाठी नंबर लावावे लागतात. अशी स्थिती आहे. मनपाच्या शाळांचा दर्जा व विदयार्थ्यांची संख्या वाढविण्याचे दृश्टीने प्रयत्न करण्याची अवश्यकता आहे. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. नसता हजारो विदयार्थ्यांचे भविष्य खराब होत आहे. अधिकारी एक दोन शाळेवर भेट देतात. परंतू काही शाळेत शिक्षक, मुख्याध्यापक गैरहजर असतात. एक दोन शिक्षक उपस्थित असल्यास मुलांना सुटी देवून टाकतात. शिक्षकही घरी निघून जातात. शिक्षणाधिकाऱ्यांचा शाळेचा शिक्षकांवर अंकूश नाही.

**मा. सभापती** : स. सदस्या सौ. शाहीन जफर यांनी जे पत्र दिले होते त्याची चौकशी केलेली आहे का एकाच शाळेतील चार शिक्षक एकाच कुटूंबातील आहेत का? खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** दोन शिक्षक एकाच कुटूंबातील एका शाळेवर आहेत. घरभाडे देता येते किंवा काय याबाबत माहीती सध्या माझ्याकडे नाही.

**मा. सभापती** : ठीक आहे. पती-पत्नी दोघे सेवेत असतील तर घरभाडे दोंघाना देते येते का याबाबतची माहीती पुढील बैठकीत सादर करावी. दोन-तास खिचडी शिजवण्याकरीता व वाटप करण्यास लागत असतील तर बरोबर नाही. तसेच शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. एकच ग्लास, एकच माठ, तोही फुटलेला तसेच शाळेला शिक्षणाधिकाऱ्यांनी भेटी देणे आवश्यक आहे माझ्याकडे वाहन नाही हे कारण होवू शकत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** आजची सभा निर्णयाची सभा म्हणून महत्वाचा प्रश्न मांडायचा प्रयत्न करतो. मागच्या वेळी आयुक्त डी. एन. वैदय असतांना तांत्रिक कक्ष कसा उघडण्यात आला. तो त्यांनी कसा उघडला का, उघडला. या महापालिकेत १७-१८ आयुक्त होवून गेले. तांत्रिक कक्ष तसाच चालू आहे. कामाचा बोजा आहे. मान्य आहे. कामाची विभागणी करायची म्हटले तर ती वेगळया पध्दतीने केली पाहीजे. त्याबद्दल दुमत नाही. तांत्रिक कक्षात उप अभियंताची नियुक्ती केली व चार कनिष्ठ अभियंता देण्यात आले. इतर कर्मचारीही दिले. अनेक विभाग आहे तेथे गरज आहे. तेथे खर्च करीत नाही. या विभागावर महिन्याकाठी सर्वात जास्त खर्च होतो. सदर कक्षाची कामाची पध्दत विचित्र आहे. कामाचे टेंडर निघते. अंतीम टप्प्यात असते. कार्यकारी अभियंताची संचिका तांत्रिक कक्षातील उपअभियंता पाहतात. उपअभियंता त्यावर रिमार्क्स लिहीतात की, पुर्तता करण्यात यावी, ही पध्दत चुकीची आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी उणिवा काढणे व कार्यकारी अभियंतावर कार्यवाही झाली पाहीजे. आपल्याकडे थर्ड पार्टी इन्सपेक्शन नेमण्यात आलेले आहे. हा विभाग कशासाठी निर्माण केला हा महत्वाचा प्रश्न आहे उप अभियंताना कार कोणत्याही अधिकारात देण्यात आली? पाणीपुरवठा विभागातील उप

अभियंता यांनी वारंवार गाडीची मागणी केली. त्यांना वाहन देण्यत आले नाही. ते आपल्या मोटार सायकलवर जायकवाडीचा प्रवास करतात. तांत्रिक कक्षाला चार इंजिनियर देण्यात आलेले आहेत. वाहनावर १०-१२ हजार रुपयांचा खर्च होतो. ८/९ हजार इंधनावर ५-६ हजार वाहन चालकावर हा सर्व खर्च आपण का करतो? कार्यकारी अभियंता चुकत असेल तर वरीष्ठांनी कार्यवाही करावी हे अपेक्षीत आहे. परंतू उपअभियंतानी रिमार्क्स काढणे कितपत योग्य आहे? अनावश्यक खर्च होत आहे. त्यास स्थायी समिती व सर्वसाधारण सभेची मान्यता नाही. एका आयुक्तांने त्यांच्या मुडप्रमाणे विभाग निर्माण केला तो आजपर्यंत चालतो हे अत्यंत चुकीचे अहे. त्यांचे पेमेंट काढण्यत येते. त्यावरील सुविधांचा खर्च कशा आधारे होतो. त्यास स्थायी समितीची मान्यता नाही. संबंधितांनी खुलासा करावा किंवा आजपासून बंद करण्याचे आदेश दयावेत.

**मा. सभापती** : उपआयुक्त (प्र.) यांनी खुलासा करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** याची गरज आहे का, असेल तर का? त्याच्यावर होणारा खर्च, याचे उत्तर देता येत असेल तर, द्यावे नसता आजपासून हा टेक्निकल सेल डिमॉलिश करावा.

**मा. सभापती** : उपआयुक्त (प्र.) यांनी स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** मा. आयुक्त यांनी त्यांच्या कामांचा एकदंर बोजा लक्षात घेता सर्व विभागावर कामाची छाननी अधिनियमाच्या कलम ६९ प्रमाणे प्रत्येक विभागाला काम वाटून दिले आहे. कोणत्या विभागाने काय काम करावे. कोणाकडून काय काम करुन घ्यावे. याप्रमाणे आदेश पारीत केले आहे. मा. आयुक्त कायदयानुसार (आय. ए. एस.) दर्जाचे अधिकारी असून, त्यांना सर्व बाबतीत त्या त्या क्षेत्रामध्ये तांत्रिक मदत व सविस्तर माहीती असावी. गाईड लाईन असावी म्हणून टिप्पणी सादर करण्याकरीता (Putting authority) म्हणून वेगवेगळे अधिकारी नियुक्त केले जातात. म्हणून मा. आयुक्तांनी टेक्निकल असिस्टंट हे पद त्यांचे अखत्यारीमध्ये त्यांना (Putting authority) म्हणून नियुक्त केले आहे. जसे आयुक्तांना उप आयुक्त किंवा उपआयुक्तांना सहाय्यक आयुक्त त्याप्रमाणे एखादी संचिका आली तर त्याची छाननी करुन ती संचिका मा. आयुक्त मागवून घेतात त्याच पध्दतीने तांत्रिक कक्षाचे काम आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** आम्हाला हे सर्व कळत नाही असा आपला समज असेल तर, कृपया आपणांस उत्तर देता येत नसेल तर देवू नये. आपण मा. आयुक्तांना उत्तर दयायला सांगावे आयुक्त हे आय. ए. एस. किंवा इतर कोणत्या दर्जाचे असतात याबाबत काही देणे घेणे नाही. मुळ प्रश्न विभाग रचनेचा आहे. नियमानुसार रचना योग्य आहे. तांत्रिक कक्ष निर्माण करतांना स्थायी समितीची व सर्वसाधारण सभेची मान्यता आहे काय? खर्च कशा आधारे करतो? एक उपअभियंता कार्यकारी अभियंता त्यांच्या उणिवा काढीत आहे. त्यांना गाडीचे प्रयोजन आहे का?

**श्री. काशीनाथ कोकाटे :** सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाठ यांनी जो मुद्दा उपस्थित केला. या संदर्भात उपआयुक्त (प्र.) यांनी केलेला खुलासा तोटका व अपूर्व आहे. त्यांनी मत मांडलेले आहे. त्याप्रमाणे कलम ६९ नुसार मा. आयुक्तांना अधिकार आहेत. कोणाला काय काम द्यायचे कलम ६९ अन्वये जे अधिकार

आहेत. त्या अधिकारावर किंवा इतर कोणाच्या अधिकारावर आम्हाला काही उत्तर नाही. कलम ६९ चा उपयोग त्याप्रमाणे असेल तर, अंमलबजावणी होते का, तांत्रिक संदर्भात सांगायचे झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांना साह्या करण्यात येते. तांत्रिक छाननी अधिक्षक अभियंता स्तरावर असते. या ठिकाणी जी पध्दत आहे. कनिष्ठ अभियंता उप अभियंता कार्यकारी अभियंत्याला सांगतो. कोण हुशार समजावे की, कार्यकारी अभियंता हुशार समजावे की, उपअभियंता की, कनिष्ठ अभियंता, तांत्रिक म्हणजे संचिकेत ज्या त्र्युट्या राहील्या डी. एस. आर मध्ये चुकीचे झाले असेल रेट कमी जास्त घेतले असेल हे पाहण्याचा सर्व अधिकार दिलेला असतो. तो किमान त्या दर्जाचा अधिकाऱ्यांना असावा. या ठिकाणी मी खेद व्यक्त करतो. कार्यकारी अभियंता यांनी या संदर्भात साधी हरकत देखील घेतलेली नाही. दुर्देव आहे. त्यांचे अधिकारावर गदा आली आहे. उपआयुक्त यांनी केलेला खुलासा चुकीचा आहे. तांत्रिक कक्ष अधिकारी, कार्यकारी अभियंता किंवा अधिक्षक अभियंता दर्जाचा ठेवावा. पुस्तकाप्रमाणे कामकाज चालत नाही. मागे सर्वसाधारण सभेत सहाय्यक संचालक नगर रचना यांनी १ ते १० कलमे वाचली. त्याचा प्रत्यक्षात उपयोग होत नाही. स. सदस्य श्री. शिरसाठ यांनी विचारणा केलेली आहे. आय. ए. एस. आय. पी. एस. दर्जाचे अधिकारी देखील तांत्रिक असतात. अभियांत्रिक पदवीधर देखील आय. ए. एस. आय. पी. एस होतात. श्री. वैदय हे पदवीधर होते. येणारे आयुक्त बी. ई. असतील. परंपरा चालू आहे. खुलासा देण्यात यावा.

**श्री. संजय शिरसाठ :** स्थायी समितीची परवानगी घेतल्याशिवाय नविन विभाग उघडता येणार नाही. आपण केलेला खुलासा चुकीचा आहे. मागे झालेल्या चुका मान्य करु शकतो. आपणांस विनंती आहे की, आज पासून हा विभाग डिमॉलिश करण्यात यावा. प्रशासनास आदेश दयावेत.

**श्री. मधूकर सावंत :** आपणांस सभापती निवडलेले आहे. आपणांस अधिकार आहे. तो अधिकार वापरा व डिमॉलीश करा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** लोकप्रतिनिधी व प्रशासन मिळून महानगरपालिका चालवावयाची आहे.

**श्री संजय शिरसाठ :** सर्व निर्णय मा. आयुक्तांवर ठेवून त्यांना कैचित आणू नका. आपले अधिकार वापरावे व आजपासून डिमॉलिश करायची घोषणा करावी.

**मा. सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेवून मनपातील तांत्रिक कक्ष बंद करण्याचा निर्णय घेण्यात येतो.

**श्री. माणिक साळवे :** मा. उच्च न्यायलय, खंडपीठ औरंगाबाद यांनी महापालिकेस पार्कींगच्या जागेवर आलेले अतिक्रमण काढून त्या जागा रिक्त कराव्या असे आदेश केलेले हेते. जेणे करुन पार्कींगच्या व्यवस्था होईल व रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. परंतू मागील वर्षी नगररचना विभाग तसेच प्रशासकीय अधिकारी विभागामार्फत कार्यवाही झालेली होती. परंतू गेल्या सहा ते सात महिन्या पासून ती कार्यवाही बंद आहे. मा. न्यायालयाचे तसे आदेश आहेत का, नसतील तर का काढण्यात येत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** दैनिक सामना या वृत्तपत्रात चौकट छापून आली. महानगरपालिकेचे कर्मचारी थंड पडले. उपआयुक्त (म) यांचे स्टेटमेंट आहे. त्याचे दूरगामी

परिणाम होतात. त्यांना अडचणी येत असतील. स्टाफ ऐकत नसावे त्याबाबत त्यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पार्कींगच्या जागेवरील अतिक्रमणाच्या कार्यवाही बाबतची माहीती होण्यासाठी वर्तमानपत्राचे प्रतिनिधी माझ्याकडे आलेले होते. कोणतीही सविस्तर चर्चा झालेली नव्हती. याबाबतची प्रगती कशा प्रकारे चालू आहे. एवढे एकच वाक्य त्यांनी विचारलेले होते. त्यावर मी असे म्हटले की, वेळोवेळी न्यायालयात अहवाल सादर करतो आहे. काम स्लो चालू आहे. हा इंग्रजी शब्द प्रयोग आहे. त्यांनी तो मराठीत टाकलेला आहे याव्यतिरिक्त कोणतेही संभाषण माझे त्या वार्ताहरांशी झालेले नाही. यापूर्वी वार्ताहरांना सांगितलेले होते की, मला पत्रकार परिषद होण्याचे अधिकार नाही. मी स्पोक्समन नाही. ही बातमी पत्रकारांनी दिलेली दिसून येते. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे सह संचालक नगररचना यांचे त्यात काही फेरफार असेल त्या संचिका प्रशासकीय विभागाकडे पाठविण्यात येतात. त्यानुसार प्रशासकीय विभाग पाहणी करुन फेरफार आलेले असल्यास मालकांना नोटीस देवून कार्यवाही करतात. चार पथक तयार केले व चार उप अभियंता नेमले. आतापर्यंत १७४ संचिका नगररचना विभागाकडून प्रशासकीय विभागाकडे दिलेल्या आहेत. जवळपास ४० प्रकरणे प्रलंबीत आहेत. स. सदस्य म्हटल्याप्रमाणे कार्यवाही थोडी स्लो आहे. याबाबत माझ्या स्तरावर व मा. आयुक्तांच्या स्तरावरही बैठका झालेल्या आहेत. नगररचना विभागाकडून संचिकेची तपासणी होवून प्रशासकीय विभागाकडे जाण्याबाबतची गती वाढविणे आवश्यक आहे. याबाबत सहा. संचालक नगर रचना यांना प्रत्यक्ष तशा सूचना दिलेल्या आहेत. त्यांचे विभागाचे उपअभियंता व कर्मचारी यांचे बरोबर बैठकही घेतलेल्या आहेत. सहा. संचालक नगररचना तसेच माझ्या स्तरावर पुन्हा अशी प्रकरण निहाय वेगळी कार्यपध्दतीचा अवलंब करीत आहोत. निश्चित गती येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** मुख्य लेखा परीक्षक पद का भरण्यात आलेले नाही. १४ महिने झाले प्रशासनाने खुलासा करावा. सर्वसाधारण सभेचा ठराव झाला. कार्यवाही काय केली.

**उपआयुक्त (प्र.) :** मुख्य लेखा परीक्षक या पदावर शासनाने सक्षम अधिकारी प्रतिनियुक्तीवर दयावे. अशी शासनास विनंती केलेली आहे. शासनाकडून अदयाप प्रतिनियुक्तीवर अधिकारी नियुक्त झालेले नाही. सध्या त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्य लेखाधिकारी श्री. खैरनार हे पाहतात.

**मा. आयुक्त :** सुरुवातीला मघाशी तांत्रिक कक्षाबद्दल जी चर्चा झाली त्या बद्दलही मा. सभापतींची व माझी इच्छा आहे की, काही बोलावे आपण जो आम्हाला समिती मार्फत आदेश दिलेला आहे. त्या आदेशाचा अभ्यास अभ्यास आम्ही करुन निश्चित योग्य तो निर्णय घेवू. परंतू जर प्रशासन म्हणून मला या ठिकाणी जे अधिकारी वापरायचे असतील तर ते अधिकारी आयुक्त म्हणून मी वापरण्यासाठी सक्षम आहे. आणि कामामध्ये वैयक्तीक अथवा सार्वजनिक जी काही त्रुटी विभागाकडुन विभाग प्रमुखाकडून किंवा प्रशासनाकडून राहात असेल त्याबाबत सभागृहात चर्चा होणे अतिशय रास्त आहे. त्याचा निर्णय लवकर होणेही रास्त आहे. परंतु प्रशासनाची रचना कशी असावी.

प्रशासनात कोण कोठे असावे. याबाबत जर प्रशासनाकडे अधिकार ठेवला तर भारतात जी काही लोकशाही प्रशासन पध्दती चालू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेला देखील तीच लागु आहे. तीला धरुन ती सुसंगत होईल. प्रशासन जिथे चुकत असेल तेथे जरुर मार्गदर्शन करावे. परंतू असलेल्या संरचना/सिस्टिम्स या का दिल्या होत्या. त्याच्यात काय कारणे होती आणि ती कारणे आता संपली आहेत का, याही पध्दतीने तपासणीची गरज असते. याची कृपा करुन सभागृहाने दखल घ्यावी. दुसरा जो मुद्दा आहे की, बाह्य लेखा परिक्षक ह्यांच्या पदाबाबत सुरुवातीलाच स. स. श्री. किरमाणी यांनी सांगितल्याप्रमाणे मी या महानगरपालिकेत येण्यापूर्वी हा ठराव झाला होता की, आपण हे पद महानगरपालिकेच्या अधिकऱ्यातून कलम ५४ च्या खाली जी निवड समिती असेल तिच्या मार्फत भरण्यात यावे. त्यावर माझ्या पुर्वीच्या आयुक्तांनी बराच पत्रव्यवहार केला होता. तो सभागृहाला माहीत आहे. त्यांचे असे मत होते की, हे पद महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांमधून भरले जाऊ नये. त्यावर शासनाने विचार केला आणि शासनाने अंतिम निर्णय असा कळविला की, सर्वसाधारण सभेत जो ठराव झालेला आहे. त्यानुसार पद भरण्याची कार्यवाही करावी. त्यानुसार माझ्या काळामध्ये आपण ५४ खाली जे या पदास पात्र आहे असे प्रशासनास वाटले त्या अधिकाऱ्यांची यादी घेतली. एकच अधिकारी प्रथम दर्शनी पात्र आहे असे त्यांनी कलम ५४ च्या समितीला कळविले. त्या पात्र अधिकाऱ्यांची पात्रता जेव्हा तपासली तेव्हा काही त्रुटी आढळल्यामूळे समितीला त्यांनी पदोन्नती देण्यासाठी पात्र ठरविता आले नाही. ही वस्तुस्थिती शासनाला कळविलेली आहे. शासनाच्या नगर विकास विभागाला ही परिस्थिती अवगत केल्यानंतर त्या प्रधान संचिवांना मी स्वतः विनंती केली आहे की, आपण एक तर हे पद प्रतिनियुक्तीने तरी भरायची परवानगी द्या अथवा पात्रता असणारा जो अधिकारी आमच्या महानगरपालिकेतून, तो उपलब्ध होईपर्यंत तरी किमान पदनियुक्ती करावी. आपण आपल्या भावना व्यक्त केल्यामूळे पदोन्नती म्हणूनही नाही व बाहेरुनही नाही. अशा प्रकारे श्री. खैरनार यांचेकडे दीर्घकाळ हा पदभार अतिरिक्त राहीलेला आहे. ही वस्तुस्थिती मी सध्याचे सचिवांना देखील स्पष्ट केलेली आहे. मला अपेक्षा आहे की, आचारसंहीता संपल्यामुळे प्रधान सचिव पुढच्या महिन्यापर्यंत यामध्ये आपणांस निर्णय देतील.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सर्व स. सदस्यांनी आपापले मत व्यक्त केले. मा. आयुक्तांनी आता जे शब्द वापरले, मुळातच आम्ही मा. आयुक्तांच्या अधिकाराबद्दल बोललो नाही. आम्ही या ठिकाणी शिक्षण विभागाबद्दल प्रशासनाच्या अनावस्थेबद्दल मत विचारणा करण्यात आलेली आहे. याबाबत माझा आक्षेप आहे. आम्ही असे काही वेगळे बोललोच नाही. मा. आयुक्तांच्या अधिकाराबद्दल बोललोच नाही.

**श्री. मा. आयुक्त :** मला शिक्षण विभागाबद्दल जे बोलायचे होते ते मी मघाशीच बोललो आहे. आता मी शिक्षण विभागाबद्दल बोललो नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** लोकशाही पध्दतीने कसे सभागृह चालवावे याबद्दल आम्हाला ज्ञान असावे असा माझा समज आहे कदाचित आयुक्तांना वाटत असेल की, हा माझा गोड गैरसमज आहे एखादा आयुक्त येतो व आपल्या मर्जीनुसार

नियुक्ती करतो. त्याला चार वर्ष झाली त्यावर खर्च होतो त्यास स्थायी समितीची मान्यता नाही. ही त्यांनी चुक केली म्हणून आपण चूक करत असाल तर ही सुध्दा लोकशाहीची पायमल्ली होवू शकते हा अधिकारांचा गैरवापर आहे. असे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

**श्री इलियास किरमाणी :** मा. आयुक्तांनी सांगितले माझा अधिकार मी वापरेन, याबद्दल वाद नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** आम्ही आमचे स्टेटमेंट करतांना ते जबाबदारीनेच करतो. महानगरपालिकेच्या कार्यपध्दती अंतर्गत कार्यकारी अभियंत्याना काही अधिकार दिले. उपआयुक्तांना काही अधिकार दिलेत ते हा चांगले काम आलेले आहे. मी या ठिकाणी नावानिशी श्री. वैदय हे आयुक्त असतांना तांत्रिक कक्षाची स्थापना केली व हे निर्माण करतांना त्याबद्दल काही निकष असावेत. एक उप अभियंता कार्यकारी अभियंत्यानी केलेल्या कामावर रिमार्क्स देतो. ही बाब कितपत योग्य आहे? तसेच त्यांच्या हाताखाली चार कनिष्ठ अभियंता देण्यात येतात. त्यांच्या हाताखाली चार चपराशी कशासाठी आहेत, दोन टायपीस्ट कशासाठी आहेत. एक स्टेनो कशासाठी आहेत. त्यांना गाडी कशासाठी दिली? कोणत्या अधिकारात दिली हा माझा प्रश्न आहे. याला जर स्थायी समितीची मान्यतेची गरज नसेल तर ही नियमावली पहिल्यांदा फाडा कलम ५१ (२) काय म्हणते की, तुम्हाला हे सर्व स्थायी समितीसमोर आणायलाच पाहीजे. हे जर तुमचे हुकूमशाही पध्दतीने चालत असेल तर हे चुकीचे आहे हे या ठिकाणी मी नमूद केलेले आहे. मला टेक्नीकल सेल बद्दल काही घेणे-देणे नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** प्रशासनाने या ठिकाणी खुल्या मनाने चर्चा करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** आम्ही नियमाला सोडून कधीही बोलत नाही. जे नियमावलीत आहे तुम्हाला जर उदया एखादया चपराशाला कार्यकारी अभियंत्यांची संचिका तपासाचे अधिकार द्यायचे असतील तर द्या. परंतू त्याला स्थायी समितीची मान्यता घ्या. त्याला जीप ऐवजी एखादी थाऊजंड गाडी दया. मर्सिडीज द्या. स्थायी समितीची मान्यता दयावी लागते हे नियम म्हणतो. आपल्या आदेशाची अंमलबजावणी ताबडतोब आली पाहिजे व पुढच्या स्थायी समितीमध्ये ते डिपार्टमंट डिमॉलिश झाले याचा अहवाल स्थायी समितीमध्ये आला पाहीजे.

**मा. सभापती** : १५ मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.
(सुमारे दुपारी २ वाजता सभा तहकूब झाली व दुपारी ३.१० वाजता सभा पुन्हा सुरु झाली.)

**श्री. इलियास किरमाणी :** स. सदस्य श्री. सावंत यांनी जे वैयक्तिक आरोप लावले होते ते इतिवृत्तातून वगळण्यात यावेत.

**मा. सभापती** : इतिवृत्तात जे वैयक्तिक आरोप झालेले आहेत. ते वगळण्यात यावेत.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** अतिक्रमणाबाबत व जाहीरात फलकाबाबत माहीती दयावी.

**मा. सभापती** : दि. १७-०५-२००४ च्या बैठकीत अनाधिकृत बांधकामाबाबत श्री. बलांडे यांच्या प्रकरणात मा. न्यायालयाने जैसे थे आदेश दिले होते, तसेच सुरेवाडी जाधववाडी भागातील अनाधिकृत बांधकामाबाबत श्री. मेघावाले यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंदर्भात म. प्रा. व न. र. अधिनियमाचे कलम ५२,

५३ नुसार नोटीसेस बजावण्यात आल्या असून, गुन्हा दाखल करण्याचे नमूद करण्यात आले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** नोटीस कशासाठी द्यायची. उपआयुक्तांनी पाहणी करावी. या ठिकाणी काम चालूच आहे. दुकान केंद्राचे अनाधिकृत बांधकाम चालू आहे. प्रशासन कशासाठी त्यांना पाठीशी घालतो. नोटीस कशासाठी द्यायची, जे अनाधिकृत आहे ते अनाधिकृत आहे.

**मा. सभापती** : नोटीसा देऊन, सामान जप्त करुन भागणार नाही. तात्काळ कार्यवाही अपेक्षीत आहे आपण तोडण्याची कारवाई का केली नाही? असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. याबद्दल खुलासा करण्यात यावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एखादया गरीबाने मेहनतीने एखादे झोपडे बांधले असेल तर, ताबडतोब जेसीबी लावून काढण्यात येते. दोन-दोन तीन-तीन मजली कमर्शियल कॉम्प्लेक्सला कशासाठी नोटीसा देता? हे कोणत्या नियमात बसते याचा खुलासा द्यावा.

**उपआयुक्त (म.) :** मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४७८ मध्ये विना परवाना जे म. प्रा. व न. र. अधिनियमाप्रमाणे परवाना न घेता करण्यात आले ते अनाधिकृत बांधकाम गृहीत धरलेले आहे. या कलमा विहीत मुदतीची नोटीस देण्याची तरतुद आहे. परंतु म. प्रा. व न. र. अधिनियमाचे कलम ५२, ५३ व मु. प्रा. मनपा अधिनियम ४७८ यामध्ये फरक असा आहे. ४७८ प्रमाणे विहीत मुदतीची नोटीस दिली आणि त्या मुदतीत त्यांनी स्वतःहून बांधकाम निष्कर्षीत केले नाही तर, ते आपल्याला पाडता येते. व आपण ते पाडतो. परंतु म. प्रा. व. न. र. अधिनियमाच्या नोटीसेस यापूर्वी देण्यात येत नव्हत्या. कलम ५२ व ५३ मध्ये अनाधिकृत बांधकाम निर्दशनास आल्यानंतर त्यामध्ये पाच हजार रुपयांपर्यंत दंड व तीन वर्षापर्यंत कैद अशी तरतुद आहे. ५३ मध्ये असेही नमूद केलेले आहे की, नोटीस दिल्यानंतर ते बांधकाम त्यांनी निष्कार्शात केले नाही आणि कोर्टाने आदेश दिल्यानंतरही ते बांधकाम तसेच पुढे चालू राहिले तर प्रतिदिन १०० रुपये दंड जेव्हा केव्हा भरुन घेण्यात येईल. तो पर्यंत घेण्यात यावा. अशीही तरतुद आहे. नगररचना अधिनियमाखाली नोटीस देण्याचा उद्देश असा आहे की, कलम ५२, ५३ खाली गुन्हा दाखल करता येतो. कलम ५४, ५५ नुसार पुन्हा पाडता येते. गुन्हा सिध्दतेनंतर पाच हजार रुपयांपयर्यंत दंड व तीन वर्षापर्यंत कैद अशी शिक्षा होते. परत केल्यानंतर अनाधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर वचक बसेल. अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात पोलीस यंत्रणा कार्यक्षम नाही या संदर्भात मागच्या बैठकीत चर्चा झाली व आपल्या काही कर्मचाऱ्यांना देखील मारहाण झाली. पोलीस पथक बघ्याची भूमिका घेत होते, ही सर्व बाब सिल्लेखान्यातील अनाधिकृत बांधकाम काढतांना निर्दशनास आली. ही बाब मा. पोलीस आयुक्तांच्या निर्दशनास आणून देण्यात आली आहे. अनाधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी शासनाने पोलीस प्रशासनास देखील जी. आर. काढुन योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत. सक्षम पोलीस बंदोबस्त देण्याची जबाबदारी मा. पोलीस आयुक्त याची आहे. तशा प्रकारचे अर्ध शासकीय पत्र मा. पोलीस आयुक्त यांना देण्यात आले आहे. व अनाधिकृत बांधकाम डिमॉलिश करण्याची आपली जबाबदारी आहे व आपणांस पूर्णतः संरक्षण देण्याची जबाबदारी पोलीस विभागाची आहे. जोपर्यंत आपल्याला पूर्ण

संरक्षण नसेल तोपर्यंत अशा प्रकारची कृती वाढेल. शासनाने जी. आर. काढुन पोलीसांना पाबंद केलेले आहे. या जी. आर. चा संदर्भ देवून पत्र देण्यात आलेले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, कलम ४७८ आणि म. प्रा. व न. र. अधिनियमांचे कलम ४२ आणि ४३ मध्ये जरी ३५ दिवसांची नोटीस देण्याची तरतूद असली तरी ते अत्यंत परिणामकारक आहे. तशा माझ्या प्रशासकीय अधिकारी व त्यांच्या स्टाफला सूचना होत्या. आता मा. आयुक्तांच्या मान्यतेने इमारत निरिक्षकांना सुध्दा गुन्हा दाखल करण्याचे अधिकार प्रदान करीत आहोत. त्यामुळे मोठया स्वरुपाची कार्यवाही होईल. याच बरोबर आम्ही मा. पोलीस आयुक्तांनी अशी विनंती केली आहे की, ज्या प्रकरणात गुन्हे दाखल झालेले आहेत. त्याबद्दल ताबडतोब चार्जशीट तयार होऊन मा. न्यायालयात सादर व्हावे व मा. न्यायालयात गुन्हा सिध्द करण्यासाठी पाठपुरावा करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** अतिक्रमण काढायला सांगतात ते नगरसेवक सांगतात, मग ते जातील व कायदेशीर नोटीस देतील मुळातच हे डिपार्टमेंट कशासाठी आहे व ते काय करतात, ही पध्दत चुकीची आहे.

**श्री. मधुकर सावंत :** अतिक्रमण काढण्याची पध्दत कशी आहे ते सांगण्यात यावे किती फुटापर्यंत काम झाले तर ते तोडता येते?

**श्री. इलियास किरमाणी :** किती गुन्हे दाखल झाले व किती प्रकरणे न्यायालयात गेली व न्यायालयाने किती प्रकरणात शिक्षा दिली याची अगोदर माहिती घेण्यात यावी.

**सहा. संचालक नगररचना :** म. प्रा. व. न. र. अधिनियमाचे कलम ५२, ५३, ५४ खाली कार्यवाही कशी करावी याबाबत महाराष्ट्र शासनाने दि. ०२-०१-८४ ला परिपत्रकात विहती केलेले आहे. गुन्हा कशा पध्दतीने दाखल करावा. आठ जोडपत्राचे नमुने दिलेले आहेत. आपल्याकडे जी कार्यवाही होते ती अनाधिकृत बांधकाम, अनाधिकृत भूखंड पाडणे गुंठेवारी, विना परवाना बांधकाम परवानगीचे उल्लघंन करुन बांधकाम करणे, मंजूर ले-आऊटचे उल्लघंन करुन भूखंड पाडणे, वापरात बदल करणे, डेव्हलपमेंट प्लॅनचे उल्लघंन करणे बा. प. च्या अटी व शर्तीचे उल्लघंन करणे. ना विकास क्षेत्रातील तसेच विकास योजनेतील रस्ते, आरक्षणाखालील जागेवर बांधकाम करणे, नाल्याच्या जागेवर अनाधिकृतपणे बांधकाम करणे, जमीनीचे खदानीसाठी खोदकाम करणे या सर्व बाबी अनाधिकृतमध्ये मोडतात. त्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ च्या भाग २ च्या पहिल्या यादीतील शेवटची एक सोडून आधीच्या नोंदीनुसार गैर जमानती दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आलेला आहे. या सर्व बाबी कलम ४३ सह कलम ४२ नुसार घडतात. यासाठी सुरुवातील जागेवरील निरिक्षण अहवाल तयार करुन पोलीसात गुन्हा दाखल करायचा आहे. याला नोटीस द्यायची आवश्यकता नाही. यामध्ये साक्षी घेण्याची सुध्दा गरज नाही. पंचनाम्याची गरज नाही. फक्त निरिक्षण अहवाल तयार करायचा आणि पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवायची आहे. नंतर प्रॉसिक्युशनसाठी मंजूरी देण्याचे अधिकार उपआयुक्तांना आहेत. बांधकाम अर्धवट स्थितीत असेल तर त्याला पुन्हा नोटीस दयायची त्यावर त्यांनी थांबविले नाही तर पुन्हा कलम ५४ नुसार गुन्हा दाखल करु शकता परत बांधकाम करत असेल तर, त्याला ३०

दिवसाची नोटीस दयायची. त्याची पूर्तता केली नाही. तर परत त्याचा निरीक्षण अहवाल तयार करायचा व पुन्हा कलम ५३ प्रमाणे त्याच्यावर गुन्हा दाखल करायचाच आतापर्यंत आपल्याकडे असे परिपत्रक नव्हते. इथून पूढे अशी कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** अशा प्रकारे कार्यवाहीसाठी दोन वर्षे लागतील.

**श्री. मधूकर सावंत :** जागेवर जाऊन पाडायचे अधिकार केव्हा आहेत?

**सहा. संचालक न. र. :** मा. न्यायालयात सिध्द झाल्यानंतर पाडायचेत.

**उपआयुक्त (प्र.) :** म. प्रा. व न. र. अधिनियमाचे कलम ५१, ५२, ५३, ५४, ५५ यामध्ये अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमण हे वगवेगळे विषय असल्यामुळे अतिक्रमण म्हणजे रस्त्यावरील कोणतेही अतिक्रमण असेल तर कलम २३१ प्रमाणे नोटीस न देता काढता येते. बेकायदेशीर बांधकाम संदर्भात म. प्रा. व. नर अधिनियमाचे कलम ७१, ५२ प्रमाणे जर बांधकाम चालू स्थितीत असेल तर, त्याला २४ तासांची नोटीस पुरेशी आहे. जर बांधकाम पूर्ण झालेले असेल तर, त्या ठिकाणी ३५ दिवसाची नोटीस देणे कायदयानुसार आवश्यक आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** प्रशासकीय विभागातर्फे मागच्या महिन्यापासून आतापर्यंत २८ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. २६ तारखेपासून रोज सकाळी जे काम चालू असेल ते लगेच पाडायचे काम सुरु आहे. जे काम चालु आहे ते पूर्ण होणार नाही.

**मा. आयुक्त** : अतिक्रमणाच्या बाबतीत दयामाया नाही. स. सं. न. र. हे बोलतांना अतिक्रमण हा विषय बाजूला राहीला फक्त अनाधिकृत बांधकामाबाबत बोलले. आपल्याकडे दोन कायदे अस्तित्वात आहेत. एक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व दुसरे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ म. प्रा. न. र. अधिनियमाचे कलम ५२, ५३, ५४ चे अधिकार परिणामकारक रित्या वापरले गेले नाहीत असे आमच्या लक्षात आले. हे अधिकार परिणामकारक रित्या वापरले गेले नाहीत असे आमच्या लक्षात आले. हे अधिकार ९६ पासून वापरण्यासाठी व त्यास पोलीस अधिकाऱ्यांनी मदत करण्याबाबत शासन नगर विकास विभागाकडून सक्त सूचना आलेल्या असतांनाही आपण गुन्हेच दाखल केलेले नव्हते. जे काही गुन्हे दाखल झालेले आहेत ते फक्त मागच्या तीन-चार महिन्यातच झालेले आहे. त्याचा पाठपुरावा पण पोलीस अधिकाऱ्यांबरोबर चालू आहे. मागे याबाबत जरब नसली असती तर प्रमाण कमी झाले असते. बांधकाम परवानगी देतो. परंतू त्यानंतर प्लींथलिंटललेव्हल पर्यंतचे बांधकाम तपासणी होत नाही व भोगवटा प्रमाणपत्रही घेतले जात नाही. जे भोगवटा मागतात त्यांचे काम तपासून त्यांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते. यासाठी देखील आपण मोहीम घेण्याचे ठरविले आहे. प्लींथ चेकींग, लिंटल लेव्हल चेकींग कनिष्ठ अभियंता इतर कुणीही पाहात नाही. प्लींथ चेकींग नंतर पुढील परवानगी दयावी व लिंटल चेकींग योग्य असल्यानंतर पुढील परवानगी दयावी व नंतर भोगवटा आणि त्यानंतर राहायला जावे हे कटाक्षाने पाळले जावे म्हणून आम्ही सर्वकर्ष असे आदेश काढले आहेत. इमारत निरिक्षकावर यापुर्वीही जबाबदारी होती. काम चालू असतांना अहवाल येण्याची प्रथा नव्हती. एखादी तक्रार झाली तर आपण तपासणी करतो. परंतू पाहणी करणे हा यंत्रणेचा दैंनदिन कर्तव्याचा भाग आहे. ज्या इमारत निरिक्षकाला

दिलेला आहे. आहे. त्याने सतत त्या भागात फिरुन अनाधिकृत बांधकाम चालू असेल त्यास तात्काळ नोटीस देता येईल व काम थांबविता येईल. सभागृहाचे म्हणणे रास्त आहे की, अगोदर काम पूर्ण होण्याची वाट पाहायची. नंतर नोटीस दयायची प्रकरण न्यायालयात जाईल व तोपर्यंत बांधकाम पूर्ण होईल. अशा प्रकारचे काम करता येणार नाही. त्यामुळे प्रशासनाचा अशा कामावर वचक राहणार नाही. म्हणून ज्या त्या बीटला जे इमारत निरिक्षक दिलेले आहेत. त्यांनी कसे काम करावे याच्याही सूचना दिलेल्या आहेत. त्यांचा आढावा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. आजपर्यंत त्यांचे वर उपआयुक्त (प्र.) हे काम पाहात होते. ते अजूनही पाहतील. परंतू मध्यंतरी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, आणखीन एक अधिकारी या कामासाठी नियुक्त करावा आणि म्हणून यामध्ये आम्ही सहा. संचालक नगररचना यांनी स्वत: ही पाहावे विशेषत: बिल्डींग इन्सपेक्टरचे काम जे जे चालू आहे ते तात्काळ बंद होण्यासाठी बिल्डींग इन्स्पेक्टर व त्यांचेवरील प्रशासकीय अधिकारी यांचे नियंत्रण प्रभावी असल्याशिवाय ते होणार नाही. तीन प्रकारची तपासणी कुणी करावी हा एक मुद्दा आहे. आदेशात आम्ही असे नमूद केलेले आहे की, जे जे उप-उपअभियंता आहेत. त्यांच्या हाताखाली जे कनिष्ठ अभियंता आहेत. त्यांनी ही तपासणी केली पाहीजे आणि इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत व भोगवटा प्रमाणपत्र होईपर्यंत पाठपुरावा केला पाहीजे. तो त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. भोगवटा झालेला आहे की नाही हे पाहात नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसानही होते. भोगवटा घेण्यासाठी ज्यांनी कर्ज घेतलेले आहे. ज्यांना गरज आहे. वित्तीय संस्थेचा बोजा आहे. किंवा आणखी काही कायदेशीर कारण असतील तेवढेच लोक आपल्याकडे भोगवटा प्रमाणपत्र घेण्यासाठी येतात आणि तेवढयापुरतेच आपण पाहणार असू, अलीकडेच मी ३१ मार्च २००४ पर्यंत आढावा घेतला. त्यानुसार फक्त ५१ प्रकरणात भोगवटा प्रमाणपत्र दिलेली आहेत आणि बांधकाम परवाना ७०० च्या वर आहेत. प्रत्येक बांधकाम परवानगीला भोगवटा प्रमाणपत्र का दिले नाही? त्यामुळे मनपाचा आर्थिक तोटा होतो प्रभावी नियंत्रण राहावे म्हणून एक सविस्तर चार ते पाच पानी आदेश काढण्यात आलेला आहे तो आपणांस मिळू शकेल. यात प्रामुख्याने दोन गोष्टी आहेत. दिलेली परवानगी जी अधिकृत आहे तिचे प्लींथ, लिटल, स्लॅब आणि कंप्लीशन हे त्या त्या विभागातील उप अभियंता आहेत. त्यांचे झोन ठरलेले आहेत. त्यांनीच ते पाहिलं पाहीजे अशीही एक सुचना आहे की, विशिष्ट उपअभियंतावर ही जबाबदारी द्यावी. ते समन्वय ठेवून या कामास मॉनिटर करेल. थोडक्यात सांगायचे झाल्यास अतिक्रमण वेगळे आहे त्याला दया माया नाही. महापालिकेची जागा असो सरकारी जागा असो, रस्ता असो, सार्वजनिक जागा असो त्यामध्ये एम. आर. टीपीचा संबंध येणार नाही. अनाधिकृत बांधकामाबद्दल देखील काम चलू असतांनाच तपासण्या घेणे. त्यासाठीच इमारत निरिक्षक त्या त्या बिटला दिलेले आहेत. आणि त्यांचा दैनंदिन, साप्ताहीक व मासिक अहवाल घेणे व त्याच्यावरची जी कार्यवाही आहे त्याचा अहवाल आयुक्तांनी आणि स्थायी समितीला सादर करणं अपेक्षीत आहे. आणि तशा प्रकरच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सभागृहाच्या

भावनेशी मी पूर्णपणे सहमत आहे की, फौजदारी स्वरुपाच्या केसेस यापूर्वी झालेल्या नाहीत आणि त्यामुळे अनाधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण दोन्हीवरही प्रशासनाचा हवा तेवढा वचक नव्हता. इमारत निरिक्षक जेवढी तक्रार येईल किंवा वरीष्ठांकडून सांगितले जाईल तेवढेच काम पहात होते. कदाचित बाकीच्या कामांमध्ये त्यांचा अहवाल प्रशासकीय अधिकाऱ्यांना तरी येत होता का, हे मला सांगता येणार नाही. येत असेल तर, ही परिस्थिती उद्‌भवणार नाही. कारण काम चालू असतांना पाया खोदला गेल्या बरोबर तुमच लक्ष गेल पाहीजे. हे काम अल्पकाळात संपणारे नाही. किमान दोन-तीन दिवस तरी लागतील. तेवढयात नजरेला यायलाच पाहिजे. ते पूर्ण होवून लोक राहायला जातात. त्यानंतर तक्रार प्राप्त होते की, ते अनाधिकृत आहे. त्यानंतर आपण जागे होतो याबद्दल सभागृहाचा रोष आहे आणि तो रास्त आहे. प्रत्येक स्तरावर कोण अधिकारी जबाबदार आहे आणि त्यांनी ते काम जबाबदारीने केले नाही तर त्यांचेवर कार्यवाही केली जाईल. अशा प्रकारचे आदेश आहेत.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यगृहांचे कंप्लीशन झाले नाही ते कसे काय चालू आहे? यात महापालिकेचे देखील नुकसान होत आहे. आपले नाट्यगृह सोडून त्या नाट्यगृहाची बुकींग करीत आहेत. हे सर्व जाणून बुजून होत आहे. आताही त्या ठिकाणी कार्यक्रम चालू आहे. वृत्तपत्रामध्ये कार्यक्रमाच्या जाहीराती येतोहेत. आपण अदयाप यास सिल का लावले नाही? मी सुरुवातीलाच आपण सभापती नसतांना बोललो होतो की, नोटीस दिल्यानंतर संबंधित स्टे घेवून येईल त्याप्रमाणेच झाले. त्यांना स्थगिती मिळाली. त्यांच्या गर्दीचे काम आपल्या मनपाच्या लोकांनी जाणून बुजून केले. त्यांना सहाकार्य केले. मी एक वर्षापासून याबद्दल बोलत आहे. स्थगिती उठविण्यासाठी काय कार्यवाही केली. समोरची इमारत अनाधिकृत आहे. शैक्षणिक झोनमध्ये वाणिज्य वापर होत आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, याच्यात चांगले वकील लावण्यात यावे.

**विधी सल्लागार :** तापडीया नाट्यगृहाचे संदर्भात प्रशासनातर्फे कार्यवाही झालेली आहे. बा. प. चे अट क्र. १९ चे उल्लघंन केल्याने आणि नाट्यगृहाचा वाणिज्य वापर होत आहे. म्हणून प्रशासनातर्फे त्यांना दि. २४-१२-२००३ रोजी कलम ५२.५३ नुसार त्यांना नोटीस दिलेली आहे. नाट्यगृहासंबंधी संस्था मराठवाडा लिगल ॲण्ड एज्युकेशन सोसायटी यांनाही नोटीस देण्यात आली होती. या नोटीसला न्यायालयात आव्हान देण्यात आलेले आहेत व दिवाणी दावा क्र. १४२/२००४ दाखल केला व जैसे थे आदेश प्राप्त आहेत. सुनावणीची पुढील तारीख १६-०६-२००४ रोजी ठेवण्यात आलेली आहे. आणि मनपातर्फे श्री. कापडीया हे जेष्ठ विधीज्ञ काम पाहात आहे.

**श्री. मधुकर सावंत :** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ५२, ५३ अन्वये नोटीस दिल्याचे सांगण्यात आले. ह्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार आणि परिपत्रक क्र. टीपीबी-४३८३/१६५९ दि. १५-०६-१९८३ नुसार नोटीस देण्यात आली न्यायालयाकडून स्थगिती मिळो अथवा ना मिळो पोलीस गुन्हा का दाखल केला नाही?

**विधी सल्लागार :** गुन्हा दाखल करण्यापुर्वी नोटीस देणे आवश्यक होते व सर्व बाबी तपासणे आवश्यक होते. म्हणून आपण ही नोटीस देण्याची कार्यवाही केलेली

आहे. नगररचना अधिनियमाच्या तरतुदीनुसार परवानगी देण्यात आलेली आहे. अट क्र. १९ चे उल्लघंन करण्यात आलेले आहे त्या प्रस्तावित ऑडोटोरियम आणि स्पोर्ट हॉलचा वापर संस्थेने त्यांच्या शैक्षणिक वापरासाठीच करावयाचा आहे. त्याचा इतर उद्देशासाठी वाणिज्य वापर करता येणार नाही. या अटीचे उल्लघंन झालेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** वाणिज्य वापर करता येणार नाही. हॉलमध्ये कोणत्या स्पोर्टसच्या ॲक्टीव्हिटीज चालतात. सील का ठोकले नाही. सदरील संस्थेच्या अध्यक्षांना किती नोटीसा दिलेल्या आहेत. त्या भागात किती अनाधिकृत इमारती झाल्या. नाल्यावर कोणते बांधकाम चालू आहे? याची माहीती सभागृहाला देण्यात आली. ०१-०५-९६ ला जो कायदा झाला त्याप्रमाणे स्वतंत्ररित्या आयुक्त, उपआयुक्तांना अधिकार देण्यात आलेले आहेत. आमचा प्रामाणिक हेतू हा आहे की, प्रशासनाने चांगला उद्देश समोर ठेवून शहराची सुंदरता व विकास होण्याच्या दृष्टीकोणातून चांगली पावले उचलावीत. अनाधिकृत झाल्यानंतर मनपावर आर्थिक बोजा पडतो. झालेल्या वसाहतींना मुलभूत सुविधा देण्यात याव्यात याबद्दल आम्हाला मागणी करावी लागते. उलट आम्ही प्रशासनाला मदत करतो. या सभागृहाला वेगळया दिशेने नेण्याच्या कुणी प्रयत्न करत असेल तर, त्याची दखल घेण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** ज्या वापरासाठी परवानगी दिली तो वापर बदलला. संबंधितावर गुन्हा दाखल करता येणार नाही का?

**श्री. काशीनाथ कोकाटे :** सदर भाग हा शैक्षणिक झोनमध्ये असून, त्या ठिकाणी वाणिज्य वापर करण्यात येत आहे. नाट्यगृहाचा वापर करणे. या संदर्भात वृत्तपत्रात जाहीरात देणे हे सर्व वाणिज्य वापरात मोडते.

**मा. सभापती** : सदर प्रकरणात गुन्हा का दाखल करण्यात आला नाही हा सर्व स. सदस्यांचा प्रश्न आहे. सहा. संचालक नगर रचना यांना सूचना देण्यात येते की, शहरातील अशा शैक्षणिक झोनमध्ये ज्या ज्या बांधकाम परवानग्या दिलेल्या त्याचा आज काय वापर होत आहे. या संदर्भात सविस्तर माहती पूढील सभेमध्ये देण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** बिल्डरला पाठीश घालण्याचा प्रयत्न करतात.

**मधूकर सावंत :** गुन्हा दाखल करण्यात यावा.

**विधी सल्लागार :** गुन्हा दाखल करण्यासंबंधीची नोटीस दिली होती त्याला जैसे थे असे मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त झालेले आहेत. जोपर्यंत आदेश रद्द होत नाहीत तो पर्यंत पुढील कार्यवाही करता येणार नाही. अन्यथा न्यायालयाचे निर्णयाचा अवमान होईल.

**मा. सभापती** : नगररचना विभाग, विधी सल्लागार आणि प्रशासकीय विभाग या तिघांनी एकत्रितपणे कार्यवाही करावयाची होती. कोणी कोणी काय काय कार्यवाही केली याबद्दलची सविस्तर माहीती पुढील सभेत देण्यात यावी.

**सहा. संचालक न. र. :** तापडीया नाट्यगृहाला नोटीस देण्यात आली. त्यांनी परवानगीतील अट क्र. १९ मध्ये शैक्षणिक वापरच करण्यात यावा. वाणिज्य वापर करता येणार नाही. त्याबाबत आपण म.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ अन्वये ३० दिवसाची नोटीस दिलेली होती व मुदत संपण्याच्या अगोदरच ते न्यायालयात गेलेले आहेत व त्यावर जैसे थे आदेश प्राप्त झालेले आहेत. ज्या गाईड लाईन्स आता आपल्याजवळ आलेल्या आहेत.

त्यापूर्वी आपल्याजवळ नव्हत्या. आजच्या परिस्थितीमध्ये आपण गुन्हा दाखल करु शकत नाही. त्यावेळेस आपल्याला गुन्हा दाखल करता आला असता परंतू त्या गाईडलाईन्स आपल्याजवळ त्यावेळी नव्हत्या.

**श्री इलियास किरमाणी :** बिल्डरसह यांचे संगनमत आलेले आहे. जाणून बुजून कार्यवाही झालेली नाही असा माझा आरोप आहे.

**सहा. संचालक न. र. :**हे आरोप मला मान्य नाही.

**मा. सभापती :** गुन्हा का दाखल केला नाही, कॅव्हेट का दाखल केले नाही. पुढील बैठकीत सविस्तर माहती देण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** मा. आयुक्तांनी अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम वेगवेगळे दाखवले. माझ्या वार्डातील ब्रिजवाडी रस्त्यावर अतिक्रमण आलेले आहे. त्याबद्दल मा. आयुक्त व प्रशासकीय अधिकारी यांना निवेदन दिले. निर्दशने केली ते का नाही हटविले? पाच महिन्यानंतर स्थगिती आदेश प्राप्त होतो. पाच महिने गप्प का राहीले? सरकारी जागा आहे स्लममधील जागा आहे. या संदर्भात महिलांनी निर्दशने केलेली आहेत. सात आठ महिने होत आहेत. अतिक्रमण का काढत नाही? स्थगिती आणणारे आणि स्थगितीची कल्पना देणारे हेच अधिकारी आहेत.

**मा. सभापती :** उदयाच्या उदया कार्यवाही करुन अहवाल मा. आयुक्तांकडे दयावा.

**प्रशासकीय अधिकारी :** ब्रिजवाडी संदर्भात तक्रार केली होती. त्या ठिकाणची पाहणी करण्यात आली असता तिथे रस्ता उपलब्ध असल्याचे दिसत नाही. सदरची फाईल अभिप्रायासाठी स्लम विभागाकडे पाठविली. रस्ता असेल तर, मार्कींग करुन देण्यात यावी. स्लम विभागाकडून चार-पाच महिनेपर्यंत अभिप्राय प्राप्त झाला नाही. ज्यावेळेस अभिप्राय आला त्यावेळी स्टे आला होता. त्यामुळे आपण कार्यवाही करु शकलो नाही.

**मा. सभापती :** पुढील सभेत अभिप्राय देण्यात यावा.

**श्री. संजय शिरसाठ :** विवेकानंद कॉलेजला जी जागा दिली त्या जागेच्या पी. आर. कार्डवर महापालिकेचे नांव लागले आहे काय?

**उपआयुक्त (म.) :** टी. आय. एल. आर कडे मालमत्ता अधिकाऱ्यांमार्फत सदर प्रकरणामध्ये कागदपत्रांची मागणी करण्यात आलेली आहे. त्यांना भूसंपादन निवाडयाची प्रत व ॲवार्ड स्टेटमेंट ई ची मागणी करण्यत आलेली आहे. अदयाप अवार्डच्या प्रती मिळालेल्या नसल्याने महानगरपालिकेचे नांव लागलेले नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** १५ वर्षापुर्वी झालेल्या भूसंपादन प्रकरणात आजही नांव लागत नाही. सदर प्रत कोणाकडे आहे कोण पोहेचती करणार आपणाकडे कागदपत्रे नाहीत ही दुर्देवी बाब आहे.

**सौ. शाहीन जफर :** मागील सभेत १.४३ कोटीचे पाईप खरेदी संदर्भातील अहवाल देणार होते. यात दिवसांची मुदत २३ तारखेलास संपलेली आहे. या संदर्भात काय कार्यवाही आलेली आहे.

**मा. सभापती :** लोखंडी पाईप खरेदीचा प्रस्ताव १० तारखेच्या सभेपूढे आलेला होता. तो मंजूर केला होता आणि सात दिवसांत नियमानुसार डिपॉझीट भरण्याची मुदत दिली होती. केलेल्या कार्यवाहीचा अहवाह सभागृहात सादर करण्याचे आदेश दिले होते. प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात आली याचा खुलासा करावा.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर लगेचच एजन्सीला पत्र पाठवले. फॅक्स केला व स्पीड पोस्टाने पाठविण्यात आले. त्याची १८-०५-०४ ही शेवटची तारीख होती. त्याने १८ तारखेला पत्र देवून ३१ मे पर्यंत मुदतवाढ मागितील. त्यांना सात लाख बावीस हजार रुपये भरण्यास सांगितले होते. कालपव्यय टाळण्यासाठी त्यांना ३१-०५-०४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यांनी पुन्हा पत्र दिले की, एफ. एस. डी. कॅशन भरता बँक गॅरटींच्या स्वरुपात भरण्याची मुभा देण्यात यावी. परंतु आम्ही त्यांना सांगितले की, बँक गॅरटी न देता कॅश भरावेत.

**मा. सभापती** : या निविदेवर जवळपास ३६ कामे पाणी पुरवठयाची अवलंबून आहेत. १८ तारखेला त्याची पैसे भरण्याची मुदत संपली. आपण तातडीने कार्यवाही करा. अनामत रक्कम भरुन ह्या. वर्क ऑर्डर द्या आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहात द्या म्हणून आदेश दिले होते. ३६ कामाच्या लेबर कॉन्ट्रॅक्टच्या निविदा सुध्दा निघालेल्या आहेत. सर्वांचेच म्हणणे आहे की, तात्काळ खरेदी करुन ही कामे सुरु करावीत. लॅन्को कंपनी ही मोठी कंपनी आहे. पैसे भरण्यास ते वेळ सांगून घेतात. म्हणजे कुठेतरी वेळ घालावण्याचा प्रकार दिसतो.

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** त्यांना जी मुदतवाढ दिलेली आहे. त्यात त्यांनी भरले नाही तर निश्चितच कार्यवही करु. त्यांनी ३१-०५-०४ पर्यंतची मुदत मागितली. त्यांनी जर मुदतीत भरले नाही तर त्यांची इएमडी जप्त करुन ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. आणि पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण सादर करण्यात येईल.

**मा. सभापती** : ३१-०५-०४ ला योग्य तो निर्णय घेण्यात यावा. नसता दुसऱ्या टाईपचे पाईप खरेदीचा प्रस्ताव सभागृहापुढे सादर करावा. तांत्रिक ओपिनियन घेवून ए. सी. पाईपचे क्लास पाठवून प्रस्ताव द्यावा.

**विषय क्र. १८ :**

दिनांक १०-०५-२००४ (का. प. क्र.४) व १७-०५-२००४ (का. प. क्र.५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** स. सदस्य श्री. सावंत यांनी जे वैयक्तीक आरोप लावले ते इतिवृत्तातून वगळण्यात यावे.

**मा. सभापती** : इतिवृत्तात जे वैयक्तीक आरोप झालेले आहेत. ते आक्षेपार्ह वाक्य वगळण्यात यावेत.

**मा. सभापती** : दिनांक १७-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. १७ दोन इंडीगो कार खरेदी संदर्भात अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडून टिप्पणी प्राप्त झालेली आहे. या ठरावात दोन इंडीगो जी एल एक्स पेट्रोल कार दोन प्रत्येकी रु. ४,६४,७८८/- प्रमाणे खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे. यात किरकोळ दुरुस्ती सुचविण्यात येत असून, एक इंडीगो जी एल एक्स पेट्रोल कार एक किंमत रु. ४,६४,७८८/- व एक इंडिगो एल एक्स डिझेल कार किंमत रु. ४,९५,५६९/- खरेदी करण्यात यावे अशी ठरावात दुरुस्ती करण्यात यावी. वरील प्रमाणे दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दि. १७-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील पान क्र. ६ व ७ वरील वैयक्तीक स्वरुपाचे आक्षेपार्ह वाक्य वगळण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली आणि दि. १७-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीत अतिरिक्त शहर अभियंता यांनी शिफारस केल्यापैकी इंडीगो जी. एल. एक्स (पेट्रोल) प्रत्येकी रु. ४,६४,७७८/- या किंमतीचे दोन वाहने (कार) मे. सानिया मोटर्स यांचेकडून प्रस्तावात दर्शविलेल्या बाबीस अधिन राहुन खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे. तथापि दिनांक १७-०५-२००४ रोजी संपन्न झालेलया स्थायी समिती सभेतील विषय क्र. १७ दोन इंडीगो पेट्रोल कार एक किंमत रु. ४,६४,७८८/- व एक इंडीगो एल एक्स डिझेल कार किंमत रुपये ४,९५,५६९/- खरेदी करण्यात यावे अशी ठरावात दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. या व इतर दुरुस्तीसह दिनांक १०-०५-२००८ (का. प. क्र.४) व १७-०५-२००४ (का. प. क्र.५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १९ :**

(स्थायी समिती सभा दि. १९-०५-२००४ विषय क्र. १३ वरील निर्णयाप्रमाणे)

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिळकत सर्व्हे नं. २३/६ जयसिंगपूरा भागशः क्षेत्र सहा एकर दोन गुंठे मोजणी नकाशानुसार क्षेत्र दोन हेक्टर तीस आर (२३००० चौ.मी.) या मिळकतीवर अर्जदार दि. फ्रान्सीस कार्पोरोन, रोमन कॅथलिक चर्च करीता विदयमान फादर जॉर्ज (ट्रस्टी) यांनी बांधकाम परवानगी संचिका क्रमांक १६९/१७/२००२ नुसार बांधकाम परवानगीाठी प्रस्ताव सदर केला असून, या प्रस्तावामध्ये मतिमंद मुलांसाठीची शाळा, व्यावसायिक शिक्षण केंद व कर्मचारी निवासस्थान या इमारतींसाठी बांधकाम प्रस्तावित केले आहे. सदर प्रस्तावास न्यु नंदनवन कॉलनी अनाधिकृत वसाहतीमधील विदयमान पोंच रस्ता गृहीत धरुन तसेच अंतर्गत विकास कामासंबंधी अर्जदाराकडून हमीपत्र घेवून विकास परवानगी ही विषय क्र. २५ दि. ०२ सप्टेंबर २००३ रोजी संपन्न झालेल्या मा. स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बां. प्र. प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे. तो मान्य करतांना जमीन विकास शुल्क रु. ४,८३,०००.०० तसेच शहर विकास निधी ७२,३२०/- आकारुन बा. प. प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे.

अर्जदाराने दाखल केलेली प्रस्तावित मिळकत सार्वजनिक विश्वस्त संस्था यांची असून, तेथे मतीमंद मुलांसाठी शाळेचा प्रस्ताव असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१२९३/३२/प्र.क्र./२३/नवि १२ दिनांक २४ मे १९९३ नुसार जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% सुट देणेची तरतुद आहे.

जमीन विकास निधी ४,८३,०००.०० तसेच शहर विकास निधी ७२,३२०.०० असे एकूण रु. ५,५५,३२०/- शुल्क आकारण्यात आलेले असून, यामध्ये एकूण ७५% सूट म्हणजे रु. ४,१६,४९०/- देण्यात येवून उर्वरीत रक्कम रुपये ,१३,८३०/- मान्यता झाल्यास भरुन घेण्यात येईल.

करीता वरील प्रमाणे जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% सुट रु. ४,१६,४९०/- देणे बाबत व उर्वरीत रक्कम रु. १,१३,८३०/- भरुन घेणेकरीता प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मा आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

करीता वरील प्रमाणे ७५% सुट देणेचे निर्णयास्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

(या विषयासंदर्भात नगर रचना विभागाकडुन प्राप्त झालेली टिप्पणी खालील प्रमाणे)

**टिप्पणी :**

अर्जदार दि. फ्रान्सीस कॉर्पोरेशन, रोमन कॅथालिक करीता विद्यमान फादर जॉर्ज (ट्रस्टी) यांना मिळकत स. न. २३/६ जयसिंगपूरा येथे बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर केला आहे.

अर्जदाराने दाखल केलेली प्रस्तावित मिळकत सार्वजनिक विश्वस्त संस्था यांची असून, तेथे मतीमंद मुलांसाठी शाळेचा प्रस्ताव असल्यामुळे शासन निर्णय क्र. टिपीएस१३९३/३२/प्र.क्र./९३/नवि-१२ दि. २४ मे १९९३ नुसार जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% सुट देण्याची तरतुद आहे.

करीता वरील प्रमाणे सदर संस्थेस ७५% सुट देणे बाबत मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्याकरीता मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. सबब मा. स्थायी समितीच्या विषयपत्रिका क्र. १३ नुसार १) या प्रकारचे किती प्रकरणे आहेत २) वरील विषयान्वये शासन निर्णय काय आहे? ३) प्रस्तावित संस्थेची घटना काय आहे? याबाबत विचारणा केली आहे.

करीता म. प्रा. व म. र. अधिनियम १९६६ च कलम १२४ एफ तील तरतुदीनुसार ज्या शैक्षणीक संस्था/चॅरिटेबर ट्रस्ट/वैदयकीय संस्था बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार नोंदणीकृत आहेत. त्यांना जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये अंशत: सुट देण्याची तरतुद आहे. करीता सुलभ संदर्भाकरीता शासन निर्णयाची प्रत व प्रस्तावित संस्थेची घटनेची छायांकित प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**मा. सभापती** : सदर प्रकरणात जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% सुट मागितलेली आहे. मतिमंद मुलांसाठी असणारी शाळा यासाठी बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव दाखल कण्यात आला होता. यामध्ये जमिन विकास शुल्क व शहर विकास निधी जवळपास रु. ४,१६,४९०/- सुट देणे व उर्वरीत रु. १,१३,८३०/- भरुन घेणे बाबत प्रस्ताव आलेला आहे.

**मा. आयुक्त** : हा विषय मागच्या वेळेला आलेला होता. आणि मागच्या वेळी आपण चर्चा केल्यानंतर स. स. नगररचना यांचे कडुन दोन-तीन मुदयांवर अधिक माहीती मागितली होती. एकतर हा शासनाचा निर्णय काय आहे. त्यात काय तरतुदी आहेत. नकाशा कसा आहे, पोच रस्ता कसा आहे. आणि ७५% २५% प्रमाणे जी रक्कम केलेली आहे. ती तपासून घ्यावी आणि एवढी मोठी ७५% रक्कमेची सवलत आपण द्यावी का असे मुद्दे चर्चेत आले होते व सभागृहाने ठरविले होते की, सविस्तर चर्चा पुढच्या वेळेला करु म्हणून आपण स्थगित ठेवला होता. या शासन निर्णयाच्या तरतुदी या संस्थेला लागू पडतात का? कशा लागू पडतात. यापूर्वी अशा प्रकारची सवलत दिलेली आहे का, यावरही सभागृहात चर्चा घडून आणावी.

**मा. सभापती** : अशा प्रकारचा प्रस्ताव पहिल्यांदाच आलेला आहे.

**सहा. संचालक न. र. :** सदर मिळकतीचे एकुण क्षेत्र २३००० चौ. मी. असून, त्यापैकी प्रस्तावित बांधकाम १६६३ चौ. मी. वर आहे. शाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण असा प्रस्ताव आहे. ७७४ चौ. मी. वर शाळा आहे व या दोन्ही मतीमंद मुलांसाठीच आहे.

**मा. सभापती** : या बद्दल प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे आणि प्रतीज्ञा पत्रात त्याचा वापर फक्त मतीमंद मुलांसाठीच होईल असे प्रतिज्ञापत्र प्राप्त झाल्यानंतर ५०% सूट देवून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्व्हे नं. २३/६ जयसिंगपूरा भागशः क्षेत्र सहा एकर दोन गुंठे मोजणी नकाशानुसार क्षेत्र दोन हेक्टर तीस आर (२३००० चौ.मी.) या मिळकती पैकी प्रस्तावित बाधकाम क्षेत्रावर होणाऱ्या वास्तुचा वापर मतिमंद मुलांच्या उपयोगासाठीच होईल असे जर प्रतिज्ञापत्र प्राप्त झाले तर, बांधकाम परवानगीच्या संदर्भात प्रस्तावित जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ७५% ऐवजी ५०% सूट देण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २० :**

(स्थायी समिती सभा दि. १७-०५-२००४ विषय क्र. १५ वरील निर्णयाप्रमाणे)

नगर भुमापन क्र. २५९१ मौ. खडकेश्वर मिलकॉर्नर या भूखंडावर बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दाखल झालेला असून, सदरील मिळकत ही विकास योजना नकाशा नुसार गावठाण बाहेरील आहे. प्रचलित कार्य पध्दती नुसार गावठाण क्षेत्राबाहेरील ज्या मिळकत धारकाने आतापर्यंत कधीही त्यांच्या मिळकतीसाठी विकास खर्च भरल्याचा पुरावा उपलब्ध होत नाही. अशा सर्व मिळकत धारकांकडून विकास खर्च भरुन घेण्यात येतो. परंतू सदरील प्रस्तावात रितसर छाननी करुन भूखंड धारकांस विकास खर्च भरण्याबाबत सुचना देण्यात आली असता अर्जदाराने मा. आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे अपील करुन सदरील मिळकतीवर १९७१ पूर्वीपासून जुने बांधकाम असल्यामुळे ते पाडुन नवीन बांधकाम करावयाचे असल्याने विकास खर्च आकारण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

सदर प्रकरणात मा. आयुक्तांचे आदेशानुसार उप संचालक नगर रचना औरंगाबद यांचे मार्गदर्शन मागितले असता त्यांचेकडील पत्र जा. क्र./विनिनि/विकास खर्च/उ.सं./औ ७४८ दि. ०६-०४-०४ अन्वये अभिप्राय प्राप्त झाले आहेत. ते खालील प्रमाणे

सदरच्या प्रकरणात जुनी इमारत पाडुन नवीन इमारत बांधायचे प्रस्तावित आहे. तसेच विकास खर्च हा एकदाच खुल्या भुखंडावर बांधकाम करते वेळीच वसूल करावयाचा असल्यामुळे सदरचा पुनर्विकास करतांना घेणे योग्य होणार नाही. असे या कार्यालयाचे मत आहे. तथापी सदरचे बेटरमेंट चार्जेस हे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाचे अनुषंगान घेण्यात येत असल्यामुळे याबाबत आपले स्तरावर सर्वकष धोरण ठरवून निर्णय घेणे उचित होईल असे उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांनी कळविले आहे.

सदर प्रकरणात न. भू. क्र. २५९१ जो नगर भुमापन नकाशा सादर केलेला आहे. त्यानुसार १९७१ साली त्यावर बांधकाम अस्तित्वात असल्याचे दिसते.

अशा प्रकारे केवळ एकाच भूखंडाबाबत निर्णय घेण्याऐवजी याबद्दलचे सर्वसाधारण धोरण ठरविणे योग्य राहील.

या उपसंचालक नगररचना यांचे अभिप्राय लक्षात घेता ज्या भूखंडावर धारकांना यापुर्वी बांधकाम परवानगी दिलेली आहे. परंतू त्यांचेकडे आता पावती उपलब्ध होत नाही. अशा भूखंडधारकांना त्यांचे भूखंड परिसरातील विकास कामे पूर्ण झालेली असतील तर, विकास खर्च न आकारण्याचे धोरण निश्चित करणे योग्य होईल. त्यानुसार प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. काशीनाथ कोकाटे :** विकास खर्च घेतल्याबाबतचा पुरावा नाही. १९७१ च्या सीटीसर्व्हे शिट वर नोंद आहे. विकास खर्च होतांना अटी टाकल्या पाहीजेत. ७१ पुर्वी जो वापर होता तेवढया क्षेत्रापुरताच विकास खर्चात सुट दयावी. परंतू त्याचा वापर बदलू नये. सदर बांधकाम आल्यानंतर ते कुणाला विकता येणार नाही. या अटीवर बेंटरमेंट चार्जेस भरावे. जास्तीचे बांधकाम झाल्यास त्यावर बेटरमेंट चार्जेस घ्यावेत. या ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन, पाईप लाईन वाढवावे लागेल.

**मा. आयुक्त** : सभागृहास विनंती आहे की, उपसंचाल नगररचना यांचे मत आहे ते आम्ही जसेच्या तसे सभागृहापुढे सादर केलेले आहे. आयुक्त म्हणून माझं मत या ठिकाणी मी देवू इच्छितो. हा धोरणात्मक मुद्दा आहे. याचे परिणाम मोठया प्रमाणावर होणार आहेत. घाईघाईने निर्णय घेवू नये अशी माझी सभागृहाला विनंती आहे. आता स्थायी समितीने होकार दिला तर हे प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे लागणार आहे. कारण हा सर्वसाधारण सभेचा अधिकार आहे. गावठाण भागामध्ये ज्या ठिकाणी आपण चटई क्षेत्र निर्देशांक मूळात जास्त देतो त्या ठिकाणी जर अशा प्रकारे सवलत दयायची ठरवली किंवा अटी टाकून द्यायची ठरविली तरी सुध्दा एखादयाच प्रकरणात दिली तर त्याचं उदाहरण म्हणून (प्रेंसिडेंट) लोक समोर येतात. कोर्टातही जातात आणि त्यातून अनेक वाद महापालिकेला सुध्दा सोसावे लागतील यावर अधिक विचार व्हावा व नंतरच निर्णय दयावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा. सभापती** : प्रशासनाचे स्पष्ट मत काय आहे. सहाय्यक संचालक नगररचना म्हणून आपण नमूद करावे.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** शासनाच्या आदेशाच्यापलिकडे स. स. न. र. हे काहीच वाचून दाखवणार नाहीत. परंतु विकास खर्च किती घ्यायचा हे ठरविण्याचा अधिकार महापालिकेचा आहे आणि ते घेतलेच पाहीजे असेही नाही. महानगरपालिका खूप सक्षम असेल तर विकास खर्च न आकारता देखील परवानगी देवू शकतो. हे उत्पन्नाचे स्त्रोत आहे. हा धोरणात्मक निर्णय आहे. १९७१ ला जे शीटवर नोंद झालेली आहे. त्यांच्यावर देखील अन्याय होता कामा नये. परंतू त्याचा भार आपल्यावर पडेल. याचे चांगले वाईट परिणामावर प्रत्येक सदस्यांनी विचार करावा. पुर्वानुभव पाहता अनेक लोक मिळकती विकसीत करायला बिल्डरला देतात. त्यात अनेक अटी टाकण्यात येतात. ते विक्री झाल्यानंतर लोक तिथं राहायला जातात. बिल्डर तिथे अनेक सुविधा पुरवित नाही. त्यामूळे महानगरपालिके त्याचा ताण पडतो.

**श्री. मधुकर सावंत :** विकास खर्च आपण कोणत्या नियमाखाली जमा करतो?

**सहा. संचालक न. र. :** विकास खर्च किती वसूल करावा किंवा करु नये याबद्दल शासनाचे कोणतेही निर्देश नाहीत. म. प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम १२४ ए टू जे पर्यंत आहे. त्यामध्ये जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी हे वसूल करण्याबद्दल आहे. प्रस्तावित प्रस्ताव विकास खर्चाबाबतचा आहे. विकास कार्य नियमावलीमध्ये आपण जे अंतर्गत विकास कामे करण्यासाठी परवानगी देतो तो त्यांनी करायला पाहिजे. विकास खर्च जो आपण वसूल करतो. तो मनपाच्या धोरणाप्रमाणेच करतो व त्याचे दर देखील आपण

ठरविलेले आहेत. सध्या आपण १४० रुपये प्रती चौरस मीटर प्रमाणे वसूल करतो. जुन्या गावठाणाला ते लागू नाही. गावठाणला लागून नवीन वसाहत असेल त्यांचेकडून वसूल करतो. सदर मिळकतही खडकेश्वर भागात असून, जुन्या गावठाणांपैकी असल्यासारखेच आहे. परिस्थिती थोडी तशी आहे. परंतू विकास योजनेमध्ये ते आर-२ झोन दाखविलेले आहे. अशा अनेक मिळकती आहेत की, ज्यामध्ये मुद्दा उपस्थित होतो की, त्यांचेकडून विकास खर्च घ्यायचा की नाही यासाठी आपणास धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. हा पुनर्विकास आहे. जुने बांधकाम पाडुन नवीन बांधकाम करताहेत. तिथे सुखसुविधा पुर्वीच उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. आणि पुनर्विकास आहे. अशा ठिकाणी अशा ठिकाणी आपण विकास खर्च वसूल करावा किंवा नाही याबाबत आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे.

**मा. सभापती** : आर-२ मध्ये असतांना जुने म्हणून सवलत द्यायची तर स. सं. न. र. म्हणून आपले काय मत आहे?

**सहा. संचालक न. र. :** उप संचलक नगर रचना यांच्या मताशी मी सहमत आहे. पुनर्विकासाच्या वेळी विकास खर्च घेवू नये असे अभिप्राय दिलेले आहेत.

**मा. सभापती** : जुने गावठाण आहे ते सर्व आर-१ मध्ये आहे. मग आर-२ कशाला म्हणता.

**सहा. संचालक न. र. :** उप संचालक नगर रचना यांच्या मताशी मी सहमत आहे. पुर्नविकासाच्या वेळी विकास खर्च होवू नये असे अभिप्राय दिलेले आहेत.

**मा. सभापती** : जुने जे गावठाण आहे ते सर्व आर-१ मध्ये आहे मग आर-२ कशाला म्हणता.

**सहा. संचालक न. र. :** महसूल अभिलेखात महसूल गावठाण जे दाखवलेले असते त्याला आपण आर-१ म्हणतो.

**मा. सभापती** : जेवढे जुने बांधकाम आहे तेवढया क्षेत्रापुरतीच सवलत देण्यात यावी.

**सहा. संचालक न. र. :** भूखंडाच्या संपूर्ण क्षेत्रासाठी एकतर आपल्याला विकास खर्च घ्यावा लागतो नाही तर पूर्ण माफ करावा लागतो. घेता येणार नाही.

**मा. आयुक्त** : जे जुने बांधकाम आहे ते पाडणार ज्यावर नविन बांधकाम करणार. विकास खर्च लावायला काही हरकत नाही. असे आयुक्त म्हणून माझे मत आहे.

**मा. सभापती** : जे जुने क्षेत्र आहे त्यावर सवलत दयायला हरकत नाही. त्यांना जर वाणिज्य वापर करायचा असेल तर, त्या क्षेत्रावरील फरकाची रक्कम महापालिकेकडे जमा करावी. वाणिज्य वापरासाठी जर ईमारत बांधत असेल तर त्याचे विकास खर्च घेण्यास हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नगर भूमापन क्र. २५९१ मो. खडकेश्वर मिल कॉर्नर या मिळकतीचे मुळनगर भुमापन आलेखावर १९७१ साली अस्तित्वात असलेल्या बांधकामाने व्यापलेले भूखंडाचे क्षेत्रावर फक्त विकास खर्च आकारणीत सुट देता येईल. तसेच त्यानंतरच्या क्षेत्रावर आणि भूखंडावर वाणिज्य अथवा तत्सम वापर केल्यास विकास खर्च रक्कमेत कोणतीही सुट दयेय होणार नाही असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजूरी आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २० :**

(स्थायी समिती सभा दि. १७-०५-२००४ विषय क्र. १६ वरील निर्णयाप्रमाणे)

संचालक प्राणी संग्राहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००४-२००५ या एका वित्तीय वर्षाकरीता, महानगरपालिका प्राणी संग्राहालयातील प्राण्यांकरीता बीफ खन्नी खरेदी करणे करीता निविदा मागविण्यत आल्या असता खालील प्रमाणे एकच निविदा प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नांव | भाव प्रति किलो |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल हमीद शेख हनीफ | रु. २२.०० |

वरील निविदा धारकाने मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनंतर वरील प्राप्त दर कमी करुन रु. १७/- प्रती किलो प्रमाणे पुरवठा करण्यास होकार दिलेला आहे.

एकच निविदा प्राप्त असली तरी सदर दर हे बाजार भावाचे तुलनेत अत्यंत कमी आहेत. त्यामुळे श्री. अब्दुल हमीद शेख हनीफ यांनी दिले रु. १७.०० प्र. किलो दर सन २००४-०५ (दि. ०१-०५-२००४ ते ३१-०३-०५) या कालावधीसाठी मान्यता देण्यास्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : ज्या तारखेपर्यंत खरेदीस मान्यता त्यानंतर किती तारखेपर्यंत आपण ती वाढवून देणार आहोत.

**श्री मधूकर सावंत :** खुलासा वैगेर होत राहील. परंतू मा. आयुक्तांच्या अधिकारात थोडे फार दिवस खरेदीचे अधिकार देण्यात यावेत. आणि त्याच्यामध्ये स्पर्धा होण्यासाठी व महानगरपालिकेची बचत होण्यासाठी रिकॉल करावे. यामध्ये १५ रुपये दराने मिळू शकते.

**संचालक (प्रा. स.) :** प्राणी संग्राहालयासाठी बीफ खरेदीसाठी जी निविदा मागविण्यात आली त्यात रु. २२/- प्रतिकिलो असे दर आले होते. मा. आयुक्तांकडे झालेल्या वाटाघाटीअंती रु. १७/- प्रतिकिलो प्रमाणे देण्याची तयार दर्शविली. म्हणून तसा प्रस्ताव सादर केला. जो पर्यंत मा. स्थायी समितीची मंजूरी होत नाही. तो पर्यंत खरेदी करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. निविदाधारकाने मा. न्यायालयात रिकॉल करु नये म्हणून रिट याचिका दाखल केलेली आहे. त्यात आदेश झालेले नाही.

**मा. सभापती** : या घटकेला न्यायालयाचे कुठलेच आदेश नाहीत. मा. न्यायालयाचे जे आदेश येतील ते आपण मान्य करु. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून ही निविदा रिकॉल करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार सदर प्रकरणात पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २२ :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता क्रांतीचौक ते पैठणगेट या रस्त्याचे भुसंपादन सन २००० मध्ये झाले. त्यावेळी न. भु. क्र. १४२४४, १४२४५, १४२४६ या मिळकतीचे बाधीत भाग निवाडयात सामाविष्ठ नव्हत्या. परंतु प्रत्यक्ष विकास योजना रस्त्याने बाधीत होत असल्याने उक्त मिळकतीचे बाधीत क्षेत्र संपादन केलेले आहेत. तर न. भू. क्र. १४२२० चे निवाडयाप्रमाणे बाधीत क्षेत्र ८०.४ चौ. मी. दर्शविले आहे.

परंतू प्रत्यक्षात १९८.९ चौ. मी. क्षेत्र रस्ता रुंदीकरणात संपादन झालेले. त्यामुळे (१९८.९-८०.४=११८.५ चौ. मी. क्षेत्राचा मोबदला द्यावा लागेल. उक्त मिळकतीचे बाधीत क्षेत्राबाबत धारकाने मोबदला मिळण्यासाठी मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली आहे.

सबब उपरोक्त मिळकतीचे बाधीत क्षेत्र व त्यांना द्यावयाचा मोबदला खालील प्रमाणे आहे.

| न. भु. क्र. | बाधीत क्षेत्र | सर्व वजावटी जाता द्यावयाचा मोबदला |
|---|---|---|
| १४२४४ | ६०.४० चौ. मी. | रु. ४,००,१५०/- |
| १४२४५ | ९०.६० चौ. मी. | रु. ६,००,२२५/- |
| १४२४६ | २८.०० चौ. मी. | रु. १,८५,५००/- |
| १४२२० | ११८.५ चौ. मी. | रु. ७,८५,०६०/- |
| | **एकूण रुपये** | **१९,७०,९३५/-** |

वरील प्रमाणे हितसंबंधीतांना द्यावयाचा मोबदला दोन टप्यात देणे असून, त्यापैकी पहिला हफ्ता ५०% संपादीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवज रजिस्ट्री करते वेळी उर्वरीत ५०% मोबदला संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे झाल्यानंतर द्यावयाचे आहे. तसेच उक्त संपादीत क्षेत्राचे रजिट्री करुन द्यावी लागेल. त्यासाठी रुपये ३,४२,१३०.०० (रुपये तीन लाख बेचाळीस हजार एकशे तीस मात्र) श्री. मोहम्मद वसील, सहा. अभियंता यांचे नांवे देणेस्तव व वरील प्रमाणे हितसंबंधितास द्यावयाचा मोबदला एकुण रक्कम रु. १९,७०,९३५/- (एकोणवीस लाख सत्तर हजार नऊशे पस्तीस मात्र) देणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता क्रांती चौक ते पैठणगेट या रस्त्याचे भुसंपादनात न. भू. क्र. १४, २४४, १४२४५, १४२४६ या मिळकतीचे बाधीत क्षेत्र निवाडयाप्रमाणे बाधीत क्षेत्र ८०.४ चौ. मी. दर्शविले आहे. प्रत्यक्षात १९८.९ चौ. मी. क्षेत्र रस्ता रुंदीकरणात संपादन केले असल्यामुळे (१९८.९-८०.४=११८.५) चौ. मी. क्षेत्राचा मोबदला खालील दर्शविल्याप्रमाणे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| न. भु. क्र. | बाधीत क्षेत्र | सर्व वजावटी जाता द्यावयाचा मोबदला |
|---|---|---|
| १४२४४ | ६०.४० चौ. मी. | रु. ४,००,१५०/- |
| १४२४५ | ९०.६० चौ. मी. | रु. ६,००,२२५/- |
| १४२४६ | २८.०० चौ. मी. | रु. १,८५,५००/- |
| १४२२० | ११८.५ चौ. मी. | रु. ७,८५,०६०/- |
| | **एकूण रुपये** | **१९,७०,९३५/-** |

वरील प्रमाणे हितसंबंधितांना पहिला हफ्ता ५०% संपादीत क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवज रजिस्ट्री करते वेळी व उर्वरीत ५०% मोबदला संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे झाल्या नंतर देण्यत यावे. तसेच नोंदणीकृत दस्तऐवजासाठी रुपये ३,४२,१३०.०० (रुपये तीन लाख बेचाळीस हजार एकशे तीस मात्र) श्री. मोहम्मद वसील सहा. अभियंता यांचे नांवे व एकुण मोबदला रक्कम रुपये १९,७०,९३५/- (एकोणीस लाख सत्तर हजार नऊशे पस्तीस मात्र) देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद मनपा अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या कें. प्रा. शाळा, मा. शाळा पैकी १४ इमारती मनपाने भाडेतत्वावर घेतलेल्या असून, त्यास भाडेसमितीची मान्यता आहे.

परंतु सदर बाबीस मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. या सबबीखाली संबंधितांना त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तारखेपासून इमारत भाडे अदा केलेली नाही. त्यामुळे संबंधितांनी भाडे अदा करण्यास्तव तगादा लावलेला आहे.

मनपाने भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतींचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | इमारत मालकांचे नांव | शाळेचे नांव | प्रतिमहा भाडे रुपये |
|---|---|---|---|
| १. | श्री. सिरजोद्दीन खान हमीद्दीन खान, बेगमपूरा | प्रा. शाळा बेगमपुरा (उर्दू) | ३०००/- |
| २. | अध्यक्ष, गणेश मंदीर व हनुमान मंदीर, गणेश कॉलनी | प्रा. शाळा गणेशकॉलनी (मराठी) | ५९०/- |
| ३. | अध्यक्ष रोषण मस्जिद किराडपूरा | के. प्रा. शाळा किराडपूरा नं. २ (उर्दू) | ७९०/- |
| ४. | अध्यक्ष नुतन कॉ. को. ऑप हौ. सो. नूतन कॉलनी | बालवाडी, अजबनगर कोकणवाडी | २०६/- |
| ५. | श्री. बाबासहेब सुदामराव चव्हाण न्यू. हनुमाननगर | प्रा. शाळा न्यू हनुमान नगर | ४४१६/- |
| ६. | श्री. एस. एल. भगत यशोधरा कॉलनी | प्रा. शाळा यशोधरा कॉलनी (डी. पी. ई. पी.) | ६९३४/- |
| ७. | जी. एम. इंगळे मुकूंदवाडी | प्रा. शाळा विठ्ठल नगर प्रकाश नगर | १०००/- |
| ८. | श्री. नंदू छोटीराम वाणी पडेगाव | प्रा. शाळा पडेगाव (डी. पी. ई. पी.) | २८८३/- |
| ९. | श्री. मो. अ. नासेर मो. अ. कादर बायजीपूरा | प्रा. शाळा बायजीपूरा | १२९९/- |
| १०. | श्री. मझहररुल हक किराडपूरा | के. प्रा. शा. किराडपूरा नं. २ | १०१९/- |
| ११. | अध्यक्ष जगदंबा मंदीर बेगमपूरा | के. प्रा. शाळा पहाडसिंगपूरा | २८७०/- |
| १२. | श्री. आर. टी. चव्हाण हर्सुल | बालवाडी राधास्वामी कॉलनी | २२५/- |
| १३. | श्री. उत्तम नारायण इंगळे, जयभवानीनगर | बालवडी जय भवानीनगर सिडको | २२८८/- |
| १४. | अध्यक्ष, बागवान जमातखाना पैठणगेट | के. प्रा. शाळा पैठणगेट | १६४६/- |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मनपा अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या कें. प्रा. शाळा, मा. शाळा आणि प्रा. शाळा पैकी १४ इमारती मनपाने भाडेतत्वार घेतलेल्या इमारतीस भाडेसमितीने मान्यता दिल्याप्रमाणे प्रस्तावातील अ. क्र. १ ते १४ मध्ये दर्शविल्यानुसार

प्रतिमहा भाडे ठरविण्यात आलेले भाडे देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच त्यांचेकडे जर मालमत्ता कर व इतर करांची थकबाकी असल्यास ते त्यांना देण्यात येणाऱ्या दयेयकातून वजा करुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळेचे विषय*

**विषय क्र. २४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज व विदयूत) यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दीत समाविष्ट सिडको वळण रस्त्याचे पूर्वेकडील विकसित भागात (मयुरपार्क व लगतच्या परिसरात) जलनि:सारण वाहीनीचे कामाकरीता २००३-२००४ चे अर्थसंकल्पात रु. २५.०० लक्षची तरतुद करण्यात आली होती. त्या कामाचे अंदाजपत्रकास/प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेत दि. २०-१२-०३ च्या सभेत मान्यता दिलेली आहे. त्या मंजूर ठरावा आधारे निविदा मागविण्यात आल्या. ह्या कामी ज्या रस्त्याचे जागेतून ड्रेनेज लाईन टाकावयाची आहे. त्या रस्त्याचे आखणीनुसार रस्त्याचे क्षेत्र संपादीत करावयाचे आहे. परिसर भूसंपादन करुन क्षेत्र ताब्यात घेण्यास लागणारा कालावधी व खर्च पाहता आता खाजगी जमीन संपादनासंबंधित जमिन मालक () कडून संमती () मिळवून मंजुर विकास योजनेनुसार रस्त्याची आखणी करुन घेवून संबंधिताकडून संमती पत्रा आधारे जमीन ताब्यात घेवून ड्रेनेज लाईन टाकण्यात येईल. याबाबत कार्यवाही कण्यात येत आहे.

ह्या कामामुळे या भागातील २१ विकसित वसाहतींना ड्रेनेज सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. या कामामुळे ह्या भागातील २९ मंजूर रेखाकनांना सुविधा उपलब्ध होईल. त्या रेखांकन मंजूरी पोटी महानगरपालिकेकडे रक्कम रुपये १,०३,३८,५८५/- विकास खर्च म्हणून जमा झाले आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणेच ड्रेनेज लाईन टाकण्याकरीता लागणाऱ्या क्षेत्रापूरते संबंधिकडून संमतीपत्र घेण्यात येत आहेत. पूर्ण लांबीकरीता क्षेत्र ताब्यात घेवून निविदा निश्चितीनंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल.

मा. सर्वसाधारण सभेने ह्या कामाचे प्रस्तावास संबंधित जमीन मालकाचे संमतीपत्र घेवून त्या आधारे जागा उपलब्ध झालेनंतरच काम करण्याचे कार्यवाहीस अधिन राहून प्रस्तावास मान्यता दिली आहे. अंदाजपत्रक मान्यतेनंतर ह्या कामाकरीता मंजूर विकास योजना रस्त्याने बाधीत जमीन मालकाकडून संमतीपत्र होण्याची कार्यवाही करण्यात येत असून, आता पर्यंत आठ संमतीपत्र प्राप्त आहे. दरम्यान दि. १०-०२-२००८ च्या स्थायी समिती सभेत ह्या बाबत चर्चा होवून प्राप्त निर्देशानुसार निविदा मागविण्यात आल्या. या कामी निविदा मागविल्या असता एकूण ११ निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे. रत्नगुरु कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ३३.३३५% कमी दराने |
| २ | मे. राणा कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा ३२.०७% कमी दराने |
| ३ | मे. शहा कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा २९.९६% कमी दराने |
| ४ | श्री. मन्नानखान | अं. प. दरापेक्षा २९.७८६% कमी दराने |
| ५ | मे. ऋषीकेश कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा २८.९९% कमी दराने |
| ६ | मे. हुमा कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा २७.७७% कमी दराने |
| ७ | मे. सोहेल सिध्दकी | अं. प. दरापेक्षा २७.५४% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ८ | मे. एस. एस. असोसिटस | अं. प. दरापेक्षा २३.५८% कमी दराने |
| ९ | मे. मेट्रो असोसिएट | अं. प. दरापेक्षा २२.८८% कमी दराने |
| १० | मे. के. डी. पाथ्रीकर | अं. प. दरापेक्षा २२% कमी दराने |
| ११ | मे. सुदेश कन्स्ट्रक्शन | अं. प. दरापेक्षा २५% कमी दराने |

त्यापैकी मे. रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ३३.३३५% कमी दराची निविदा मान्य करणे योग्य वाटते.

मा. सर्वसाधारण सभेची मान्यता व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही तसेच मा. स्थायी समितीचे निर्देशानुसार केलेली निविदा कार्यवाही पाहता सर्व संबंधीताकडून ड्रेनेज लाईन टाकण्याकरीताचे क्षेत्रासाठी संमतीपत्र घेण्यात येवून काम करण्यात येईल. निविदा मंजूरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : सदरील प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर करण्यात येतो. त्यांचेकडून २% अनामत रक्कम भरणा करुन घेवून सदरील काम तात्काळ सुरु करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दीत समाविष्ट सिडको वळण रस्त्याचे पुर्वेकडील विकसित भागात (मयुरपार्क व लगतच्या परिसरात) जलनिःसारण सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य जलनिःसारण वाहिनीचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३३.३३५% कमी दराची मे. रत्नगुरु कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणे सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. त्यांचेकडून २% अनामत रक्कम भरणा करुन घेवून सदरील काम तात्काळ सुरु करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मे. सरस्वती महिला विविध उदयोग औदयोगिक सहकारी संस्था लि. जळगांव यांनी सहकार कायदयाखाली व कामधेनू योजने अंतर्गत नोंदणीकृत महिला संस्था असून समाजातील गरीब, विधवा, अपंक व घटस्फोटीत महिलांना (जवळ जवळ ४०० ते ५०० महिलांना) शिलाई चेक मा मिळवून देण्याचे तसेच सुशिक्षित बेरोजगारांना रोजंदारी देण्याचे काम करीत आहे. मे. सरस्वती महिला विविध उदयोग संस्था लि. जळगांव यांना तयार गणवेश पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते. तथापि संबंधित एजन्सीने निकृष्ट दर्जाचे गणवेश पुरविल्याने संबंधित एजन्सीचा समावेश काळया यादीत करण्यात आला होता. संबंधितांनी दिनांक १९-०५-२००४ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, संस्थेने महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी कामे केलेली असून, सर्व ठिकाणी उत्कृष्ट काम केल्याचे प्रशस्तीपत्र जळगांव जिल्हा यांनी दिलेला आहे. तसेच अर्जदार संस्थेने भविष्यात निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरवठा करण्यात येणार नाही. याची लेखी हमी दिली आहे.

मे.सरस्वती महिला विविध उदयोग औदयोगिक सहकारी संस्था लि. यांचे नांव काळ्या यादीमधून काढून टाकणेबाबत त्यांनी विनंती केली आहे. करीता मा. स्थायी समितीच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. आयुक्त** : शासनाकडून लेखी पत्रही आलेले आहे.

**मा. सभापती** : ही संस्था समाजातील गरीब, विधवा व अपंग व घटस्फोटीत महिलांना तसेच सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे काम करते. भविष्यात या संस्थेचे काम मिळण्यास अडचण देवू नये. या अटीवर हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. संस्थेची अनामत रक्कम परत करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे. सरस्वती महिला विविध उदयोग औदयोगिक सहकारी संस्था लि. जळगांव ही संस्था समाजातील गरीब, विधवा, अपंग व घटस्फोटीत महिलांना तसेच सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे काम करते या बाबींचा विचार करता भविष्यात या संस्थेस काम मिळण्यास अडचण येवू नये. याचा सहानूभूतीपूर्वक विचार करुन औरंगाबाद मनपामध्ये तीन वर्ष त्यांना काम देण्यात येवू नये. या अटीवर मे. सरस्वती महिला विविध उदयोग औदयोगिक सहकारी संस्था लि. जळगांव या संस्थेचे नांव काळया यादीतून (ब्लॅक लिस्ट) काढुन टाकण्यास व त्यांची अनामत रक्कम परत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे जाधववाडी, येथील सर्वे क्र. १० मधुन आंबेडकर स्मशानभूमी विस्तारासाठी १५ गुंठे जमिन मिळकत धारकाकडून खाजगी वाटाघाटीने संपादन करावयाचे असून, मिळकत धारक १) श्री. महंमद कासीम अली शहा पिता शफी, २) श्री. महंमद कमरोद्दीन पिता शफी, ३) श्री. महंमद इब्राहीम पिता शफी यांचेतर्फे जीपीए व स्वत: ४) श्री. जैनुद्दीन उर्फ पाशु पितामो. शफी यांना द्यावयाचा मोबदला रु. १५,४१,५५०/- (रुपये पंधरा लाख एक्केचाळीस हजार पाचशे पन्नास फक्त) निश्चित केला आहे. सदरील मोबदला दोन हफ्त्यात द्यावयाचे असून, पहिला हफ्ता ५०% खरेदीखत करते वेळी व दुसरा हफ्ता संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांव ७/१२ वर नोंद करुन दिल्यानंतर द्यावयाचे आहे. तथापी मोबदल्याचा पहिला हफ्ता देण्यापुर्वी मालकीबाबत तसेच वक्फ बोर्डाचा काही हिस्सा दयावा लागेल. काय या सर्व बाबींची शहानिशा करण्याच्या अटीवर तसेच स्मशानभूमी विस्तारीत करते. वेळी मालकी हक्काबाबत कोणी वाद निर्माण केल्यास मिळकत धारकाने सदर वाद स्वखर्चाने निपटारा करावा किंवा घेण्यात आलेला मोबदला व्याजासह परत करणे अशी अट खरेदी खतामध्ये टाकण्यात येईल.

तसेच उपरोक्त संपादीत जागेचे खरेदीखत करुन घेणेसाठी रु. ४,५४,५००/- (रु. चार लाख चोपन्न हजार पाचशे फक्त) खर्च अपेक्षीत आहे. सदर रक्कम अग्रीम म्हणून श्री. एस. एस. गायकवाड, दुय्यम आवेक्षक यांना देणेस्तव आणि संबंधित जमिन मालकास वरील प्रमाणे दयावयाचा मोबदला देणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे जाधववाडी, येथील सर्वे क्र. १० मधुन आंबेडकर स्मशानभूमी विस्तारासाठी १५ गुंठे जमिन प्रस्तावात नमूद केलेल्या मिळकत धारकाकडून खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यास व ठरविलेली मोबदल्याची रक्कम रु. १५,८१,५५०/- निश्चित करण्यास आणि सदरील रक्कम पहिला हफ्ता ५०% खरेदीखत करते वेळी व दुसरा

हफ्ता संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांव ७/१२ वर नोंद करुन दिल्यानंतर तसेच पहिला हफ्ता देण्यापूर्वी मालकी बाबत तसेच वक्फ बोर्डाच काही हिस्सा द्यावा लागेल. काय या सर्व बाबींची शहानिशा करण्याच्या अटीवर तसेच स्मशानभुमी विस्तारित करते वेळी मालकी हक्कबाबत कोणी वाद निर्माण केल्यास मिळकतधारकाने सदर वाद स्वखर्चाने निपटारा करावा किंवा घेण्यात आलेला मोबदला व्याजासह परत करणे अशी अट खरेदी खतामध्ये टाकण्यास आणि खरेदी खत करुन घेणेसाठी रु. ४,५४,५००/- अग्रीम श्री. एस. एस. गायकवाड दुय्यम आवेक्षक यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**चर्चा :**

**मा. सभापती** : जपान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लाइफ सेव्हिंग चँपीयनशीप स्पर्धेकरीता राष्ट्रीय लाईफ सेव्हींग सोसायटी इंडीया तर्फे भारतीस संघाचे प्रशिक्षिक म्हणून श्री. धनंजय फडके प्रशिक्षिक, सिध्दार्थ जलतरण तलाव यांची निवड झालेली आहे. यासाठी उपस्थित राहणे करीता एकंदर रु. ८०,०००/- खर्च अपेक्षीत असून, राष्ट्रीय लाईफ सेव्हींग सोसायटीतर्फे निम्मा खर्च रु. ४०,०००/- करण्यात येणार असून, उर्वरीत ५०% खर्च महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत करण्यास व स्पर्धेकरीता प्रशिक्षक म्हणून जपान येथे जाण्यासाठी मान्यता देण्यात येते.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०७-०६-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक ०७-०६-२००४ रोजी मा.सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०४.०० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३. | स. स. श्री. साळवे माणिक लक्ष्मणराव | -//- |
| ४. | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ५. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ६. | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फारयार खान | -//- |
| ७. | स. स. श्री. प्रल्हाद निमगांवकर | -//- |
| ८. | स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ९. | स. स. श्री. पारे सोपान भाऊराव | -//- |
| १०. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ११. | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| १२. | स. स. श्री. भगवान रगडे | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : बैठकीत अगोदर चर्चा घेण्यात येईल. उस्मानपूरा प्रभागात वॉर्ड क्र २५ मध्ये निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे या भागातील कोणताही विषय या सभागृहात घेता येणार नाही. स. सदस्यांनी कृपया दक्षता द्यावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** मोंढा नाका भागात फळांचे स्टॉल लावण्यात आले. मागील सभेत या संदर्भात चर्चा केलेली होती. माहिती घेवून या बैठकीत सादर करणार होते. माहिती देण्याची सूचना करावी.

**प्रशासकीय अधिकारी :** जालना रोड मोंढा नाका भागात ज्या फळांच्या दुकाना आहेत. तो रस्ता बी. अँड सी. चा असल्यामुळे त्याची जिम्मेदारी बी ॲण्ड सी वर आहे. अहवाल मागील आठवडयात दिलेला आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** तेथील दुकाने लिगल आहेत का, मनपाच्या हद्दीत येते. काढू शकत नाही का, कार्यवाही होत नसेल तर बाबा पेट्रोल पंप ते मोंढा नाका भागातील टपऱ्या टाकल्या तर ते मान्य करणार का, जेथे खाजगी जागेवर २० बाय ३० फुटाचे प्लॉट होतात ते खाजगी मालकाची जागा असते त्यावर सुध्दा कार्यवाही करण्यात येते. मोठया प्रमाणात अतिक्रमणे होवू दयायचे का, ती जागा खाजगी मालकाची असतांना का कार्यवाही करण्यात येते. खाजगी जागेवरील अनाधिकृत बांधकाम का तोडतात.

**प्रशासकीय अधिकारी :** संबंधितांना नोटीस दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे कार्यवाही करता येईल.

**श्री. संजय शिरसाठ :** प्रशासकीय अधिकारी दोन प्रकारची उत्तर देत आहेत. जागा सा. बा. विभागाची व नोटीस मालकाला नेमकी जागा कोणाची आहे ते खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकीय अधिकारी :** जी फळांची दुकाने आहेत. त्यात अर्धा भाग रस्त्याचा म्हणजे बी ॲण्ड सी चा येतो. १४५ फुट रस्ता आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** १५ दिवस निघून गेले कार्यवाही नाही. विना परवानगी फळांचे स्टॉल आहेत. उदयाच ते स्टॉल काढण्यात यावे असे सभागृहाच्या वतीने सूचना आहे. त्यांना संधी देण्याचे कारण नाही. अनाधिकृत घरे का तोडण्यात येते. अगोदर त्या काढा बाकीचे नंतर काढा.

**मा. सभापती** : अतिक्रमण नियंत्रणात आणावे.

**श्री. संजय शिरसाठ :** महाराष्ट्र राज्याचे माजी अर्थमंत्री व एक अभ्यासू खासदार, आमदार म्हणून राहीलेले स्व. श्रीकांत जिचकार यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** यास माझे अनुमोदन आहे.

(यावेळी सभागृहात स्व. श्रीकांत जिचकार यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. भगवान रगडे :** मागील बैठकीत अतिक्रमण, अनाधिकृत बांधकामाबाबत चर्चा झालेली होती. ब्रिजवाडी भाग हा पूर्णतः सरकारी जमिनीवर आहे. स्लम घोषीत आहे. एका व्यक्तीने रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे. ते अतिक्रमण काढणे बाबत चर्चा केलेली होती. पान क्र. १४ वर संवाद आलेला आहे. ते अतिक्रमण काढण्याबाबत आपण सुचना दिल्या होत्या. कार्यवाही केली का, खुलासा घेण्यात यावा.

**मा. सभापती** : प्रशासकीय अधिकरी यांनी खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी :** अतिक्रमण काढण्यासाठी कर्मचारी गेले असता संबंधित व्यक्तीने न्यायालयाचे जैसे थे आदेश दाखविले त्यामुळे पुढील कार्यवाही होवू शकली नाही. न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. २० बाय १५ फूट एवढी जागा आहे.

**श्री. भगवान रगडे :** सरकारी जमीन आहे. मोजमाप आहे का, छोटया जागेवर स्टे असेल. संपूर्ण जागा त्याच्या हवाली करायची का, किती जागेवर स्थगिती आहे. स्थगिती दिली का? स्लम विभागात आठ महिन्यापासून ही संचिका होती. अनेक दिवसांपासून प्रश्न मांडतो. पत्र देतो पण कार्यवाही होत नाही. स्थगिती आदेश नंतर आणलेला असेल. त्यापुर्वीच कार्यवाही का केली नाही.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा. स्थगिती आदेश किती जागेसंबंधी आहे.

**विधी सल्लागार :** आताच अधिकाऱ्यांनी खुलासा केलेला आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. जागेसंबंधीची सद्यस्थिती काय आहे त्याची तपासणी करुन आजच्या बैठकीत सांगता येणार नाही. पुढील बैठकीत तपासून सांगतो.

**श्री. संजय शिरसाठ :** आपले म्हणणे दाखल करेपर्यंत जैसे थे आदेश असतो. आपण म्हणणे (से) दाखल केले आहे का?

**विधी सल्लागार :** यासंबंधी न्यायालयाने म्हणणे दाखल करेपर्यंत जैसे थे चे आदेश दिले आहे. या प्रकरणी न्यायालयतील सद्य:स्थिती काय आहे. हे न्यायालयीन संचिका पाहून सांगणे योग्य होईल. संचिकेची माहिती घेण्यात येईल.

**मा. सभापती** : विधी सल्लागार यांनी यासंबंधी उदयाच्या उद्याच माहीती घेवून प्रशासकीय अधिकारी यांना सांगून प्रकरणात आवश्यक ती कार्यवाही करावी. माहिती घेवून प्रशासकीय अधिकारी यांना कळवावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सातारा भागात शिवाजीनगर परिसर हा सिडकोची स्कीम ११, १२ रेल्वे रुळाला लागून येतो. सन २००० च्या मनपाच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्यावेळेस हा भाग मनपाच्या हद्दीत येत नाही. म्हणून तेथील नागरिकांची नांवे मतदार यादीत झालेली नव्हती व त्यांना मतदान सुध्दा करता आलेले नाही. म्हणून तेथील नागरिकांनी काही तक्रारी दिल्या की, १९९५ च्या निवडणुकीमध्ये आम्ही मतदान केलेले आहे. सन २००० च्या सार्वत्रिक निवडणूका होत असतांना हा भाग तत्कालीन आयुक्त श्री. बलदेवसिंग यांनी मनपा हद्दीत येत नाही म्हणून या भागातील नागरिकांना मतदानापासून वंचित राहावे लागेल. जो भाग मनपा हद्दीत येत नाही त्या भागासाठी मनपा कर आकारते का? दुकाने असेल, हॉटेल असेल त्यांना लायसन्स देण्यात येते का? त्या भागात जकात वसूली करतो. दुकान परवाना दिला जातो का? ज्यांना दिला जातो त्यांनी नुतनीकरण केलेले आहे का? तेथील एका नागरिकांने दि .०२-०३-२००० ला या संदर्भात न्यायालयात रिट पीटीशन दाखल केलेले होते. त्यांचा नंबर ५९१/२००० आहे. हा भाग मनपामध्ये येत नाही असे मनपाने स्पष्ट मत मांडलेले होते व जाहीर प्रगटन काढले त्यात सुध्या हा भाग वगळलेला होता. हा भाग निश्चित सिडको की, मनपाचा आहे. तेथे सुविधा दिल्या जातात की नाही याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : हा भाग मनपा हद्दीत येतो का? या भागातील विक्रेत्याकडून जकात तसेच हॉटेल दुकान परवाना देण्यात येतो का? याबाबत मनपाचे धोरण काय आहे.

**विधी सल्लागार :** आताच जो विषय चर्चेला आला त्याची सविस्तर माहिती देता येणार नाही. परंतू शिवाजीनगर स्कीम नं. ११, १२, हा भाग जेव्हा मनपाच्या २००० च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी तेथील नागरिकांची नांवे मतदार यादीत समाविष्ट केली नव्हती व महानगरपालिका हद्दीत नव्हते. या भागातील नांवे समाविष्ट का केली नाही म्हणून रिट याचिका मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेली होती. मनपा हद्दीत हा भाग येत नाही. हे मनपाने स्पष्ट केलेले होते. तो भाग मनपा हद्दीत येत नाही म्हणून नांवे समाविष्ट केलेली नव्हती. त्यावर मा. उच न्यायालयाने हा भाग मनपा हद्दत येत नसला तरी या भागासाठी स्वतंत्र नगरपालिका किंवा स्वतंत्र नगरपंचायत करता येईल का याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्याचे आदेश केलेले होते. शासनाकडून पाठपूरावा करुनही अदयाप काहीही निर्णय प्राप्त झालेले नाही. न्यायालयाने ही याचिका निकाली काढलेली आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** यासंबंधी सविस्तर माहिती पुढील बठकीत सभागृहाला देण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सन २००० मध्ये पिटीशन दाखल झाल्यानंतर चार वर्षे होत आहेत. यात महानगरपालिकेवर जबाबदारी टाकलेली होती. जबाबदार संस्था आहे. शासन स्तरावर कार्यवाही करण्यात आलेली नाही. शिवाजी नगर हा भाग गारखेडा परिसरात येतो. बीड बायपास रस्ता आहे. जो माल शहरात येतो तो नाका याच भागात आहेत. जकात कर वसुल केला जातो. न्यायालयाने जे आदेश दिलेले होते. त्याची दखल घेतलेली नाही हा माझा मुद्दा आहे.

**करमूल्य निर्धा अधिकारी :** या भागातील घरांना कर आकारणी झालेली नाही. कोणताही कर वसुल केलेला नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पुन्हा एकदा खेद व्यक्त करावा वाटतो. २००० मध्ये रिट याचिका दाखल झालेली होती. चार वर्ष सदर याचिका निकाली निघालेली आहे. म. उच्च न्यायालयाने शासन व मनपा यांनी याबाबत निर्णय घ्यावा असे निर्देश दिलेले असतांना प्रशासनाने काहीच कार्यवाही केलेली नाही. त्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. मालमत्ता कराचा प्रश्न दुय्यम आहे. मनपाची हद्द निश्चित करुन घेतली का, जकात नाका आहे का, कोठे आहे. कर घ्यावे व सुविधा दयावी. सन २००० रीट याचिका निकाली निघाली. आपणांस बाजू मांडण्यासाठी नकाशा मंजूर करुन दयावा लागतो. उदा. सिडकोचे एन-२, एन-३ चे सुधारीत विकास योजनेस सन २००२ ला सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. आम्हीच जबाबदारी घेतली का प्रशासनाची जबाबदारी नाही का प्रशासनाने प्रशासनाचे काम केले पाहीजे. अधिकारी/कर्मचारी यांना पगार कशासाठी देतो. प्रशासनाची जबाबदारी काय असते ते समजावून घेतले पाहिजे. चार वर्षात कार्यवाही होत नसेल तर, लोकप्रतिनिधींनी कुठपर्यंत लक्ष ठेवायचे.

**जकात अधिक्षक :** शिवजीनगर रेल्वेरुळाच्या दक्षिणेकडे मनपाची हद्द येत नाही. जागा निश्चित करण्यासाठी स. स. न. र. यांना पत्र दिले. सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात त्या परिसरातील लोकांकडून जकात घेतलेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जकात वसूली केली. जकात अधिक्षक यांचे अभिनंदन करतो. तेथील नागरिकांची हद्द निश्चित नाही. तो मुख्य रस्ता आहे. जास्त जकात वसूल व्हावयास पाहीजे. असे माझे मत आहे. जकातीचे मोठया प्रमाणात उत्पन्न या नाक्यावरुन मिळू शकते. याकडे प्रशासनाने लक्ष दिले नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

**मा. सभापती** : चार वर्षाचा वेळ निघून जातो. मा. उच्च न्यायालयाने निर्देश देवूनही सदर भाग नक्की कोणत्या हद्दीत येतो. याची दखल घेतलेली नाही. तेथे सोयी सुविधा देण्याचा प्रश्न निर्माण होतो. गंभीर बाब आहे. चार वर्षात कार्यवाही केलेली नाही. पुढील बैठकीत प्रशासनाने सविस्तर अहवाल दयावा.

**श्री. संजय शिरसाठ :** गेल्या आठवडयात महानगरपालिकेच्या संदर्भात वेगवेगळया अशा बातम्या आलेल्या आहेत. गेल्या वर्षभरात आरोग्य समितीचा मी सदस्य होतो. एक बैठक झाली. वृत्तपत्रात आले. ९५% खादयपदार्थ विक्रेते विना परवाना आहेत. असे परवाना आहेत असे सर्वेक्षणामध्ये आढळून आले. शहागंज भागातील विक्रेत्यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना बदडले. हे सत्य आहे का, असेल तर, पोलीसात तशी तक्रार केली आहे का? खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : यात दोन तीन मुदयांवर खुलासा करावा. १) किती खाद्य पदार्थ विक्रेत्यांना परवाने दिले किती अनाधिकृत आहेत. २) दोन तीन दिवसांपूर्वी फळ विक्रेत्यांनी अधिकाऱ्यांना मारहाण केलेली आहे का, त्यानंतर काय कार्यवाही करण्यात आली. ३) जाधववाडी भागातील रासायनिक प्रक्रिया करुन पिकविलेली फळे जप्त केलेली होती. ती मोहीम शहागंज भागात काही लोकांनी उधळून लावली. यशस्वी होवू दिली नाही. त्याबद्दलही खुलासा करण्यात यावा.

**आरोग्य वैदय. अधिकारी :** शहरात ४०२५ परवानाधारक आहेत. ते अल्प प्रमाणात आहे. शहरात खाजगी संस्थेमार्फत सर्वेक्षण करण्याचे काम चालू अून, २५ तारखेपासून सुरु केलेल आहे. झोन क्र. ५ चा सर्वे झालेला असून, २२५९ खादय अन्न हॉटेल्सचा सर्व्हे केला. आता झोन क्र. ६ चा सर्व्हे चालू आहे. यात परवानाधारक फक्त १०१ आढळून आले. अहवाल दररोज प्राप्त होतो. विभाग क्र. ५ मध्ये विभागीय अधिकाऱ्यांमार्फत २०० लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत. कागदपत्रांची पूर्तता करुन परवाने दयावे म्हणून काही लोक मला प्रत्यक्ष भेटले. त्यांना सांगण्यात आले. सर्वेक्षणातून असे दिसून येईल की, किमान १० हजार विना परवानाधारक असतील. त्यांनी वेळीच परवाने घेतले नाही तर रितसर कार्यवाही होईल. अन्न भेसळ प्रतिबंध कायदा १९५४ नुसार कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : विभाग क्र. ५ चा विचार केल्यास फक्त ५% लोकांकडे लायसन्स आहेत असे दिसून येते.

**आरोग्य वैदय. अधिकारी :** विभाग क्र. ५ मध्ये फक्त १०१ लोकांकडे खादय पदार्थ विक्रेते म्हणून लायसन्स आहेत. १८ लोकांकडे लायसन्स नाहीत.

**मा. सभापती** : अधिकाऱ्यांना मारहाण झाली त्याचा खुलासा करावा.

**आरोग्य वैदय. अधिकारी :** जाधववाडी आझाद मार्केट लक्की फुट कंपनी यांचे दुकानात रासायनिक प्रक्रिया करुन आंबे पिकवीत असल्याचे निर्दशनास असल्याने अन्न भेसळ विभागाचे स्वच्छता निरिक्षक यांचे सहा. आयुक्त मनपाचे चार आरोग्य निरिक्षक व मी स्वतःच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली असता रासायनिक प्रक्रीया करुन आंबे पिकवत असल्याचे आढळून आले. ३०००/- रुपये किमतींचे आंबे जप्त करुन मनपाच्या वाहनात टाकले. त्यानंतर शहागंज भागात झोन क्र. ८ च्या बाजूला शे. रफीक यांचे दुकानावर छापा टाकल्यावर १०-१५ क्विंटल आंबे रासयनिक प्रक्रीया करुन पिकवित असल्याचे दिसून आले. याबाबत पंचनामा करुन आंबे गाडीत टाकणार होतो. अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अन्न निरिक्षक पंचनामा करीत असतांना गाडी व्यवस्थित लावतांना आंबे गाडीत टाकतांना मी विभागीय कार्यालयात गेलो होतो. मारहाण फक्त पंचनामा करीत असतांना अन्न निरिक्षकास झालेली आहे. त्यानंतर मोठया प्रमाणात जमाव जमला. नंतर आंबे आणि दगड फेकण्यास सुरुवात केली. मी झोन क्र. ८ मध्ये होतो. मनपाने स्वच्छता निरिक्षण पण होते. झोन क्र. ८ मध्ये दक्षिणेकडील काचा फुटलेल्या आहेत. त्याचा अहवाल दिलेला आहे. या प्रकरणी रितसर तक्रार केलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** या शहरात आंब्यावर रासायनिक प्रक्रीया होते हे आपणांस कळाल्यानंतरच धाड टाकण्यात येते. अन्न निरिक्षक पंचनामा करीत होते. आपण झोनमध्ये जाऊन बसलात. हा भाग वेगळा. या आंब्यामुळे जनतेला स्लो पॉयझनींग होते. एका निरिक्षकाला मारहाण झाली हा भाग नाही. रासायनिक प्रक्रीया होते. याबाबत आता काय कार्यवाही चालू आहे. या संदर्भात खुलासा करावा.

**मा. सभापती** : या संदर्भात आपले पुढील नियोजन काय आहे. आपण गुन्हा दाखल केला. परंतू यापुढे अशा प्रकारला बळी न पडता कार्यवाही करावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** ५ तारखेला पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला. यापुर्वी अशी कार्यवाही करतांना प्रतिकार झालेला नव्हता. यानंतर एफ. डी. ए. तसेच पोलीस यंत्रणेसह जाणार आहोत. ही कार्यवाही थांबणार नाही चालू राहील.

**मा.सभापती** : अशी कार्यवाही करावयाची झाल्यास पोलीस पथक बरोबर घ्यावे अशा प्रकाराला बळी पडू नये. मारहाणीची कर्मचाऱ्यांनी बाळगू नये. नसत व्यापाऱ्यांचे मनोधैर्य वाढेल. ही कार्यवही विहीत कालावधीतच करावी लागणार आहे. आंब्याचा हंगाम आता चालू आहे. वेळीच कार्यवाही व्हावी.

**उपआयुक्त (प्र.) :** ज्या प्रमाणे कार्यवाही झाली ही पूर्वी प्रमाणेच कार्यस्तराहील. सिटीचौक पोलीस स्टेशनचे पत्र देखील मनपास प्राप्त झले की, ज्या दिवशी छापा टाकणार असेल व पोलीस पथक आवश्यक असेल तर, एक दिवस अगोदर कळवावे म्हणून लेखी पत्र पोलीस विभागाकडुन आलेले आहे. यापुढे असे छापे टाकण्याचे कार्य चालुच राहील. व ते यशस्वी करण्याचे प्रयत्न प्रशासनाचे राहतील.

**मा. सभापती** : नाक्यांवर आंब्याच्या गाडया येतात. तेथेच तपासणी करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** एक काळच्या बाबत अशी कार्यवाही करावयाची आल्यास इतर बाबतीत आरोग्य विभाग कार्यवाही करेल का? सर्व्हे केला. साधे खादयपदार्थ विक्रेते यांना आरोग्य विभाग लायसन्स देवू शकत नाही ही खेदाची बाब आहे. केवळ आंब्याची गाडी थांबविता येणार नाही. जकात अधिक्षक यांनी पैसे घेतले असे आरोप होऊ शकतात. कच्चा माल असतो. नंतर रासायनिक प्रक्रिया केली जाते. २२५९ लोकापैकी २१५८ लोकांनी खादय पदार्थ विक्रीचे लायसन्स घेतलेले नाही. फक्त १०१ लोकांकडे लायसन्स आहे. २०० लोकांना नोटीसा दिल्या असे सांगण्यात आहे. २००० लोकांना केव्हा नोटीसा पाठविणार आहोत.

**आरोग्य वैदय अधिकारी :** लायसन्स देण्यासाठी मनपात स्वतंत्र कक्ष स्थापन केलेला आहे. ३ ते ४ खादय पदार्थ विक्रेत्यांना नोटीसा पाठविण्यासाठी तयार आहोत. २०० देण्यात आलेल्या आहेत.

**श्री. इलियास किरमाणी :** शहरात दूध येते. यापुर्वी छापे टाकण्यात आले होते. सध्या त्या बाबतीत कार्यवाही का येत नाही. सर्रासपणे शहरात त्याच कंपनीचे दुध विक्री होत आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** पोलीस कार्यवाही करुन चालणार नाही. विषबाधा झाल्यास नागरिकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. यास जबाबदार कोण. पथके स्थापन करावी. दररोज तपासणी व्हावी. तसे सभागृहाच्या वतीने आदेश देण्यात यावेत.

**मा. आयुक्त** : असे लक्षात आले की, शहरातील विविध अन्न खादय पदार्थ यांचे जे किरकोळ विक्रेत्यांचे स्टॉल आहेत. यापासून मनपास अपेक्षित असे उत्पन्न मिळत नाही. परवाना धारकांचे संख्या अत्यल्प आहे. आरोग्य विभागाकडे अदयावत माहिती नाही. दोन चार दिवसात माहिती मिळण्यासारखी परिस्थिती नव्हती. पुष्कळ लोक व्यवसाय करतात. प्रत्येकावर कार्यवाही करणे शक्य होत नाही. सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात माहीती भरुन दयावी. खादय पदार्थ परवाना नाही. त्यांना परवाना घेण्यास भाग पाडणे किंवा कार्यवाही करणे. याबरोबरच शासनाचा अन्न भेसळ विभाग हा सुध्दा सतर्क आहे. त्या विभागाला असलेले अधिकार व जबाबदारी व

त्यांचेकडे असलेले अन्न निरिक्षक, कर्मचारी संख्या हे सर्व विचारात घेता त्या विभागाचे जे वरीष्ठ अधिकारी आहेत. त्यांना बोलावून घेवून ही सर्वेक्षणाची कार्यवाही प्रत्यख राबविण्यात येत आहे. सर्वेक्षण करण्यासाठी रितसर निविदा सूचना काढलेली होती. अटी शर्ती व बाबींचे पालन करण्यास तयार असलेल्या एका संस्थेस हे काम दिलेले आहे. एकाच झोनमध्ये सर्व स्पष्ट होते की, कितीतरी पट विना परवानाधारक असून, व्यवसाय करतात. म्हणून स्थापन करण्यात येतो. असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिले त्यांचे दृष्टीने त्या ठिकाणी एक परंतू कामाचा व्याप लक्षात घेता एक कक्षाद्वारे हे काम करणे शक्य नाही. असे मी आरोग्य वैदयकीय अधिकारी यांना सूचना केलेल्या आहेत. दोन-तीन कक्ष करावे लागतील. कार्यालयानी वेळेच्या व्यतिरिक्त जो वेळ असतो दोन-तीन तास त्या वेळेत सुध्दा काम करावे लागेल व जेवढया लवकर परवाने देता येतील ते दयावे लागतील. नोटीस तयार करणे त्या वाटप करणे. विक्रेत्यापर्यंत पोहचविणे कामास वेळ लागणार आहे. कर्मचारी जास्त असतील जेथे सर्व्हे झाला तेथील विक्रेत्यांना नोटीस जाण्याच्या अगोदर परवाना घेण्यासाठी स्वतःहून मागणी केली. पाहिजे अशी भावना झालेली आहे. त्यांनी स्वतःहून परवानाग्यासाठी अर्ज भरुन परवाना घेतला पाहीजे. शिवाय परवाना घेतल्यानंतर सुध्दा खाद्यपदार्थ, अन्नपदार्थ विक्रेत्याने अटी व शर्तीचे पालन करुनच विक्री केली पाहिजे. याकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे. नियमाचे पालन कटाक्षाने होणे आवश्यक आहे. सर्वेक्षण लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. ३० दिवसांची मुदत अपूर्ण पडू शकते आणखी त्यापेक्षा जास्त दिवस लागतील. परंतू सर्वेक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. ज्या काही नोटीसा तयार आहेत. त्यापाठवून दयाव्यात. ते करुनही परवाना घेण्याची इच्छा ज्या विक्रेत्यांची नाही अशा लोकांवर उपआयुक्त (प्र.) यांनी जातीने लक्ष देवून कार्यवाही करावी. प्रत्येक आठवडयाचा अहवाल घेणे आवश्यक आहे. अतिशय मोठे उत्पन्न या विभागापासून मिळू शकते. होणारी कार्यवाही वेळोवेळी या सभागृहाला सादर होईल.

**श्री. इलियास किरमाणी :** बरेच खादयपदार्थ विक्रेते परवाना घेण्यासाठी अर्ज घवून येतात. अटी शर्ती शिथिल कराव्यात जेणे करुन सर्वच विक्रेते परवाने घेतील. मनपाचे उत्पन्नात भर पडेल. विक्रेते पैसे भरणा करण्यास तयार आहेत.

**मा. सभापती** : अटी शर्ती काही प्रमाणात शिथिल कराव्यात. बरेच खादयपदार्थ विक्रेते परवाना घेतील. काही ठिकाणी अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसते. निश्चित धोरण ठरवावे व तसे जनतेला जाहीर प्रगटनाद्वारे कळवावे. शहरात येणारे दुधाची तपासणी करण्याची कार्यवाही थंडावलेली आहे. त्या बाबतीत तपासणी मोहीम होती घ्यावी.

**श्री. सोपान पारे :** शहरात मोबाइलचे टॉवर्स किती आहेत. अधिकृत/अनाधिकृत किती खुलासा करण्यात यावा.

**उप अभि. (न. र. ) :** संबंधित संचिका लगेच मागवून घेतो आता निश्चित उत्तर देता येणार नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** मागील बैठकीत शिक्षण विभागाच्या संदर्भात बरीच चर्चा झाली. शाळेचा विषय गंभीर आहे. शिक्षणाधिकारी यांची बदली झाली. मनपाच्या शाळांमध्ये क्रिडा किती आहे व कोठे काम करतात. खुलासा घेण्यात यावा.

**सौ. शाहीन जफर :** क्रिडा शिक्षक किती पाच-सहा शिक्षक त्यापैकी मुख्याध्यापक झाले. श्री. जाधव, श्री. भूमकर निवडणूक कामासाठी गेले तर पुन्हा मनपात हजरच आले नाही. श्री. चव्हाण नावाचे शिक्षक यांना मुख्याध्यापक करण्यात आले. सांस्कृतीक अधिकारी पदावर क्रिडा शिक्षक श्री. साळवे यांना चार्ज दिला. खेळ घेण्यासाठी शाळेत एक तास असतो. विदयार्थ्यांचे खेळ बंद झाले. क्रिडा शिक्षक नाही. जे शिक्षक क्रिडा शिक्षक होते. त्यांना मुख्याध्यापक होता येते का? असे झाल्यास विदयार्थ्यांची प्रगती कशी होणार यास कोण जबाबदार राहणार आहे? तसेच किती शिक्षकांना घरासाठी कर्ज दिलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे ५० कर्मचाऱ्यांना घर कर्ज म्हणून दिले वसूल केले जातात का? क्रिडा शिक्षक मुख्याध्यापक कोणत्या बेसीसवर घेतात खुलासा करावा.

**प्र. शिक्षणाधिकारी (श्री. जावरे) :** महानगरपालिकेच्या शाळांसाठी एक क्रिडाधिकारी व एकूण १२ क्रिडा शिक्षकांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत. त्यातील काही शिक्षकांच्या इतर कामासाठी केलेले आहे. त्यात श्री. मालोदे हे व्यवस्थापक म्हणून जलतरण तलाव येथे आहेत तर श्री. सलीम हे गरवारे क्रिडा संकुल येथे श्री. पारधे हे बॅडमिंटन हॉल बन्सीलालनगर येथे आहे. श्री. जाधव हे जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीच्या कामासाठी गेलेले होते. मध्यंतरी ते मनपात रुजू झालेले होते. सध्याची स्थिती माहिती नाही. शाळा बंद आहेत. श्री. चव्हाण एकनाथ नगरच्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहे. श्री. साळवे यांना सांस्कृतीक अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** ८४ शाळा आहेत. त्यासाठी १२ क्रिडा शिक्षक त्यापैकी ६ शिक्षक इतरत्र नियुक्त केले उर्वरीत ६ शिक्षक ८४ शाळांना कसे खेळाचे प्रशिक्षण देतात. याचा खुलासा द्यावा. चार पाच शाळेला एक शिक्षक दिले तरी संख्या कमी पडते. काही शाळांमध्ये ४ ते ७ पर्यंत १५ ते १६ वर्ग चालतात. खेळासाठी किमान एक तास दिला ती ६ शिक्षक ८४ शाळेत जाऊन कसे शिकवतील. गंभीर प्रश्न आहे. नियोजन नाही.

**प्र. शिक्षणाधिकारी :** जे क्रिडा शिक्षक आहेत त्यांना विशिष्ट दिवशी शाळेवर खेळांचे प्रशिक्षण देण्याचे काम विभागून देण्यात आले आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** खेळाचा एक तास किमान असतो. माझ्या वॉर्डात १५ ते १६ वर्ग चालतात. एक शिक्षक कसे प्रशिक्षक देवू शकेल. एका वर्गास १ तास असे ६ शिक्षक ८४ शाळांत जावून प्रशिक्षण देवू शकत नाही. क्रिडा शिक्षकांची संख्या कमी आहे.

**प्र. शिक्षणाधिकारी :** उपलब्ध क्रिडा शिक्षकांचे नियोजन करण्यात येईल. प्रत्येक शाळेला क्रिडा शिक्षक नाहीत.

**सौ. शाहीन जफर :** निवडणूक कामासाठी ४ शिक्षक गेलेले होते. काही शिक्षक आलेले नाही. निवडणूक कामासाठी गेल्यानंतर त्यांना बोलाविण्यात येत नाही. मनपा पगार देते.

**मा. आयुक्त** : श्री. शे. रफीक हे शिक्षक २५ मे. ला मनपामध्ये परत आलेले आहेत. सध्या आर. एन. जोशी आयुक्त म्हणून आयुक्तांच्या सूचनेशिवाय कोणताही कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणार नाही. अशा सक्त सुचना मी दिलेल्या आहेत.

**श्री. माणिक साळवे :** क्रिडा शिक्षकांच्या जागा आहेत. आवश्यकता किती शिक्षकांची आहे.

**प्र. शिक्षणाधिकारी :** एकूण १२ क्रिडा शिक्षकांच्या जागा आहेत. उपलब्ध क्रिडा शिक्षकांचे नियोजन कायम शाळेवर देण्यात येईल. नविन पदे भरण्यासाठी पदनिर्मिती करावी लागेल. प्रत्येक शाळेवर क्रिडा शिक्षक देणे आज तरी शक्य नाही.

**मा. सभापती :** पुढच्या वेळेस याबाबत नियोजन कसे करणार सभागृहाला माहिती दयावी. तसेच मागील बैठकीत खिचडी वाटप केली जाते. फोटोग्राफी करण्यात येते वैगेर चर्चा झालेली होती. शिक्षक काय काय व्यवसाय करतात. सविस्तर माहिती या बैठकीत देणार होते. पुढील बैठकीत देण्यात यावी तसेच शिक्षणाधिकरी पदावर वर्ग-१ चे अधिकारी मागवावे. एकाच शाळेत पती पत्नी असतील हे बरोबर नाही व दोघांना घरभाडे दिल्या जाते का? याबद्दलची माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

**प्र. शिक्षणाधिकारी :** मुख्याध्यापकांना तसे पत्र दिलेले आहे.

**सौ. शाहीन जफर :** पती-पत्नी दोघेही नौकरी करतात. दोघांनही घरभाडे देता येते का माहिती दयावी.

**मा. आयुक्त :** शासनाचे आदेश असे आहेत की, जर पती पत्नी एका शहरात एका गावात आणावे. एकाच संस्थेचे किंवा एकाच शाळेत यावे असे आदेश नाहीत.

**मा. सभापती :** प्रश्न घरभाडयाचा आहे. दोघांनही घरभाडे दिले जाते का?

**श्री. संजय शिरसाठ :** पती पत्नी एका शहरात एका तालुक्यात जवळच्या गावात नौकरीस असू शकतात. परंतु एकाच शाळेत नाही. शासनाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा. सभापती :** मागील बैठकीत एक निर्णय घेतलेला होता. खाजगी संस्थेला प्रायोगिक तत्वावर एखादी शाळा देण्याचा याबाबत प्रशासनाने धोरण ठरवावे. शाळा सुरु होण्याच्या अगोदर नियोजन व्हावे.

**श्री. भगवान रगडे :** १४ जून २००४ रोजी शाळा सुरु होणार आहेत. शिक्षण विभागाच्या संदर्भात मागील बैठकीत सविस्तर चर्चा केलेली असून, शाळेची स्थिती कशी आहे हे सर्वांनी जाणून घेतले. शिक्षणाधिकार नाही, अतिरिक्त कार्यभार श्री. जावरे यांचेकडे दिलेला आहे. त्यांचेकडे अनेक विभागाचे चार्ज देण्यात आलेले आहेत. कामे कशी होतील याचा विचार करावा. शिक्षणाधिकारी म्हणून चार्ज दिला. सुवर्णजयंती कर्ज प्रकरणे कर्ज वाटप केले जाते. त्याबाबतचे उद्दीष्टपूर्ण करायचे आहे. शिक्षण विभागाचे जास्तीचे काम ते करु शकतील का? ठोस निर्णय घेवून आठ दिवसाच्या आत शिक्षणाधिकारी मागविण्यात यावे.

**मा. सभापती :** वर्ग-१ चे शिक्षणाधिकारी शासनाकडून मागविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. मधूकर सावंत :** शिक्षण विभागाच्या संदर्भात दोन-तीन तास चर्चा मागील बैठकीत पोटतिडकीने झाली. याकडे लक्ष देण्याची गरज असून हा विभाग सक्षम करण्यासाठी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. खुलासा घ्यावा. प्रत्येक बैठकीत त्याच त्या विषयावर चर्चा होते. ठोस निर्णय घेण्यात यावा. चर्चा व निर्णय घेवून कार्यवाही होत नाही. महानगरपालिका शाळेची उन्नती कशी होईल याकडे लक्ष दयावे.

**सौ. शाहीन जफर :** श्री. जावरे यांचेकडे या विभागाचा चार्ज दिला. त्यांचेकडे इतरही विभागाचे चार्ज आहेत. १४ जून रोजी शाळा सुरु होत असून, जो तो प्रश्न उपस्थित केल्यास उदया परवा, पुढील बैठकीत खुलासा करु असे उत्तर अधिकाऱ्यांचे असते. उप आयुक्तांनी लक्ष घालून इतरत्र दुसऱ्या अधिकाऱ्याकडे चार्ज दिला तर योग्य होईल. या विभागासंबंधी माहती घेण्यासाठी अनेक कागदपत्र दिलेली आहेत. कार्यवाही होत नाही व उत्तरही मिळत नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** मागील बैठकीत सविस्तर अशी चर्चा झाल्यानंतर या विभागासंबंधीचा अहवाल व उपाय योजनेच्या संदर्भात सर्वसाधारण सभा व स्थायी समितीला देणार होतो. त्यातच शिक्षणाधिकारी यांची बदली आल्यामुळे अतिरिक्त कार्यभार श्री. जावरे यांचेकडे दिलेला आहे. त्यांचेकउे प्रकल्प विभाग तसेच रिसर्च सेंटरचा चार्ज आहे व आता शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज दिलेला आहे. महिला व बालकल्याण समितीचा चार्ज त्यांच्याकडून काढलेला आहे. मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार शिक्षण विभागाचा दर्जा कसा उंचावेल यासाठी २० पॉईन्ट त्यांनी काढुन प्रशासनाकडे सादर केलेले आहेत. शासनाकडे अधिकारी मागविण्यात प्रयत्न चालू आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** किती शाळा बंद करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. असेल तर खुलासा करावा. २० मुद्दे काढले. शाळा कशी चालावी. मुलांना शिस्त कशी लावावी यासाठी ते दिलेले आहे. माजी नगरसेवक यांची इमारत शाळेसाठी भाडयाने घेतलेली आहे. १५ विदयार्थी शाळेत आहेत. ५ शिक्षक व भाडे १५०००/- देण्यात येते. एकनाथ नगर शाळेत पहिली दुसरी तिसरीचे मुले एकाच वर्गात एकाच पट्टीवर बसतात. एकत्रितपणे कसे शिक्षण दिले जाते. का अशा शाळा बंद करण्याचे प्रस्तावित केले नाही. अनेक इमारती भाडयाने घेतलेल्या आहेत. अनेक शाळेत ६०० विदयार्थी ५ शिक्षक आहेत. जे जे पॉईन्ट काढले त्याची प्रत प्रथम सर्व सदस्यांना देण्यात यावी. त्यानंतर निर्णय घेता येईल. कागदावर आराखडे पॉईन्ट काढणे. नियोजन करणे सोपे असते. स. सदस्य बोलतात. गरीबाच्या मुलांसाठी पोटतिडकीने बोलतात. ज्या काही त्रुट्या आहेत. त्याही त्यात समावेश करावा.

**मा. सभापती :** स. सदस्यांच्या भावना अशा आहेत की, काही शाळाबंद करणार आहात का? बंद करणे आवश्यक आहे का? ज्या त्रुट्या आढळून येतात. त्या शाळा चालुच शकत नाही. अशा शाळा बंद करणार काय.

**उपआयुक्त (प्र.) :** तो देखील प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यात येईल. काही शिक्षक मनपात येतात. त्यासाठी काय करता येईल. नोंद रजिष्टर ठेवता येईल का?

**श्री. संजय शिरसाठ :** मा. आयुक्तांसमोर उपआयुक्त (प्र) यांनी स्टेटमेंट केले की, काही शिक्षक घरुन निघाल्यानंतर मनपा कार्यालयात येतात. एका अर्थाने त्यांनी हे कबूल केले की, अनेक शिक्षक मुलांना शिकवीत नाही. उपआयुक्त असे स्टेटमेंट करीत असतील व हे सत्य असेल तर, ही बाब गंभीर आहे. कार्यवाही प्रस्तावित करावी. मा. आयुक्तांनी याबाबत तातडीने निर्णय घ्यावा.

**मा. सभापती :** जे ३० मुद्दे शाळेचा दर्जा सुधारण्याबाबत दिलेले आहेत. ते सभागृहाला वाचून दाखववे.

**प्र. शिक्षणाधिकारी :** १. मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेत व वर्गात वेळेवर उपस्थित रहावे. यास्तव अनुपस्थितीची आगाऊ लेखी स्वरुपातील सुचना शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी यांना दयावी.

२. वर्गातील विदयार्थ्यांची कौटुंबीक, आर्थिक परिस्थिती संदर्भातील कार्डस शाळेत उपलब्ध असावेत.

३. विदयार्थ्यांना विशेष रुची असलेले विषय, शिक्षणाविषयी त्यांना वाटणारी नकारात्मकता याबद्दल प्रत्येक विदयार्थ्यांची माहीती वर्ग शिक्षकांनी येत्या महिन्याभरात संकलीत करावी.

४. शक्यतो संबंधित प्रभागाच्या नगरसेवक/नगरसेविकांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक शाळेत पालक शिक्षक संघाची स्थापना करुन दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी त्या संघाची बैठक व्हावी. या बैठकीत शाळेची गुणवत्ता, शैखणिक दर्जा इ. बाबत तसेच शाळेच्या अडचणीबाबत चर्चा व्हावी.

५. शिक्षकांनी विदयार्थ्यांची व त्यांच्या कुटूंबीयाशी जवळीक साधणारे उपक्रम राबवावेत व विदयार्थी त्या घरी घेणाऱ्या कार्यक्रमांना उपस्थित रहावे. पालकांना वारंवार शाळेत बोलावून त्यांना विदयार्थ्यांच्या प्रगतीची माहिती देणे, वर्षातून दोनदा पालकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत करणे, शाळेत दर सप्ताहास विविध स्पर्धांचे आयोजन करणे, विदयार्थ्यांचे आरोग्य व नीटनेटकापणा याकडे वैयक्तीक लक्ष पुरविणे, मनपाच्या शालेय आरोग्य कार्यक्रमामधून आपल्या विदयार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेवून आजारपणाबाबत नोंदी ठेवणे व उपचारासाठी उपाययोजना करणे.

६. नियमित शाळेत येणाऱ्या व विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विदयार्थ्यांचा गुणगौरव करणे. शाळेतील अनुपस्थितीची कारणे शोधून त्यांच्या पालकांशी चर्चा करुन त्यात सुधारणा घडवून आणणे.

७. मुख्याध्यापक शिक्षक/शिक्षिका, सांस्कृतिक अधिकारी, क्रिडा अधिकारी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निलंबीत करणेचा अधिकार शिक्षणाधिकारी यांचेकडे असावा.

८. खाजगी शाळांमधील गुणवंत शिक्षकांकडून मनपा शाळा तसेच विदयार्थ्यांच्या वार्षिक उत्तर पत्रिकेचे मूल्यमापन करुन घेणे.

९. सांस्कृतिक अधिकारी व क्रिडा अधिकारी यांना प्राधान्याने मनपा शाळांनमधून उपक्रम आयोजीत करणे ही त्यांची मुळ व प्रमुख जबाबदारी असेल.

१०. शाळांमधून दर्जेदार स्नेहसंमेलन, क्रिडा स्पर्धांचे आयोजन, आधुनिक शैक्षणिक साहित्याचा वापर प्रात्याक्षिके दाखविणे, वनस्पती, पर्यावरणसंबंधी माहती देणे, सहलींचे आयोजन, राष्ट्रीय भावना वृध्दीगत करणारे उपक्रम शैक्षणिक पात्रतेनुसार निर्धारीत पातळीपेक्षा शैक्षणिक क्षमता असणाऱ्या विदयार्थ्यांसाठी अधिक वर्गांचे आयोजन करणे शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे. मूलभूत सुविधांचा योग्य वापर करणे मुख्याध्यापकांची जबाबदारी असेल.

११. विशेष मेहनत घेणाऱ्या शिक्षक/मुख्याध्यापकांना अतिरिक्त वेतनवाढ व प्रमाणपत्र गौरवपुर्वक दिनांक ८डिसेंबर मनपा वर्धापनदिनी प्रदान करणे व

दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते ती प्रथा कायम ठेवावी.

१२. स्वच्छ व सुंदर शाळा योजने अंतर्गत प्रत्येक विभागातील एका शाळेस वार्षिक पारितोषक देण्यात यावे. त्यासाठी वरील उपक्रमांचे आयोजन व इयत्ता ४ थी, ७ वी बोर्डाच्या परिक्षेतील यश हे निकष असावेत.

१३. जागा उपलब्ध असल्यास शाळेभोवती वृक्षारोपन करणे व झाडे किमान तीन वर्षे जगविणे ही मुख्याध्यापकाची जबाबदारी राहील. या संदर्भातील त्यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालात केली जावी.

१४. दोन शाळा पर्यवेक्षक व उपजिल्हाधिकाऱ्यांची दोन पदे मनपा मुख्याध्यापकांमधून करण्यात यावीत.

१५. ही पध्दत अंमलात येईपर्यंत मनपा अधिकाऱ्यांची शाळा तपासणीसाठी टीप तयार करण्यात यावी.

१६. चार स्कुल सोशल वर्कर्सची करार पध्दतीवर नियुक्ती करण्यात यावी.

१७. शिक्षणाधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याला रुपये ५०००/- पर्यंत खर्च मंजूरीचे अधिकार प्रदान करण्यात यावे.

१८. मुख्याध्यापक, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सर्व प्रकारच्या मंजूरीचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना असावेत.

१९. शिक्षण विभागाचे भांडार पूर्वीप्रमाणेच शिक्षणाधिकारी यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र असावे.

२०. सर्व शिक्षकांनी सकाळी/दुपारी शाळेच्या या वेळाचे पालन करुन स्वत: प्रार्थना व राष्ट्रगिताकरीता उपस्थित रहावे.

२१. शाळेच्या वेळा मोठया अक्षरात शाळेच्या प्रवेश द्वारावर नमूद करावे.

२२. शाळेच्या वेळेपूर्वी सेविका चौकीदार यांनी वर्ग, परिसर पूर्ण शाळा स्वच्छ करावी.

२३. शाळेतील एका शिक्षकाला विदयार्थ्यांचे पिण्याचे पाणी व देण्यात येणारे खादय (खिचडी) तपासणीची जबाबदारी घ्यावी तसेच मुख्याध्यापक यांनी संबंधित शिक्षकाला तांदुळाचा हिशोब ठेवण्याचे लेखी आदेश दयावे.

२४. प्रार्थनेकरीता जास्तीत जास्त विदयार्थी उपस्थित राहतील याची सर्व शिक्षक वर्ग यांनी जबाबदारी घ्यावी जर शाळेत विद्यार्थी येत नसल्यास त्यांच्या घरी जावून पालकांना तशी विनंती करण्यात यावी. प्रार्थनेनंतर कमीत कमी २० मिनिटे शिक्षक व विदयार्थी यांनी जमलेल्या विदयार्थ्यांना कवायत, सामान्य ज्ञान, दिनविशेष सुविचार दररोज घडणाऱ्या घटनांची माहिती देण्यात यावी.

२५. शाळेत आल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी हजेरी रजिष्टरवर स्वाक्षरी करावी. शिक्षण विभागात व प्रत्येक शाळेत मुख्याध्यापक/शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी मुव्हमेंट रजिष्टरवर नोंद करणे बंधनकारक राहील.

२६. उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेगळे रजिष्टरमध्ये नोंद घेत जावे.

२७. वर्गात शिक्षकांनी सर्व विदयार्थी हे मनपाने दिलेल्या स्वच्छ गणवेशात येतील याची काळजी घ्यावी.

२८. मध्यांतरामध्ये विदयार्थी शाळेतून घरी जावू नये यासाठी उपाययोजना करण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.

२९. प्रत्येक शिक्षकाने वर्गात दररोज उपस्थित नोंदणी करुन गोषवाऱ्यात नोंद करणे.

३०. समर्थनीय कारणाशिवाय मुख्याध्यापक यांनी कोणत्याही विदयार्थ्यांस शाळा सोडल्याचा दाखला देणे बाबत शिक्षणाधिकारी यांचेकडे शिफारस करु नये.

**मा. सभापती** : सभा १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दुपारी ५.२० वाजता, ५.४० वाजता पुन्हा सभेला सुरुवात.)

**श्री. इलियास किरमाणी :** अतिक्रमण हटविण्याबाबत वृत्तपत्रात बातम्या झळकतात परंतू त्यात बिल्डरांनी केलेल्या अनाधिकृत बांधकाम कोठे पडलेले दिसून येणार नाही. अनाधिकृतपणे वार करीत आहेत. किती बिल्डरने भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले आहे. अशा लोकांवर काय कार्यवाही केलेली आहे. ज्या ज्या बिल्डरांनी भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरु केला त्याबद्दल मागील बैठकीत माहिती देण्याचे आदेश आपण केलेले होते. काही उत्तर दिलेले नाही. तापडीया बिल्डरने शैक्षणिक झोनमध्ये कॉम्प्लेक्सचे बांधकाम केले त्या दुकानांना सील का केल्या नाही. सारा प्राईड बिल्डरचे मालक यांनी एका व्यक्तीला संडास बाथरुमच्या जागेवर दुकान तयार करुन विक्री केली. तेथील लोकांना शौचालयाची सोय नाही. संबंधित व्यक्ती गरीब असून, त्यांनी फसवणूक केलेली आहे. त्यासाठी नोटीस वैगेर देण्याच्या अगोदर ते अनाधिकृत बांधकाम काढण्यात यावे. सर्वच बिल्डरांनी जे जे बांधकाम केले त्याचे भोगवटा घेत नाही. त्यामुळे मनपाचे मोठे नुकसान होते. कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत.

**श्री. मधुकर सावंत :** तापडीया नाट्यगृहाबाबत काय कार्यवाही केलेली आहे. त्याचाही खुलासा करावा. माझ्या माहती प्रमाणे असे काही झालेले नाही.

**मा. सभापती** : सहा. संचालक नगररचना हे आज नाहीत. या संबंधात ते योग्य ती माहिती देतील.

**श्री. संजय शिरसाठ :** साजेद बिल्डरने जे जे बांधकाम केले त्या संचिका अदयापही सापडलेल्या नाहीत त्याबद्दल खुलासा करावा.

**मा. सभापती** : एका वेळेस एकच विषय घेवून चर्चा करावी. विधी सल्लागार यांनी तापडीया नाट्यगृह व शॉपींग कॉम्प्लेक्स बाबत खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** तापडीया नाट्यगृहाच्या संबंधी नोटीस देवून जी नगररचना विभागाने कार्यवाही केलेली आहे. त्या अनुषंगाने संबंधिताने मा. न्यायालयातून जैसे थे चे आदेश आणलेले आहेत ते कायम आहेत. शैक्षणिक झोनसंबंधी नगररचना विभागाने माहिती दिली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जैसे थे आदेश म्हणजे कोणती परिस्थिती खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** जी नोटीस देण्यात आलेली होती. त्यात करीत असलेला वापर का बंद करण्यात येवू नये. या स्थितीला संबंधिताने न्यायालयात आव्हान देवून जैसे थे चा आदेश प्राप्त केलेला आहे. ती परिस्थिती आहे ती कायम ठेवावी लागेल.

**श्री. इलियास किरमाणी :** बिल्डरांनी मोठमोठे कॉम्प्लेक्स तयार केले. व्यापारी संकुल बांधकाम केले. भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. वापर सुरु केला. एखाद्या

गरीब व्यक्तीने नाल्याच्या बाजूला रस्त्याच्या बाजूला टपरी टाकली तर उचलून आणल्या जाते. वृत्तपत्रात बातम्या झळकतात. चांगल्या प्रकारे कार्यवाही चालू आहे असे दाखविले जाते. वृत्तपत्रात बातम्या झळकतात. चांगल्या प्रकारे कार्यवाही चालू आहे असे दाखविले जाते. प्रसिध्दी केल्या जाते. ज्या बिल्डरांनी एक एक दुकान ३०-४० लाख रुपयांमध्ये विक्री केल्या लोकांना फसविले त्यांचेवर का कार्यवाही घेत नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कायदयात तरतुद असतांना नोटीस देण्यात आल्यानंतर कॅव्हेट दाखल केला असता तर स्थगिती आदेश मिळाले नसते. कॅव्हेट का दाखल केले नाही. मोठमोठ्या बिल्डरांना पैसे मिळविण्याच्या दृष्टीने मनपामार्फत अभय रहात असेल तर, या शहरातील गोरगरीब जनतेची पिळवणूक करण्याचा काहीही नैतिक अधिकार नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** नोटीस दिल्यानंतर लगेच संबंधित व्यक्ती न्यायालयात जातात. त्या अगोदर कॅव्हेट दाखल होणे आवश्यक आहे. अनेक वेळा याबाबत मी सभागृहात चर्चा केलेली होती जाणून बुजून नोटीसा देवून न्यायालयाचे स्थगिती आदेश आणण्यासाठी नोटीसा दिल्या जातात. तसेच ज्यांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही अशी दुकाने विक्री होतात. व्यवसाय करतात कसा हा प्रश्न आहे?

**मा. सभापती** : नोटीस दिल्यानंतर संबंधितास कालावधी मिळाला. स्थगिती आदेश आणले असा प्रकार आहे का?

**विधी सल्लागार** : स्थगिती आदेश आणण्यास संबंधितास वाव मिळाला असे कोणतेही कृत्य मनपाकडून आलेले नाही. जी कार्यवाही केली ती नियमानुसार असून, जैसे थे चे आदेश दिले ते न्यायालयाच्या कक्षेतील बाब आहे महानगरपालिकेला जेवढे करायचे तेवढे केले.

**श्री. इलियास किरमाणी :** याबाबत चौकशी समिती नियुक्त करावी. भोगवटा प्रमाणपत्र न घेता ज्या दुकाने इमारतींचा वापर होतो त्यांना सील करण्यात यावे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** प्रशासनाची दिरंगाई नाही असे सांगण्यात आले. परंतू दिरंगाई आलेली आहे हे स्पष्ट दिसून येते. अधिकाराचा वापर केलेला नाही. नोटीस दिल्यानंतर कॅव्हेट दाखल करणे आवश्यक होते. स्थगिती आदेश मिळाले नसते. कॅव्हेट का दाखल केलेले नाही. कायदयानुसार दिरंगाई झालेली नसेल तर, आम्ही आमचे शब्द परत घेतो. कायदयाचे पुस्तक आहे. ५३:५६ मध्ये काय तरतुद आहे. खुलासा करावा.

**विधी सल्लागार :** महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे संबंधितांस स्थगिती आदेश मिळाले असे कृत्य मनपाकडून झालेले नाही. नियमाने कार्यवाही होत होती. न्यायालयाचे जैसे थे चा आदेश केला. न्यायालयाच्या कक्षेतील बाब आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पुन्हा पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होत आहे माझ्या मते कायदयात १६० च्या तरतुदीनुसार ५६, ५३ मध्ये एखादया प्रकरणात नोटीस दिल्यानंतर संबंधित व्यक्तीला स्थगिती आदेश मिळू नये यासाठी कॅव्हेट दाखल करता येते. त्या नियमांचा वापर केला नाही हे माझे स्पष्ट मत आहे.

**विधी सल्लागार** : स. सदस्यांची सूचना बरोबर आहे. परंतू ज्या वेळेस नोटीस दिली ती कार्यवाही नगर रचना विभागाकडून झालेली आहे. दावा दाखल झाल्यानंतर पुढील कार्यवाही माझ्याकडे आलेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** नोटीस एका विभागाने दिली. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त आले. दोन्ही विभाग हे मनपाचेच एक भाग आहेत. वेगवेगळे प्रशासन आहे असे म्हणता येणार नाही. उपआयुक्त त्यांचे वरीष्ठ मा. आयुक्त हे सुध्दा प्रशासनाचे अधिकारी आहेत.

**विधी सल्लागार :** नोटीस देण्याअगोदर सांगितले असते तर कॅव्हेट दाखल केले असते. माझ्या चुकीमुळे स्टेटस्को मिळालेला नाही. यानंतर अशा प्रकरणाबाबत दक्षता घेतली जाईल.

**मा. आयुक्त** : या संबंधी वेळोवळी या सभागृहात सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे. याबद्दल यापुर्वीच सविस्तर असा खुलासा केलेला होता. या कामाची बांधकाम परवानगी सन २००२ मध्ये दिलेली होती. बांधकाम परवानगी देतांना अशा प्रकरणात १५% जागा वाणिज्य वापरासाठी दयेय आहे. नगररचना विभागाने वरिष्ठांचा लेखी अहवाल घेतला. त्याप्रमाणे १५% वाणिज्य वापर दयेय होतो. यावर ते ठाम आहे. नगररचना विभागाचे मताप्रमाणे माझे पूर्ण समाधान झालेले नाही. आदेश १९८८ चे आहे. त्यावर उपसंचालक नगररचना यांनी अभिप्राय दिला. सहा. संचालक नगर रचना यांनी परवानगी दिली हे स्पष्ट आहे. सभागृहात याबाबतीत चर्चा झाल्यानंतर प्रकरण पुन्हा तपासले सदर प्रकरणी सविस्तर अहवाल नगररचना पुणे यांना नोव्हे. २००३ मध्ये पाठविण्यात आलेला आहे. त्याचा पाठपुरावा स. सं. न. र. यांनी करावा अशा सूचना दिल्या आहेत. १५% वापर अनुज्ञेय आहे. उपसंचालक नगररचना व संचालक नगर यांचे मत स्विकारले तर आपणाकडे फारसे काही राहणार नाही. परत सभागृहात चर्चा होते. ती योग्य आहे. ३० दिवसांची नोटीस देणे सक्तीचे आहे ती न दिल्यामूळे पराभव स्विकारावा लागला. कलम ५२, ५३ प्रमाणे नोटीस मध्ये अट क्रमांक १७, १८, १९ चा उल्लेख केला असता पार्टीने २-३ पाने उत्तर दिले. नोटीस दिल्यानंतर कायदयाप्रमाणे स्टे ऑर्डर मिळू नये म्हणून कॅव्हेट दाखल करता येते. नगररचना विभागाचा अभिप्राय दिला त्यात १५% वाणिज्य वापर अनुज्ञेय होतो. १९८८ चे हे परिपत्रक लागू पडते किंवा नाही याचा अर्थ लावण्यात यावा. सभागृहाने कमर्शियल वापर त्या जागेवर होतो म्हणून मुद्दा मांडला त्याबाबत संबंधिताने त्यावेळेस नियमानुसार वापर अनुज्ञेय होता त्यास चॅलेंज केलेले आहे. येत्या १६ तारखेला त्याबाबत विधी सल्लागार विभागाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडणार आहे. सभागृहाच्या भावनांशी मी सहमत आहे. परंतू पार्टीचे म्हणणे असे की, जेव्हा बांधकाम परवानगी दिली ती बरोबर असून, त्यानुसार भोगवटा प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. १५% वापर कमर्शियल वापर करु शकतो. त्यात दुकानांचही भाग येतो. हा मुद्दा प्रशासनाने स्विकारलेला नाही. याबाबत प्रकरण न्यायालयातही गेलेले असून, तज्ज्ञ म्हणून राज्याचे प्रमुख म्हणून संचालक नगररचना यांचे मत घ्यावे म्हणून विनंती केलेली आहे. येत्या १६ तारखेला मनपाचे जे म्हणणे आहे ते देण्यात येईलच यात शंका नाही. सभागृहाने जी भावना व्यक्त केली त्यासी मी सहमत आहे. शैक्षणिक वापर व कमर्शियल वापर यातील फरक आपणांस कळतोच. विशेषत: अट क्र. १९ नुसार त्यांचे संस्थेचे शैक्षणिक हेतू आहे. ज्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यासाठीच वापर करायला पाहीजे. तो न करता त्या ठिकाणी तिकीट विक्री अन्य इतर व्यवसाय करुन अन्य

मार्गाने उत्पन्न होण्याच्या दृष्टीने वापर सुरु आहे ही बाब सत्य आहे. त्यामुळेच नोटीस दिलेली होती. मनपाची बाजू न्यायालयासमोर मांडली जाईल. भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठीची तयार मी येण्यापूर्वी पासून संचिकेवर मला दिसून आली होती. भोगवटा प्रमाणपत्र देण्याचे थांबून ठेवलेले आहे. शैक्षणिक झोनमधील जागेचा वाणिज्य वापर करायचा हे प्रशासनाला मान्य नाही. म्हणून त्यांना आव्हान दिलेले आहे. भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. चांगल्या तज्ज्ञ वकीलाच्या वतीने बाजू मांडणार आहोत. हे एवढयावरच थांबणार नाही. तर आणखी दोन प्रकरणांच्या बाबतीतही चर्चा होणे आवश्यक आहे. ते आताच सादर केलेल्या टिप्पणीत दिलेले आहेत. यापुढे नगररचना विभागास शैक्षणिक व व्यापारी वापराबाबत ठोस अशा सूचना देता येतील.

**श्री. इलियास किरमाणी :** २५% पेक्षा जास्त वाणिज्य वापरासाठी बांधकाम केलेले असेल तर, काढणार का, पोलीसात गुन्हा दाखल करणार का? भोगवटा प्रमाणपत्र न घेता दुकाने चालू झाले ते बंद करा. गरीबांची झोपडी असेल तर, ताबडतोब कार्यवाही येते. बिल्डर विरुध्द चांगला मेसेज जाईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मोठ्या लोकांसाठी दयेची भावना आपण दाखवता. गोरगरीब जनतेला दाखविली पाहीजे. बिल्डरांना अभय दयायचे असेल तर सर्वांनाच द्यावे नसता कुणालाच देवू नये. नियमाने कार्यवाही करावी. मुख्य रस्त्यावर मोठमोठया इमारती झाल्या. पार्कींगच्या जागा सोडलेल्या नाही. सर्वांना समान कार्यवाही करावी. शहराचा विकास होण्यासाठी चागले निर्णय घेण्याची गरज आहे. जनतेने आपणांस चांगले काम करण्यासाठी निवडून दिलेले आहे.

**मा. सभापती** : हे सभागृह भेदभाव करणार नाही. नगररचना, विधी सल्लागार व प्रशासकीय विभाग या तीनही विभागात समन्वय नाही. समन्वय साधावा. नोटीस देणे, त्यानंतर स्थगिती मिळणे यांचे प्रमाण वाढत आहे. त्यासाठी तीनही विभागांनी समन्वये ठेवून नोटीसा द्यावयास पाहीजे. नोटीस देण्यापुर्वी कॅव्हेट दाखल केले पाहीजे. याबाबत दक्षता घ्यावी. भोगवटा प्रमाणपत्र घेण्याचे वाढेल याकडे लक्ष दयावे व सुसूत्रता आणावी.

**श्री. इलियास किरमाणी :** सारा प्राईड यांनी शौचालयाच्या जागेवर दुकानाचे बांधकाम केले. पंचनामा करुन उदयाच ते काढण्यात यावे असे आदेश करावेत. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ५२, ५३ अन्वये नोटीस दिल्या असे सांगण्यात आले आणि तरतुदीनुसार परिपत्रक क्र. टीपीबी/४३८३/१६६१ दि. ०५-०६-८३ नुसार नोटीस देण्यात आली. स्थगिती मिळो अथवा व मिळो गुन्हा दाखल करता येतो. उदयाच नगररचना नियमाने काय कार्यवाही करणार याचा स्पष्ट खुलासा करावा.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** नाथ प्रांगण ओपन स्पेसमध्ये तीन चार एकर जमीन आहे त्या ठिकाणी वॉचमन ठेवावा. सुट्टीच्या दिवशी कितीतरी लोक येतात. चुना मारतात. प्लॉट पाडतात व राहतात वॉचमन ठेवला तर बरे होईल.

**मा. सभापती** : या जागेचे संरक्षण होण्यासाठी प्रशासनाने त्या जागेसाठी एक वॉचमन उदयाच नियुक्त करावा.

**मा. आयुक्त** : स. स. न. र. च्या अधिकाऱ्यांना माझी सूचना आहे. सदर जागेचे ले-आऊट अंतीम झालेले नाही. तार फेन्सींग किंवा संरक्षिक भिंत बांधून खर्च

होईल. ले आऊट बदलला तर जबाबदारी निश्चित केली जाईल याची नोंद घ्यावी.

**उपअभियंता (न. र.) :** टेन्टेटिव्ह मंजूरी आहे. जागा हस्तांतर झाली आहे. रिलीक्वीशमेंट डीड झालेले आहे.

**मा. सभापती** : त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले असेल तर, उदयाच काढण्यात यावे.

**श्री. मधुकर सावंत :** स. सदस्य श्री. निमगांवकर यांनी जो नाथ प्रांगणाचा विषय उपस्थित केला तो ले-आऊट १९७५ ला टेन्टेटिव्ह मंजूर झालेला आहे. या जागेचा आर. पी. नाथ यांनी ले-आऊट केला आहे. परंतू ती जागा श्री. आर. पी. नाथ यांच्या नावांवर नव्हती. आजही नाही. मुलांच्या पत्नीच्या नावावर नव्हती आजही नाही. मुलांच्या त्यांच्या पत्नीच्या नावांवर होती. ओपन स्पेस म्हणून ती जागा दुसऱ्या एका गृहस्थाला विक्री केलेली आहे. ओपन स्पेसवर अधिकार कसा दाखविणार, महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे हे उघड आहे. मनपाची फसवणूक केलेली आहे हे उघड आहे. मनपाची ओपन स्पेस जागा आहे असे बोलू शकतो का?

**मा. सभापती** : नोंदणीकृत दस्तऐवज मनपाकडे आहे.

**श्री. मधुकर सावंत :** त्या जागेच्या ७/१२ जी. आर. कार्डवर मनपाचे नांव नाही. १९८४ ला संबंधितांनी जीपीए करुन घेतलेले आहे. त्या अगोदरच त्या व्यक्तीने महापालिकेची फसवणूक करुन ओपन स्पेस म्हणून मनपास दिलेली आहे व्यक्ती कोणी असेल परंतू मनपाची ज्यांनी फसवणूक केलेली आहे. त्यांचेवर आजच पोलीसात गुन्हा दाखल करावा. त्या व्यक्तीच्या नावांवर जागा नसतांना ती जागा त्यांनी दिलीच कशी हा माझा प्रश्न आहे. महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे.

**मा. सभापती** : जो नोंदणीकृत दस्तऐवज झालेला आहे. त्यानुसार जागा मनपाच्या नावांवर झालेली आहे का खुलासा करावा? जागेचा ताबा आहे का?

**मालमत्ता अधिकारी :** यापुर्वी दोन वेळेस सिटी सर्व्हे कार्यालयाला पत्र दिलेले आहे.

**श्री. मधूकर सावंत :** त्या जागेवर आजही मनपाचे नांव नाही. कागदपत्रांचे पुरावे देण्यात येईल. आर. पी. नाथ यांनी सरळपणे मनपाची दिशाभूल केलेली आहे.

**श्री. प्रसाद निमगांवकर :** यापुर्वी त्या जागेवर मनपाने दोन वेळेस तार फेन्सींग केलेले होते. लोकांनी तोडून टाकले.

**श्री. मधुकर सावंत :** श्री. आर. पी. नाथ यांचे नावांवर जागा नव्हती. मनपाची दिशाभूल केलेली असून, फसवणूक केली. गुन्हा दाखल करावा. अशी मागणी आहे. पी. आर. कार्डवर आजही त्या व्यक्तीचे नांव नाही. संबंधित व्यक्तीच्या नावांवर ती जागा आहे. त्यांचेविरुध्द प्रकरण न्यायालयात दाखल करता येईल का? जो खर्च करण्याबाबत आताच सक्त सुचना केल्या. कशासाठी खर्च करता आहात. सद्य:स्थितीत जागा मनपाच्या मालकीची नाही.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** ती जागा ताब्यात नसेल तरी मनपाच्या ताब्यात घेण्याचे प्रयत्न करावेत. आज कुठल्याही परिस्थिती ताब्यात घेता येईल असे पहावे.

**मा. सभापती** : संबंधित व्यक्तीने त्या जागेबाबत नोंदणीकृत दस्तऐवज करुन दिलेला आहे.

**श्री. मधुकर सावंत :** हे सर्व चुकीचे आहे. श्री. आर. पी. नाथ यांनी अगोदरच ही जागा विक्री केली असून, त्यांचे मुलाच्या व पत्नीच्या नावांवर ती जागा होती.

**मा. सभापती** : जागा मनपाच्या ताब्यात असेल तर योग्यच आहे. अतिक्रमण असेल तर तात्काळ काढण्यात यावे. जो नोंदणीकृत दस्तऐवजाने जागा दिली त्याची मालमत्ता विभागाने तपासणी करुन सिटी सर्व्हे कार्यालयाला कळवा. नियमानुसार सर्व लक्ष घालून कार्यवाही करावी.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** आताच आदेश केले कार्यवाही करावी जो दस्तऐवज करुन दिला त्याप्रमाणे तार फेन्सींग करावी.१९८४ चे टेन्टेटिव्ह ले-आऊट आहे. स्पष्ट मत स. सदस्यांनी मांडलेले आहे. तो रद्द करण्याचा अधिकारी आहे का ते सुध्दा तपासावे.

**श्री. संजय शिरसाठ :** सर्व बिल्डर महानगरपालिकेची सरळ फसवणूक करतात.म्हणून सभागृहात पोटतिडकीने प्रश्न मांडला जातो. गुन्हा दाखल करावा एका सदस्यांनी म्हटले सारा प्राईडच्या मालकावर कार्यवाही करा. तापडीया नाट्यगृहाचा सुध्दा आहे. ह्या चार पाच प्रकरणाची कार्यवाही करायची आहे. याबाबत कार्यवाही करुन पुढील बैठकीत मा. आयुक्त यांना अहवाल देण्याचे आदेशित करावे. पुढील बैठकीत अहवाल दयावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** महानगरपालिकेच्या मालमत्तेची आर्थिक बाबींचे दृष्टीकोनातून संरक्षण करणे अधिकाऱ्यांचे काम आहे. सभागृहाचे नाही. वारंवार तोच तो प्रश्न चर्चेला येतो प्रशासन कार्यवाही करीत नाही. ३-४ बैठकीपासून हा विषय निघतो. तसेच सेल ॲडस कंपनीने शहरात किती होर्डींग्ज लावल्या आहेत. मागील बैठकीत चर्चेला विषय होता. खाजगी होर्डींग्ज किती आहेत. सेल ॲडस या कंपनीकडूनव खाजगी मालकाकडून किती होर्डींग्जची वसुली झाली. साईज ठरवून दिली का? दर काय लावण्यात येतात. आता पर्यंत किती वसूली करण्यात आली. खुलासा देण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी :** सेल ॲडस कंपनीला दि. ११-०७-२००३ ला कार्यादेश देऊन एकूण १६ ग्रुप मध्ये काम दिलेले आहे. त्यापैकी वर्ग-१ मध्ये ५३ होर्डींग्ज आहेत. १६-०८-२००३ पर्यंतचा अहवाल आहे. त्यापैकी १९ होर्डींग्जच लावण्यात आल्या. २४ जागेवर लावण्यास अडचण नाही. प्रत्यक्ष दाखविले आहे. ८ ठिकाणी होर्डींग्जच लावण्यास अडचण आहे.

**मा.सभापती** : करारनामा झाला त्याप्रमाणे कार्यवाही होते का? चौकशी करण्याचे आदेश दिले होते. मुदत किती तारखेपर्यंत आहे. या सर्वच बाबींचा खुलासा देणार होते. विहीत मुदतीत काम केले नाही तर त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. करारनाम्याच्या अटी शर्ती काय आहेत?.

**मालमत्ता अधिकारी :** विधी सल्लागार यांचेकडून अभिप्राय घेतलेला आहे. संबंधिताकडून १९.५० लक्ष रुपये येणे आहे. यापुर्वी तीन नोटीसा दिल्या. गेल्या आठवडयात पुन्हा एक नोटीस दिलेली आहे. १८% व्याजासह पैस भरावे अशी मा. उपआयुक्तांच्या सहीने नोटीस देण्यात आलेली आहे. येत्या ११-०७-२००४ ला मुदत संपणार आहे. नियमानुसार १८-०७-२००४ ला करारनामा रद्द करु शकतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** करार झाला. अटी शर्तीनुसार २० लक्ष भरले. उर्वरीत रक्कम सहा महिन्याच्या नंतर १५ दिवसाच्या आत भरणा करणे आवश्यक होते. त्यास पाच महिने उशीर झाल. काय कार्यवाही करणार आहोत.

**मालमत्ता अधिकारी :** १८% प्रमाणे त्या रक्कमेवर व्याज आकारण्यात येणार आहे. डिपॉझिट जप्त करता येईल डिपॉझिट जप्त करता येईल. उर्वरीत रक्कमेसाठी

करारनाम्यानुसार कार्यवाही करता येईल. २२ लक्ष हे व्याजासह स. सदस्य सांगतात. अनामत रक्कम अँड करुन वसूली रक्कम गृहीत धरल्या जाईल. महानगरपालिकेच्या जागेवर अनाधिकृतरित्या २८ होर्डींग्ज लावण्यात आलेले आहेत. १५२ ठिकाणी खाजगी जागेवर अनाधिकृत होर्डींग्ज लावण्यात आलेल्या आहेत. १५२ ठिकाणी खाजगी मालकीच्या ठिकाणी म्हणजेच इमारतीवर होर्डींग्ज लावण्यात आलेल्या आहेत. हे सर्व अनाधिकृत आहे. शासनाचे जी. आर. आहे. त्याप्रमाणे संबंधितांनी अर्ज दिलेले आहे. छाननीचे काम चालू आहे. दंडात्मक कार्यवाही करुन रेग्युलर करणार आहेत. महापालिकेच्या वतीने सेल अँडला जे दिले त्यास परवानगी देणार उर्वरीत होर्डींग्ज काढून घेण्याबाबत कार्यवाही होणार आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सल अँड ३५० होर्डींग्ज असूनही २३ लक्ष उत्पन्न खाजगी मालकाच्या २०० होर्डींग्ज असूनही २३ लक्ष उत्पन्न मिळते. ही तफावत कशी खुलासा करावा

**श्री. मा. सभापती :** नियमानुसार जे दर ठरवून दिले त्याप्रमाणेच केल्या जाईल. खाजगी मालकांनी जास्त दर देण्यास तयार असतील तर काहीच करु शकत नाही. टेंडर प्रमाणे कार्यवाही होईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** खाजगी मालकांना का जास्त लावण्यात येतात. सेल अँड कंपनीने दिलेले दर कमी आहे. काही ३० बाय ४० चौ. फुटांच्या सेल अँड कंपनीने होर्डींग्ज लावलेल्या आहेत.

**मा. सभापती** : मुळ रक्क्मच त्या कंपनीने भरणा केलेली नाही. तेव्हा मोठया साईजच्या होर्डींग्ज लावण्यात आल्या असतील तर ती रक्कम भरणे दूरच राहीले. हे सर्व प्रश्न अडचण निर्माण करणारे आहेत.

**मालमत्ता अधिकारी :** सेल अँड कंपनीने जे होर्डींग्ज लावलेले आहेत. त्यांचे मेंजरमेंट आणलेले आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जागेचा प्रश्न नाही. पावसाळयाचे दिवस आहेत. प्राणहानी होवू शकते. नागपूरला एका व्यक्तीच्या अंगावर होर्डींग पडून मृत्यू झाला होता. वाजवीपेक्षा मोठया होर्डींग्ज लावण्यात येऊ नये. याची दखल घेण्याचे आदेश दयावेत. औरंगपूरा क्रांतीचौकात मोठमोठया होर्डींग्ज उभ्या केलेल्या आहेत.

**मालमत्ता अधिकारी :** औरंगपुऱ्यात एका वर एक दोन होर्डींग्ज आहेत. औरंगपूरा व क्रांतीचौक येथील जाहीरात फलकासंबंधी नोटीस दिलेली आहे.

**मा.सभापती** : तात्काळ काढुन घेण्यात यावे.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** सुट्टीच्या दिवशी अनाधिकृत बांधकाम होतात. हा विभाग बंद असतो की चालू असतो दुरध्वनी लागत नाही. वृत्तपत्रात प्रसिध्द करावे.

**प्रशासकीय अधिकारी :** एक इमारत निरीक्षक ४ मजूर यांची नियुक्ती केलेली आहे.

**मा. सभापती** : कोणी अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम करीत असेल तर हा विभाग सुटीच्या दिवशीही चालू असतो. असे वृत्तपत्राद्वारे कळविण्यात यावे.

**विषय क्र. २७ :**

दिनांक २७-०५-२००४ (का. प. क्र. ६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** मागील बैठकीत तांत्रिक कक्ष बदं करण्याबाबत सविस्तर अशी चर्चा होवून तो विभाग बंद करावा म्हणून मा. सभापती यांनी सभागृहाच्या भावना

लक्षात घेवून निर्णय घेतला. त्याची मा. आयुक्त यांनी अंमलबजावणी केली. चांगला निर्णय मा. आयुक्तांनी घेतला त्याबद्दल सभागृहाच्या वतीने मा. सभापती तसेच मा. आयुक्त या दोघांचेही अभिनंदन करतो. गेल्या सहा वर्षापासून स्थायी समितीची मान्यता न होता चालू असलेला विभाग त्यावर होणार खर्च त्या विभागाची आवश्यकता हा विषय मांडताना काही सदस्यांना असे वाटले की, मा. आयुक्तांच्या अधिकारावर गदा येते की काय? तशा बातम्या वृत्तपत्रात झळकल्या. विषय मांडत असतांना माझे मत मांडत असतांना कदाचित मी आक्रमकपणे मांडलेले असेल. परंतू ती व्यवस्थित मांडलेला होता की, मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्या नंतर उप-आयुक्तांना वसुली काढण्याचा अधिकार आहे का? हा साधा प्रश्न त्यामागे माझा होता. उदाहरण दिले होते की, एखादी संचिका कार्यकारी अभियंत्यांनी मंजूर केल्यानंतर उप अभियंता क्यूरी काढू शकतो हा प्रश्न होता टेक्नीकल सेल बंद करावे असे मी बोललो नाही. इतर मनपामध्ये कोठेही हा विभाग नाही आणि या मनपामध्ये हा विभाग निर्माण करावयाचा असेल तर, स्थायी समितीची मान्यता घेणे गरजेचे आहे. व त्या विभागातील अधिकारी कार्यकारी अभियंता दर्जाचे असावे असे माझे मत आहे आणि त्यात काही वावगे सुध्दा नव्हते. यापुर्वी जी कार्यवाही होत होती. ती कार्यकारी अभियंता विभागाच्या उपअभियंता जे ई व इतर कर्मचाऱ्यांमार्फत होत होती. पुन्हा काही कामाच्या बाबत थर्ड पार्टीकडे तपासणीसाठी जाते. म्हणून हा विभाग बंद झाल्यामुळे कोणताही परिणाम होणार नाही. गेल्या बैठकीत निर्णय घेतल्या नुसार मा. आयुक्तांनी हा विभाग बंद करण्याबाबत चांगला निर्णय घेतलेला आहे. त्यांचे व मा. सभापती यांचे अभिनंदन करतो.

**सौ. शाहीन जफर :** इतिवृत्त उशिरा दिले. पुढील सभेत मंजूर करावे.

**श्री. संजय शिरसाठ :** तांत्रिक कक्ष बंद करण्याबाबत जी चर्चा निर्णय झाला त्यास मान्यता दयावी. उर्वरीत इतिवृत्त पुढील सभेत कायम करावे.

**मा. आयुक्त** : इतिवृत्त कायम झाले असे गृहीत धरुनच ॲक्शन पॉईंटचा आढावा घेण्यात येतो. इतिवृत्त मंजूर होईल म्हणूनच घेतो.

**मा. सभापती** : तांत्रिक कक्ष बंद करण्याबाबतच्या संवादास कायम करण्यात येते. उर्वरीत इतिवृत्तास पुढील सभेत मंजूरी दिली जाईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दि. २७-०५-२००४ च्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील तांत्रिक कक्ष बंद करण्याबाबतचा वृत्तांत कायम करुन उर्वरीत इतिवृत्त पुढील सभेत ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २८ :**

उपआयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, नगरपरिषद पैठण छावणी परिषद तसेच एम. आय. डी. सी. वाळूज यांचेकडून महानगरपालिकेस त्यांचे परिसरातील मोकाट कुत्रे पकडणे बद्दल नेहमी विनंती करण्यात येते.

करीता मनपा हद्दी बाहेर अशा प्रकारे मोकाट कुत्रे पकडण्यासाठी गाडी (डॉग व्हॅन) नियमानुसार फी आकारुन पाठविण्याबद्दल प्रस्ताव विचाराथ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** शहरातील कुत्रे पकडत नाही तर हे कुत्रे केव्हा पकडणार, प्रस्ताव नामंजूर करावा.

**संचालक (प्रा. सं.) :** प्रस्ताव येण्यापूर्वी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. छावणी व पैठण येथील यात्रेच्या वेळी गरजेनुसार गँग युनिट पाठवावे. सार्वजनिक सुट्टया, रविवारला पाठवू. प्रस्ताव मंजूर पूर्ण वेळ तेथे दिल्या जाणार नाही. छावणी परिषदेने मागणी केलेली होती. लोकंच्या तक्रारी होत्या.

**मा. सभापती** : ठिक आहे. शहरातील कुत्रे अगोदर पकडावे नंतर उर्वरीत वेळात छावणी भागातील आवश्यक शुल्क आकारुन कार्यवाही करावी. हा भाग सुध्दा शहरातच येतो. तसेच आरोग्य वैदयकिय अधिकारी यांना सूचना करतो की, स्वर्गरथ घेण्याबाबत निर्णय घेतलेला होता. प्रस्ताव अदयाप का आलेला नाही? पुढील बैठकीत सादर करावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** कुत्रे पकडण्यासाठी किती वाहने आहेत?

**संचालक (प्रा. सं.) :** एकच वाहन आहे. त्यात १४-१५ कुत्रे पकडून टाकू शकतो. दोन महिन्यात ६२९ कुत्रे पकडले होते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या निर्णयानुसार नगरपरिषद पैठण छावणी परिषद तसेच एम. आय. डी. सी. वाळूज यांचेकडून महानगरपालिकेस त्यांचे परिसरातील मोकाट कुत्रे पकडणे बद्दल होत असलेली मागणी लक्षात घेता शहरातील कुत्रे पकडण्यास प्रथम प्राधान्य देवून उर्वरीत वेळात सार्वजनिक सुटीचे दिवशी मनपा हद्दी बाहेर अशा प्रकारे मोकाट कुत्रे पकडण्यासाठी नियमानुसार फी आकारुन गाडी (डॉग व्हॅन) पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार नागेश्वरवाडी ते एम. पी. लॉ कॉलेज या १५ मीटर (५० फूट) रुंद रस्त्याने न. भु. क्र. ४७६२ व ४७८४ चे बाधीत क्षेत्र अनुक्रमे ६३ चौ मी व ३४ चौ. मी. आहे. सदर बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करुन मिळकत धारका सधावयाचा मोबदला खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| न. भू. क्र. ४७६२ | द्यावयाचा मोबदला रु. १,६८,१३५/- |
| न. भू. क्र. ४७८४ | द्यावयाचा मोबदला रु. ९२,८७०/- |
| | रु. २,६१,००५/- |

वरील प्रमाणे मिळकत धारकास मोबदला द्यावयाचा असून, मोबदला रक्कम दोन हफ्त्यात देणे आहे. पहिला हफ्ता ५०% संपादीत क्षेत्राचे खरेदी खत करुन घेते वेळी व दुसरा हफ्ता संपादीत क्षेत्र महानगरपालिकेच्या नांवे पी. आर. कार्डवर नोंद घेतल्यानंतर व मालमत्ता टॅक्स बेबाकी प्रमाण सादर केल्यानंतर द्यावयाचे आहे.

तसेच संपादीत क्षेत्राचे नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्यासाठी रक्कम रु. ८५,०००/- (पंच्याऐंशी हजार) रजिष्ट्री करीता अपेक्षीत आहे. करीता दोन मिळकत धारकांना वरील प्रमाणे द्यावयाचा मोबदला म्हणून रु. २,६१,००५/- (दोन लाख एकसष्ठ हजार पाच) व रजिष्ट्री खर्च रु. ८५,०००/-(पंच्याऐंशी हजार) अग्रीम म्हणून श्री. एस.एस. गायकवाड, दुय्यम आवेक्षक यांना देणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. काशीनाथ कोकाटे :** सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पातील कामांना सुरुवात केली किंवा काय त्यावर चर्चा करण्यासाठी लवकर बैठक बोलवावी.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** हा प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात यावा.
**मा. सभापती :** ठिक आहे. पुढील बैठकीत घेण्यात येईल.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

## *ऐनवेळचा विषय*

**विषय क्र. ३० :**

उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सादिया टॉकीज मागील महानगरपालिका व्यापारी संकुलातील तळमजल्यावर २५.०६ चौ. मी. चा गाळा हा औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघास भाडे तत्वावर द्यावयाचा आहे. स्थायी समितीची बैठक दिनांक २०-०२-२००३ मध्ये उक्त गाळा हा औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघास विनामूल्य देणेबाबत ठराव क्रमांक ३३/३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. महानगरपालिका भाडे समितीने रु. २५१०/- प्रति माह असे भाडे ठरविलेले आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न व हित पाहता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ब) नुसार ११ महिन्याचा करारनामा करुन रु. २५१०/- प्रती माह भाड्यावर औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ यांनी सादीया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील गाळा भाडे तत्वावर देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. संजय शिरसाठ :** महानगरपालिकेत पत्रकारांना पत्रकार कक्ष दिले आहे. त्यांना ६ नंतर बातम्या कश्या पोहचावे. त्यांनी चांगल्या बातम्या दयाव्या अशी अपेक्षा असते. ज्याप्रमाणे सभागृहाच्या पत्रकाराकडून काही अपेक्षा असतात तशा त्यांच्या सुध्दा काही अपेक्षा असतात. मनपाने सादिया टॉकीजच्या बाजूला एक व्यापारी संकुल बांधलेले आहे. पत्रकारांनी वारंवार मागणी केलेली आहे की, आम्ही सर्व वेगवेगळे पत्रकार एका ठिकाणी येऊन बसणे व बातम्या संकलन करणे यासाठी मनपाने सादीया टॉकीजच्या बाजूला असलेल्या कॉम्प्लेक्समधील एक गाळा नाममात्र भाडे तत्वावर द्यावा म्हणून मागणी केलेली आहे. नाममात्र याचा अर्थ असा होत नाही की, त्यांना तेथे व्यवसाय करुन उत्पन्न मिळवायचे नाही. म्हणून सर्व स.सदस्यांतर्फे नाममात्र रु. १०१/- भाडे दरमहाप्रमाणे एक गाळा देण्यात यावा. येणाऱ्या दोन-चार दिवसात अग्रीमेंट करुन द्यावे आणि तो गाळा आपल्या व मा. आयुक्तांच्या उपस्थितीत देण्यात यावा.

**श्री. माणिक साळवे :** मागील वर्षी सर्वसाधारण सभेत जिल्हा मराठी पत्रकार संघाला कार्यालयासाठी नाममात्र दराने जागा द्यावी असा ठराव पास केलेला होता. नाममात्र १०१/- रु. भाडे आकारावे. मालमत्ता विभागाने २५००/- भाडे

आकारणी केलेली आहे. जिल्हा मराठी पत्रकार संघ हा व्यावसायिक नाही. समाज व जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी संघ कार्य करतो. नाममात्र १०१/- रु भाडे आकारावे ही विनंती.

**मा. सभापती** : जिल्हा मराठी पत्रकार संघाला मनपाने संघाला मनपाने सादीया टॉकीज जवळील व्यापारी संकुलातील एक गाळा भाडेतत्वावर देण्याचा निर्णय झालेला आहे. भाडे कमी करण्याबाबत जिल्हा मराठी पत्रकार संघामार्फत सभागृहाला विनंती करण्यात आली होती. त्यानुसार स.सदस्य श्री. शिरसाठ, श्री. साळवे यांनी सुचना केल्या प्रमाणे जि. म.प. संघ एक सामाजिक दृष्टीकोन समोर ठेवून कार्य करणार आहे. कोणतीही व्यापार व्यवसाय तेथे करणार नाही. म्हणून या सभागृहाच्या वतीन १०१/- रु. प्रतिमहा नाममात्र भाडे आकारुन त्यांना तो गाळा तात्काळ देऊन दोन दिवसात गाळा ताब्यात देण्यात यावा हा ऐनवेळचा विषय म्हणून मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सादीया टॉकीजमधील महानगरपालिका व्यापारी संकुलातील तळमजल्यावर २५.०६ चौ. मी. चा गाळा हा औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघास भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव आहे. या गाळयाचा वापर सामाजिक कार्यासाठी होणार असून, कुठल्याही प्रकारचा वाणिज्य वापर संबंधिताकडून केला जाणार नाही. म्हणून एक सामाजिक दृष्टीकोन समोर ठेवून जिल्हा मराठी पत्रकार संघास सदरील शाळा प्रतिमहा रु. १०१/- (रुपये एकशे एक मात्र) या नाममात्र भाड्याने देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. तसेच दोन दिवसांत करारनामा करुन घेवून संबंधितास गाळयाचा ताबा देण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २३-०६-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. बुधवार दिनांक २३-०६-२००४ रोजी मा.सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी १२.०५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३. | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ४. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ५. | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फारयार खान | -//- |
| ६. | स. स. श्री. प्रल्हाद निमगांवकर | -//- |
| ७. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ८. | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| ९. | स. स. श्री. भगवान रगडे | -//- |

**संवाद :**

**मा. सभापती** : उस्मानपुरा प्रभागची पोटनिवडणूक असल्याने त्या भागासाठी आचारसंहीता लागू आहे. त्या भागासंबंधीची कोणतीही चर्चा त्या सभागृहात करु नये.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आपल्या अध्यक्षतेखाली दोन महिन्यापासून स्थायी समितीच्या सतत बैठका होत आहेत. बैठकीत अनेक विषयावर चर्चा होवून निर्णय होत आलेला आहोत. परंतू कुठे " माशी शिंकली " समजायला मार्ग नाही. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. महत्वाची बाब निर्दशनास आणून देतो की, सी. आय. पाईप खरेदी करण्याचे टेंडर निघाले. गेल्या दीड वर्षापासून महानगरपालिकेस सी. आय. पाईप मिळालेले नाही. जे काम तातडीचे होते ते कारणे गरजेचे होते ते केलेले नाही. आजच्या विषय पत्रिकेवर पदनिर्मितीचे काही प्रस्ताव आलेले आहेत. महत्वाचे विषय आहेत. अधिकारी उपस्थित नाही. मा. आयुक्त सभेला नाही. मुख्यलेखाधिकारी नाही. आपल्या अध्यक्षतेखाली अधिकारी पदाधिकारी यांची बैठक आयोजीत करुन यावर चर्चा करुन नंतरच स्थायी समितीची सभा आयोजीत करावी. आजची बैठक तहकूब करावी.

**श्री. इलियास किरमानी :** आजच्या सभेला मुख्यलेखाधिकारी नाहीत. मा. आयुक्त नाहीत तसेच उपआयुक्त (प्र.) सुध्दा उपस्थित नाही. हे योग्य नाही. त्यासाठी आजची सभा तहकूब करण्यात यावी. कोणतेही निर्णय घेतल्यानंतर अंमलबजावणी होणार नाही.

**मा. सभापती** : आताच स.सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांनी खंत व्यक्त केलेली आहे की, स्थायी समिती सभेत जे निर्णय घेतात त्यांची अंमलबजावणी होत नाही. ही खेदाची बाब आहे. स. स. श्री. इलियास किरमाणी यांचेही म्हणणे आहे

की, सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी उपस्थित नाही. चर्चा करुन या सभागृहात निर्णय होत असतांना प्रमुख अधिकारी असणे आवश्यक आहे. मा. आयुक्त मुंबईला नगर विकास खात्याची बैठकीच्या संदर्भात गेलेले आहेत. लेखी माहिती दिलेली आहे. मुख्यलेखाधिकारी त्यांचे बरोबर आहेत. आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांचे वैयक्तिक कामासाठी परवानगी मागविलेली आहे. तसेच उपआयुक्त (प्र.) यांनी सुध्दा परवानगी घेतलेली आहे. तसेच श्री. देशमुख नगररचनाकार हे सुध्दा परवानगी घेवूनच अनुपस्थित आहेत. सहाय्यक संचालक, नगररचना श्री. राठोड हे न्यायालयात एका प्रकरणाबाबत गेलेले आहे. कदाचित उशीर होवू शकेल असे त्यांनी मला कळविलेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** अधिकारी नाही. ज्या विभागाचे प्रस्ताव आलेले आहे ते अधिकारी उपस्थित नाही. अंमलबजावणी होणर कशी? चर्चा करण्याची इच्छा नाही. आजची बैठक स्थगित करावी. अंमलबजावणी होणार असेल तर चर्चा करतो.

**मा. सभापती** : या सभागृहात चर्चेअंती जे निर्णय झालेले आहे किंवा घेतले जातील त्यासंबंधी अंमलबजावणी करण्यासंबंधी प्रशासनास आदेश दिले जातील. याचा आढावा घेता येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या दोन वर्षापासून सी. आय. पाईप खरेदीची कार्यवाही का थांबलेली आहे?

**मा. सभापती** : यासंबंधी माझ्याकडे जी माहीती आहे ती अशी की, संबंधित एजन्सीला मंजूरी दिली आहे. त्यांना बँक गॅरन्टी दिली कंपनीचे नावात थोडा बदल आला. त्यानंतर तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्या कंपनीने नांव बदलेले आहे. मागील बैठकीत हा विषय चर्चेला आलेला होता. आजच्या बैठकीसाठी तो प्रस्ताव माझ्याकडे आला त्यावेळी विषय पत्रिका निर्गमीत झाली होती. ऐनवेळचा प्रस्ताव आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** २० पदे निर्मितीचा प्रस्ताव आलेला आहे. उपआयुक्त (प्र.) सभेला नाही. मुख्यलेखाधिकारी नाही. मा. आयुक्त नाही पदनिर्मितीच्या प्रस्तावाबाबत कोणते अधिकारी खुलासा करणार आहे. आपण सर्व जबाबदारी घेत असाल तर, सभेचे कामकाज घ्यावे.

**श्री. मधूकर सावंत :** विषय पत्रिकेवर जे विषय आहेत. त्या संबंधित विभागाचे अधिकारी अनुपस्थित आहे. अधिकारी नाही. त्यासाठी आजची बैठक तहकुब करण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आजची बैठक तहकूब करुन उदया दुपारी ०३.०० वाजता घेण्यात यावी.

**मा. सभापती** : सभागृहात स. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून आजची सभा सभागृहाच्या संमतीने तहकुब करण्यास येत असून, उदया दिनांक २४-०६-२००४ रोजी दुपारी ०३.०० वाजता सभेचे आयोजन करण्यात येईल.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | स्थायी सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २४-०६-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक २४-०६-२००४ रोजी (दि. २३-०६-०४ ची तहकूब सभा का. प. क्र. ८) मा.सभापती श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०३.४५ वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला मा. आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | स. स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक | स. सदस्य |
| २. | स. स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग | -//- |
| ३. | स. स. श्री. शे. इलियास किरमाणी | -//- |
| ४. | स. स. सौ. शाहीन जफर महेमुद जफर | -//- |
| ५. | स. स. सौ. रशिदा बेगम गफ्फारयार खान | -//- |
| ६. | स. स. श्री. प्रल्हाद निमगांवकर | -//- |
| ७. | स. स. श्री. मोहन मेघावाले | -//- |
| ८. | स. स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ | -//- |
| ९. | स. स. श्री. सावंत मधूकर दामोधर | -//- |
| १०. | स. स. श्री. भगवान रगडे | -//- |

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** शहरातील किती बिल्डरांनी बांधकाम परवानगी घेऊन बांधकाम केले. अनाधिकृत किती, भोगवटा प्रमाणपत्र किती बिल्डरांनी घेतले याबाबत आजच्या बैठकीत माहती देणार होते दिलेली नाही. तसेच सारा बिल्डरांच्या बाबत चर्चा केलेली होती. स्वच्छतागृहे तोडून दुकाने तयार केली. ती विक्री केली. संबंधितास तीन दिवसांची नोटीस दिलेली होती. त्यानंतर ३५ दिवसाची नोटीस दिली. कॅव्हेट दाखल केले नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा. एखाद्या लहान रस्त्यावरील टपरी वैगेरे असेल तर, तात्काळ काढले जाते. वृत्तपत्रात येते प्रशासकीय विभाग सतर्क आहे. सामान्य नागरीकांवर तात्काळ कार्यवाही होते. मोठमोठया बिल्डरवर कार्यवाही होत नसेल तर, योग्य नाही. हे प्रशासन काय करते. (याच वेळी स. स. श्री. किरमानी त्यांचे हातातील विषयपत्रिका फाडून सभागृहात सभापती यांचे डायससमोर टाकतात.) मला सभागृहाबाहेर काढले तरी चालेले परंतू मोठमोठया बिल्डरवर कार्यवाही होत नाही. त्यांचे पोलीस गुन्हे का दाखल होत नाही. सर्वसामान्य व्यक्तींना सुध्दा असे वाटू लागले की, मनपाचे अधिकारी फक्त गरीब लोकांवरच कार्यवाही करतात. बिल्डरांनी अनाधिकृत बांधकाम करुन दुकाने काढली पुन्हा त्यांना इतर सुविधा दिल्या जातात.

**मा. सभापती** : स. सभासद किरमाणी आपण आपल्या जागेवर बसावे. आपल्या प्रश्नाचा खुलासा केला जाईल. सहा. संचालक नगररचना उपस्थित आहे. त्यांनी खुलासा करावा. किती लोकांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले असून, किती लोकांनी घेतलेले नाही. याबाबत सर्वेक्षण करुन माहीती पुढील बैठकीत

ठेवावी म्हणून आदेशित केलेले होते. सारा बिल्डरबाबत प्रश्न उपस्थित झालेला होता. त्यास अगोदर तीन दिवसांची नंतर ३५ दिवसांची नोटीस देण्यात आली. त्याबाबतही सहा. संचालक नगररचना व प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**सहा. संचालक न. र. :** सन २००३-२००४ या वर्षात भोगवटा प्रमाणपत्रासाठी ११२ लोकांचे प्रस्ताव प्राप्त झालेले होते. त्यापैकी ५९ लोकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. उर्वरीत प्रकरणाच्या बाबत कागदपत्रांची पुर्तता न करणे. बांधकाम परवानगीच्या व्यतिरिक्त केलेले बांधकाम यामुळे भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** ज्यांनी जास्तीचे बांधकाम केले. कागदपत्रे पूर्ण नाही. त्या बिल्डरवर दाखल केलेले नाही. बिल्डर पैसे देतात.

**मा. सभापती** : कायदयाच्या बाबी तपासुन संबंधितावर गुन्हा दाखल करता येतो का? स. सदस्यांनी आरोप केले ते गंभीर स्वरुपाचे आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** कोण किती पैसे देतो त्यानुसार कार्यवाही होते असे माझे मत आहे. ज्यांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. वापर सुरु आहे. अशा बिल्डरांवर पोलीस गुन्हा का दाखल होत नाही. गरीब व्यक्तीवर तात्काळ कार्यवाही होते. मी माझ्यावर आरोप करतो की, मी किती पैसे घेतले. ज्यावर स्थगिती आहे ते ही तोडले. प्रशासन भेदभाव करते. आंधळे होवून काम करतात.

**श्री. संजय शिरसाठ :** ६० प्रकरणे किती दिवसांपासून प्रलंबीत आहेत.

**सहा. संचालक नगररचना :** भोगवटा प्रमाणपत्र मागणी केल्यानंतर नोटीस देण्यात आलेल्या होत्या. त्या नोटीसने प्रतिसाद दिलेला नाही. कोणते प्रकरण केव्हा पासून प्रलंबीत आहे. आताच खुलासा करता येणार नाही. माहीती काढीवी लागेल.

**श्री. संजय शिरसाठ :** ६ महिने, २ महिने, ३ महिने अंदाजीत कालावधी सांगू शकता. नोटीस दिल्यानंतर त्यात ही कालावधी दिलेला असतो. विहीत मुदतीत कार्यवाही केली नाही. तर कार्यवाहीची विहीत मुदतीत कार्यवाही केली नाही तर कार्यवाही करण्याची तरतुद असतांना नोटीस देवून टाकायची व नोटीस दिलेली होती उत्तर देणे बरोबर नाही.

**सहा. संचालक न. र. :** सन २००३-०४ मधील ही प्रकरणे आहेत. ६० दिवसात करावे लागते.

**श्री. संजय शिरसाठ :** २ महिन्यापूर्वीची प्रकरणांत समजु न घेऊ शकतो. परंतू नोटीस देवून त्या संबंधित मालकाने उत्तर दिले नाहीत. दोन महिने उलटले अशा प्रस्तावाबाबत काय कार्यवाही आपण केलेली आहे. अंदाजीत कालावधी आपण सांगू शकता. २ महिने चार महिनेची प्रकरणे असतील.

**मा. सभापती** : सविस्तर माहती ६० प्रकरणाच्या बाबतीत पुढील बैठकीत देण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** शहरात बऱ्याच ठिकाणी भोगवटा प्रमाणपत्र न घेता दुकाने चालू आहे. वापर सध्या सुरु आहे. अशा लोकांवर पोलीस गुन्हे दाखल का केले नाही.

**मा. आयुक्त** : मागील दोन बैठकीपूर्वी अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामाबाबत सविस्तर अशी चर्चा झालेली होती या विभागात तीन ठिकाणी खुपच लक्ष दयावे लागणार आहे. काम करण्यासाठी यंत्रणा वाढवावी लागणार आहे. सध्या जो कर्मचारी आहे तो अपूरा पडतो आहे. जे प्रयत्न होत आहे. ते अपुरे पडते.

पहिली बाब प्लिंथ तपासणीचे आदेश काढले. यापूर्वीच प्लिंथ तपासणी केव्हाच केलेली नव्हती. दर बुधवारी सहा.संचालक नगर रचना यांचे कार्यालयात आढावा घेण्यात येत आहे. लिटल व त्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देण्याची पध्दत सुरु होईल. सन २००३-२००४ या वर्षात एकूण बांधकाम परवानगीसाठी आलेले एकूण अर्ज किती असा खुलासा करावयास पाहीजे होता. त्यात १ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४ हा कालावधी येतो. ५९ भोगवटा प्रमाणपत्र दिले ६० लोकांना दिले नाही. जेष्ठ सदस्य येथे बसलेले आहेत. हे स्पष्ट होत की, उर्वरीत जे ६० लोकांनी भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरु केलेला आहे. त्यांचेवर नियमानुसार काय कार्यवाही केली याचा खुलासा स. सदस्यांना अपेक्षीत आहे. यापेक्षा जास्त खुलासा करण्याची आवश्यकता नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** मा. आयुक्तांनी आताच सुचना केल्यानुसार संबंधित अधिकारी केव्हा खुलासा करणार आहेत.

**मा. सभापती** : सविस्तर माहीती पुढील बैठकीत देतील जी प्रकरणे दंडात्मक कार्यवाही करुन बांधकाम नियमीत करता येत असेल तर विचार करण्यात यावा.

**श्री. इलियास किरमाणी :** सारा बिल्डरचे अनाधिकृत काम तोडावे. तीन दिवसाची नोटीस त्याचे पालन नाही. त्यानंतर ३५ दिवसाची नोटीस देण्यात आली. आपल्या आदेशाचे पालन होत नाही. बिल्डर लोक करोडो रुपयाचे बांधकाम करीत आहेत. याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष आहे. मा. आयुक्तांची व सभागृहाची अधिकारी दिशाभूल करतात.

**मा. आयुक्त** : दोन दिवस मी बाहेरगांवी होतो. उपआयुक्त शिंदे हे आजारी होते. त्यामुळे प्रत्यक्ष स्थळी जावू शकलो नाही. कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. इलियास किरमाणी :** न्यायालयाचे स्थगिती आदेश होते. तर कॅव्हेट दाखल करण्याचे आपण प्रशासकीय विभागास कळविले होते का, कॅव्हेट का दाखल केले नाही. नोटीस देवून टाकली जबाबदारी संपली असा अर्थ लागला जातो.

**प्रशासकीय अधिकारी :** सारा बिल्डर्स यांनी जे अनाधिकृत काम केले त्याबद्दल सुचना दिल्या होत्या. प्रत्यक्ष पाहणी केली ३ दिवसाची नोटीस दिली त्यानंतर सहा.संचालक नगररचना साहेबांनी चर्चा केली. काम चालू असेल ते थांबविण्यासाठी ५२, ५४ नुसार नोटीस द्यावी लागते. त्यानुसार संबंधित व्यक्तीस नियम ५२, ५३ ची नोटीस दिलेली आहे. ३५ दिवसाची नोटीस दिली. कॅव्हेट दाखल करण्यासाठी सुध्दा विधी सल्लागार यांनी पत्र दिले आहे.

**मा. आयुक्त** : सभापतीच्या परवानगीने बोलतो. काम चालू असले तर, ते आहे. त्या स्थितीत थांबविले पाहीजे. काही चुकले असेल तर आयुक्तांनी जबाबदारी आहे असे समजावे.

**श्री. इलियास किरमाणी :** टॉयलेटच्या जागेवर ३-४ दुकाने काढलेले आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** मंजूर प्लॅनमध्ये टॉयलेट दाखविलेले आहे परंतू ते दूकाने झालेली आहे.

**मा. आयुक्त** : मंजूर परवानगीनुसार बांधकाम नाही. त्यावेळी आहे त्या स्थितीत थांबविणे त्याचा पंचनामा करणे व पुढे पोलीस विभागात तक्रार द्यायची ती दयावी. टॉयलेटच्या जागेवर दुकाने बांधकाम करावे याला नियमीत करता येत असेल तर आताच चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**मा. सभापती** : सामायिकरित्या तपासणी करुन पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा.

**श्री. इलियास किरमाणी :** ज्या बिल्डरांनी भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. अशा इमारतींना ड्रेनेज लाईन, पाणी लाईन देवू शकतो का? भोगवटा प्रमाणपत्र न घेता काही इमारतींना पाणी दिले जाते या संदर्भात पत्रही दिलेले आहे. पाणी पुरवठा अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**मा. सभापती** : बांधकाम होईपर्यंत तात्पुरते कनेक्शन घेतलेले असेल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** आतापर्यंत २-३ बैठकीपासून निर्णय घेत आहोत. त्या निर्णयाची अंमलबजावणी काय झालेली आहे कोणती कार्यवाही बाकी आहे. खुलासा घ्यावा. मागच्या वेळेस घेतलेल्या विषयावर चर्चा करुन आढावा घ्यावा पुढील विषय घेवूच नये असे माझे मत आहे. सर्व ॲक्शन पॉईंट प्रशासनाकडे आहे.

**मा. सभापती** : ४-५ बैठकीतील बरेच ॲक्शन पॉईन्ट आहेत. महत्वाचे मुद्दे चर्चेला घ्यावे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जालना रोड रस्त्यावरील मोंढा परिसरात असलेल्या फळाच्या गाडया हटविण्याबाबत चर्चा केलेली होती. अदयाप कार्यवाही केलेली नाही. दुसऱ्या दिवशीच कार्यवाहीचे आदेश दिले होते.

**मा. सभापती** : प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी :** तेथील फळांचे दुकाने काढण्याकरीता कर्मचारी गेलेले होते. परंतू पावसाळयाचे दिवस असल्याने त्यांनी वेळ मागविलेला आहे. ८ दिवस कालावधी दिलेला आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** पावसाळा चार महिने असतो. चार महिने अतिक्रमण हटविणार नाही का?

**श्री. इलियास किरमाणी :** अतिक्रमण हटविण्यास विरोध नाही. पंरतू माणुसकीच्या नात्याने मुदत मागविली देण्यास हरकत नसावी. त्या लोकांच्या रोजी रोटीचा प्रश्न आहे. पावसाळयानंतर हटवावे.

**मा. आयुक्त** : शासनाचे तसे परिपत्रक ही आहे. ते संबंधित विभागाला अधोरेखीत करुन पाठविलेले आहेत. सन २००४ च्या पावसाळयासाठी सुचना आहे. आताच स. सदस्य श्री. किरमाणी बोलले त्यानुसार ज्यांचे डोक्यावरील छत काढले व पावसाळया दिवसात त्यांचे संसार उघडयावर पडतील. त्यांना रोजी रोटीला सुध्दा बाधा येईल. अशा प्रकारच्या अतिक्रमणाच्या बाबत पावसाळयात सहानुभूती बाळगावी याचा अर्थ व्यापारी किंवा ज्याच्यापासून खूप उत्पन्न मिळते त्यांना संरक्षण द्यावे असा होत नाही. मोठया स्वरुपाची आर. सी. सी. ची कामे चालू आहेत. ती मोठया स्वरुपाची आहेत. तेथे सध्या कोणी राहात नाही. यासाठी हे शासन परिपत्रक लागू होत नाही.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सेल ॲन्ड जाहीरात फलकांचे उर्वरीत २२ लक्ष रुपये मनपाकडे भरणार होते. त्यास खुलासा देण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी :** सेल ॲंड कंपनीला निविदेच्या अटीनुसार रु. १९,४०,२२६/- रुपये भरणा करण्याबाबत व १८ % व्याजा रक्कम भरण्याबाबत नोटीस दिलेली आहे. विधी विभागाकडून करारनामा तपासणी करुन नोटीस देण्यात आलेली आहे. जुलै २००४ पर्यंत पैसे भरणा केले नाही तर करारनामा रद्द करण्याबाबतची नोटीस देणार आहोत.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** १९ लक्ष रुपये हे पहिल्या सहा महिन्यासाठीचे होते. पुढील सहा महिन्याची रक्कम १५ दिवसांत भरणा करणे आवश्यक होते. पाच महिने

गेले तरी अदयाप उर्वरीत रक्कम भरणा केलेली नाही. जुलै अखेर भरणा करणार की नाही, त्या कंपनी मालकाचा प्रतिसाद मिळत नाही.

**श्री. मालमत्ता अधिकारी :** १२.२.०४, २८-०३-०४ ला पत्र दिलेले आहे. दोन वेळेस नोटीस दिली. पुढील महिन्यात ३० जुलै पर्यंत रक्कम भरणा केली नाही. तर करारनामा रद्द करण्याची नोटीस देवून साहीत्य जप्त करावे लागेल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** बऱ्याच ठिकाणी धोकादायक होर्डींग्ज आहेत. त्या का काढण्यात आलेल्या नाही?

**मा सभापती :** ज्या धोकादायक होर्डींग्ज आहेत त्या तात्काळ सर्वे करुन काढण्याच्या सूचना केलेल्या होत्या.

**मालमत्ता अधिकारी :** आपण कार्यवाही सुरु केलेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** बऱ्याच दिवसांपासून बैठकीत जाहीरात फलकाच्या संदर्भात स. सभासद प्रश्न उपस्थित करतात. मनपाच्या उत्पन्नाची बाजू आहे. वारंवार तोच तो खुलासा प्रशासन करीत आहे. नुसत्या सभा घेवून वेळ वाया घालवयाचा का? अशी उत्तरे मिळत असतील सभेचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहीजे असे माझे मत आहे. १५ दिवसांपुर्वी स्थायी समितीची बैठक झालेली होती. शहरात अनेक भागात रस्त्याच्या कडेला अनाधिकृत होर्डींग्ज लावण्यात आल्या त्या काढण्यात याव्या म्हणून स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यामुळे प्राणहानी वित्तहानी होऊ शकते असे मतही व्यक्त केले होते. जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही झाली पाहीजे. १५ दिवसात कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही.

**मालमत्ता अधिकारी :** सर्वेक्षण केलेले आहे. होर्डींग्ज मालकास नोटीस दिली १२७ प्रकरणे आपल्याकडे नोंदणी झालेली आहेत. त्यातील काही रेग्युलाईज करुन उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करतो आहोत.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मा. सभापती आपण अधिकाऱ्यांना पाठीशी घालता आहात. असे होत असेल तर, आम्हाला सभेला बोलावू नये. सभा तहकूब करा. जे निर्णय आपण घेतलेले आहे. त्यानुसार कार्यवाही का केलेली नाही. दोन दिवसाचे आदेश दिले होते. मागील मिनिटस मध्ये दिलेले आहे.

**मा. सभापती :** शहरात रस्त्याच्या कडेला ज्या ज्या धोकादायक होर्डींग्ज लावलेल्या आहेत. त्या उदया सायंकाळ पर्यंत काढुन अहवाल सादर करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** स्थायी समितीच्या निर्णयानुसार विकास केलेल्या २५% जागा मनपाने ताब्यात घेण्याची कार्यवाही केली. ताब्यात घेतांना काही नियम दिलेले आहेत. भोगवटा प्रमाणपत्र दिले पाहीजे. नंतरच ताब्यात घ्यावे. मालखरे बिल्डर्सची जागा ताब्यात घेतांना जागेचे मोजमाप न घेता भोगवटा प्रमाणपत्र न देताच २५% जागा घेण्याऐवजी २२% घेण्यात आली. भोगवटा प्रमाणपत्र न देता काही दूकानाचे निविदा सूचना काढण्यात आले. वृत्तपत्रात दिले. ते काढता येतात का? मालमत्ता अधिकारी सहा. संचालक नगर रचना यांनी खुलासा करावा. भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय वापर करता येत नाही असे नियमात आहे.

**मालमत्ता अधिकारी :** त्या ठिकाणी बांधलेली जी दुकाने आहेत ती मी या विभागाचा कार्यभार घेण्यापूर्वी जे मालमत्ता अधिकारी होते त्यांनी ताब्यात घेतली आहेत. तेथील दुकाने खूप दिवसापुर्वी तयार झाली होती. त्यांचे भोगवटा प्रमाणपत्र शहर

अभियंता यांचेकडून प्राप्त आलेले होते. म्हणून प्रशासकीय मान्यतेनुसार या दुकानाचे टेंडर काढलेले आहे.

**सहा. संचालक न. र. :** जो २५% भाग आहे त्यास रितसर शहर अभियंता यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे. ते रितसर ताब्यात सुध्दा घेतलेले असून, नगररचना विभागाकडून जी शिफारस झाली ती फक्त २५% जागेच्या बाबतीत झालेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** ७५%, २५% एकत्रित बांधकाम परवानगी दिली. नियम काय सांगतात त्यावर खुलासा व्हावा. ७५ चे भोगवेटा होणेसंबंधी काम आहे. २५ मनपाचा हिस्सा देणार होते. जो पर्यंत संपूर्ण बांधकामासाठी भोगवटा प्रमाणपत्र देत नाही. तोपर्यंत २५ जागेला सुध्दा भोगवटा प्रमाणपत्र देऊ शकत नाही. असा नियम दिसून येतो. हे चुक आहे की बरोबर आहे. संबंधित मालकास भोगवटा प्रमाणपत्र दिले का भोगवटा प्रमाणपत्र भागशः देता येते का

**सहा. संचालक न. र. :** पार्ट कम्प्लीशन देता येते.

**श्री. संजय शिरसाठ :** संबंधितास बांधकाम परवानगी दिली त्यांनी बांधकाम बरोबर केले किंवा काय याची तपासणी होणार नंतर भोगवटा प्रमाणपत्र देणार. ते न घेता दुकानाचे टेंडर कसे काढण्यात आले. हा माझा प्रश्न आहे.

**सहा. संचालक न. र. :** नियमाला धरुन नाही.परंतू त्यावर माझा खुलासा असा की,

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आताच अधिकाऱ्यांनी पार्ट कंम्प्लीशन प्रमाणपत्र देता येते म्हणून खुलासा केला. कोणत्या कलमाखाली नियमानुसार देता येते. खुलासा करावा. पुस्तक माझ्याकडे आहे. कलम वाचून दाखवावे.

**सहा. संचालक न. र. :** कलम ४५ एमआरटीपी ॲक्टचे आहे. त्यानुसार जे डेव्हलपमेंट कंट्रोल रुम्स आहेत. कलम ४५ हे विकास परवानगी बाबतचे नियम आहेत. आणि त्या अनुषंगाने जे विकास नियंत्रण नियमावली तयार झालेली आहे. त्यानुसार दिलेले आहे.

**मा. सभापती** : मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : पहिला मुद्दा पार्ट कम्प्लीशन सर्टीफिकेट देण्याच्या ज्या तरतुदी आहेत. त्या सभागृहाला दाखवून दयाव्यात. याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करणे आवश्यक होते. मी स्वतः संचिका तपासलेली असून जो हिस्सा २५% मनपास मिळणार तो त्यांनी पूर्णतः सर्टीफाय केलेला आहे. उर्वरीत मुद्दा असा की, ते ७५% मालखरे बिल्डरचे बांधकाम त्यांचेकडे भोगवटा प्रमाणपत्र नसतांना दुकान टेंडर काढले. जेव्हा एकत्रीत बांधकाम परवानगी देता तेव्हा ७५% वरच्या बांधकामात काही त्रुट्या राहील्या असतील व भोगवटा प्रमाणपत्र देता येत नसेल तर सभागृहाच्या प्रश्न विचारात दयावा लागेल. २५% चा शहर अभियंता यांनी रिपोर्ट दिला. भोगवटा प्रमाणपत्र दिले. त्यामुळे देण्यात आले. २५% जागेचा भोगवटा प्रमाणपत्र देण्यास अडचण नसावी परंतू का दिले गेले याचा खुलासा आवश्यक आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** महानगरपालिकेचे हित जपतांना विचार करावा. २५% तर जागा नाही. २२% दिलेली आहे. संबंधित मालकाचे ७५% चे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ते तपासणी करुन.

**मा. आयुक्त** : २५%, २२% जो हिस्सा मनपास मिळाला त्याबाबत एडीटीपी किंवा शहर अभियता यांचेकडून खुलासा घेणे आवश्यक आहे. यापुर्वीही सभागृहात चर्चा झालेली आहे. अशी ४ प्रकरणे आहेत. ते लवकरात लवकर मार्गी लावावेत.

अशी सुध्दा चर्चा झालेली होती. या दुकानाचे टेंडर ऑक्शन करण्याकरीता मालमत्ता विभागाने गती दयावी. अशी चर्चा झालेली होती. जेव्हा १००% एस. एफ. आय. चा विचार करतो. ७५% संबंधित मालक होणार व २५% मनपास देणार असेल व एस. एफ. आय. नुसार मनपाचे नुकसान होवू नये. हा सुध्दा महत्वाचा मुद्दा आहे. ते विचारात घेवून त्या दुकानाचा लिलाव झालेला आहे की नाही हा खुलासा आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** संबंधित विकास बांधकाम करणाऱ्या मालकास भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय दुकानाचा लिलाव करु शकत नाही. हा माझा प्रश्न आहे. जो खुलासा केला तो चुकीचा आहे. मूळ मालकास प्रमाणपत्र दिलेले नाही.

**मा. आयुक्त** : १९९४ चा जी. आर. आणि एडीटीपी व शहर अभियंता यांनी केलेली कार्यवाही तपासणे गरजेचे आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पार्ट कम्प्लीशन देता येते. आताच खुलासा केला मला याची जाणीव आहे. एखादया व्यक्तीला ५०० चौ. फुट बांधकाम परवानगी त्यांनी पूर्ण बांधकाम करण्याची परिस्थिती नसेल. म्हणून विचार करुन त्यांनी केलेले बांधकाम पार्ट कम्प्लीशन प्रमाणपत्र देवू शकतो असे माझे मत आहे. परंतू हे प्रकरण वेगळे आहे. ७५-२५ जागेचा विकास करुन २५ जागेवरील आलेला विकास मनपास हस्तांतर करणे आवश्यक होते. जेव्हा एकत्रीत परवानगी दिली व पार्ट कम्प्लीशन प्रमाणपत्र देता येते का? दिल्यानंतर ती दुकाने जागा विक्री केल्यास पुन्हा वेगळा प्रकारे घडल्यास त्यास जबाबदार कोण असा प्रश्न निर्माण होतो.

**मा. आयुक्त** : स. सदस्य जी चर्चा करतात ती बरोबर आहे. ए. डी. टी. पी. नी यात खुलासा करुन दयावा. आदर्श स्थिती अशी आहे. १००% चे भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय कम्प्लीशन प्रमाणपत्र देवू नये.

**मा. सभापती** : एकत्रित बांधकाम परवानगी दिली पार्ट कम्प्लीशन प्रमाणपत्र देता येते का? ते देता येत नाही. असा सदस्यांचा प्रश्न असून दुकाने ऑक्शन केले ते का? केले त्यावर खुलासा अपेक्षीत आहे.

**सहा. संचालक नगररचना :** २५% जे क्षेत्र आहे ते स्वतंत्र आहे. त्या प्लॉटमध्ये असले तरी एका बाजूला आहे. शहर अभियंता यांनी २५% क्षेत्रास भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** सबंधित मालकास एकत्रित बांधकाम परवानगी दिली. त्यास भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय २५ जागेलाच स्वतंत्र भोगवटा प्रमाणपत्र देणे हे नियमाला धरुन आहे का? हा प्रश्न आहे. नियमास धरुन आहे का?

**सहा. संचालक न. र. :** नियमास धरुन नाही.

**मा. आयुक्त** : ७५% जे बांधकाम झाले ते वाढू देवू नये. ते सध्या रिकामे पडलेले आहे. वापर होत नाही. त्या जागेचा वापर केव्हांचाच सुरु झालेला असेल.

**सहा. संचालक न. र. :** स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा होवून २५% जागा हस्तांतरी करुन घेण्याबाबत ठरविले होते.

**मा. सभापती** : हस्तांतर झाले ते नियमानुसार आहे का सहा. संचालक नगर रचना यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिले का शहर अभियंता यांनी बरोबर असल्याची तपासणी केलेली आहे का. हे सर्व तपासून त्या जागा ताब्यात घ्याव्यात असे ठरलेले असेल. भोगवटा प्रमाणपत्र नसतांना २५ जागा घेण्याबाबत का कार्यवाही झाली.

**श्री. संजय शिरसाठ :** भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय जागा ताब्यात घेता येत नाही असे माझे मत आहे.

**सहा. संचालक न.र. :** ७५% जागेचे भोगवटा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कार्यवाहीस्तव आहे.

**मा.सभापती** : निविदा प्रसिध्दस देणार आहेत का, ते देण्यापुर्वी पुढील कार्यवाही करण्यापूर्वी सर्व नियम तपासावे.

**मा. आयुक्त** : अशी आणखी तीन प्रकरणे आहेत. भोगवटा प्रमाणपत्र देण्यास काय अडचण आहे. अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. सहा. संचालक न. र. व त्यांचे उपअभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. प्रमाणपत्र देण्यास काय अडचण आहे. अडचण नसेल तर का देत नाही?

**श्री. संजय शिरसाठ :** भोगवटा प्रमाणपत्राशिवाय त्या दुकानांचे निविदा सूचना काढू शकत नाही. जे टेंडर काढले ते चुकीचे आहे असे माझे मत आहे. उर्वरीत जी प्रकरणे असतील. त्यांचेही भोगवटा प्रमाणपत्र न देता ताब्यात घेणार आहात का? संपूर्ण वस्तुस्थिती निर्दशनास आणून दिली आहे.

**मा. सभापती** : मालखरे बिल्डरने बांधकाम केले त्याचे ताब्यात घेतलेल्या गाळयांचे निविदा प्रसिध्द झाली. ते कोणत्या स्तरावर आहे?

**मालमत्ता अधिकारी :** एकुण सात दुकाने आहेत. त्या बाबतीत टेंडर काढलेले आहे. प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले आहे. यापुर्वीचे मालमत्ता अधिकारी यांनी हस्तांतर करुन घेण्याची कार्यवाही केलेली आहे. शहर अभियंता यांनी कामे पूर्ण असल्याबद्दल प्रमाणपत्रही दिलेले आहे. म्हणून निविदा काढण्यात आलेल्या आहेत.

**श्री. इलियास किरमाणी :** कोणत्या नियमाने टेंडर काढले. खुलासा घ्यावा.

**मा. सभापती** : भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय निविदा काढावयास नको होती निविदा प्रक्रीया झाली ती नियमबाह्य झाली. सर्व सदस्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होते. सहा. संचालक नगर रचना व मालमत्ता अधिकारी यांनी गाळयांची चौकशी करावी. चौकशी अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** निविदा काढल्या इथपर्यंत ठिक आहे. पाच वर्षे जागा ताब्यात घेण्यास लागले. भोगवटा प्रमाणपत्र नसतांना निविदा कशाच्या आधारे काढल्यानियम वाचून दाखवावे.

**श्री. मधूकर सावंत :** सभागृहात अधिकारी उत्तर देवू शकत नाही. अशी स्थिती निर्माण झाली आहे. असे खेदाने सांगावे वाटते.

**मा. सभापती** : निविदा काढली ती सर्व प्रक्रीया नियम बाह्य झालेली आहे. हे चर्चेवरुन स्पष्ट दिसून येत आहे. मालखरे बिल्डर्सने बांधलेल्या दुकानांची नियमबाह्य काढण्यात आलेली निविदा रद्द करण्यात येते. सहा. संचालक नगर रचना यांनी जी सर्व मिळून चार प्रकरणे आहेत त्या सर्व प्रकरणाचा अहवाल पुढील बैठकीत द्यावा. मालमत्ता अधिकारी यांनी जी गाळेबाबत निविदा काढायची ती संपूर्ण तपासूनच निविदा प्रसिध्दीस दयावी व मालखरे बिल्डर गाळे निविदा काढण्याबाबत सविस्तर अहवाल आल्यानंतरच चर्चा करावी.

**श्री. संजय शिरसाठ :** विषय महत्वाचा आहे. गाळे पाच वर्षापासून पडून आहेत. निविदा काढल्या. मान्य आहे. परंतू त्या चुकीच्या पध्दतीने काढल्या हा माझा प्रश्न आहे. याबाबत जबाबदार कोण व जबाबदारी कुणावर निश्चित करणार आहात?

**मा. सभापती** : याबाबत मा. आयुक्त यांनी चौकशी करुन जे दोषी असतील त्याबाबत कार्यवाही अहवाल पुढील बैठकीत सादर करावा.

**श्री. मधुकर सावंत :** क्रांतीचौक येथील सर्व्हे नं. ५४ कोणाच्या मालकीचा आहे. खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** क्रांतीचौक येथील सर्वे न. ५४ च्या ७/१२ वर महानगरपालिकेचे नांव आहे. माझ्याकडे दि. ०७-१२-२००२ चा उतारा आहे.

**श्री. मधूकर सावंत :** आज या जागेची मार्केट व्हॅल्यू करोडो रुपये आहे. मनपाच्या ताब्यात यापैकी किती जागा आहे. खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** एकूण ९ एकर जागा आहे. उर्वरीत माहिती माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही.

**श्री. मधुकर सावंत :** अधिकाऱ्यांकडे सर्व माहिती उपलब्ध आहे. देण्याचे टाळले जात आहे. माझ्याकडे सर्व माहिती आहे. ९ एकर मधून ५ लोकांना जागा भाडे तत्वावर दिलेली आहे. धरेन्द्रसिंग रहेन्द्रसिंग यांना ५०० चौ. मी. दिलेली आहे.

**मालमत्ता अधिकारी :** ही माहीती आहे. एकूण पाच लोकांना जागा भाडेतत्वावर दिली आहे. १ धरवेंद्रसिंग रघुवीरसिंग यांना ५५१ चौ. मी.प्रति ८४/- रु. चौ. मी.प्रमाणे भाडयाने दिलेली आहे. २ कर्सन तान्हाजी पटेल २९६२ चौ.मी. ४६८/- रु. चौ. मी. प्रमाणे ३ लालदास पन्नालालदास यांना ११३१/- चौ. मी. जागा २८२ चौ. मी. प्रमाणे दिली ४. देवेंद्रसिंग मुलसिंग जग्गी ७०६.०६ चौ. मी. रु. ११५/- व ५ कल्याणजी युवाजी यांना ६३५.५ चौ. मी. रु. ७९/- प्र. चौ. मी. प्रतिमहा प्रमाणे दिलेली आहे. यापैकी दोन लोकांनी जास्त जागा घेतलेली आहे मी स्वत: मोजणी केलेली आहे.

**श्री. मधुकर सावंत :** या पाच लोकाव्यतिरिक्त मनपाच्या ताब्यात किती जागा आहे. गेल्या सहा महिन्यापूर्वीच मी उपआयुक्त व मालमत्ता अधिकारी यांना मनपाची ही जागा ताब्यात घ्यावी म्हणून पत्र दिले होते. मनपाच्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे मनपाचे करोडो रुपयाचे नुकसान होते. अर्थसंकल्पाचे पुस्तक बघितले तर २९४ कोटीचे कर्ज मनपावर आहे ही मनपा बिगारी की भिकारी म्हणावे असा प्रश्न पडतो. मनपाच्या मालकीच्या इतक्या जमिनी भूखंड आहेत की, ते विक्री केले तर मनपावर कोणतेही कर्ज राहणार नाही. असे माझे मत आहे. १०० फुट रुंद रस्त्यावर या जागा असून, मनपास त्यापासून फक्त १०२८/- रुपये टॅक्स म्हणून जमा झालेले आहेत. परंतू महानगरपालिकेने एम. ए. पोटी आजपर्यंत ११,१९,३६२/- रुपये भरणा केलेले आहेत. ९५-९६ ला रु. ५,६०,०८०/- तर ९६-९७ ला रु. १,१८,०८६/- रुपये भरणा केले. तर ९६-९७ ला २,९५,२००/- सन २००० साली १,४५,२०२/- भरणा केली. महाराष्ट्र शासनाकडून जे अनुदान येते ते ३.०० कोटी परस्पर त्या विभागाने वळती करुन घेतलेले आहे. एक गुण जमा मनपाच्या ताब्यात नाही ज्या लोकांनी अतिक्रमण केले खोटे नाटे कागदपत्र बनवून पी. आर. कार्डवर नांवे लावली त्यांची सुध्दा यादी माझ्याकडे आहे. रमानगर स्मशानभूमी कडील काही भाग मनपाच्या ताब्यात असू शकेल. तेथे सुध्दा एक प्रायव्हेट व्यक्ती पैसे मागतो. ही जागा माझ्या मालकीची आहे असे सांगाते. उर्वरीत काही जागेत भुरुड व लिंगायत समाजाची स्मशानभूमी आहे. ७.५० (साडे सात) एकर जमीन इतर लोकांनी घेतलेली आहे. त्यात राजस्थान हॉटेल मालक, राजतारा हॉटेल मालक शे.

अब्बास बारवारवाला, भारत ट्रॅक्टरवाला शहा, लक्ष्मी हार्डवेअर व कर्सनजी पटेल, विष्वकर्मा इंजिनियरींग तसेच हॉटेल मेवाडची चार दुकाने अशी यात एकूण ७.५० एकर जागा गुंतलेली आहे. ही जागा सर्व मनपाच्या मालकीची आहे. खोटे-नाटे, पी. आर. कार्ड तयार करुन जागा बळकावलेल्या आहेत. माझी सभागृहाला विनंती की, आपला फायदा ८१/बी सभागृहाल वाचून दाखवला तर बरे होईल. माझ्या माहीती प्रमाणे कायदयानुसार मनपाचे हित जपण्याचे प्रशासनाचे काम आहे. म्हणून ३ दिवसांची नोटीस देवून त्वरीत जागा रिकामी करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी व मनपाचे हित जोपासावे. नुकसान होता कामा नये.

**मा.सभापती** : स. सदस्य श्री. सावंत यांनी आरोप केले. उपआयुक्त यांनी खुलासा करावा.

**उपआयुक्त (म) :** सर्व्हे न. ५४ क्रांतीचौक येथील जागेचा ७/१२ उतारा हा मनपाच्या नावाने आहे. २१ लोकांनी सिटी सर्व्हे ऑफीसमधून स्वतःच्या नावाचे पी. आर. कार्ड स्वतःच्या मालकीच्या म्हणून नोंद करुन घेतलेली आहे. ज्या ठिकाणी सिटी सर्व्हे लागू होतो. तेथे सात बारा लागू होत नाही. ज्या ठिकाणी ७/१२ असतो तेथे सिटी सर्व्हे राहत नाही. या दोन्ही विभिन्न बाबी आहेत. ९ एकर मध्ये २१ लोंकाच्या नावाचे पी. आर. कार्ड व काही जागा स्मशानभूमी साठी आहे. म्हणून मनपाच्या नावाने ती जागा करण्यासाठी रितसर कार्यवाही करणे आवश्यक आहे. पी. आर. कार्ड तयार झाले ते रद्द करणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्या जागेला मनपाचे नांव सिटी सर्व्हे कार्यालयात नोंद होणार नाही. त्या २१ लोकांना मालमत्ता विभागामार्फत रितसर नोटीसा दिल्या. त्यांचे मत जाणून घेतलेले आहे. मुदत मागितलेली आहे. प्रथमदर्शनी त्यांनी जे कागदपत्र सादर केलेले होते. त्यात १९५० व त्यापूर्वी नगर पालिकेच्या काळात त्यास मान्यता दिल्याबाबतचे काही पुरावे सादर केलेले आहेत. महापालिकेने त्या लोकांना बांधकाम परवानगी दिलेली आहे. काही नगरपालिका तर प्रशासकाच्या काळातील ती परवानगी आहे. दिलेली सर्व कागदपत्र तपासून त्यानंतर पी. आर. कार्ड रद्द करण्यासाठी एस. एल. आर. कडे अपील करुन कार्यवाही करावी लागेल. त्यासाठी किमान दीड ते दोन महिनेचा कालावधी लागेल.

**श्री. संजय शिरसाठ :** एन. ए. चार्जेस पोटी मनपाने आतापर्यंत ४०-४३ लक्ष रुपये भरणा केलेले आहेत ते सत्य आहे का?

**श्री. मधुकर सावंत :** एन. ए. पोटी सर्व्हे न. ५४ चे मनपाने आतापर्यंत ११.१९ लक्ष रुपये भरणा केलेले आहे.

**मा.आयुक्त** : एन. ए. चार्जेस कोणी भरावयाचे मनपाने की, संबंधितात व्यक्तीने त्याचा खुलासा अगोदर घेणे आवश्यक आहे.

**मालमत्ता अधिकारी :** याबाबत मला निश्चित माहिती नाही. तपासून खुलासा करण्यात येईल.

**श्री. मधुकर सावंत :** पूर्ण तक्ता माझ्याकडे आहे. कोणत्या वर्षात किती पैसे भरणा केले याची माहिती आहे. एकूण ११,१९,३६५/- रु भरणा केलेले आहेत.

**मा.आयुक्त** : लेखा परीक्षणातच हा आक्षेप आहे. त्यामुळे स. सदस्य श्री. सावंत जे बोलले ते बरोबर आहे.

**श्री. मधुकर सावंत :** ज्यांनी पी आर. कार्ड केले. ज्या जास्तीच्या जागा बळकावल्या त्या ताब्यात घेण्यासाठी एक दीड महिना लागेल परंतु ज्यांना भाडेतत्वावर दिलेल्या होत्या तो करारनामा संपुष्टात आलेला आहे. अशा जागा तीन दिवसांची नोटीस देवून मा. आयुक्त ताब्यात होऊ शकतात. कायदा काय दाखवतो ते पाहावे. त्यानुसार कार्यवाही करावी. मा. आयुक्तांनी त्यांचे अधिकार वापरावे कलम ८१/बी प्रमाणे ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी.

**श्री. भगवान रगडे :** प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मनपाचे किती उत्पन्न घटते हे आताच चर्चेनुसार स. सदस्यांनी दाखवून दिले. मी ही एक या संस्थेचा सदस्य या नात्याने बोलतो. होणारे नुकसान या शहरातील होणाऱ्या विकास कामावर परिणाम होतो. सर्व नागरीकांना झळ सोसावी लागते व या सभागृहात स. सदस्य पोटतिडकीने प्रश्न मांडतात. त्यानुसार मा. सभापती यांनी दिलेले आदेशाचे पालन होणे गरजेचे आहे. प्रत्येक वेळेस स. सदस्य प्रश्न उपस्थित करतात. पुढील बैठकीस उत्तर दिले जाईल असे सांगितले जाते व अशा बैठका होत राहतात व उत्तर येई पर्यंत संपूर्ण कालावधी संपतो. प्रशासन त्यांचे जागेवर असते. पदाधिकाऱ्यांचा वेळ संपतो सन २००१-०२ या कालावधीत हर्सूल तलावातील मासे पकडण्याचा ठेका देण्यासाठी कोणत्यातरी लहानसहान वृत्तपत्रात टेंडर नोटीस देण्यात आली. नंतर मोठया पेपरला नाही. जेव्हा त्याबाबत टेंडर भरणा केले. निविदा काढण्यात आली. नंतर नोटीस वृत्तपत्रात येते. दिशाभूल करण्यात आली. माझ्या लक्षात आले मी मा. आयुक्त यांना तक्रार दिली. त्यानंतर पुन्हा टेंडर काढले गेले. ७६,०००/- रुपयाला टेंडर गेले. ज्यांनी टेंडर भरले होते. त्यांचेकडे मच्छिमारीचे रजिस्ट्रेशन असले पाहीजे परवाना असावा. सर्व अटी शर्तीला अधीन राहून ते दयावयास पाहीजे होते. ज्या व्यक्तीला ७६,०००/- रु. ला. टेंडर दिले होते. त्या व्यक्तीकडे रजिस्ट्रेशन नाही. ऑडीट रिपोर्ट नाही. कोणतेही कागदपत्र नाही. मी तक्रार केल्यानंतर टेंडर काढले तर नवीन टेंडर ३,२३,३३३/- रु. ला गेले. यात मनपाचा फायदाच झालेला आहे. म्हणून संबंधित जो पूर्वीचा ७६,०००/- टेंडर भरणाऱ्या व्यक्तीने मनपाची फसवणूक केली. चुकीचे टेंडर भरणा केले. पोलीस गुन्हा दाखल करावा म्हणून विनंती केलेली होती. गुन्हा दाखल केला नाही. आजही कोणतीही कार्यवाही न होता ती व्यक्ती ३०-३५ हजार रुपयांचा विक्रीचा व्यवसाय करतो. मासे विकतो. संबंधित व्यक्ती न्यायालयात गेला. त्यास न्यायालयाचे स्थगिती आदेश मिळाले सन २००१-०२ चे ७६,०००/- चे टेंडर ३.२३ लक्ष रुपयाला गेले. तीन वर्षात आज मनपास मोठा फायदा झाल असता. ताबडतोब त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल केला नाही. त्यास वेळ दिला गेला. तो न्यायालयात गेला. आज मासे पकडून विक्री करतो. त्या व्यक्तीस न्यायालयात जाण्याची संधी दिली म्हणून मनपाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. यास जबाबदार कोण? टेंडर काढण्याच्या अगोदर काय कार्यवाही केली.

**मा. सभापती :** ७६,०००/- रु. टेंडर भरणा केले मासे पकडून विक्री करतो. दुसरे टेंडर काढले. त्या व्यक्तीस न्यायालयात जाण्याची संधी का देण्यात आली?

**श्री. संजय शिरसाठ :** पहिल्यांदा जे रु. ७६,०००/- चे टेंडर काढले ते कशाच्या आधारे काढले याचा खुलासा दयावा जे वृत्तपत्र कुणी वाचत नाही अशा वृत्तपत्रात टेंडर दिले असे स. सदस्यांचे मत आहे.

**विधी सल्लागार :** निविदेसंबंधी कालावधी संबंधी व वृत्तपत्रात निविदा देण्यासंबंधी मालमत्ता विभाग खुलासा करील हर्सुल तलावातील मासेमारीची दि. १०-०१-२००३ पुर्वी निविदा काढण्यात आली. दि. १८-०९-२००२ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली व ७६,७९९/- प्रतिवर्ष याप्रमाणे निविदेचा ठेका रामतारा मत्स्यव्यवसाय संघ यांना त्यांची निविदा जास्त असल्याने मंजूर करण्यात आला त्यानंतर स. सदस्य तसेच काही मत्स्य व्यावसायिक यांचे तक्रारी लक्षात घेवून दिलेला ठेका रद्द करण्यात आला. रद्द करण्यापूर्वी रामतारा मत्स्य व्यवसाय संघ यांचेशी दि. २१-०१-२००३ ते २६-०१-२००६ पर्यंत मच्छिमाराचा करारनामा करण्यात आलेला होता. त्यानुसार संबंधित न्यायालयात धाव घेतली व स्थगिती मिळविली. दरम्यानच्या काळाता दुसऱ्यांदा जी निविदा काढण्यात आली व या कार्यवाहीस दि. २५-४-२००३ ला मा. न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. निविदा मागवून जी कार्यवाही करायची होती. ती थांबविलेली आहे. स्थगिती आदेशानुसार पुन्हा सुनावणी घेवून मनपातर्फे न्यायालयात माहिती दिलेली आहे. मा. न्यायालयाने संबंधिताचा मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर केला. सदरील आदेशाविरुध्द मनपातर्फे अपील करण्यात आले. त्यावर सुध्दा संबंधिताच्या बाजूने निर्णय दिला. त्याविरुध्द सुध्दा मनपाने पुन्हा मा. उच्च न्यायालयात सुध्दा अपील दाखल केलेले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

**श्री. भगवान रगडे :** टेंडर काढले. त्यानंतर सहा महिने गेले. ज्या वेळेस दुसऱ्यांदा टेंडर काढले त्यावेळेस संबंधित व्यक्ती न्यायालयात गेली. टेडंर देतांना मत्स्य संघाचे कार्यालय तसेच ऑडीट रिपोर्ट सर्व अटी शर्ती का तपासून घेतल्या नव्हत्या हा माझा प्रश्न आहे. ३० दिवसांची नोटीस देतात. त्यावर तो व्यक्ती न्यायालयात जातो. त्यापूर्वी कॅव्हेट दाखल का केले नाही? या प्रकरणात दोन वर्ष निघून गेले. वेळीच कॅव्हेट दाखल केले असते तर मनपाचे होणारे नुकसान झाले नसते. ३.२३ लक्ष प्रत्येक वर्षी आले असते. याची भरपाई कोण करणार आहे?

**विधी सल्लागार :** सन २००६ पर्यंत करारनामा केलेला होता.

**श्री. संजय शिरसाठ :** न्यायालयाचे आदेश काय आहेत. स्थगिती कशासाठी दिली.

**विधी सल्लागार :** ठेका रद्द केल्याबाबत जी नोटीस दिली त्यास आव्हान दिले. त्यास स्थगिती दिली न्यायालयात गेले व दुसऱ्यांदा होणाऱ्या निविदेस न्यायालयाने स्थगिती दिली.

**मा. सभापती** : संबंधिताकडे सोसायटी रजिस्ट्रेशन कागदपत्र नाही. निविदा रजिस्ट्रेशन नाही. कायदेशीर बाबी त्यांचे बाजूने नाही असे स. सदस्यांचे म्हणणे आहे. निविदा दिल्या गेली. मंजूर केली ती कशी केली असे मत व्यक्त केलेले आहे.

**विधी सल्लगार :** त्या अनुषंगाने ठेका देण्याची कार्यवाही रद्द केली होती. ते मा. न्यायालयाने ग्राह्य धरलेले नाही स्थगिती दिली.

**मा. सभापती** : संबंधितांनी ऑडीट रिपोर्ट जे जे कागदपत्र आवश्यक होते ते नसतांना त्यांची निविदा स्विकारली गेली असे म्हणावे लागेल. यात चूक आहे की नाही. कायदेशीर बाबी तपासून निर्णय घ्यावा लागणार आहे.

**श्री. भगवान रगडे :** संबंधित व्यक्ती डायरेक्ट मा. उच्च न्यायालयात गेले होते. त्यांना खालच्या न्यायालयात जाण्याचे निर्देश दिलेले होते. ते सुध्दा तपासावे.

**मा. सभापती** : न्यायप्रविष्ट प्रकरण आहे. चुकीच्या पध्दतीने निविदा दिली गेली असेल तर, मा. आयुक्त वेगळी कार्यवाही प्रस्तावित करतील. सर्व काही न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिल्यानंतर स्थगिती आदेश मिळेल.

**श्री. भगवान रगडे :** माझे असे मत झाले की, जे नुकसान होते ते प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे होते आहे. यास जबाबदार कोण?

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** नाथ प्रांगण, मेहेरनगर, गारखेडा गावठाण भागात मनपाच्या जागेवर अतिक्रमण झाले. मेहेरनगर येथील काही नागरिकांनी यापूर्वी निवेदन दिलेले होते. रस्त्यामध्ये एका व्यक्तीने अतिक्रमण करुन भिंत बांधलेली आहे. ती जागा मनपाने तात्काळ ताब्यात दयावी. अदयाप काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. गारखेडा भागात ही महानगरपालिकेची जागा आहे. ती ताब्यात घेण्याचे प्रयत्न करावे.

**प्रशासकीय अधिकारी :** नाथ प्रांगण येथील एक खोली पाडण्यात आलेली असून, आणखी दोन खोल्यांचे बांधकाम झालेले आहे. ते पुढील आठवडयात काढणार आहोत. नोटीस दिलेली आहे. तेथे लोक राहतात.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** तेथे लोक राहतात त्यामुळे पाडता आले नाही. असे उत्तर अधिकारी देत आहेत. नोटीस देवून ते कोर्टात जातील. होणारी कार्यवाही होणार नाही असे वाटते. अतिक्रमण होवूनही ते लोक राहतात. म्हणून पाडायचे नाही हा कोणता न्याय होवू शकतो? तसेच उल्कानगरी भागात एका अपार्टमेंटच्या शयन कक्षात पाणी जाते. बांधकाम परवानगी कशी दिली?

**मा. सभापती** : नाल्यातील पाण्याचा प्रवाह आडत असेल तर संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**अति. शहर अभियंता :** नाल्यास नैसेर्गिक पाण्याचा प्रवाह आहे. परंतु या इमारतीच्या बाजूलाच दोन इमारतींचे बांधकाम झाले. एक पुर्वीचे, दुसरे बांधकाम परवानगीने बांधले. नाल्यात जास्त पाणी झाल्यास तेथे पाणी तुंबते.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** परवानगी देतांना का विचार केलेले नाही. नाथ प्रांगणात वॉचमन व त्या खुल्या जागांना तार कुंपण करणार होते. लवकरच करण्यात यावे.

**मा. सभापती** : पाण्याचा प्रवाह थांब असेल तर त्याबाबत उपाययोजना करुन कार्यवाही करावी. याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुध्दा सूचना देत आहे.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** नाथ प्रांगणात मनपाच्या जागेवर एक वॉचमन कर्मचारी मागणी मी केलेली होती. अदयाप कर्मचारी दिलेला नाही. तसेच जागेला संरक्षीत भिंत करावी.

**मालमत्ता अधिकारी :** दोन दिवसात सोमवार पासून दोन वॉचमन दिले जातील.

**मा. सभापती** : या जागेवर कंपाऊंड बांधण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. संजय शिरसाठ :** प्रत्येक वेळी मा. आयुक्तांना उत्तरे दयावी लागतात. प्रशासकीय अधिकारी हे तहसीलदार दर्जाचे असावे ते प्रशासनाने शासनाकडून मागवावे तशा सूचना आपण मा. आयुक्तांना दयाव्यात.

**मा. आयुक्त** : मा. सभापती सूचना देतीलच. माझ्या माहीतीप्रमाणे याबाबत मी येण्यापूर्वी तसा ठराव झालेला आहे. संबंधित विभागाने त्या बाबतची संचिका समोर ठेवावी.

**मा.सभापती** : ४-५ बैठकीपासून अतिक्रमणाबाबत वारंवार चर्चा झालेली आहे. प्रशासकीय अधिकारी हे तहसीलदार रँकचे असावे यासाठी मा. आयुक्त यांनी विभागीय आयुक्तांकडे तात्काळ मागणी करुन कार्यवाही करावी असा या ठिकाणी ठराव संमत करण्यात येत आहे.

**सौ. शाहीन जफर :** दिनांक २१-०९-२००३ ला शिक्षण विभागातील श्री. जोशी नावाचे लिपीक यांचे बदलीचे आदेश काढण्यात आले व तात्काळ बदलीच्या ठिकणी रुजू व्हावे म्हणून होते. श्री. जोशी यांची बदली होवूनही ते का रुजू झालेले नाही. ज्यांची बदली शिक्षण विभागात केली तेही तेथेच काम करतात. या मागचा हेतू काय. कर्मचारी बदलीच्या ठिकाणी का रुजू होत नाही.

**सहा. आयुक्त** : श्री. जोशी यांचे बरोबरच इतरही काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या होत्या. मार्च महिन्याचा कालावधी होता. परीक्षा चालु होत्या. शिक्षण विभागातील त्यावेळी शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक व कार्यालयीन कामात सुसूत्रता राहावी यासाठी श्री. जोशी यांना माहिती आहे व त्यांची आवश्यकता आहे. असे शिक्षणाधिकारी यांचे मत होते.

**सौ. शाहीन जफर :** श्री. जोशी यांची आतापर्यंत तीन चार वेळेस बदली करण्याचे आदेश दिले गेले. परंतू शिक्षण विभागातून त्यांना का सोडले जात नाही हा माझा प्रश्न आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** ज्यांना खूप वेळ झाला त्यांना हटवावे.

**मा. सभापती** : स. सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात नियमाने कार्यवाही करावी.

**सौ. शाहीन जफर :** २५ हजाराच्या ज्या ए-१ निविदा निघतात. आणीबाणी त्यावेळी तातडीने कामे करुन घेणे आवश्यक असते. अशा कामांसाठी टेंडर मागवून काम होईल तर कशा प्रकारच्या कामासाठी निविदा मागविण्यात पध्दत सर्व सदस्यांच्या संमतीने बंद करावी. त्यामुळे सगळी विकासाची कामे ठप्प होतात.

**श्री. संजय शिरसाठ :** माझे मत थोडे वेगळे आहे. गेल्या एक वर्षभरात ७.५० कोटीची ए-१ ची कामे झालेली आहेत. तातडीची कामे असतील ती ताबडतोब करायला पाहीजे या मताचा मी आहे. आयुक्तांची मान्यता घेवून अशी कामे ताबडतोब करण्यात यावीत. मा. आयुक्तांना तसे अधिकार आहेत. त्यात काही अडचण नाही. त्यांना वाटले तर ताबडतोब अशा कामांना मंजूरी देतील.

**श्री. इलियास किरमाणी :** २५ हजाराचे जे ए-१ निविदा आहे ते ए-१ राहीले नाही. त्याला रेटलिस्ट (फुटकळ) म्हणावे. सार्वजनिक बांधकाम विभागात ६० हजाराने ए-१ निविदा निघतात. आमची अडचण अशी आहे की, पावसाळयाचे दिवस आहेत. वार्डात पाणी तुंबले ते काढायचे झाल्यास निविदा काढायचे झाल्यास दोन महिन्यांचा कालावधी जातो. तातडीचे कामे असतात. जनता सदस्यांना विचारते. अधिकाऱ्यांना विचारत नाही. यातून काहीतरी मार्ग काढण्यात यावा.

**मा. सभापती** : ए-१ निविदा पुर्वी ज्या पध्दतीने काढल्या जात होत्या आणि ज्या पध्दतीने कामे करुन घेतल्या जात होती. निश्चितच तातडीची जी कामे आहेत. ती ए-१ निविदेच्या माध्यमातून केली जातात. म्हणून स. सदस्यांनी या ठिकाणी

ज्या भावना व्यक्त केल्या. दरपत्रके मागवून चारही कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या अधिकारात जी कमी दराची असेल त्यांचेकडुन जुन्या पध्दतीने जसे काम होत होते तसे काम करुन घ्यावे.

**श्री. संजय शिरसाठ :** माझा विरोध यासाठी आहे की, शहराच्या विकासासाठी १२-१३ कोटी रुपये राहतात. आणि आपण जी ए-१ ची कामे करतो. याबद्दल आयुक्तांचे मत काय?

**मा. आयुक्त** : लेखा संहिता आणि लेखा परीक्षणाचे नियम स्पष्ट आहेत. ते मुख्य लेखाधिकारी यांनी लेखी चारही कार्यकारी अभियंता यांना दिलेले आहेत व त्याची प्रत मला देण्यात आली आहे. त्यांचे पालन करावे लागणार आहे. त्या प्रमाणेच काम होईल. सभागृहात जी चर्चा होत्या. त्यांच्या विरुध्द देखील तक्रारी झालेल्या आहेत. तीन दिवसांची किंवा सात दिवसाची सुध्दा नोटीस आपण काढु शकतो.

**मा. सभापती** : सभागृहाची भावना विचारात घेता अगोदरची जी पध्दत होती त्याप्रमाणे सन २००४-२००५ आर्थिक वर्षात स. नगरसेवक स्वेच्छानिधी व विविध विभागामार्फत करावयाची फुटकळ कामे व ए-१ निविदा कामे यांची वर्तमानपत्रात प्रसिध्दी न करता नोटीस बोर्डवर निविदा सूचना लावून तीन कोटेशन्स प्राप्त करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सौ. शाहीन जफर :** १४ तारखेला शाळा उघडल्या. ८३ शाळामधून एकुण ८० शिक्षक मतदार यादया तयार करण्यासाठी गेलेले आहेत. माहिती घेतली असता ५६ शिक्षक रुजू झालेले आहेत. शाळेत नाही.

**मा. सभापती** : प्रत्येक शाळेतून एक देता येईल. मा. आयुक्तांच्या मान्यतेने गेलेले असतील. नॅशनल प्रोग्रॅम आहे. शिक्षक देणे आवश्यक आहे देत नाहीत असे म्हणता येणार नाही. फक्त एकाच शाळेतील जास्त शिक्षक संख्या देऊ नये. आतापर्यंत शिक्षक सोडले नाही. सभा १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ सायं ५-५० वाजता. पुन्हा सभेला सुरुवात ६-१३ वाजता.)

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** नाथ प्रांगण भागात रस्त्यामध्ये भिंत बांधलेली आहे. ते केव्हा पाडणार आहात?

**प्रशासकीय अधिकारी :** एक आठवडयात कार्यवाही होईल.

**श्री. मधुकर सावंत :** आजच्या वृत्तपत्रात शहरातील नागरीकांना कॉलरा, गॅस्ट्रो झाल्याबाबत आलेले आहे. त्या बरोबरच एक बातमी अशी की, ८-१० दिवसांपुर्वी एका आंब्याचे व्यापारी श्री. सुनील यांचे दुकानावर जावून आरोग्य विभागाने धाड टाकलेली होती. त्यासंबंधी काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : १४-०६-२००४ रोजी सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत महानगरपालिका हद्दीत अन्न व औषध प्रशासनाने मनपा आरोग्य विभाग यांचे संयुक्त विदयामाने रासायनिक प्रक्रियेद्वारे आंबे पिकविले जातात त्या दुकानावर धाड टाकण्यात येवून असे आंबे जप्त केले होते. ते नष्ट करण्याबाबत आरोग्य विभागाने काय कार्यवाही केलेली आहे?

**आरोग्य वैदय अधिकारी :** दि. १४-०६-२००४ रोजी स. ९ ते १ च्या दरम्यान महापालिका हद्दीतील आंब्यावर रासायनिक प्रक्रिया कथन फळे पिकविण्याच्या व्यापाऱ्यावर अन्न व औषध प्रशासन विभागामर्फत व मनपाच्या आरोग्य विभागामार्फत

संयुक्तपणे धाड टाकण्यात आलेली होती. धाड टाकुन जप्त केलेले आंबे नारेगाव येथील मनपाच्या कचरा डेपोच्या बाजूला जो खड्डा आहे. त्यामध्ये टाकले व त्यावर ३ टन कचरा टाकून आंबे पुरुन टाकण्यात आले होते. दुपारी १.३० वाजेपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झाली व आपले कर्मचारी परत आल्यानंतर तेथील आजूबाजूच्या झोपडपट्टीतील काही लोकांनी पुरुन टाकलेले आंबे उकरुन घेवून जाण्याच्या प्रयत्नात असतांना अन्न व औषधी प्रशासन विभागाचे निरिक्षक व वॉचमन यांनी आंबे काढण्यास प्रतिबंध केला.

**श्री. मधुकर सावंत :** अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. चुकीची माहिती देत आहेत. कचरा डेपोमध्ये मनपाच्या कामगाराशिवाय इतर लोक जाऊ शकतात का? कोणत्याही प्रकारचा खड्डा केला नाही. कचरा टाकला नाही. उघडयावर आंबे टाकून दिले. लोकांना आपले कर्मचारी सांगतात. काही होत नाही. आंबे घेवून जावे. परत तेथील आंबा लोकांनी घरी नेवून खाल्ले. पुन्हा जाधववाडी बाजारात विक्री केले. याची सर्व शुटींग घेतलेली आहे. आवश्यकता वाटल्यास सभागृहात दाखवू शकतो. एसीएमने कॅसेट केलेली आहे.

**श्री. भगवान रगडे :** माझ्या वार्डात संपूर्ण कचरा येतो. वॉर्डाच्या बाजूलाच अर्धा कि. मी. च्या अंतरावर कचरा डेपो आहे. बरेच लोक कचरा वेचण्यासाठी जातात. त्यांना आंबे दिसून आले. त्यामुळे ब्रिजवाडी भागातील व नारेगांव भागातील बरेच लोक कचरा डेपोत आंबे आले. म्हणून ते घेण्यासाठी एकच धावपळ सुरु झाली. बऱ्याच लोकांनी ते उघडया जागेवर टाकलेले आंबे खाल्ले आजारी पडले. अनेकांना दवाखान्या न्यावे लागले. जी स्थिती सांगतात ती चुकीच आहे. खड्डा खोदलेलाच नाही. आंबे उघडयावर टाकण्यात आले होते. वस्तीत धुमाकूळ होता. लोकांनी आंबा खाल्ले.

**श्री. मधूकर सावंत :** मनपाचा कचरा भरणाऱ्या कामगारांनी ते आंबे घरी आणले. व्हिडीयो शुटींगमध्ये सर्व आलेले आहे. अधिकारी सभागृहाची कशी फसवणूक करतात व खोटी उत्तरे देतात. या सभागृहात दुरदर्शन संच घेवून यावे. त्यावर सर्व शुटींग दाखविता येईल. जनतेच्या जीवनाशी खेळणाऱ्या अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी. नंतर काय निर्णय घ्यावयाचा तो नंतर दयावा.

**मा.सभापती** : आंबे नष्ट करणे व झालेला खर्च संबंधिताकडून वसूल करण्याची आपल्याकडे तरतूद आहे. अशा परिस्थितीत अशी अर्धवट कार्यवाही होत असेल तर बरोबर नाही.

**आरोग्य वैदय अधिकारी :** याबाबत मला माहिती मिळाल्यानंतर मी स्वतः दुपारी ४.३० वाजता त्या ठिकाणी पाहणी केली व उपलब्ध खड्डयामध्ये ते आंबे टाकले होते असे मी म्हटले आहे. त्यावर ३ टन कचरा टाकला त्यावेळी श्री. शहाणे नावाचे कर्मचारी तेथे होते.

**श्री. मधूकर सावंत :** खड्डा केला त्यात आंबे टाकले हे सर्व चुकीची माहिती देत आहे. शुटींग घेतलेली आहे. सभागृहात कॅसेट दाखविण्यास तयार आहे. अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. जनतेच्या जीवनाशी ते खेळतात.

**सौ. शाहीन जफर :** चौकशी करावी.

**मा. सभापती** : या सर्व प्रकरणाची मा. आयुक्त यांनी चौकशी करावी. १५ दिवसात अहवाल सादर करावा.

**मा. आयुक्त** : महानगरपालिकेने एखादे चुकीचे काम केल्यास दोष दयावा. ही कार्यवाही होते. ती करीत असतांना अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली काम करणे अपेक्षीत आहे. त्यांचे याबाबत काय म्हणणे आहे. त्या विभागाची जबाबदारी आहे की नाही ते पाहणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : सार्वजनिक आरोग्य चांगले ठेवण्याची जबाबदारी मनपाची आहे. अन्न व भेसळ या प्रतिबंध करण्याची कार्यवाही शासनाचे संबंधित विभागाची आहे. तो विभाग बाजूला असतो. प्रत्येक प्रकरणात तो विभाग कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करीत नाही अंग चोरतात.

**श्री. संजय शिरसाठ :** मा. आयुक्त यांनी जो खुलासा केला माझ्या लक्षात आले नाही. प्रश्न असा की, आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी अन्न व भेसळ विभागाल कळविले की, आपण आंब्यांच्या दुकानावर धाड टाकणार. धाड टाकण्यात आली आंबे आणले. ते ट्रेंचिग ग्राऊंडमध्ये घेवून गेले. आंबे नष्ट केले म्हणजे नेमके काय करावयाचे होते? जसे दूध नष्ट केले ते कसे नष्ट केले होते. आंबे खड्डयात टाकले. त्यावर कचरा टाकला. पुन्हा लोकांनी काढुन खाल्ले. दाबून टाकलेले आंबे जसेच्या तसे कसे निघतात? हा प्रश्न असून हास्यापद बाब झालेली आहे. ट्रक चालकाने माझी शुटींग होते म्हणून काढुन घेतले. १.३० वाजता सर्व शुटींग झाल्यानंतर आरोग्य अधिकाऱ्यांना ४.३० वाजता बातमी कळाली. या मधल्या काळाता लोक आंबे घेवून घरी गेले. आताच स.सदस्यांनी चर्चा केली की, काही लोक त्या आंब्यामुळे आजारी पडले. त्यातील काही आंबे पुन्हा बाजारात विक्री केले. एवढे गंभीर प्रकरण झाल्या नंतरही अन्न भेसळ विभागाचे कर्मचारी मनपाने बोलविले होते. संयुक्तपणे काम केले. ते आंबे पूर्ण नष्ट होईपर्यंत ते कर्मचारी परत का पाठविले, हा माझा प्रश्न आहे. त्या विभागाच्या कर्मचाऱ्यांना सोडले असेल तर, मनपाचा आरोग्य विभाग जबाबदार आहे. सर्व सदस्यांचे म्हणणे आहे की जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. आंबे कचऱ्याच्या ट्रकमध्ये जातात. त्याच कचऱ्याचा वास घेवू शकत नाही. अशा ट्रकमध्ये आंबे घेवून गेल्या नंतर खड्डयात टाकल्यानंतर त्यावर कचरा टाकला तर लहान मुले व मोठी व्यक्ती त्या खड्डयात गेले कसे हे सर्व संशयास्पद आहे. स. सदस्य सांगतात सर्व शुटींग त्यांनी घेतलेली आहे. त्यांचेकडे कॅसेट आहे. संबंधित अधिकाऱ्याच्या चुकीमुळे काय प्रकार घडला हे दाखवायला तयार आहे. मा. आयुक्तांना सभागृहाच्या वतीने विनंती की, एखादे काम बाजूला ठेवून अशा नागरिकांच्या जीवनाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही झाली पाहीजे.

**मा. सभापती** : जी कार्यवाही झाली ती संयुक्तपणे दोन्ही विभागातमार्फत झाली.

**श्री. संजय शिरसाठ :** आंबे संपूर्ण नष्ट होईपर्यंत कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी त्या विभागाचे कर्मचारी यांना सोडला? कसे हा प्रश्न आहे. तेथील लोकांनी अचानक ट्रकमध्ये आंबे आले म्हणून खाल्ले. काही लोक आजारी आहेत. यास जबाबदार मनपाचा विभाग आहे हे मान्य करावे लागेल.

**मा. सभापती** : मा. आयुक्त कार्यवाही करतील १५ दिवस मुदत देण्यात येते. जे कोणी दोषी असतील शहाणे नावाचे कर्मचारी होते. त्यांचेकडे आंबे नष्ट करण्याचे काम दिले होते. त्यांनी त्यांचा चौकशी अहवाल सुध्दा दिला. नेमका काय

प्रकार घडला त्याबाबत परंतू सखोल चौकशी मा. आयुक्त करतील. संयुक्तरित्या ही कार्यवाही असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

**श्री. संजय शिरसाठ :** नष्ट करणे म्हणजे नेमका अर्थ काय निघतो. त्याचा खुलासा दयावा. नष्ट होईपर्यंत आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी त्या ठिकाणी थांबणे आवश्यक होते.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** शहरात इतर ठिकाणी असे आंबे नव्हते का? एन-११ भागातच आंबे आहे. रासायनिक प्रक्रिया करुन पिकविले त्यांचे वर का कार्यवाही होत नाही.

**श्री. संजय शिरसाठ :** गंभीर विषय आहे. रासायनिक प्रक्रीया करुन ते आंबे पिकविलेले होते. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. सविस्तर चौकशी करुन पुढील बैठकीत अहवाल ठेवावा.

**श्री. भगवान रगडे :** आजची स्थिती लक्षात घ्यावी. शहराचा संपूर्ण कचरा माझ्या वार्डात येतो. चार वर्षापासून सहन करतो आहे. आरोग्याची जबाबदारी मनपावर आहे. कचरा जेथे साठविला जातो. तेथे फवारणी होत नाही. या शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी मनपाचे विविध ठिकाणी दवाखाने आहेत. मनपा मार्फत चालत असलेली आर. सी. एच. या योजनेचा आरोग्य केंद्राला फायदा काय? किती अनुदान येते व किती खर्च केला जातो. जे डॉक्टर काम करतात. कामगारांच्या नियुक्तीचा अधिकार कोणास आहे. मनपाच्या आरोग्य विभागातील डॉक्टरांचे नातेवाईक सेवेत किती आहेत. एकूण डॉक्टरांची संख्या किती आर. सी. एच. ही योजना राबविण्यासाठी जे कर्मचारी नियुक्त केले ते काम करण्यास पात्र आहेत का औषधी कोणत्या निधीतून खरेदी सिल्कमिल्क कॉलनी भागात आरोग्य केंद्र असून, अदयाप एक्सरे मशीन बसविण्यात आलेले नाही. रक्त तपासणीसाठी तज्ज्ञ डॉक्टर मनपाकडे असतांना बाहेर खाजगी डॉक्टरांकडे का पाठविले जाते? या मुदयांचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : आर. सी. एच. या योजनेचा फायदा काय व किती लोकांना सध्या फायदा होतो. किती दवाखान्याच्या माध्यमातून चालू आहे.

**आरोग्य वैदय अधिकारी :** आर. सी. एच. प्रकल्प मनपामध्ये २००० साली मंजूर झालेला आहे. प्रोजेक्टमध्ये जे नियोजन निश्चित केले होते. त्यानुसार ६ केंद्रात एक स्त्री रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ व चार स्टाफ नर्स ठेवण्याचे नियोजन आहे आणि या सर्व दवाखान्यात कुटूंब कल्याण इतर २० प्रकारच्या ज्या सेवा आहेत त्या उपलब्ध करुन दयाचे धोरण आहे. २० खांटी एक हॉस्पीटल तयार असून तेथे कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया किंवा गरोदर योजने मार्फत करता येईल. यासाठी एक समिती गठीत करुन अध्यक्ष मा. आयुक्त व सचिव एम. ओ. एच राहतील. यासाठी डेव्हलमेंट ऑफीसर यांना कन्सल्टंट केलेले आहे. तसेच दिल्लीचे जे कन्सल्टंट आहेत. स्टेट लेवल काम होत आहे. तीन ठिकाणी बाळंतपण सुरु केलेले आहे. या व्यतिरिक्त एन-८ मध्ये आहे. श्रेणीवर्धन केलेले नाही. बन्सीलाल नगर चिकलठाणा तसेच भावसिंगपूरा भागात इमारत उपलब्ध नसल्यामूळे नियुक्त करता आले नाही.

**मा. सभापती** : अनुदान किती खरेदी कशी केली जाते. कामगारांचे नियुक्ती अधिकारी नातेवाईक किती सेवेत आहेत. एक्सरे मशीन का बसविली नाही. जे प्रश्न स. सदस्य श्री. रगडे यांनी विचारले आहेत. त्याची आरोग्य वैदयकिय

अधिकारी यांनी लेखी स्वरुपात सर्व सदस्यांना व मला माहिति दयावी. सभागृहात माहीती सादर करावी.

**श्री प्रल्हाद निमंगावकर :** डास औषध फवारणी का बंद झालेली आहे?

**जीवशास्त्रज्ञ (श्रीमती जीवणे) :** सर्वच भागात मच्छर औषध फवारणी चालू आहे. स. सदस्यांच्या वॉर्डात फवारणीचे काम आले नसेल तर सूचना केल्याप्रमाणे त्यांचे वार्डात कर्मचारी पाठविण्यात येतील.

**श्री. प्रल्हाद निमंगावकर :** शव वाहीका कोठे असते?

**आरोग्य वैदय अधिकारी :** रुग्ण वाहीका व शतवाहिका एन-८ च्या दवाखान्यात २४ तास उपलब्ध असते. तेथे वाहन चालकाचे काम निश्चित करुन दिले. त्या वाहनाचा वापर रात्रीचे वेळी इतर वाहने नसल्यामुळे डॉक्टरांना घरी सोडण्यासाठी व तातडीचा कॉल असल्यास धरुन आणण्यासाठी केला जातो. इतर वेळी रुग्णवाहीका ही रुग्ण आणण्यासाठी व शववाहीका ही शव आणण्यासाठी वापरली जाते.

**श्री. संजय शिरसाठ :** दोन दिवसांपूर्वी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली या शहरात कॉलराचे काही पेंशन्ट आढळले. हा रोग भयानक असून, दोन दिवसात वाढू शकतो. नगर विकास सचिव यांनी मागे बैठक घेतली व सर्व संबंधित विभागाला पावसाळयापूर्वी यासाठी काहीतरी उपाययोजना कराव्या म्हणून सूचना दिलेल्या होत्या. परंतू आरोग्य विभागाने काही उपाययोजना केलेल्या दिसून येत नाही. कॉलराचे आठ रुग्ण घाटी दवाखान्यात दाखल झालेले आहेत. सचिवांच्या सूचनेनुसार संबंधित आरोग्य विभागाने काय उपाययोजना केल्या. खुलासा करावा.

**आरोग्य वैदय अधिकारी :** गेल्या तीन दिवसांपूर्वी घाटी दवाखान्यात गॅस्ट्रो व कॉलराचे काही संशयित रुग्ण दाखल झालेले होते. त्या सर्वांचे आपण स्टुल सँपल तपासणी केले. किराडपूरा मदरसा भागातील आहे. दोन रुग्णांची तपासणी पॉझीटीव्ह झालेली आहे. लँबकडून रिपोर्ट येईल ते कॉलराचे रुग्ण आहे. असे गृहीत धरुन व ५ रुग्णांचे स्टूल सँपल हे निगेटीव्ह आलेले आहे. शे. सोहेल शे. सलीम वय ६ वर्षे शे. नजीर शे. नवीन असे दोन रुग्ण कॉलराचे गृहीत धरुन कार्यवाही चालू आहे.

**मा. सभापती** : संशयीत रुग्ण आहे हे माहती होवूनही वृत्तपत्रात बातम्या येतात तेव्हा कार्यवाही होते. आपल्या संबंधित आरोग्य केंद्राच्या डॉक्टरांची जबाबदारी येत नाही का? एम. पी. डब्ल्यू कर्मचारी काय करतात. मागील वर्षाचे आकडेवारी या वर्षाचे आकडेवारी बाबत खुलासा करावा.

**आरोग्य वैदय अधिकारी :** ज्या त्या भागातील आरोग्य अधिकारी यांनी कॉलरा गॅस्ट्रोच्या संशयीत रुग्णांची तपासणी केलेली आहे. मागील वर्षाची आकडेवारी किती होती. तुर्त माझ्याकडे माहिति उपलब्ध नाही.

**मा. सभापती** : शहरात साथीचे आजार घेवू नयेत याची दखल घ्यावी. कर्मचारी नियुक्त करावे.

**श्री. इलियास किरमाणी :** अग्निशमन विभागाची हॉटेल मालकास एन. ओ. सी. दिल्या जात नाही. त्यांना त्रास सहन करावा लागतो. दहा दहा चकरा होतात. एन. ओ. सी. दिली जात नाही. जेथे वाटले तेथे जावून तपासणी केली जाते. अधिकारी जागेवर प्रत्यक्ष भेट नाही. एन. ओ. सी. चे काम शहर अभियंता

यांचेकडे दयावे. टेक्नीकल पध्दतीने कार्यवाही होवू शकेल असे माझे मत आहे.

**मा. सभापती** : आरोग्य विभागाचा विषय झाल्यानंतर हा विषय चर्चेला होता येईल.

**मा.आयुक्त** : माझ्याकडे अहवाल झालेला आहे. सर्व वाचण्याची गरज नाही. मा. सभापती यांनी प्रश्न विचारलेला होता. संबंधित अधिकारी उत्तर देतील अशी अपेक्षा होती. संबंधित किराडपूरा भागात पाण्याची नहर आहे त्या पाण्याचे प्युरिफिकेशन होत नाही हे बरोबर आहे का? याची माहिती घेवून कार्यवाही करावी अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना सभापतींच्या वतीने देण्यात येतात. आठ विहीरी खाजगी आहेत की, सार्वजनिक खाजगी विहीरी असतील तर मनपाच्या संबंधित विभागाचे अधिकारी एम. पी. डब्ल्यू कर्मचारी यांनी त्या विहीरीची पाहणी केलेली होती का, याचा सुध्दा आरोग्य वैदयकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. चर्चा होते तेव्हा कार्यवाही करण्यात येते. उघडयावर खाण्याचे पदार्थ फळ आढळले असे म्हटले भारतात कुठेच बंद पाकीटमधून विक्री करण्याची प्रथा दिसून येत नाही. जेथे खराब पदार्थ फळे दिसतील तेथे कार्यवाही झाली पाहीजे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कॉलरा किंवा साथीचे रोग यास एकच विभाग जबाबदार असू शकत नाही. हे रोग न होण्यासाठी स्वच्छता पाहीजे. तसेच इतर ज्या काही उपाययोजना पावसाळयापुर्वी करावयास पाहीजे त्या होत नाही. कोणत्या कामाच्या बाबत कमतरता आहे? हे प्रशासन मा. आयुक्तांच्या अधिपत्याखाली चालते. पाण्याचे नमुने घेतले होते जी वस्तुस्थिती आहे. त्यास धरुन बोलणार आहे. स्पष्ट मत आहे की, प्रशासन चालवीत असतांना या सर्व बाबतीत मा. आयुक्तांनीच सर्व पूर्तता करुन घेणे आवश्यक आहे. सभागृह प्रश्नाला वाचा फोडू शकते. ते काम करण्यास प्रशासनास भाग पाडू शकतो. कोणत्याही विभागाच्या बाबत प्रश्न उपस्थित झाल्यास त्याबाबत कार्यवाही करण्याचे जेवढे अधिकार मा. आयुक्तांना आहेत तेवढे कोणासही नाहीत असे माझे ठाम मत आहे. कॉलजचे जे दोन रुग्ण आढळले ते रुग्ण अत्यंत गरीब आहेत. शिक्षणाचे प्रमाणे कमी असलेल्या वसाहतीतील आहे. जेथे सुविधा दिल्या जात नाही. त्या वसाहतीतील रुग्ण आहेत. याचा सुध्दा अभ्यास करण्याची गरज आहे. एका भागात कॉलरा होतो. दुसऱ्या भागात का होत नाही? दोन्ही भागाची तफावत लक्षात घेतली तर त्या भागात ज्या सुविधा द्यावयास पाहीजे त्या दिल्या जात नाहीत. फक्त डॉक्टरांनी काळजी घेणे असे म्हणणे कितपत योग्य आहे. सर्व परिस्थितीची काळजी घेण्याची गरज आहे. अनेक भाग असे आहेत की, तेथे मनपाचे दुर्लक्ष होते. आरोग्य सुविधा नाही. शैक्षणिक सुविधा नाही पाणी नाही रस्ते व्यवस्थित नाही, सांडपाणी थांबून राहते, अतिक्रमणे होत आहेत या सर्व बाबींकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. योग्य प्रकारे लक्ष दिले तर साथीचे रोग होणार नाही असे माझे ठाम मत आहे.

दुसरा प्रश्न असा की, पाणी पुरवठा विभागासाठी लागणाऱ्या १.४४ कोटी रुपयांची सी.आय. पाईप खरेदी करण्याची निविदा काढण्यात आलेली होती. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी गेलेला आहे. या निविदेच्या अनुषंगाने त्या अंतर्गत ३३ कामाचां समावेश होतो. ती कामे थांबलेली आहेत. पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. चार बैठकीपुर्वी विषय निघाला होता. सभापती

यांनी या कामाचे आदेश दिलेले होते. एकूण ३३ कामे त्यात आहेत. आठ दिवसात तो प्रस्ताव आला पाहीजे. म्हणून सांगितले होते. आणि कोणकोणत्या वॉर्डात कामे सुरु झाली त्याचा खुलासा झाला पाहीजे.

**कार्य. अभि (पा. पु.) :** एकूण १.४४ कोटीची निविदा होती. जी एजन्सी होती. लँका कलाहस्ती कास्टींग लि. १.४६% जास्तीची निविदा त्यांनी भरलेली होती. रितसर स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवला होता. त्यास मान्यताही मिळालेली होती. त्यानुसार आठ दिवसांची नोटीस दिली. ५% जी एकूण रक्कमेच्या अनामत रक्कम म्हणून भरावी ती ७.२२ लक्ष होतात असे आदेश दिले. नोटीस दिल्यानंतर ८ दिवसांचा कालावधी कमी होतो. मुदत वाढवून दयावी अशी विनंती केली. वेळ वाढवून दिला. त्यानंतर ३१-०५-२००४ ही शेवटची तारीख होती. त्या रोजी संबंधिताने ७.२२ लक्ष रुपये मनपाकडे भरणा केले. त्यानंतर त्या कंपनीने पुन्हा पत्र दिले की, आता ही कपंनी लॅन्को हस्ती कास्टींग लिमिटेड याऐवजी लॅन्को इंडिया लिमिटेड असे नांव देण्यात आले असून, कार्यादेश लॅन्को इंडिया लिमिटेड या नावाने देण्यात याव असे कळविले त्यानुसार संचिका मा. आयुक्त यांचेकडे विधी सल्लागार मार्फत सादर केली. त्यांनी समर्थनार्थ हैद्राबाद उच्च न्यायालयाचे आदेश दिलेले आहेत. दुसरे रजिष्टर ऑफ कंपनी म्हणून कागदपत्र सुध्दा दिले. कंपनीच्या नावात बदल झाली म्हणून त्यानुसार बदल झालेल्या नावाने कार्यादेश देण्याची कार्यवाही सुरु करतांना मा. सभापती यांनातसे पत्र देवून कळविले असता मा. सभापती यांनी सूचना केली की, परस्पर तसे न करता स्थायी समितीसमोर रितसर प्रस्ताव ठेवावा. म्हणून कंपनीच्या नावात आलेल्या बदलाबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** कोणत्या वेळी काय कार्यवाही झाली मला लेखी स्वरुपात दयावी. त्या कंपनीकडून महापालिकेला सी. आय. पाईप मागविण्याची इच्छा आहे का हा प्रश्न स्वतःलाच अधिकाऱ्यांनी विचारला पाहिजे. नावात बदल केला म्हणून असे केले हे टेक्नीकल कारण सभागृहाला दिले जाते. सन २००२ मध्ये काही कंपन्या मालाचा पुरवठा करीत होत्या. त्यावेळी सुध्दा काही कंपन्याच्या नावात बदल करण्याचा डिलीट करण्याचे प्रस्ताव आलेले होते. काही नावे ॲड करण्याचे प्रस्ताव झालेले होते. त्यावेळेस जवळपास तीन कंपन्यांना प्रकरणात या सभागृहाने मान्यता दिलेली आहे. तीच परिस्थिती या कंपनीच्या प्रकरणात या सभागृहाने मान्यता दिलेली आहे. तीच परिस्थिती या कंपनीच्या नावात बदल करण्याची आहे. मा. उच्च न्यायालयाने सुध्दा असे सांगितलेले आहे की, फक्त लॅन्कोइंडिया लिमिटेड असेल नांव करायचे फारसा बदल नाही. माझे स्पष्ट मत असेल की, जाणून बुजून टाळाटाळ होत आहे. दुसऱ्या कंपनीकडून पाईप मागविण्याचा कल आहे असे वाटते. दीड वर्षापासून कामे थांबवून लावता त्या कंपनीकडून सी. आय. पाईप मागवावे. कामे त्वरीत व्हावी. यापुर्वीच प्रशासनास आपण आदेश दिले होते. दुर्देवाने कार्यवाही झाली नाही. सन २००० मध्ये तीन कंपन्यांचे नावात बदल करण्याचे प्रस्ताव होते. ते मंजूरही झालेले होते.

**सौ. शाहीन जफर :** दिनांक १८-०६-२००८ ला तांत्रिक कक्ष बंद करण्यात आलेला आहे. परंतू तेथे कर्मचारी बसतात. ते काम करतात. संचिका सरळ मा.

आयुक्तांकडे जायला पाहीजे. त्या श्री. देशमुख यांचेकडे का जातात. तांत्रिक कक्ष बंद करुन तेथील कर्मचाऱ्यांच्या बदल्या कराव्यात. ए टू झेड बंद करावा.

**मा सभापती** : टेक्नीकल सेल पूर्णत: बंद केला आहे. श्री. काझी यांची बदली ड्रेनेज विभागात श्री. पाटील यांची नियुक्ती मा. आयुक्तांचे कक्षात करण्यात आलेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे** : तांत्रिक कक्षाबाबत स. सदस्या सौ. शाहीन जफर यांनी विषय काढला मा. आयुक्तांनी तांत्रिक कक्ष बरखास्त केल्याचे आदेश काढले. काही कर्मचारी आहे काही नाही यात जाण्यापुर्वी तांत्रिक कक्ष कोणकोणत्या महापालिकेमध्ये आहे व त्याचे काम कोणत्या दर्जाचे अधिकारी पाहतात याचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.)** : स्थायी समितीच्या निर्णयानुसार तांत्रिक कक्ष रद्द केला आहे. व तसे आदेश काढलेले आहेत. इतर महापालिकेतील काय पध्दत आहे. याची माहिती घेवून पुढील सभेत देण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे** : सर्व माहिती प्रशासनाकडे आहे. या विषयावर चर्चा करतांना मी बोललो होतो की, माझ्या माहिती प्रमाणे सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये मुख्य अभियंता किंवा अधिक्षक अभियंता यांना तांत्रिक स्वीय सहाय्यक ठेवतात. ते समान दर्जाचा अधिकारी ठेवला तर काही हरकत नाही. मुख्य अभियत्यांचे कामाची छाननी अधिखक अभियत्यांच्या दर्जाचे अधिकारी करतात. कार्यकारी अभियत्यांची छाननी कार्यकारी अभियंता करतात. कार्यकारी अभियंतानीच काम केले तर काम सुरळीत होईल. आम्हाला टेक्नीकल सेल्शी मा. आयुक्तांच्या अधिकाराबद्दल काही देणे-घेणे नाही. चपराशाने अधिकाऱ्यांची चूक काढणे ऐवजी अधिकाऱ्याने अधिकाऱ्यांची चूक काढावी कशा प्रकारे चेक करावे. हे मा. आयुक्तांचे अधिकारी आहेत. चारही कार्यवाही अभियंता व सर्व अधिकारी मा. आयुक्तांच्या अधिपत्याखाली काम करतात. ते ताबडतोब काम करु शकता तांत्रिक कक्ष आमचा चुकीचा मेसेज जात आहे असे दाखविण्याचा प्रयत्न झाला उठवला. ठेकेदारांच्या हितासाठी केले आमचे स्पष्ट मत आहे की, तांत्रिक बाबींच्या तपासणीसाठी कितीही अधिकारी ठेवा. कितीही व्हिजीट करा परंतू त्या दर्जाचा अधिकारी असावा. जर कनिष्ठ दर्जाचा अधिकारी ठेवला तर तो वरीष्ठ दर्जाच अधिकाऱ्यांची चूक काढणार नाही. कारण त्यांना त्यांच्या हाताखाली काम करावयास लागण्याची शक्यता असते. तेच जर कार्यकारी अभियत्यांचे दर्जाचा अधिकारी असेल तर तो कार्यकारी अभियत्यांचे कामातील बिनधास्त चूक काढू शकतो. तत्सम दर्जाचे अधिकारी ठेवावे. पदवी शिक्षणाने व अनुभवाने त्या बरोबरच असावे असे माझे मत होते. तेव्हाही होते व आताही आहे. आम्हाला कुणाचे हित जोपासायचे नाही. इतर महानगरपालिकात काय पध्दत आहे हे पाहीले पाहीजे. कुणाच्या भल्यासाठी वक्तव्य करीत नाही. आम्ही कर्तव्य म्हणून बोलतो.

**उपआयुक्त (प्र.)** : स. स. श्री. कोकाटे यांनी ज्या सुचना केल्या त्या सूचनेच्या अनुषंगाने इतर मनपास काय पध्दत आहे. त्यांनी मुद्दे उपस्थित केले. प्रशासनात सारख्या दर्जाचे असावे. याबाबत इतर मनपात काय पॅटर्न आहे. त्याची माहिती घेवून कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जर असे करायचे होते तर आपण असा निर्णय का? घेतला घाई का केली. आवश्यकता होती का?

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आजी तांत्रिक कक्ष चालू आहे. नांव काय द्यायचे. नावात बदल आहे. तांत्रिक कक्ष असणे काय किंवा त्यातील दोन अधिकारी असणे काय?

**सौ. शाहीन जफर :** बंद करायचे तर संपूर्ण बंद करा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जरी मा. सभापतींनी आदेश दिले. आतापर्यंत एवढे निर्णय घाईघाईने पुढच्या सभेत डायरेक्ट निर्णय घ्यायचे आतापर्यंत कुठलाही निर्णय घेतला नाही. हा निर्णय घ्यायची काय आवश्यकता होती. १०-१५ दिवस विचार करुन इतर मनपाची माहिती घेवून नियमानुसार करायला पाहिजे होते.

**उपआयुक्त (प्र.) :** तांत्रिक कक्ष बंद झाला आहे. आम्ही आदेशही दिलेले आहे.

**मा. सभापती :** प्रशासनाने आदेश काढलेले आहेत. मला प्रत दिलेली आहे. त्यात १ ते ४ संदर्भ दिले आहेत. त्यातील संदर्भ क्र. ४ स्थायी समितीच्या आदेशाप्रमाणे तांत्रिक कक्ष बंद झाला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** श्री. देशमुख उप अभियंता आहेत ते काम पाहतात. श्री. पाटील काम पाहतात. यास बदल झाला.

**सौ. शाहीन जफर :** तांत्रिक कक्ष बंद केला तर यांना वेगवेगळया ठिकाणी पाठवा. पूर्णच बंद करा.

**मा. आयुक्त :** कलम ६९ नुसार माझे अधिकार वापरुन या संबंधीची टिप्पणी मा. सभापतींना सादर केली ती मंजूर करावी किंवा नामंजुर करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मा. आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात जी टिप्पणी सादर केली ती सभागृहापुढे ठेवावी. आम्हाला स्पष्ट दिसते की, टिप्पणीच सादर झाली नाही. आता टिप्पणी सादर होते. सभागृहाची दिशाभूल आहे.

**मा. सभापती :** पुढच्या बैठकीत ती टिप्पणी ठेवण्यात येईल. मा. आयुक्तांनी या संबंधीची टिप्पणी माझेकडे सादर केलेली होती. परंतू मीच त्यांना सांगितले की सदरील टिप्पणी सभागृहात सादर करावी.

**मा.आयुक्त :** कलमासहीत टिप्पणी आहे. आणि ज्या गोष्टी मा. सभापतींनी मला सूचना दिल्या आहेत. माझे काही अधिकार असतांना सुध्दा त्या माझे पाळणे भाग आहे. त्यांनी सांगितले नंतर ठेवा म्हणून नंतर ठेवले.

**श्री. इलियास किरमानी :** जीवन प्राधीकरणाकडील ५ अभियंते यांना त्यांच्या विभागाला परत बोलाविण्यात आलेले आहे. जोपर्यंत दुसरे अभियंते येत नाहीत जो पर्यंत त्यांना सोडू नये.

**श्री. संजय शिरसाठ :** तसेच उपआयुक्त (महसूल) यांचाही प्रतिनियुक्तीत वाढीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे होता. ते कार्यक्षम अधिकारी असून, त्यांनाही परत बोलाविण्याची शक्यता आहे. तसे आदेश आले तरी त्याच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना सुध्दा तुर्त कार्य मुक्त करण्यात येवू नये.

**मा. सभापती :** जीवन प्राधीकरणाकडील अभियंत्याचे मूळ विभागास परत न पाठविता मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ऐनवेळी आला होता. सर्वसाधारण सभेत मुदत वाढीचा प्रस्ताव असल्याने त्यांना सोडू नये. त्यांचे मुख्यालयास लेखी कळवावे. तसेच उपआयुक्त (म) यांनाही जर दरम्यानच्या काळात त्यांच्या विभागात परत बोलावले तरी ते कर्तव्यदक्ष अधिकारी असल्याने व त्यांचे सेवेची महानगरपालिकेला गरज असल्याने त्यानाही

कार्यमुक्त करण्यात येवू नये असे सभागृहाच्या वतीने मा. आयुक्तास आदेश देण्यात येतात. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१ :**

दिनांक २७-०५-२००४ (का. प. क्र. ६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त (भागशः) व दि. ०७-०६-२००४ (का. प. क्र. ७) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती** : दिनांक २७-०५-२००४ च्या सभेत विषय क्र. १९ मध्ये स. न. २३/६, जयसिंगपूरा बांधकाम परवानगी प्रकरणात जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी मध्ये ५०% सुट दिलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे ७५% सुट दयेय होते. ५०% ऐवजी ७५% अशी दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २७-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १४ विषय क्र. १९ मध्ये सर्वे न. २३/६ जयसिंगपूरा च्या बांधकाम परवानगी च्या संदर्भात प्रस्तावित जमीन विकास शुल्क व शहर विकास निधी यामध्ये ५०% ऐवजी शासन निर्णयाप्रमाणे ७५% सुट देण्यात यावी. या व इतर दुरुस्त्यासह दिनांक २७-०५-२००४ (भागशः) व ०७-०६-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ३२ :**

(दि. ०७-०६-२००४ च्या सभेतील विषय क्र. २९ पुढील सभेत ठेवण्याचा निर्णय झाल्यानुसार)

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार नागेश्वरवाडी ते एम. पी. लॉ कॉलेज या १५ मीटर (५० फूट) रुंद रस्त्याने न. भु. क्र. ४७६२ व ४७८४ चे बाधीत क्षेत्र अनुक्रमे ६३ चौ.मी. व ३४.३० चौ. मी. आहे. सदर बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करुन मिळकत धारकास द्यावयाचा मोबदला खालील प्रमाणे

वरील प्रमाणे संबंधित मिळकत धारकास मोबदला दयावयाचा असून, मोबदला रक्कम दोन हफ्त्यात देणे आहे. पहिला हफ्ता ५०% संपादीत क्षेत्राचे खरेदी खत करुन घेते वेळी व दुसरा हप्ता संपादीत क्षेत्र महानगरपालिकेच्या नांवे पी. आर. कार्डवर नोंद घेतल्यानंतर व मालमत्ता टॅक्स बेबाकी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर द्यावयाचे आहे.

तसेच संपादीत क्षेत्राचे नोंदणीकृत खरेदी खत करुन घेण्यासाठी र. रु. ८५,०००/- (पंच्याऐंशी हजार) रजिस्ट्री करीता अपेक्षीत आहे. करीता वरील दोन मिळकत धारकांना वरील प्रमाणे द्यावयाचा मोबदला रु. २,६१,००५/- (दोन लाख एकसष्ठ हजार पाच) व रजिस्ट्री खर्च रु. ८५,०००/- (पंच्याऐंशी हजार) अग्रीम म्हणून श्री. एस. एस. गायकवाड दुय्यम आवेक्षक यांना देणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्वत सादर.

**मा. सभापती** : मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार नागेश्वरवाडी ते एम. पी. लॉ कॉलेज या १५ मीटर (५० फूट) रुंद रस्त्याने न. भु. क्र. ४७६२ व ४७८४ चे बाधीत क्षेत्र अनुक्रमे ६३ चौ.मी. व ३४.३० चौ. मी. आहे. सदर बाधीत क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करुन मिळकत धारकास अनुक्रमे र. रु. १,६८,१३५/- व रु. ९२,२७०/- असा एकूण रु. २,६१,००५/- दोन हफ्त्यात देण्यास व त्या अनुषंगाने रजिस्ट्री करीता रु. ८५,०००/- (पंच्याऐंशी हजार) अग्रीम म्हणून श्री. एस. एस. गायकवाड दुय्यम आवेक्षक यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समर्थनगर येथील रस्त्यांच्या दोन्ही बाजूच्या साईड पंरव्याचे खडीकरण करणेच्या कामाकरीता अं. प. र. रु. १२,६९,३७२/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूर प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागवण्यित आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण ३४ कोरी निविदापत्रके विकली गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त ९ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. यु. के. पंडीत | ३७.३३ टक्के कमी दराने |
| २. | श्री. मुबारक एम. पठाण | ३६.७८६ टक्के कमी दराने |
| ३. | मे. पंडीत इंजिनियरिंग कं. | ३४.२ टक्के कमी दराने |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | ३१.१० टक्के कमी दराने |
| ५. | मे. अफ्लाईड कं. | ३०.९९ टक्के कमी दराने |
| ६. | श्री. डी. अजितसिंग | ३०.५६ टक्के कमी दराने |
| ७. | मे. एस. एच. असोसिटस | २५.०० टक्के कमी दराने |
| ८. | श्री. एस. एच असोसिटस | २४.३९५ टक्के कमी दराने |
| ९. | श्री. शिवहार निर्मल | १७.०० टक्के कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री. यु. के. पंडीत यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.३३ टक्के कमी आहे.

तरी श्री. यु. के. पंडीत यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.३३ टक्के कमी दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**मा. सभापती** : स्विकृतीसह मंजूर तात्काळ काम करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर येथील रस्त्यांच्या दोन्ही बाजूच्या साईड पंरव्याचे खडीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरपेक्षा ३७.३३% कमी दराची श्री. सु. के. पंडीत यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४ :**

मुख्य लेखा परीक्षक प्रस्ताव सादर करीत आहेत की, लेखा परिक्षण विभागामार्फत महानगरपालिकेच्या सर्व विभागाचे लेखा परिक्षण हाती घेण्यासाठी मागील ५-६ वर्षापासून वार्षीक लेखापरिक्षक कार्येक्रम तयार करण्यात येतो व त्यानुसार त्या त्या वेळी विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांअधारे लेखापरिक्षण करण्यात येते. लेखा परिक्षणा दरम्यान निर्दशनास आलेल्या ओक्षेपार्ह बाबी अर्धसमास स्वरुपात विभाग प्रमुख/शाखा प्रमुख यांचेकडे कळविण्यात येवून पुर्तता करण्याचे सुचित करण्यात येते किंवा तीव्र आक्षेपार्ह बाबी या मा. आयुक्त यांच्या निर्दशनास आणून देण्यात येवून त्यावर यथोचित कार्यवाही करण्याची सूचना प्रशासनास देण्यात येते.

आर्थिक वर्ष संपल्यानंतर सर्व आक्षेपार्ह बाबी किंवा इतर अभियंत्ताबाबत मा. स्थायी समितीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अन्वये अहवाल सादर करण्यात येतो.

सन २००३-२००४ चे वार्षिक अंदाजपत्रक रुपये १५.४० कोटीच्या जवळपास आहे. मागील आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक रु. १०८.०० कोटीचे होते. जमा व खर्च अशा दोन्ही बाजूंना १००% लेखा परिक्षण केल्यास जमा रु. १५०.०० कोटी व खर्च रु. १५०.०० कोटीचे करावे लागणार आहे. सध्या अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे १०० लेखा परिक्षण करणे शक्य होत नाही. त्यामुळे काही विभागाचे १०० तर काही विभागांचे चाचणी लेखापरिक्षण करावे लागते. त्यामुळे काही महत्वाच्या बाबी चाचणी लेखापरिक्षणा दरम्यान पुर्णपणे निर्दशनास येत नाहीत. यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या लेखा परिक्षण विभागात खालील प्रमाणे पदे मंजूर आहेत.

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पद संख्या |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ लेखा परिक्षक (कार्यालय अधिक्षक) | ०१ |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक (वरिष्ठ लिपीक) | ०४ |
| ३. | वाहन चालक | ०१ |
| ४. | शिपाई | ०२ |

प्रस्तावित नुसार जमा बाजूच्या लेखापरिक्षणासाठी कार्यालय अधिक्षक अधिकाऱ्यांच्या अधिनस्त एक पथक व खर्च बाजुसाठी त्यापेक्षा थोडेमोठे पथक खालील प्रमाणे असावे अशी शिफारस करण्यात येते.

**अ) जमा बाजू :**

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | संख्या |
|---|---|---|---|
| १. | लेखा परिक्षक अधिक्षक (कार्यालय अधिक्षक सवंर्ग) | रु. ५५००-९००० | १ |
| २. | वरिष्ठ लेखा परिक्षक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ४५००-७००० | ४ |
| ३. | कनिष्ठ लेखापरिक्षक (कनिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ३०५०-४५९० | ८ |
| ४. | शिपाई | रु. २५५०-३२०० | १ |
| | | | १४ |

**ब) खर्च बाजू :**

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | संख्या |
|---|---|---|---|
| १. | लेखा परिक्षक अधिक्षक (कार्यालय अधिक्षक सवंर्ग) | रु. ५५००-९००० | १ |
| २. | वरिष्ठ लेखा परिक्षक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ४५००-७००० | ४ |
| ३. | कनिष्ठ लेखापरिक्षक (कनिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ३०५०-४५९० | ८ |
| ४. | शिपाई | रु. २५५०-३२०० | १ |
| | | | २० |

**क) कार्यालयीन कर्मचारी :**

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | संख्या |
|---|---|---|---|
| १. | लघुलेखक/संगणक ऑपरेटर | रु. ४५००-७००० | १ |
| २. | लिपीक/टंकलेखक | रु. ३०५०-४५९० | १ |
| ३. | वाहन चालक | रु. ३०५०-४५९० | ०१ |
| ४. | शिपाई | रु. २५५०-३२०० | ०१ |
| | | | १४ |

**एकूण :** अ+ब+क=१४+२०+४=३८

यांप्रमाणे प्रस्तावित कर्मचारी वर्ग लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाल्यास लेखा परिक्षणाचे कामकाज अत्यंत प्रभावीपणे पार पाडता येईल. त्यामुळे सध्याची मंजूरपदे वजा जाता खालील प्रमाणे नविन पद निर्मिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७ (१) (क) व कलम ५१ (१) (४) अन्वये प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | एकूण प्रस्तावत पदे | सध्याची मंजूर पदे | नवीन निर्माण करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | लेखा परिक्षा अधिक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | रु. ५५००-९००० | २ | १ | १ |
| २. | वरीष्ठ लेखापरिक्षक | रु. ४५००-७००० | १० | ४ | ६ |
| ३. | लघुलेखक/संगणक ऑपरेटर | रु. ४५००-७००० | १ | -- | ०१ |
| ४. | कनिष्ठ लेखापरिक्षक (कनिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ३०५०-४५९० | २१ | ४ | १७ |
| ५. | वाहन चालक | रु. ३०५०-४५०० | -- | १ | -- |
| ६. | शिपाई | रु. २५५०-३२०० | ३ | २ | १ |
| | | | ३७ | ११ | २६ |

**इ) वाढीव खर्च :**

लेखा विभागाकडील आकडेवारी नुसार सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील एकूण महसूली उत्पन्न (अनुदान वगळता) रु. १२३०२ कोटी इतके अपेक्षीत असून एकुण अस्थापना खर्च रु. ४०.०१ कोटी इतका अपेक्षीत आहे. महसूली उत्पन्नाशी एकूण अस्थापना खर्चाची

टक्केवारी ३२.५२% आहे. सदरील प्रस्तावित पदांवरील वार्षीक अपेक्षीत खर्च रु.१८.६४ लक्ष इतका गृहीत धरल्यास अस्थापना खर्च ०.१५% वाढेल व एकुण अस्थापना खर्च ३६.७% इतका होईल. म्हणजेच मर्यादेच्या आत राहील.

लेखा परिक्षणाचे काम हे बरेचसे तांत्रिक स्वरुपाचे असून व ज्यांना लेखा परिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव आहे. अशा कर्मचाऱ्यांकडून करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे असे आवर्जून नमूद करण्यात येते.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (०४) आधारे प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लेखापरिक्षणाचे कामकाज प्रभावीपणे पार पाडण्याकरीता व लेखा परिक्षणासाठी पुरेसा कर्मचारी उपलबध व्हावा. याकरीता खालील दर्शविलेल्या पदानामासमोर दर्शविलेल्या वेतन श्रेणीत नवीन पदे निर्माण करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी नवीन पदांची संख्या | मंजूर पद संख्या |
|---|---|---|---|
| १. | लेखा परिक्षक अधिक्षक (कार्यालय अधिक्षक) | रु. ५५००-९००० | ०१ |
| २. | वरिष्ठ लेखा परिक्षक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ४५००-७००० | ६ |
| ३. | लघुलेखक/संगणक ऑपरेटर | रु. ४५००-७००० | १ |
| ४. | कनिष्ठ लेखापरिक्षक (कनिष्ठ लिपीक संवर्ग) | रु. ३०५०-४५९० | १७ |
| ०५ | वाहनचालक | रु. ३०५०-४५९० | -- |
| ०६ | शिपाई | रु. २५५०-३२०० | १ |
| | **एकूण** | | **२६** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या चांगल्या प्रकल्पाची योजनांची माहिती व विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ उपलब्ध व्हावे म्हणून शासनाने एक स्वतंत्र नागरी संघटना स्थापन व्हावी यासाठी " महाराष्ट्र नागरी व्यवस्थापन संघटना" (City Managers Association of Maharashtra (CMAM)) च्या स्थापनेस मान्यता प्रदान केली आहे. मुंबई महानगरपालिकेत आयुक्त हे संस्थचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. प्रधान सचिव (१) व (२) नगरविकास तसेच संचालक नगरपरिषद प्रशासन व इतर महानगपालिकेचे आयुक्त व नगर परिषदांचे मुख्याधिकारी त्यांचे स्थायी सदस्य आहेत. नागरी व्यवस्थापन संघटना महाराष्ट्र ही सदस्यत्वावर आधारीत आहे. महानगरपालिकेतील सर्व खाते पमुख व अधिकारी या संस्थेचे व्यक्तीगत सदस्य घेण्यास पात्र आहेत.

आपल्या शहराच्या विकासामध्ये आपल्या बरोबर काम करण्यास ही संस्था उत्सुक आहे. या संस्थेचे प्रमुख उद्दीष्ट असे आहे की, आपल्या शहरात जे उत्कृष्ट प्रकल्प राबविले

गेले असतील किंवा राबविले जात आहेत. याची माहिती इतर शहरांना राज्यांना व इतर आंतरराष्ट्रीय स्तरावर माहिती देणे आहे. तसेच इतर शहराच्या प्रकल्पांची माहिती या महानगरपालिकेस देवून या उपक्रमांद्वारे स्थानिक संस्थेने नागरी प्रश्न सक्षमपणे हाताळून परिणामकारक आणि कार्यक्षम नागरी व्यवस्थापन देण्याची प्रयत्न आहे. ही संस्था विकासात्मक बाबी सोबत दुहेरी लेखा पध्दती घनकचरा व्यवस्थापन मानवी संसाधन धोरणाचा विकास वेगवेगळया शासकीय योजनांचे मुल्यमापन आणि नियोजन तसेच विशेष विभागासाठी जसे धार्मीक व पर्यटन स्थानासाठी विकास आराखडा बनविणे इत्यादी बाबीमध्ये सुध्दा संस्था मदत करु इच्छिते. तसेच संस्था शहर विकास प्रकल्पात खाजगी संस्थाच्या भागीदारीमध्ये आदर्श नमुना निविदा बनविण्यासाठी व प्रायोगिक प्रकल्प राबविण्यासाठी मदत करु शकते.

नागरी व्यवस्थापन संघटना, महाराष्ट्र चे सदस्य होण्यासाठी कॉर्पस फंड रु. २,५०,०००/- आणि वार्षीक वर्गणी रु. ५०,०००/- इतकी आहे. सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात अभ्यास दौरा आणि कर्मचारी प्रशिक्षण या लेखाशिर्षांतर्गत रु.५.०० लक्ष तरतूदीतून सदरील संस्थेचे सदस्यत्व स्विकारण्याकरीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी व्यवस्थान संघटना महाराष्ट्र चे सदस्य घेण्यासाठी कॉर्पस फंड रु. २,५०,०००/- आणि वार्षीक वर्गणी रु. ५०,०००/- इतकी भरण्यास तसेच याकरीता सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकास " अभ्यास दौरा आणि कर्मचारी प्रशिक्षण " या लेखाशिर्षांतर्गत रु. ५.०० लक्ष तरतुदीतून वर्गणी व फंडासाठी लागणारी रक्कम भरुन संस्थेचे सदस्यत्व स्विकारण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६ :**

**नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० च्या तरतुदी नूसार यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबत व उपलब्ध वाहनांवर निमयाप्रमाणे यंत्रसामुग्री बसविणे बाबत.**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ग-अ दर्जाच्या शहरामध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास करुन सुधारणा करण्याबाबत शिफारस करण्यासाठी बर्मन समितीची स्थापना केली. या समितीने केलेल्या शिफारशी तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशनानुसार शासनाच्या पर्यावरण आणि वनमंत्रालय, भारत सरकार यांनी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० निर्गमीत केले आहे.

२५ सप्टेंबर २००२ रोजीच्या राजपत्रात हे नियम प्रसिध्द केलेले आहे व त्या दिनांकापासून अंमलात आहेत. त्यानुसार अनुसूची-१ मध्ये तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन देण्यात आला आहे. दि. ३१-१२-२००३ पर्यंत सदरील यंत्रणा राबविणे जरुरी होते. त्याप्रमाणे दि. १८ व १९ ऑगस्ट २००३ रोजी कार्यशाळा संपन्न झाली व घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम-२००० अंतर्गत कचरा वाहतूकीच्या पध्दती बाबत मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त मुख्य अभियंता (यांत्रिकी) श्री. गौर साहेब यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे कर्मचारी सर्व झोनल अधिकारी, सर्व स्वच्छता निरीक्षक व यांत्रिकी विभागातील अधिकारी यांना प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले.

नविन नियमानुसार ह्यापुढे शहरातील घनकचरा हा उघडा टाकता येणार नाही. किंवा एकदम बंद बॉडीच्या मशिनरी वापरुनच वाहतुक करता येईल सध्या

महानगरपालिकेच्या वापरात असलेल्या सर्व कुंडया काढुन त्या जागी बंद बिन्स व कंटेनर ठेवावे लागतील मनपाचे लेबर्स घंटागाडयाद्वारे घरोघरी जावून कचरा गोळा करतील व जागोजागी ठेवलेल्या कंटेनर्स मध्ये टाकतील. कंटेनर्स ची वाहतूक स्कीप लेडर्स द्वारे डंपिग ग्राऊंड पर्यंत करावी लागेल. याशिवाय गारबेज कॉम्पॅक्टर्स, हुक लेडर्स सारख्या मॉडर्न मशिनरी पण वापराव्या लागतील.

सदरील यंत्रणा ही पूणे, पिंपरी चिचवंड, मुंबई मनपा तर्फे वापरण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार इतर मनपांना व अशा प्रकारची मशिनरी उत्पादन करणाऱ्या उत्पादक कंपन्यांना भेट देण्यासाठी आरोग्य वैदयकीय अधिकारी, उपअभियंता (यांत्रिकी) झोनल अधिकारी झोन क्र. ८ दुय्यम आवेक्षक (यांत्रिकी) यांना पाठविण्याचे ठरले होते. परंतू काही कारणास्तव आरोग्य वैदयकिय अधिकारी व झोन अधिकारी हे जाऊ शकले नाहीत व यांत्रिकी विभागातील अधिकारी जाऊन आले. पूर्ण महानगरपालिकेची एकूण २१० विविध प्रकारची वाहने व मशिनरी कचरा वाहतुकीसाठी २ पाळयामध्ये कार्यरत आहेत. प्रथम कचरा, ट्रान्सफर स्टेशन येथे नेण्यात येतो व तेथुन खत बनविण्यासाठी पाठवला जातो. पिंपरी चिंचवड येथे पण ह्या प्रकारची मशिनरी आहे. मुंबई मनपाने ही योजना प्रायव्हेट कॉन्ट्रॅक्टर्सद्वारे राबविली आहे. नाशिक मनपामध्ये देखील सर्व कामे प्रायव्हेट कॉन्ट्रॅक्टर्सद्वारे करुन घेण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड येथील कॅम-ॲव्हिडा या कचरा वाहतुकीसाठी प्रायव्हेट कॉन्ट्रॅक्टर्सद्वारे करुन घेण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड येथील कॅम-ॲव्हिडा या कचरा वाहतुकीसाठीचे काम प्रायव्हेट एजन्सीजला दिले आहे. कॉम्पॅक्टर्स भरतानाची प्रत्यक्ष पाहणी केली झालेल्या चर्चेनुसार व उपलब्ध माहीतीच्या आधारे मनपा औरंगाबादकडे असलेल्या वाहनांवरील ओपन बॉडी काढुन त्यावर नवीन यंत्रणा बसवून ही योजना राबविण्यासाठी नियोजन व अंदाजपत्रक तयार केले ते खालील प्रमाणे आहे.

१. मनपाकडे उपलब्ध ६ ऑटोरिक्षाच्या जुन्या बॉडीज काढून त्या जागी टिपर टाईन नवीन बंद बॉडी बनविणे शक्य आहे. तसेच नवीन १२ ऑटोरिक्षा खरेदी करुन त्यावर देखील टींपीग बॉडी बसविणे जरुरी आहे. ह्या वाहनांवर घरोघरी घंटा बसवून कॉलनीत घरोघरी जाऊन कचरा गोळा करता येईल. असे एकुण १८ ऑटोरिक्षाद्वारे कचरा गोळा करता येईल.

२. मनपाकडे टाटा-४०७ ची वाहने उपलब्ध असून, त्यातील २ वाहने जुनी असल्यामुळे उर्वरीत एकूण ८ टाटा-४०७ वरील जुनी बॉडी काढून त्या जागी बदं बॉडीची व टिप्पींग व्यवस्था करुन वाहनांचा उपयोग घंटा गाडी म्हणून करता येईल.

३. कं टेनर्स-घंटा गाडयाद्वारे जमा झालेला कचरा " हुक लेडर्स " द्वारे वाहुन नेण्यात येणाऱ्या १५ मीटर क्युबिक क्षमतेच्या कंटेनर्समध्ये टाकता येईल. जेणे करुन शहराच्या शहरात वाहनांच्या जास्त ट्रीप होतील व कंटेनर्स च्या कमी ट्रीपामध्ये जास्त कचरा वाहतूक होईल.

४. डंपर प्लेसर : (स्कीप लोडर्स) टाटा ९०४ ची एकूण ६ वाहने व टाटा ६०९ ची २ वाहने असून, त्यावर अदयावत मशिनरी बसवून त्यांचा उपयोग स्कीप लोडर/डंपर प्लेसर म्हणून करता येईल. शहरातील एकूण ३२ जागी ३.८ एम क्षमतेचे स्कीप लोंडीग कंटेनर्स ठेवून ही स्कीप लोडर्सद्वारे वाहून नेता येतील व परत खाली आल्यावर जागीच आणून ठेवता येतील.

५. कॉम्पॅक्टर : टाटा १२१० चे एकूण ८ टिप्पर असून त्यापैकी चार वाहनांचे आयुष्य संपत असल्यामूळे फक्त चार वाहनेच कॉम्पॅक्टर बसविण्यासाठी उपयोगात येऊ शकते. तसेच टाटा १६१३ चे एकूण  पाच वाहने असून चार वाहने कॉम्पॅक्टर बसविण्यासाठी उपयोगात घेता येतील. अशा प्रकारे ८ वाहनांवर कॉम्पॅक्टर बसविता

येईल. एका कॉम्पॅक्टरद्वारे शहरात जागोजागी १.१ एम ३ चे २५ कंटेनर्स दररोज उचलता येतील. म्हणजेच ८ कॉम्पॅक्टरद्वारे एकूण २०० कंटेनर दररोज उचलता येतील. शिवाय विविध कॉलनीमधील १२० लिटर्सचे ४०० व २४० लिटरचे ४०० असे एकूण ८४० पिन्स देखील या कॉम्पॅक्टरद्वारे उचलता येतील.

६. हुक लोडर्स : शहरातील विविध ठिकाणचा कचरा घंटा गाडीद्वारे, हॅन्ड कार्ट द्वारे जमा झालेल्या कचरा हा शहरात विविध ठिकाणी १५ एम ३ क्षमतेचे कंटेनर मध्ये जमा करता येईल. सात झोनमध्ये २१ कंटेनर्स ठेवून तीन हुक लोडरद्वारे सदरील कंटेनर उचलून डिस्पोजल पॉईंटला नेता येईल. हुक लोडर तयार करण्याकरीता एक जुनी १५१३ चेसीस वापरता येईल व दोन नवीन चेसेस विकत घ्यावा लागतील.

७. एक जे. सी. बी. मशीन कचरा हाताळणीसाठी लागणाऱ्या ॲक्सेसरीजसह खरेदी करणे जरुरी आहे. डंपिग ग्राऊंडवर दोन शिफ्ट मध्ये मशीन कचरा व्यवस्थित लावण्यासाठी जरुरी आहे. यासाठी दोन नवीन जे. सी. बी. वाहन चालक नेमावे लागतील.

वरील प्रकारचे वाहने व कंटेनर्सद्वारे शहरातील एकूण साधारणपणे ३०० टन कचरा खालील प्रमाणे वाहुन नेता येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | टाटा-६०८ वाहनांवर ६ डंपर प्लेसर (स्कीप लोडर) ३.८ एम३ (३८०० मीटर) कॅपिसिटी कंटेनर १.५ टन लोड; प्रत्येक वाहन ४ कंटेनर एक शिफ्ट मध्ये उचलेल. म्हणजेच १.५X४.६ टन वाहनांद्वारे एकूण ६X६=३६ टन कचरा वाहतूक होईल. | ३६ टन |
| २. | टाटा ६०९ ह्या दोन वाहनांर २ डंपर प्लेसर ३.८ एम म्हणजेच १.५ लोड क्षमता १.५X४.६X२=१२ टन | १२ टन |
| ३. | ४ टाटा-१२१० वाहनांवर ४ कॉम्पॅक्टर बसविण्यात येतील. दररोज एक कॉम्पॅक्टर १.१ एम १/२ कॅपॅसिटीचे २५ बिन्स उचलेल म्हणजेच अंदाजे १० टन कचरा उचलेल. ४ वाहनांद्वारे डबल उचलला जाणारा कचरा ४X१०=४० टन | ४० टन |
| ४. | टाटा १६१३ च्या ४ वाहनांवर चार कॉम्पॅक्टर बसविण्यात येतील. दररोज एक कॉम्पॅक्टर १.५ एम३ म्हणजेच ७०० कि. ग्रॅम कचऱ्याचे २५ बिन्स उचलेले म्हणजेच अंदाजे १७.५ टन कचरा उचलेल ४ वाहनांद्वारे १७.५X४=७० टन कचरा उचलला जाईल. | ७० टन |
| ५. | टाटा-१६१३ या तीन वाहनांवर हे हुक लेडर्स बसविण्यात येतील १५ एम३ कॅपॅसिटीचे म्हणजे अंदाजे २ टन कचरा क्षमतेचे १ हुक लोडर दररोज ५ कंटेनर उचलले म्हणजेच ९X५=४५ टन कचरा उचलला जाईल. तीन वाहनांद्वारे दररोज उचलला जाणारा कचरा ४५X३=१३५ टन त्यासाठी एक जूने चेसीस व दोन नवीन चेसीस करुन वापरता येईल. | ३०० टन |
| | **एकूण अंदाजे** | **३०० टन** |

अशा प्रकारे एकूण साधारणपणे ३०० टन कचरा जवळपास वरील प्रकारच्या मशीनरीद्वारे दररोज उचलला जाईल. बारा रिक्षा चालविण्यासाठी दैनिक वेतन वाहन चालक

नेमावे लागतील. तसेच कमी पडणारे वाहन चालक नेमण्याची कार्यवाही अस्थापना १ तर्फे करावी लागेल.

वरील प्रकारच्या मशीनरी खरेदी मॉडीफिकेशन बिन्स कंटेनर्स खरेदीसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून, अनुक्रमे १ ते २० प्रमाणे सोबत जोडण्यात आले असून, सदरील अंदाजपत्रकात एकूण रु. ४,५०,००,०००/- खर्चाचे आहे. अंदाजपत्रकातील दर हे औरंगाबादमध्ये झालेल्या घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अंतर्गत कार्यशाळेत ऑल इंडिया इन्स्टियूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट श्री. गौर साहेब यांनी दिलेल्या तक्त्याच्या व चर्चेच्या आधारे तसेच कॅम ॲव्हिडा या मॅनिफॅक्टरींग कंपनीने दिलेल्या दराच्या आधारे तसेच ॲन्टोनी मोटर्स ठाणे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी यांचेशी चर्चा करुन गृहीत धरले आहेत. कंपनी टू कंपनी ह्या प्रकारच्या यंत्र सामुग्रीचे डिझाईन बदलत असते. त्यामुळे दरपत्रक मागवितांना मुंबई, पुणे येथे वर्तमानपत्रात टेंडर नोटीस देणे योग्य राहील. डिझाईन/ड्रॉईंगसह/टॅक्सेस/ट्रान्सपोरटेशन सह दर कंपनी कडूनच मागवून नंतर त्याचे तांत्रिक स्क्रुटनी करता येईल.

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात बजेट उपलब्ध नव्हते. त्यामुळे कार्यवाही करता आली नाही. परंतू २००४-२००५ या आर्थिक वर्षाच्या बजेट मध्ये रु. ४.५ कोटीची तरतुद केलेली आहे. तथापी सदरील तरतुद बँकेमार्फत कर्ज उभारणे त्या माध्यमातून खर्च करण्याच्या अटीवर केली आहे. त्यामूळे ४.५ कोटी रुपयाचे कर्ज उभारणी करण्यासाठी कार्यवाही करण्यास मंजूरी मिळावी.

**मा. सभापती** : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० च्या तरतुदी नुसार यंत्रसामुग्री खरेदी करणे व उपलब्ध वाहनांवर नियमाप्रमाणे यंत्रसामुग्री बसविण्याच्या कामाकरीता सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पातील तरतुदीस अनुसरुन बँकेमार्फत रक्क्म रु. ४.५ कोटी रुपयांचे कर्ज उभारणी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळेच विषय*

**विषय क्र. ३७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे की, दिनांक १०-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये विविध व्यासाचे सी. आय./डी. आय. के ७ व के ९ पाईप खरेदी करणे (अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,४४,३८,४६६) करीता लॅन्को कलाहस्ती कास्टींग लिमिटेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४६% जास्त दराची निविदा (विषय क्र. ७ अन्वये) मंजूर झालेली आहे. स्थायी समितीच्या आदेशानुसार दिनांक १२-०५-२००४ अन्वये मे. लॅन्को कलाहस्ती कास्टींग लिमिटेड यांना ५% अनामत रक्कम भरण्याबाबत कळविले असता त्यांनी कार्पोरेशन बँकेचे (तिरुपती शाखा) बँक डिपॉझीट पावती रुपये ७,२२,०००/- व रुपये १०० चा मुद्रांक कागद करार करार नाम्यासाठी कार्यालयात जमा केला आहे. या बरोबरच त्यांनी एक पत्र दिलेले असून त्यात त्यांनी लॅन्को कलाहस्ती लिमिटेड (lkcl) ही कंपनी लॅन्को इंडस्ट्रीज लिमिटेड या नावाने करावा असे नमूद केलेले आहेत. याबाबत पुरावा म्हणून त्यांनी मा.उच्च न्यायलय, आंध्रप्रदेश

(हैद्राबाद) यांच्या आदेशाची प्रत (निर्णय दिनांक २०-०२-२००४ कंपनी पिटीशन नं. १८२, १८३/२००३) सादर केलेली आहे. तसेच Register of Companies Andhra Pradesh, Hyderabad या प्रकरणात महानगरपालिकेचे विधी सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय घेण्यात आला असून, याबाबत त्यांनी लॅन्को कलाहस्ता कास्टींग लिमिटेड ही कंपनी आता लॅन्को इंडस्ट्रीज लिमिटेड यां कंपनीत Amalgamate झाल्यामुळे कामाचा आदेश लॅन्को इंन्डस्ट्रीज कंपनी लि. नावाने देण्यास हरकत नाही असा अभिप्राय दिला आहे.

तरी पाईप खरेदीसाठी लॅन्को कलाहस्ती कास्टींग लिमिटेड ऐवजी लॅन्को इंडस्ट्रीज लिमिटेड या नावाने कार्यादेश देऊन पाईपाचा पुरवठा करुन घेण्यास हरकत नाही. कृपया सदर बदलास मान्यता व्हावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १०-०५-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीमध्ये विविध व्यासाचे सी. आय./डी. आय. के ७ व के ९ पाईप खरेदी करण्यासाठी लॅन्को कलाहस्ती कास्टींग लिमिटेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४६% जास्त दराची निविदा (विषय क्र. ७ अन्वये) मंजूर झालेली आहे. तथापी लॅन्को कलाहस्ती कास्टींग लिमिटेड (lkcl) ही कंपनी लॅन्को इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीमध्ये विलिंग (Amalgamate) झाल्यामुळे व याबाबत पुरावा म्हणून त्यांनी मा. उच्च न्यायालय. आंध्रप्रदेश (हैद्राबाद) यांच्या आदेशाची प्रत (निर्णय दिनांक २०-०२-२००४ कंपनी पीटीशन नं. १८२, १८३/२००३) सादर केलेली असल्याने तसेच Register of Companies Andhra Pradesh, Hyderabad या प्रकरणात महानगरपालिकेचे विधी सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे अभिप्रायानुसार कामाचा आदेश लॅन्को इंडन्स्ट्रीज कंपनी लि. च्या नावाने देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शासकीय कर्मचारी व इतर कर्मचारी यांना दिनांक १ जुन २००४ पासुन वेतनश्रेणी मूळ वेतनाच्या ५५% च्या ऐवजी ६१ दराने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. मभवा-११०३/प्र. क्र.-१४/सेवा-९ दि. १० जुन २००४ नुसार महागाई भत्ता वाढ मजुर करण्यात आली आहे.

स. २००४-२००५ या आर्थिक वर्षात पगार व भत्तेसाठी रु. ४३.९० कोटीची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. जे की मागील वर्षाचे खर्चापेक्षा अंदाजे १०% ने जास्त आहे. भविष्यात वेळोवेळी वेतन व भत्यात वाढीचा विचार करुन उपरोक्त तरतुद करण्यात आली आहे.

करिता उपरोक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना माहे १ जुन २००४ पासुन दरमहा मूळ वेतनाच्या ६१% दराने महागाई भत्ता रोखीने अदा करणे करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती** : स्विकृतीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना माहे १ जुन २००४ पासुन दरमहा मुळ वेतनाच्या ६१% या दराने महागाई भत्ता रोखीने अदा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९ :**

उपआयुक्त (प्र) सादर करीत आहेत की, श्री. सुधीर मधुकरराव पत्की हे औरंगाबाद महानगरपालिकेत वाहन चालक या संवर्गात कार्यरत असून, अधिष्ठाता, शासकीय वैदयकीय महाविदयालय औरंगाबादच्या वैद्यकीय मंडळाने त्यांचे पत्र क्रमांक/जीबी/एबी/एमसीएच/१५५९.६०/२००३ दि. १७-१०-२००३ अन्वये श्री. सुधीर पत्की यांच्या सतत प्रकृती अस्वास्थामुळे त्यांना वाहन चालक या पदाऐवजी office Table Work कार्यालयीन काम करण्यासाठी सक्षम असल्याची शिफारस केलेली आहे. श्री. सुधीर पत्की यांना सध्या वाहन चालक या पदाची वेतनश्रेणी देण्यात येत असून, त्यांची सेवा लिपीक संवर्गात वर्ग केल्यास लिपीक संवर्गाची व वाहन चालक संवर्गाची वेतनश्रेणी एकच असल्यामुळे त्यांना आर्थिक फायदे होणार नसल्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच त्यांची सेवा ही लिपीक संवर्गात वर्ग झालेचे तारखेपासून त्यांना लिपीक संवर्गात सेवा जेष्ठता लागु राहील.

वैदयकीय मंडळाने केलेली शिफारस तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती) १९८१ चे कलम २७ नुसार विशेष बाब म्हणून श्री. सुधीर पत्की यांची सेवा वाहन चालक संवर्गातून लिपीक संवर्गात वर्ग करण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**मा. सभापती** : स्विकृतीसह मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. सुधीर मधुकरराव पत्की हे वाहन चालक या संवर्गात कार्यरत असून सतत प्रकृती अस्वास्थामुळे त्यांना वाहन चालक या पदाऐवजी office Table Work कार्यालयीन काम करण्यासाठी सक्षम असल्याची वैद्यकीय मंडळाने केलेली शिफारस तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती) १९८१ चे कलम २७ नुसार विशेष बाब म्हणून श्री. सुधीर मधुकरराव पत्की यांची सेवा वाहन चालक संवर्गातून लिपीक संवर्गात वर्ग करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. तसेच त्यांची सेवा ही लिपीक संवर्गात वर्ग झाल्याचे तारखेपासून त्यांना लिपीक संवर्गात सेवा जेष्ठता लागू राहील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.